# THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL
LIBRARY
OU_196120
UNIVERSAL
LIBRARY

OUP—881—5-8-74—15,000.

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M 181·42 Accession No. PG M 183
M 213


Author

Title

This book should be returned on or before the date last marked below.

## ध्यान.

शांताकारं, गगनवसनं, पद्मनाभं, सुरेशं ।
विश्वाधारं, गगनसदृशं, मेघवर्णं, शुभांगं ॥
लक्ष्मीकांतं, कमलनयनं, योगिभिर्ध्यानगम्यम् ।
वंदे विष्णुं, भवभयहरं सर्वलोकैकनाथम् ॥



श्रीक्षेत्र गया येथील फोटोवरून घेतलेली, श्रीविष्णूची मूर्ती.

# सचित्र समाधिशास्त्र

अथवा

# मनोन्नति व आरोग्य.

हें पुस्तक,

**पांडुरंग गोपाळ बाळ महाजन**

यांनीं लिहिलें तें,

**रा. चिंतामण सखाराम देवळे** यांनीं मुंबई वैभव प्रेस,
सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीज् बिल्डिंग, सँढर्स्ट रोड,
गिरगांव–मुंबई येथें छापिलें.

व

**रा. पांडुरंग गोपाळ बाळ महाजन** यांनीं मुंबई, मुगभाट,
जीवनजीची नवी चाळ, चौथा मजला, खोली नं. ५१ येथें प्रसिद्ध केलें.

**यावत्स्वस्थो ह्ययं देहः यावन्मृत्युश्च दूरतः।**
**तावदात्महितं कुर्यात्प्राणान्ते किं करिष्यसि ॥**

सन १९१५

किंमत १–८

मालकानें सर्व हक्क आपणाकडे राखून ठेविले आहेत.

# शुद्धपत्र.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३२ | १९ | देवना | देवानां |
| ३९ | १७ | गुणेषु | परगुणेषु |
| ५४ | २ | एकात्मनौ | एकात्मानौ |
| १६२ | १८ | द्रष्टयाशीं | दृश्याशीं |
| १७९ | ८ | कोट्यवधींत | कोट्यावधींत |
| २१३ | ७ | चुकीनें अर्ध वाक्य राहिलेलें | |

" इंद्रियाणि हयानाहुर्विषयांस्तेषुगोचरान्
आत्मेन्द्रिय मनोयुक्तंभोक्तेत्याहुर्मनीषिणः

---

# अनुक्रमणिका.


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| प्रस्तावना | १–४ |
| मनोन्नति प्राक्तनानें का पुरुषार्थानें ? | ४–८ |
| योगसूत्रें | |
| समाधिपादः | ९–४८ |
| साधनपादः | ४९–१०५ |
| विभूतिपादः | १०६–१३९ |
| कैवल्यपादः | १४०–१७१ |
| कैवल्य म्ह. काय ? | १७२–१७५ |
| शुष्कशास्त्र कशाला ? | १७५–१८४ |
| सृष्ट्योत्पत्ति व हेतु | १८४–१८७ |
| प्राण्यांचीं कर्तव्यें प्रजापति संदेश | १८८–१९७ |
| मानवांकरितांच धर्मशास्त्र | १९७–२०३ |
| तो धर्म आहे कोठें ? | २०३–२०७ |
| पारिभाषिक शब्दांचा खुलासा | २०७–२१२ |
| सुखदुःख कोणाला ? | २१२–२१३ |
| मन आवरण्याचा यत्न | २१३–२१६ |
| ब्रह्मचर्य | २१६–२३४ |
| आसनें | २३४–२४८ |

# प्रस्तावना.

हठ योगांतील प्रयोगांसह व्यावहारिक योग नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केल्या-नंतर, कित्येकांनीं पत्रव्यवहार केला व उलट सुलट प्रश्न विचारिले कीं, व्यवहारांत नशिबापुढें हात टेंकावे लागतात; मग योग आचरून वळेल कसें ? मोक्ष ह्मणजे काय ? प्राणायामाला सुरवात कशी करावी, प्राणायाम साधावा कसा, आसन-स्थैर्य कसें होईल, आत्मदर्शनाला उपाय काय, ईश्वर कसा ओळखावा, योग कसा आचरावा, मन चंचल तें आंवरणें कठीण, तें आंवरण्याला उपाय ह्मणून सुरवात कशी करावी, गृहस्थाश्रम पत्करूनही ब्रह्मचर्य शास्त्रोक्त पाळण्याचे नियम कोणते, ( धातुविकार बंद होण्याला कोणता उपाय योजावा हा पुष्कळांचा प्रश्न होता ) ब्रह्मचर्य पाळण्याचा आमचा विचार आहे, वगैरे वगैरे; व दुसरे अनेक प्रश्न अनेक तऱ्हेनें विचारण्यांत आले. व्यवहाराला धरून प्रत्येक प्रश्नाचें उत्तर यथामाति तर दिलेंच. परंतु शास्त्र पुढें ठेविल्याशिवाय उत्तर पटवितां यावयाचें नाहीं, व पटाव-याचेंही नाहीं, हें मनानें पक्कें घेतलें. सबब, हें शास्त्र ग्रंथावरून समजून घेण्याची उत्कट इच्छा झाली. शास्त्र पाहतां सहज न समजणारें व पारिभाषिक कठीण शब्द त्यांत फार, तेव्हां तज्ज्ञाशिवाय समजणें कठीण.

तपास करितां मुंबई क्राफर्डमार्केट पिकेटक्रासरोड जवळ महाजनवाडींत, मुंबईतील बडे बडे व्यापारी भाट्ये मंडळीच्या साह्यानें चालविलेली भगवत्‌गीता पाठशाळा नांवाची संस्था आढळली. तेथें वेदान्त शास्त्रावर चर्चा चालणारे निर-निराळे वर्ग असून, दर रविवारीं सकाळीं उपनिषद्, व पांतजलयोगसूत्रें या विषयांवर प्रवचनें होत असतात. बारमास एकादशीला प्रवचनाशिवाय, चारी वेद ऐकावयास मिळतात. प्रवचन गुजराथी भाषेंत होत असल्यानें पुष्कळांचा गैर समज होतो कीं, गुजराथी भाषा असल्यानें, आपण कशाला जा. आपली भाषा मराठी, आपणांस समजावयाचें नाहीं. याप्रमाणें माझाही समज झाला होता. व कित्येक दिवस जवळ राहत असूनही, मी तेथें गेलों नाहीं. माझे मित्र रा. गोपा-ळराव आंचवल हे आपल्या बरोबर प्रवचनें ऐकण्यास मला घेऊन जाऊं लागले. प्रत्यक्ष ऐकतांच माझा समज चुकीचा ठरला. व जवळ असूनही बरेच दिवस

## प्रस्तावना.

गेलों नाहीं, ह्याचा पश्चात्ताप वाटला. कारण तेथिल मुख्याध्यापक वेदान्ततीर्थ रा. **नरहर विष्णु गोडसे** शास्त्री हे दक्षिणी असून, इतक्या सुलभ भाषेंत व विषय सोपा करून सांगतात कीं, कोणी कितीही मठ्ठ डोक्याचा असला, व हिंदुस्थानांतील कोणत्याहि मुख्य मुख्य भाषेचा असला ह्मणजे, त्याचे गळीं विषय उतरतोच. हें लिहिण्याचें कारण पुष्कळ लोक मुंबईस येऊन जातात. त्यांनीं एकदां तरी सदर शास्त्रीबुवांचें प्रवचन ऐकावेंच. इतक्या किमतीचें तें असतें. एकदां ऐकल्यानें पुन्हा तो ऐकावयास आल्यावांचून राहणारच नाहीं. व भाषा गुजराथी, हीही सबब तो सांगणार नाहीं. शिवाय तेथील व्यवस्थापकांनीं उत्तम व्यवस्था इतक्या प्रेक्षकांची ठेवलेली पाहून, आनंद वाटतो. हें तेथील व्यवस्थापकांस भूषण आहे.

बरेच दिवस प्रवचनें ऐकून शास्त्र वाचण्यास सुरवात केली. व ज्या ज्या शंका होत्या, त्या तेथील दुसरे दुय्यम अध्यापक, वे. मू. रा. **वैजनाथ लक्ष्मण आठवले** शास्त्री यांस जरी फुरसत फारशी मिळत नाहीं तरी त्यांची पाठ धरून विचारून घेतल्या. त्या त्यांनीं संतोषानें सांगितल्या. त्याजबदल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. सदर पाठशाळेंत वरच्या दर्जाचे सर्व तऱ्हेचे पांढरपेशे बरेच हिंदुलोक येत असतात. व दूरदूरचेही लोक ज्यांना ज्यांना पाठशाळेची माहिती आहे ते ते मुंबईस आले म्हणजे प्रवचनाला मुद्दाम येतात. मी नियमित प्रवचनें ऐकणारा आहें अशी ज्यांची समजूत झाली, त्यानीं मजला असें सुचविलें कीं, जर नोट्स् तयार करून प्रसिद्ध झाल्यास तर त्यांच्या सारख्या ज्यांना सदोदित ऐकण्याची सवड नाहीं, त्यांना ऋषी मुनींचें म्हणणें कळण्यास मार्ग होईल. या कारणास्तव, व व्यावहारिकयोग पुस्तक वाचल्यानें ज्यांच्या शंका म्हणून लोकांनीं पत्रव्यवहार केला, त्यांना शास्त्रोक्त उत्तरें मिळावीं म्हणून हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय माझ्या अल्पसमजुतीप्रमाणें गीताशास्त्र समजण्यास, ह्या पुस्तकाच्या वाचनानें अल्पशी तरी मदत होऊन, सुलभ जाईल असें वाटतें.

अधिकार नसतां हा अव्यापारेषु व्यापार कशाला असें कोणी म्हणतील; परंतु पातंजलयोग सूत्रांवर जे ग्रंथ उपलब्ध आहेत, ते मजसारख्या शिकणाऊमाणसानां, समजण्या इतके सोपे मराठी भाषेंत न आढळल्यामुळें, अशा लोकांना उपयोग व्हावा म्हणूनच हा अल्पसा प्रयत्न केला आहे. विद्वानांकरितां हा ग्रंथ नव्हे, ह

लक्षांत ठेविलें पाहिजे. पुस्तक लिहिल्यावर कोणी तरी चांगल्या शास्त्रसंपन्न माणसानें वाचावें व मग प्रसिद्ध करावें अशी इच्छा धरून एकदोघांवर अवलंबून सहामहिने पर्यंत राहून वाट पाहिली, परंतु कोणी मन घालीना हें पाहून, लिहिलें तसेंच छापून प्रसिद्ध केलें आहे. त्यामुळें चुका असण्याचा, संभव आहे. गीतापाठशाळेंत चांगले चांगले लोक ऐकावयास येतात. प्रवचनें ऐकतात; नोट्स् लिहून घेतात व कोणी कोणी तर सांगणाऱ्याच्या हेतूचा भलताच समज करून घेऊन जातात. असें गीतापाठशाळेंतील शास्त्रीबुवा म्हणत होते. त्याप्रमाणें माझ्या लेखांत जर चुकीचे कांहीं समज असतील तर ते वक्त्याचे नव्हत, तर ते श्रोत्याचे होत, हें कबूल करणें भाग आहे.

पातञ्जलऋषींनीं व्याकरणशास्त्र प्रथम लिहिलें. नंतर शरीरारोग्यासाठीं वैद्यकशास्त्र, व मनोन्नत्तीसाठीं मनाचें शास्त्र लिहिलें. तींच पातंजलयोगसूत्रें या नांवें प्रसिद्ध आहेत.

प्रथम समाधिपाद, मग साधनपाद, तिसरा विभूतिपाद, व चवथा कैवल्यपाद; याप्रमाणें चार पादांत चित्ताचे परिणाम दाखवून सर्व मनाचें शास्त्र गोंविलेलें आहे.

पातञ्जलमुनि हे मननिरोध मुख्य मानणारे आहेत. गोरक्षस्वामी प्राणनिरोध मुख्य मानतात. व हठयोग हें साधन प्राणनिरोधाला उपाय ते सांगतात. यांच्या मतें शरीर मजबूत, निरोगी, मलरहित झालें कीं, तें प्राणधारणेला लायक होतें. व हठ योगानें शरीर मजबूत निरोगी, मलरहित, करितां येतें. अशा तऱ्हेचें शरीर, प्राणसञ्चयाला लायक झाल्यानें, त्यांत प्राण बराच सांठवितां येतो. व प्राणाच्या जोरावर शरीराला स्थिरता आणतां येते. सुलभ उपायांनीं, शरीरस्थैर्य प्राप्त करून घेतां येतें. शरीरांत जर बराच प्राणसञ्चय नसेल तर त्या शरीराला स्थिरता प्राप्त होणें कठीण जातें. व अस्थिर शरीरामुळें ज्ञानतन्तु क्षोभ पावतात. ज्ञानतन्तूच्या क्षोभानें मन एकाग्र करणेस कठीण होतें. त्यामुळें कोणत्याही पदार्थावर एकाग्रता होत नाहीं. नाना वासनांनीं मन भरून जातें. मन वासनांनीं आणि प्राण मनानें नाचत असल्यानें, प्राणांना ताब्यांत घेतलें कीं, मन ताब्यांत आलेंच म्हणून समजावें. कारण मन प्राणाचा गुलाम आहे. ज्यांना प्राणाची क्रिया कळली त्यांना मन दीडदमडीचें आहे. म्हणून हठयोग हा शरीर ताब्यांत आणण्या-


करितां व हठ योगांतील प्रामायाम, हा प्राण ताब्यांत आणण्याकरितां, उपाय ते सांगतात.

पातञ्जलऋषींचें ह्मणणें मन घाबरलें कीं प्राण घाबरतात. मन निर्भय झालें कीं प्राण निर्भय होतात. ह्मणून मनाला प्रथम ताब्यात घेतलें पाहिजे. व तें मन ताब्यांत घेण्यासाठीं क्रिया योग ( **तपःस्वाध्यायेश्वरप्रणिधानानि क्रियायोगः** ) हा सोपा उपाय ते सांगतात. हठानें शरीराला त्रास देऊन प्राप्त होणारा उपाय, ईश्वरप्रणिधान हा सोपा उपाय असतां पाहिजे कशाला असें त्यांचें मत.

हठयोगांत योगाचीं आठ अङ्गे सांगितलीं आहेत. त्यांपैकीं समाधी हें एक अङ्ग, प्रयत्नसामाधीप्राप्यर्थ सांगितलें आहे. परंतु ईश्वरप्रणिधान हा सोपा उपाय सहजसमाधीकारणें कसा होतो पहा.

आपण ओंकारजप, गायन, किंवा स्वाध्याय वगैरे साधनानें ईश्वरभक्ति करावयास बसलों ह्मणजे आपण त्यांत अगदीं गर्क तल्लीन होऊन जातों. मग शरीराच्या प्रत्येक भागाची देवता संतुष्ट होऊन, शरीराच्या प्रत्येक भागाचे परमाणू परमाणू, स्थिर, शांत होतात. व त्यायोगें मनाला प्रसन्नता प्राप्त होते. ( **प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते**) व बुद्धि स्थिर होते. ह्मणजे प्रसन्नतेनें, स्थिरता, मग एकाग्रता, पुढें ध्यान धारणा व सहजसमाधी प्राप्त होतो.

ज्यांना शरीराची अन्तररचना माहित असेल, त्यांस आढळून येईल कीं, डायफ्राम जो आंतील मध्य पडदा तो, सर्प जसा आनंदानें डोलूं लागतो, तसाच तोही पडदा शांत तल्लीनपणें हालूं लागतो. त्याचा परिणाम सर्व शरीरक्रिया संथपणें चालून, प्राणी बेहोष होऊन जातो. कारण मुख्य चाक व्यवस्थित कोणत्याही अडथळ्याशिवाय सजातीय प्रवाहानें एकच गतींत फरकाशिवाय चालू असलें म्हणजे, त्यावर अवलंबून असणारीं सर्व शरीरचक्रें म्हणजे सर्व मशीनची गती व्यवस्थित, जशी पाहिजे तशी चालणारच. डायफ्राम व्यवस्थित झाल्यानें श्वासाचें नियमन व्यवस्थित होतें. किंवा या परस्पराबलंम्बी क्रिया कशा नाजूक, धीमे सुव्यवस्थित चालतात कीं, त्या योगें, मनुष्य देहभान विरून जातो. व हीच स्थिती समाधीनें, शांतचित्तानें मिळवावयाची असते. व हटयोगांतील प्राणायाम ह्याही, हीच स्थिती प्राप्त करून घेण्याकरितां आहे. दोहोंचें साध्य एकच आहे. साधनें म्हणजे




१ मूलाधारकमल किंवा आधारचक्र येथेंच कुंडलिनी आहे. २ स्वाधिष्ठान. ३ मणिपूर ( नाभिस्थानीं ).
४ मनश्चक्र हृत्कंठमध्य ५ अनाहतचक्र ( हृदयस्थानीं ). ६ विशुद्धचक्र ( कंठस्थानीं ). ७ आज्ञाचक्र
( भ्रूमध्यस्थानीं. ). ८ भ्रमरगुहा ( ललाटोर्ध्वमार्गी ). ९ अजरामरचक्र किंवा ब्रह्मरंध्र ( मूर्धस्थानीं. )

वर लिहिलेले पानांचे नंबर व्यावहारिक योग पुस्तकांतले आहेत. फोटो नं. ३ इडा, पिंगला, सुषुम्ना नाड्या दाखवितो. नं. ५ ज्ञान कमलें दाखवितो.

मार्ग मात्र थोड्या फरकानें आहेत इतकेंच. एकाचें साधन प्राणांना ताब्यांत घ्याव-याचें व समाधी साधावयाचा. व दुसऱ्याचें साधन मनानें बुद्धीला प्रसन्न करून घेऊन समाधी साधावयाचा आहे.

**यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते ॥**

**एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति** ॥ [गी. ५.५]

राग, द्वेष, काम, क्रोध, लोभ हे शान्त मनाला म्ह॰ समाधीला अडथळे करणारे शत्रु आहेत. हे डायफ्रामच्या गतींत फरक पाडतात. व सर्व शरीर मशीन हालवून सोडतात. व बिघाड करितात एक गती टिकूंच देत नाहींत. ह्यांच्या योगानें शरीराचे परमाणू क्षोभ पावतात. व बसल्या जाग्यावर न धावतां मनुष्याची धावून आल्यावर जी अस्वस्थता व छातींत धुडधुड होते, तशीच अस्वस्थता व छातींत धुडधुड, या काम क्रोधादिकांच्या योगें होत असते. म्हणूनच म्हटलें आहे.

**त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।**

**कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत्** ॥ [गी.१६.२१]

यांच्या मुळें श्वासोच्छ्वासांत फरक पडतो, मन चंचल होतें. प्राण घाबरतात. बुद्धि ठिकाणीं रहात नाहीं. इतकेंच नव्हे तर, मनुष्य कोपास चढला असतां क्रोधावेशानें कांपूं लागतो. शब्दोच्चार नीट होत नाहींसे होतात नाडीहि वाढते. शरीर आंत व बाहेरून तप्त होतें. परंतु ईश्वरप्रणिधानानें ही सर्व स्थिती बदलते. प्राणी कोपास चढावयाचाच नाहीं. मन शान्त झाल्यानें ते वासनारहित व्हावयास लागतें. व वासना-रहित मन करणें हेंच समाधीपासून साध्य मिळवावयाचें असतें. कारण वासना-रहित मन झाल्यानें सुषुम्ना नाडीनें प्रवेश करण्याला तें लायक होतें; व सुषुम्ना नाडीनें ब्रह्मरंध्र मिळविलें जातें. व ब्रह्मरंध्र मिळविणें तोच मोक्ष होय. म्हणूनच संन्याशाच्या डोक्यावर मरतांना शंख फोडून प्राण त्या मार्गें गेल्याचें भासवितात.

**शतं चैका च हृदयस्य नाड्यस्तासां मूर्धानमभिनिस्सृतैका ।**

**तयोर्ध्वमायन्नमृतत्वमेति विष्वङन्या उत्क्रमणे भवन्ति** ॥ कठोपनिषत्.

ह्याप्रमाणें हे कामक्रोधादि शत्रु हटयोगानें ह्मणजे प्राणायामानें, (गोरक्षस्वामीचें मत ) व ईश्वरप्रणिधानानें, बुद्धीला मनाच्या सहाय्यानें स्थीर करून ह्या शत्रूंचा प्रवेश होऊं द्यावयाचा नाहीं, असें मत पातंजलऋषीचें आहे. पातंजलऋषींनीं आपलें मनाचें शास्त्र, गोरक्षस्वामीच्या प्राणायामविधीचाही स्वीकार करून लिहिलें आहे तेंच हें शास्त्र समाधिशास्त्र होय.

हें शास्त्र समजण्याकरितां, व लोकांच्या शंकांचें शास्त्रोक्त उत्तर ह्मणून ह्यांत जे विषय दिले आहेत ते-मनोन्नति प्राक्तनानें का पुरुषार्थानें; पातंजलऋषीचीं सूत्रें चारी पादांसह; कैवल्य ह्मणजे काय ? नास्तिकांना जरूर नसलेली खटपट ह्मणजे शुष्क शास्त्राची अवश्यकता कशाला; सृष्टोत्पत्ती व हेतू; प्राण्यांचीं कर्तव्यें; प्रजापति आदेश; मानवांकरितांच धर्म शास्त्र; ता धर्म आहे कोठें; पारिभाषित शब्दांचा खुलासा; सुखदुःख कोणाला होतें; चंचल मनाला बंद घालण्याचा धडा; ब्रह्मचर्य आसन, वगैरे.

येणेंप्रमाणें वर दिलेल्या विषयासह, शास्त्रीबुवांचीं प्रवचनें ऐकून, माझा झालेला समज लोकांपुढें ठेवून, मनाचें शास्त्र मनोन्नतिकरितां, लिहिलें आहे. ह्यांत जर कांहीं ग्राह्यांश असेल, तेवढाच रसिकांनीं हंसक्षीरन्यायानें, घ्यावा एवढी विनंति करून ही आपली प्रस्तावना संपवितों.

**—पांडुरंग गोपाळ वाळ महाजन.**

---

## मनोन्नती प्राक्तनानें, का पुरुषार्थानें ? प्राक्तन व पुरुषार्थ; दैववाद व उद्योगवाद.

**सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ।**
**प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥**
**उद्यमः साहसं धैर्यं बलं बुद्धिः पराक्रमः**
**षडेते यस्य तिष्ठंति स सर्वं प्राप्नुयात् पुमान् ॥**

**दैव**—देवस्य इदं दैवं ह्यालाच प्रकृती, स्वभाव, Nature, भाग्य, नशीब, वासना, स्फुरण, पराधीनता (नामर्दता), दैवानें ग्रह फिरविले वगैरे; व पुरुषार्थ ह्म० निग्रह, निश्चय, उद्यम, साहस, मर्दपणा, धैर्य, पराक्रम, परेषां आक्रमः, पराक्रमः दुसऱ्यांना आपल्याकडे आकर्षण्याची ताकत, वगैरे वगैरे ह्मणण्यांत येत असतें.

दैव जड आहे. निद्रित आहे. पण त्यांत अगाध शक्ति आहे. दैववाद हा आळशी, व मूर्ख लोकांचा वाद आहे. उद्यमी, समजू पुरुष, दैववादी नसतात असें नाहीं, परंतु ते ज्ञानतंतूच्या स्फूर्तींच्या वेगांकडे लक्ष पुरविणारे असतात. व तिकडे

ध्यान ठेवितात. अज्ञानी, दैववादानें, आळशी, निरुत्साहि बनून, नामर्दपणाची भाषा वापरीत असतात भर्तृहरी, व तुळशीदास हे दैववादी जरी होते, तरी आळशी व मूर्ख नव्हते. ते ज्ञानी, विरक्तपुरुष असून त्यांनीं प्रकृतीला बरोबर ओळखून घेतली. व तिच्या स्वाधीन ते कधींच झाले नव्हते. आळशी लोकांचें—दैववाद्यांचें ह्मणणें, प्राणी दैवाधीन आहे. तेथें निग्रह ह्म० पुरुषार्थ बिचारा काय करील! दैवापुढें कोणाचें कांहीं चालावयाचें नाहीं. शरीर हें भोगायतनच होय. तर 'ऋणं कृत्वा घृतं पिबेत्' दैवाधीन जर सर्व आहे. तर उगाच हाल कां करून घ्यावे.

प्राण्याचे अन्य जन्मांतील कर्मांचे संस्कार गुप्त असतात. त्या कर्मसंस्कारांचा जो वेग, त्या अनुरूप दैवाचा आघात मनावर होत असतो. त्यायोगें, मनाला चालन मिळून, स्फुर्तीनें बुद्धींत अमूकच करण्याचा निश्चय होऊन, किंवा चलबिचल होऊन, वाणीनें शब्दांत शब्दानें कृतींत, ते आघात उतरत असतात. मनाच्या चलबिचलीनें, मनाचा क्षोभ होऊन, राग, ( विषयप्रीति ) द्वेष, उत्पन्न होतात.

**इन्द्रियस्येन्द्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ ।**
**तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपंथिनौ ॥** [ गी. ३-३४ ]

राग, द्वेष, हे मानवांच्या कल्याणमार्गातील वाटमाऱ्ये आहेत. त्यांच्या अधीन कोणींही होऊं नये, ही गोष्ट खरी; परंतु, प्राणी स्वभावावर जातात, स्वभाव सोडीत नाहींत. कारणः—

**मनोहराणां भोज्यानां युवतीनांच वाससाम् ।**
**वित्तस्य अपि सान्निध्याच्चलेच्चित्तं सतामपि ॥**
**अवश्यं भाविभावानां प्रतिकारो भवेद्यदि ।**
**तदा दुःखैर्न लिप्येरन् नलरामयुधिष्ठिराः ॥**
**पौलस्त्यः कथमन्यदारहरणे दोषं न विज्ञातवा**
**रामेणापि कथं न हेमहरिणस्यासंभवो लक्षितः ॥**
**अक्षैश्चापि युधिष्ठिरेण रमता प्राप्तो ह्यनर्थः कथं**
**प्रत्यासन्नविपत्तिमूढमनसां प्रायो मतिः क्षीयते ॥**

चित्तचल असल्यानें, व भवितव्यतेपुढें कांहींही चालत नसल्यानें, मोठमोठ्यांची वृत्ती स्त्रीविषयसान्निध्यानें, जर ठिकाणीं रहात नाहीं तर, सामान्य जनांची तेथें कथा काय !

पाराशर ऋष्यशृंग विश्वामित्र, नारदादि मुनिवर स्त्रीला कसे भुलले ? दशरथ

धर्मराजा, रावणासारखे, ज्ञाते पुरुषही, का वेडे होते ? पण प्राक्तन फिरल्यावेळी, प्रकृतीच्या ताब्यांत गेले. प्राक्तन फिरले ह्मणून अक्कल खचली ह्मणतात.

मनुष्यप्राणी अशीं सक्त कर्मे आचरीत असतात कीं, त्यांचे संस्कार बहुत जन्मांनीं देखील पुरे पडत नाहींत ह्म० घड्याळाचे स्प्रिंगप्रमाणें स्प्रिंग उलगडून पुसून जात नाहींत. घड्याळाला अलार्म देऊन ठेविलेला असला तर तो अलार्म झाल्यावांचून राहील का ? तसेच, कर्मांचें संस्कार, फलास आल्यावांचून, कसे राहणार ? मुक्तबाणगतिप्राय झालेला तो संस्काररूपी, अलार्म दिलेल्या घड्याळाप्रमाणें, काम केल्यावांचून राहणार नाहीं. ह्मणूनच प्रकृती, प्राण्यांनां स्वस्थ बसूं देणार नाहीं.

हें जरी खरे मानलें तरी, पुरुषार्थवाद्यांचें म्हणणें, दैव म्ह० प्रसंगानुसार शत्रूचा हल्ला आहे. तो टाळतां येणें शक्य आहे. आळशांकरितांच तो आहे. हा जो वाद आहे, तो तत्वान्वेषण करणाऱ्यांचा तो वाद नव्हे. तो आळशांचा आहे. हा वाद नसून वायफळ निरुद्योग्यांचें भकणें आहे. मागील अनिष्टकर्मांनीं भोग पाठीस लागलेले आहेत; मागील जन्मांत भलतींच कर्मे आचरून, जर भोग ओढवून घेतलेले आहेत तर,आतां तरी उद्यमानें, सदसद्विवेकानें ते टाळणें इष्ट नव्हे का ? निदान पूर्वी सोडलेल्या बाणांचा परिणाम आहे असें मानलें, तरि नवीन बाण तयार करून, ते सोडून पुढील आघात टाळण्याच्या उद्योगानें त्यांचाहि वेग कमीच होईल ही गोष्ट कबूल करणें दैववाद्यानां भाग आहे. कारण अंगावर बाण येण्यापूर्वी, आपली खंबीर तयारी असली म्हणजे, शत्रूहि दचकत असतो, व त्याच्या बाणाचा वेग, त्या दमावरच कमी पडतो, असा अनुभव आहे.

आपलें शरीर हेंच मुळीं प्राक्तनाचा पुतळा आहे खरा, पण ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं '**नर ऐसी करणी करे तो नरका नारायण बनजाय.**'

करणी बगर उलथापालथ नाहीं. उलथापालथीशिवाय दैव फिरणार नाहीं. "**साहसे लक्ष्मीः प्रतिवसतिस्म**" असेंच ह्मणतात. लक्ष्मीला कांहीं दैव आणून घरीं पोंचती करून देणार नाहीं. "असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी" पण केव्हां थकूनभागून कष्टल्यानंतर, ह्मणजे उद्यमानंतर. आंधळ्याला दैवानें रस्त्यांत ठेंच लागून लक्ष्मी मिळाली तरी तिचा योग्य वापर करून, तिला खूष करून, पचविणें, उद्यमावरच राहणार. एवढ्याचकरितां ह्मटलें आहे.

**उद्यमः साहसं, धैर्यं बलं, बुद्धिः पराक्रमः ।**
**षडिमे यस्य तिष्ठंति स सर्वं प्राप्नुयात् पुमान् ॥**

**अर्थ**—उद्यमानेंच सर्व कांहीं पुरुषाला मिळेल. नामर्दाला नव्हे. ह्मणूनच गीतेंत सांगितलें आहे. उद्यमानें आपली उन्नती करून घ्यावी. अधोगतींत लोटून घेऊं नये.

**उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।**
**आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैवरिपुरात्मनः ।।** गीता ६. ५.
**आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महारिपुः ।**

आळसानें दैववादी माणसें प्रकृतीचे गुलाम बनतात. प्रकृतीला दैवाचे नियम पाळावे लागतात. नियमानुसार वागावें लागतें हें खरें, पण परमात्मा प्रकृतीला स्वाधीन ठेवित असतो. परमात्म्यानें प्राक्तन तयार केल्यानंतर जरी शरीर धारण केलेलें असलें तरी, **प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ॥**

उद्यमानें, जर नराला नारायण होतां येतें, तसेंच उद्यमानें प्रकृतीला वश न होतां, प्रकृतीला ह्म. प्राक्तनाला स्वाधीन ठेवितां आलें पाहिजे. प्रकृतीवर जर ईश्वराचा ताबा चालतो, व मनुष्य हा प्राणी ईश्वरी अंशच आहे, तर त्याला प्रयत्नानें, तिच्यावर सत्ता ठेवितां कां येऊं नये, आलीच पाहिजे. ईश्वराचा जर प्रकृतीवर ताबा चालणार नाहीं तर ईश्वरावर अनीश्वराचा प्रसंग येईल.

प्रकृती ही लंगडी, लुली, आंधळी, आहे. जसा एखादा शेट लुला असला तर, तो आपला कारभार नोंकरांमार्फत चालवितो; त्याचप्रमाणें प्रकृती आपले कारभार राग, द्वेष, या चाकरांमार्फत करिते—चालविते.

लोकामध्यें निष्ठा दोन प्रकारच्या आहेत. मोक्ष मार्गाकडे जाण्याला दोन रस्ते आहेत. एक ज्ञानमार्ग व एक कर्ममार्ग. गाडी चालवावयास दोन बैल लागतात. पक्ष्याला दोन पंख असतात. एक पंख जर कापून टाकला तर पक्ष्याला उडतां येत नाहीं म्हणतात. त्याचप्रमाणें प्राक्तन व उद्योग हे प्राण्याचे दोन पंख आहेत. प्राक्तन हा डावा पंख होय. व तो आळशी सुस्त धीमा आहे. उद्योग हा उजवा पंख आहे. तो चलाख, तरतरीत, इकडचें तिकडे करून टाकणारा आहे. हे दोन्ही ईश्वराचेच हस्तक आहेत इश्वराचे कायदे आहेत. दैवाशिवाय शरीर नाहीं पुरुषार्थाशिवाय मोक्ष नाहीं.

प्रकृतींत जी काय शक्ती आहे ती वर सांगितली तिच्या दोन चाकरां मार्फत तिला आलेली आहे. त्या शक्तीच्या ताब्यांत जावें का न जावें. ह्याचा विचार करण्याला प्राणी स्वतंत्र आहे. म्ह. इंद्रियनिग्रह करण्याला आपण स्वतंत्र आहोंत प्रकृतीला वश होणें हा आपला मूर्खपणा आहे. तिला ताब्यांत ठेवणें हा शहाणपणा आहे.

राग द्वेष उत्पन्न करणें तेथ पर्यंत प्रकृतीची शक्ती आहे. गाढव जर प्रसन्न होऊन म्हणूं लागलें कीं माझ्या पाठीवर बैस, मी तुला त्रास न देतां कसा पण

हिंडवीन! या ठिकाणीं बसणें वा न बसणें या बाबतींत स्वतंत्रता आहे. गाढवाला वश होणें ही हृदयदुर्बलता आहे. इंद्रियनिग्रह, हा पुरुषार्थ आहे. हा संपत्तीचा रस्ता आहे.

दैवाचा आघात दैवाचे चाकरां मार्फत मनावर होऊन, क्षोभ उत्पन्न होतो. व शास्त्रनिषिद्ध कर्मे करण्यास प्राणी प्रवृत्त होतो. व ढकलतो मात्र दैवावर; परंतु उद्यमानें दैव फिरवितां येतें. उद्यमानें धर्माकडे व आळसानें अधर्माकडे प्रवृत्ति होते. धर्माचरणानें चित्त स्वच्छ होत असतें. अधर्माचरणानें त्या चित्तावर मालिन्य येतें. व प्राणी घोटाळ्यांत पडतो; मग सदसद्विवेक रहात नाहीं. उद्यम हा उजवा पंख व दैव हा डावा पंख असल्यानें, ज्या पंखाच्या बाजूनें जोर होईल त्या बाजूला प्राणी ओढला जाईल. ह्मणून निग्रह ह्म. पुरुषार्थानें, दैव फिरवितां येणें शक्य आहे. धर्माचरणावर द्वेष व अधर्माचरणावर प्रीति येते, त्याला आळा घालणें हाच पुरुषार्थ होय. कुपथ्याचे पदार्थ खाल्ले तर रोग्याला मरण ही धास्ती असल्यानें जसे तो ते सोडून देतो; तसेंच निषिद्धआचरणाचे दुःखद परिणाम ध्यानांत आणून, ते सोडावे लागतात. राग, द्वेष, प्रकृतीचे चाकर, हे चोर आहेत. हे सर्व शहाणपण हरून नेत असतात. गतजन्मांत राग द्वेषावर ताबा न ठेविल्यानें, भोग पाठीशीं लागले, ते टाळण्याकरिता ह्या चालू जन्मांत त्यांना ताबींत ठेवणें शहाणपणाचें आहे.

दैववाद्यांच्या मताप्रमाणें दैवावरच जर भरंवसा ठेऊन उगाच बसावयाचें तर हेच दैववादी आजारी पडले असतां ह्यांनीं औषध तरी कां घ्यावें ? व वैद्याचें पथ्य कां पाळावें. मरणाच्या भीतीनें रोगी जसें पथ्य आचरितो, तसेंच धर्माचरण व उद्यम पुढील हितपरिणाम ध्यानांत घेतां हें पथ्यच आहे. अधर्माचरण व आळस हें कुपथ्य आहे. नाहीं तर शरीरसंस्थानाश हा ठेवलेलाच. ह्मणूनच प्रकृतीच्या ताब्यांत गेल्यानें नाश आहे. दैवाधीनता सोडून उद्योगाधीन होऊन, पक्ष्याप्रमाणें उजव्या मार्गाकडे वळून डाव्या मार्गाकडील दैवाला फिरवितां येणें शक्य आहे.

उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः
दैवेन देयमिति कापुरुषा वदन्ति ।
दैवं निहत्य कुरु पौरुषमात्मशक्त्या
यत्ने कृते यदि न सिद्ध्यति कोऽत्र दोषः ॥

# योगसूत्राणि ।

## समाधिपादः ॥ १ ॥

### अथ योगानुशासनं ॥ १ ॥

अथ, योग-अनुशासनं ।

अथ हा-ग्रन्थारंभींचा आरंभवाचक शब्द; **योग**-'युज् समाधौ.' **शासन**-शास्त्र " मंगलानंतरारम्भप्रश्नकार्त्स्न्येष्वथो अथ. " अथ व अथो शब्दांचा उपयोग ग्रन्थारंभीं किंवा मंगलवाचक वगैरे वगैरे आहे. मंगल, अनन्तर, आरम्भ, प्रश्न, कार्त्स्न्य (म्हणजे सर्व). अथ शब्द मंगलवाचक असल्याबद्दल दुसरा पुरावा.

**ओंकारश्चाथशब्दश्च द्वावेतौ ब्रह्मणः पुरा ।**
**कंठंभित्त्वा विनिर्यातौ तस्मान्मांगलिकावुभौ ॥**

अथ शब्द आरम्भवाचक असल्यानें सूत्र, योगानुशासनमथ (प्रारभ्यते) असें वास्तवीक पाहिजे होतें. परंतु, समजा, कांहीं स्त्रिया गंगेवर स्नान करून कुंकुं लावून घडे भरून डोक्यावर घेऊन येतांना जर समोर आल्या, तर तो शुभ शकून समजला जातो, त्याचप्रमाणें ग्रंथारंभीं अथ शब्द ठेविल्यानें सौभाग्य सूचित होतें, म्हणून आरंभींच अथ शब्दाचा उपयोग केलेला आहे. अनुशासनं— अनु म्हणजे पश्चात्, पुनः, अनुकरण.

योग या शब्दाचे अर्थ दोन प्रकारचे आहेत. १ युज् समाधौ म्हणजे योग व समाधी हे जवळ जवळ समानार्थक शब्द आहेत. ' सम्यक् आधीयते मनः अत्र ' Well fixed position of the mind चित्ताची अचंचल अवस्था हा त्याचा अर्थ होय.

२ युजियोंगे. म्हणजे युज्=जोडणें, जुळवणें.

याज्ञवल्क्यांनीं--संयोगो योग इत्युक्तो जीवात्मपरमात्मनोः--

जीवात्मा व परमात्मा यांच्या संयोगाला योग म्हटलें आहे.

परंतु आयुर्वै घृतं म्हटलें म्हणजे जसें घृत हें साधन आयुष्याचें, घृत हें आयुष्य नव्हे; तसेंच योग हें जीवात्मा परमात्म्याचे संयोगाचें साधन म्हटलें पाहिजे; म्हणजे चित्तवृत्तिनिरोधाला योग हें साधन म्हटलें पाहिजे.

**उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ॥**
**यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥** [ गी. अ. १५. १७. ]

एकच पुरुष उपाधि स्थितींत जीवात्मा व निरुपाधिक स्थितींत परमात्मा म्हणजे; चित्ताच्या उपाधीनें तोच जीवात्मा व निरुपाधिक स्थितींत परमात्मा; म्हणजे एकच पुरुषाच्या दोन अवस्था अद्वैतमतानें मानल्या पाहिजेत.

योग यांत धातु युज् जोडणें घेतल्यास जोडावयाच्या वस्तु दोन असल्या पाहिजेत असा अर्थ निघतो. परंतु वस्तु एकच ( अद्वैतमत ) असल्यानें जोडणें असा अर्थ न घेतां उपाधीरूपी मळ काढून टाकून ईश्वराला ओळखणें असा घेतला पाहिजे; कारण जीवात्मा व पुरुषविशेष ईश्वरः अद्वैतवाद्यांच्या मतें सोपाधिक, व निरुपाधिक, जीवात्मा, परमात्मा होय. अद्वैतवादी अन्तःकरणाच्या उपाधिपरत्वें जीवात्म्याचें अनेकत्व दाखवितात.

द्वैतमतवादी दोन निरनिराळे जीवात्मा व परमात्मा मानून त्यांची गांठ करणें-जोडणें एक जीव करणें हें मत प्रतिपादितात.

त्या उपाधी ह्मणजे आलेला मळ ओळखून जसें आरशावरील धुरळा काढिला कीं धुरळ्यांचे आंत आरसा लख्ख असतो; तसेंच मळरूपी चित्ताच्या उपाधी ओळखून त्या काढून टाकणें ह्मणजे ईश्वर ऐक्य पावणें होय.

तात्पर्य युजियोंगे नव्हे तर—

**तं विद्याद्दुःखसंयोगवियोगं योगसंज्ञितं ।**
**स निश्चयेन योक्तव्यो योगो निर्विण्णचेतसा ॥** [ गी. अ. ६. २३. ]

ह्मणजे चित्तमलापहार हेंच योगाचें साध्य, तेव्हां योग ह्मणजे जोडावयाचें नसून मळरूपी उपाधी तोडावयाच्या असतात. वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें उपाधिरूपी मळाला तोडून टाकून मूळ स्वरूप ओळखावयाचें ह्मणजे उपाधि तोडून टाकून समत्व मिळवावयाचें तीच एकरूपताः—

**योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय ।**
**सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते** ॥[गी.अ.२.४८]

किंवा **योगः कर्मसु कौशलं** कर्मफळाचा मळ न चढूं देणें अशा कुशलतेनें जें कर्माचरण तो योग होय.

ह्या योगाचा वक्ता ह्मणजे उपदेष्टा हिरण्यगर्भ ह्मणजे ब्रह्मदेव आहे. "हिरण्यगर्भो योगस्य वक्ता नान्यः पुरातनः" असें याज्ञवल्क्यांचे मत आहे.

ब्रह्मदेवानें जें शास्त्र घालून दिलें, त्याचेंच अनुकरण आह्मीं करीत आहों. आमचें स्वतःचें तें नव्हे, याप्रमाणें पतंजलि भगवान् अनुशब्दानें आपली लीनता दाखवितात.

**सूत्रार्थः**—( १ ) आतां येथून योगशास्त्राला ह्मणजे समाधिशास्त्राला आरंभ करितों.

## योगश्चित्तवृत्तिनिरोधः ॥ २ ॥

योगः चित्त–वृत्ति–निरोधः

चित्तवृत्ती त्या कोणत्या व निरोध कसा करावयाचा व कां करावयाचा याच्याबद्दल पुढें सूत्रें येणारीं आहेत. वरील सूत्रांत सर्व चित्तवृत्तिनिरोधः असा पाठ नसल्यानें योगाला ह्मणजे समाधीला अहितकारक अशा वृत्तींचा निरोध समजावयाचा. संप्रज्ञातसमाधि सत्ववृत्तींनेंच सिद्ध होतो. यावरून संप्रज्ञातसमाधि ज्यांत सत्ववृत्तीच काय ती जागृत असते; त्या वृत्तीचा निरोध ग्रंथकाराला असंमत असला पाहिजे असें दिसतें. कारण हा समाधिपाद उत्तम अधिकाऱ्यासाठीं सांगितला असतांही सर्व तऱ्हेचा निरोध सांगितला नाहीं तथापि पुढील एकंदर ग्रंथांतील सूत्रांवरून हेंही दिसतें कीं, ज्यांना याच्याही पुढें जावयाचें असेल त्यांच्या करितां संप्रज्ञात समाधींतील सत्ववृत्तींचाहि निरोध ग्रंथकारांनीं सांगितला आहे इतकेंच नव्हे तर तो मुख्य आहे व त्याच्या सिद्धि करतां संप्रज्ञाताला हि " योग " ह्मणून ती एक पायरी मानली आहे.

जगांतील प्रत्येक सृष्टवस्तु मग ती चर असो वा अचर असो, स्थूल असो वा सूक्ष्म असो, त्या सर्वांचें अधिष्ठान ब्रह्म, जी सद्वस्तु ती "**सदेव सोम्येदमग्र आसीत् । एकमेवाद्वितीयम्**"( छांदोग्य ) असल्यानें प्रत्येक वस्तूचा त्या आपल्या उत्प-

त्तिस्थानीं–मायघरीं जाऊन पोंचण्याचा कल दिसतो; ह्मणजे चित्ताचा स्वभाव शांतता, सत्यता त्या मूळ स्वभावाप्रत जाण्याचा कल, माहेरीं जाण्याचा कल खरा, परंतु मार्गांतील विषयांस मोहित होऊन सासऱ्यांकडील माणसांत पुष्कळ दिवसांच्या सहवासांत मुरल्यानें बहुत जन्मापासून संवकलेलीं इंद्रियें त्या चित्ताचे हेतु सफल होऊं देत नाहींत; वाटेंत मोहक वस्तूंकडून अडथळे येतात. त्यामुळें इष्ट टाकून अनिष्टाकडे वळण्याचा प्राणीमात्राचा कल झाला आहे.

व्यास भगवानांनीं भागवत लिहिलें; नंतर तें तपासण्यासाठीं जैमिनी जो त्यांचा शिष्य त्यांस सांगितलें व म्हणाले ह्यांत कांहीं चूक असल्यास तपास. जैमिनीनें तें पसंत केलें परंतु एकच चूक दुरुस्तीकरितां काढिली कोणती? तर "बलवान् इन्द्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति." जैमिनीचे म्हणणें बलवान् इन्द्रियग्रामो विद्वांसं नापकर्षति असें योग्य होईल असें होतें. व्यासांनीं तें लक्ष्यांत घेऊन जैमिनीला सांगितलें "याचा विचार करूं."

कांहीं काळानंतर व्यासांनीं मोहिनीरूप धारण केलें, मोहक स्त्रीरूप धारण केलें, व ज्या ठिकाणीं जैमिनीचा आश्रम होता, तेथें, पाऊस पडत आहे अशा वेळीं, ही सुस्वरूप स्त्री त्यांच्या आश्रमाजवळ गेली. त्या जैमिनीनें तें मनोहर रूप पाहून, पावसानें भिजत आहे त्यामुळें आश्रमांत त्या स्त्रीला बोलाविलें. त्या स्त्रीला पाहून जैमिनीचे मनाची चलबिचल झाली, व ग्रंथवाचनांत गुतलेले मनाची चलबिचल स्पष्टपणें दिसूं लागली. त्या स्त्रीला आश्रमांत राहण्याचा जैमिनी आग्रह करूं लागले. मोहित झाल्यानें त्या स्त्रीला आलिंगन देण्याच्या बेतांत जैमिनी येत आहेत इतक्यांत व्यासानीं आपलें दाढीवाल्याचें रूप प्रगट केलें व विचारिलें बलवान् इन्द्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति वा नापकर्षति? जैमिनीला व्यासांचें म्हणणें कबूल करावें लागलें.

**सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ।**
**प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥** [गी. अ. ३. ३३.]

सारांश अनेक जन्मांच्या सहवासानें जबरदस्त इंद्रियें चित्ताला ओढून प्राण्याला मग तो विद्वान् असला विचारी असला तरी सुद्धां दुःखदायक खोट्या, पण दिसण्याला मोहक अशा वस्तूकडे लोटण्याला कारण होतात.

**यततोह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चितः ।**
**इन्द्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः ॥** [गी. अ. २. ६०.]
**चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद् दृढम् ।**
**तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥** [गी. अ. ६. ३४.]

म्हणून चित्ताला इन्द्रियांच्या आधीन होऊं न देण्यांकरितां त्या चित्ताचा निरोध केला पाहिजे. व निरोधासाठीं अभ्यास व वैराग्य पाहिजे.

चित्ताच्या पांच अवस्था आहेत. त्या–क्षिप्त, मूढ, विक्षिप्त, एकाग्र आणि निरुद्ध.

१ **क्षिप्त**–ज्या अवस्थेमध्यें रजोगुणाचें प्राधान्य असतें; व सत्व व तम हे गुण दबलेले असतात त्या अवस्थेस क्षिप्तावस्था म्हणतात. प्रत्येक माणूस कार्यकर्ता ह्या रजोगुणामुळें होतो. ह्या अवस्थेमध्यें हें करीन तें करीन हें मिळवीन तें मिळवीन अशी चित्ताची चंचलता कृतींत असते.

**रजो रागात्मकं विद्धि तृष्णासंगसमुद्भवं ।**
**तन्निबध्नाति कौन्तेय कर्मसंगेन देहिनम् ॥** [गी. अ. १४. ७.]
**इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् ।**
**इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ॥** [गी. अ. १६. १३.]

२ **मूढ**–या अवस्थेमध्यें तमोगुणाचें प्राबल्य असतें. दुसरें सत्व रज चोरासारखे दबलेले असतात. जेवणानंतर सुस्ती येणें, झोंप येणें, काम करण्याचा आळस हे प्रकार ह्या अवस्थेंत आढळतात.

**तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम् ।**
**प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत ॥** [गी. अ. १४. ८.]

३ **विक्षिप्त**–ह्या अवस्थेमध्यें रजोगुणाचें प्राबल्य असून मधून मधून सत्व गुण डोकावत असतो. उदारण–न्यायाधिशापुढील केस चालू असतां अपराध्यास शिक्षा करावी असें वाटत असतें, परंतु मधून मधून सत्व गुण दया सुचवितो.

४ **एकाग्र**––ह्या अवस्थेंत रजोगुण व तमोगुण नष्ट होतात. सत्त्वगुण वाढतो. ह्यास उदाहरण–लोहार बाणाचें अग्र तयार करीत होता, त्याच्या दुकानावरून राजाची स्वारी वाद्य नृत्य नर्तनासह, रस्त्यांतून गेली असतांही, तो त्या अग्रांत गुंतला असल्यानें त्या स्वारीची त्याला खबरही पडली नाहीं. अशा प्रकारची

मनाची स्थिती बराच काळ टिकणें व अभ्यासाचे सवईनें प्रयत्ना शिवाय मनाची सहज एकाग्रता होणें म्हणजे मनाचा तो ( एकाग्रावस्था ) धर्मच होऊन जाणें ह्या चित्ताच्या अवस्थेस एकाग्रावस्था म्हणतात. व ह्याच अवस्थेस संप्रज्ञात समाधि, सवितर्क समाधि, सबीज वगैरे नावें आहेत;

ह्या अवस्थेंत वस्तूचें म्हणजे ध्येयाचें सम्यक् योग्य ज्ञान असतें. सम्यक् प्रज्ञायते भावस्य रूपं इति ह्या अवस्थेस सबीज समाधीही म्हणण्याचें कारण रजोगुण व तमोगुण बीजरूपानें, न भाजलेल्या चण्या प्रमाणें, मनामध्यें दबलेले असतात. चण्यांला ज्याप्रमाणें पाणी व हवा यांच्या संयोगानें मोड ( शृंग ) येतो, त्याचप्रमाणें इंद्रियें व विषय यांच्या संयोगानें रजोगुणाचें कार्य चण्याच्या मोडाप्रमाणें सुरू होतें. ह्या संप्रज्ञात अवस्थेंत जगाचें ज्ञान असल्यानें, म्हणजे पाहिजे त्या दूरच्याही वस्तूचें यथायोग्य ज्ञान होत असल्यानें जर ती वस्तु मनाला रम्य वाटली तर तिच्या विषयीं प्रीति उत्पन्न व्हावयाची, म्हणजे इंद्रियें व विषय यांच्या संयोगानें लालसा उत्पन्न होऊन त्यांत मन आसक्त होण्याचा संभव असतो. म्हणून एकाग्रावस्था ही अभ्यासांतील मुख्य ध्येय नव्हे तर ती एक पायरी आहे.

या पुढील असंप्रज्ञात योग होय. त्याचा उल्लेख पुढें येणार आहे. हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, ह्या वरील क्षिप्त, मूढ, विक्षिप्त, व एकाग्र या चारी अवस्थां-पैकीं कोणत्याही अवस्थेंत सत्व, रज व तम हे तिन्हीं गुण कमजास्त प्रमाणांत असावयाचेच.

**५ निरुद्धावस्था**—ह्या अवस्थेमध्यें सत्वगुणाचा लय साफ झालेला असतो, मात्र सत्वगुणाचे संस्कार ( ठसे=Impressions ) च मनावर राहिलेले असतात. संप्रज्ञातसमाधीमध्यें ध्येयाचें ह्मणजे ध्यानविषयाचें, ध्यानाकरितां मूर्ती वगैरे जें घेतलें असेल त्याचें ज्ञान राहिलेलें असतें, त्यामुळें कदाचित् तें विषयांचें ज्ञान रज तम गुणांना उठवील; तसें ह्या निरुद्धावस्थेमध्यें ध्येयाचेंही ज्ञान नसतें. चित्ताची अवस्था आत्मस्वरूपाकार झालेली असते, ही अवस्था म्हणजे असंप्रज्ञात योगच होय. या निरुद्ध व एकाग्रावस्था मिळून समाधींतील दोन पायऱ्याच झाल्या. १ रजोगुण व तमोगुण यांचा निरोध, ज्यास संप्रज्ञात अवस्था म्हणतात. २ तिन्हीं गुणांचा निरोध, ज्यास निरुद्धावस्था योग म्हणतात.

**सूत्रार्थः**—२ चित्तवृत्तींचा निरोध करणें यासच योग ही संज्ञा आहे.

## तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम् ॥ ३ ॥

तदा-चित्तवृत्तीच्या निरोधकळांत, द्रष्टुः—पाहणाऱ्याची ( आत्म्याची ), स्वरूपे-स्वरूपामध्यें, अवस्थानम्-स्थिति.

आत्मा स्वयंप्रकाशित, शुद्ध, बुद्ध, निरंजन निर्विकार आहे. त्यास स्फटिक मण्याची उपमा देतात. स्फटिक मण्यासारखा आहे जसजसे निरनिराळे रंग त्याच्या सांनिध्यांत आणावे, तसतसा तो रंगीबेरंगी आपल्याला दिसतो. वास्तविक कोणताच रंग त्याला शिवत नाहीं, त्या रंगाचें सांनिध्य नाहींसें झालें कीं तो शुद्ध स्वप्रकाशच आहे ह्मणून रंग दाखविणाऱ्या चित्ताच्या वृत्तीचा संयोग विषय सांनिध्य दूर झाल्यानें तो चिन्मात्र ह्मणजे सत् चित् आनंदरूपी आहे.

क्षुब्ध झालेल्या तळ्यांतील पाणी शांत होऊन अगदीं स्थीर झालें व क्षुब्धावस्था मोडून शांतावस्था प्राप्त झाली कीं जसा त्या तळ्याचा तळ दिसतो; त्याचप्रमाणें चित्तावरील तरंग शांत झाले ह्मणजे चित्ताची स्थिरता झाली कीं चित्ताचा तळ जें आत्मस्वरूप त्याचें दर्शन होतें. चित्तावर क्षुब्धतेनें अनेक तरंग उत्पन्न होत असल्यानें चित्त तरंगाकार होऊन स्वरूपदर्शन होत नाहीं; तेंच शांत झाल्यानें त्याचें खरें स्वरूप दिसतें. ह्याच न्यायानें शुक्तिकेवर रुप्याचा भास, रज्जूवर सर्पाचा भास, परब्रह्मावर जगताचा भास होतो. परंतु भ्रम निरास झाल्यानें खरें स्वरूपच दिसणार—

**सूत्रार्थः**—चित्तवृत्तींच्या निरोधकाळीं आत्मा स्वरूपामध्यें मग्न असतो ॥ ३ ॥

## वृत्तिसारूप्यमितरत्र ॥ ४ ॥

वृत्ति-सारूप्यम्, इतरत्र.

समानं रूपं यस्य सः सरूपः ।

सरूपस्य भावः सारूप्यम् ।

इतरत्र=अन्यकालीं, व्युत्थान अवस्थेंत.

लोखंडाचे निरनिराळ्या आकाराचे तुकडे घेऊन ते तापविले तर त्या तापविलेल्या लोखंडांत अग्नीचा आकार त्या लोखंडाच्या तुकड्यांच्या आकाराबरहुकूम दिसतो. वास्तविक अग्नीला आकार नाहीं. तसेंच चित्तांत उठलेल्या तरंगाच्या

रंगाच्या आकाराप्रमाणें आत्म्यावर निरनिराळे रंग चित्ताच्या सांनिध्याच्या उपाधीनें भासतात. म्हणून चित्तवृत्तिनिरोध केलेला नसेल, अशावेळीं आत्म्यावर आकाराचे रंगाचे, सुखःदुखाचे आरोप केले जातात. यास्तव आत्म्यावर आरोप ज्या चित्तवृत्तींच्या उपाधींनी होतो, त्या चित्ताच्या वृत्ती कोणत्या त्या पुढील ५ व्या सूत्रांत सांगतात.

**सूत्रार्थः**—वृत्तींच्या निरोधकालाव्यतिरिक्त ( अन्यकालीं ) आत्मा वृत्तीच्या समानाकार झालेला भासतो [ दिसतो ]

## वृत्तयः पञ्चतय्यः क्लिष्टा अक्लिष्टाः ॥ ५ ॥

क्लिष्टः—दुःखदायक, अक्लिष्ट न दुःखदायक म्हणजे सुखदायक पञ्चतय्य—पञ्च आणि तयप् तयप् प्रत्यय हा अवयवार्थी आहे; पंञ्चावयवी चित्राच्या वृत्ति.

**सूत्रार्थः**—चित्ताच्या वृत्ति पांच प्रकारच्या दाखविल्या जातात व त्यांपैकीं कांहीं सुखदायक आहेत व कांहीं दुःखदायक आहेत म्हणजे त्याच वृत्ति कधीं दुःखदायक होतात व कधीं विशेष परिस्थितींत सुखदायक होतात. **उ.** थडीच्या दिवसांत उष्णता प्रिय, तीच उष्णतेच्या दिवसांत अप्रिय ॥ ५ ॥

त्या पांच प्रकारच्या वृत्ति कोणत्या त्या सांगतात.

## प्रमाणविपर्ययविकल्पनिद्रास्मृतयः ॥ ६ ॥

**प्रमाण**—प्रमा म्हणजे ज्ञान, ज्ञानाचें जें करण ( साधन ) तें प्रमाण प्रमीयते ( जाणलें जातें ) अनेन तत् प्रमाणं; ज्याच्या योगानें जाणलें जातें तें प्रमाण.

**सूत्रार्थः**—प्रमाण, विपर्यय, विकल्प, निद्रा व स्मृति, अशा ह्या पांच प्रकारच्या वृत्ति होत किंवा वृत्तींचे अवयव पांच आहेत ॥ ६ ॥

प्रमाणवृत्ति व त्या प्रमाणाचे प्रकार सांगतात.

## तत्र प्रत्यक्षानुमानागमाः प्रमाणानि ॥ ७ ॥

**प्रत्यक्षंः** अक्ष्णः—समक्षं प्रत्यक्षं, डोळ्यांदेखत घडणाऱ्या गोष्टी ज्यांस पुराव्याची जरूरी नाहीं तीं प्रत्यक्षप्रमाणें.

**अनुमान**—( तर्क ) तर्कानें जाणून मनाची खात्री पटणारीं प्रमाणें. उ. ह. "यत्र यत्र धूमस्तत्रतत्र वान्हिः" लांवून एका ठिकाणीं धूर दिसत आहे आग लागल्याचा बोभाटा आहे तर जेथें धूर दिसत आहे तेथेंच ती आग असली पाहिजे.

**आगम**—ह्मणजे वेदवाक्यें किंवा आप्तवाक्यें ऋषिमुनींनीं अनुभव घेऊन जें यथार्थ अनुभविलें व पुढल्यांकरितां ह्मणून लिहून ठेविलें; अशीं जीं वाक्यें तीं आप्तवाक्यें होत व त्यांसच आगम प्रमाण ह्मणतात. जे कधींही खोटें बोलणारे नाहींत, अशी आपली खात्री असते त्यांचें सांगणें प्रमाण ह्मणून मानलें जातें, तींच आप्तवाक्यें होत. " **आप्तस्तु यथार्थवक्ता** " [ तर्क संग्रह. ]

**सूत्रार्थः**—प्रत्यक्ष, अनुमान, आगम हीं तीन प्रमाणें होत.

## विपर्ययो मिथ्याज्ञानमतद्रूपप्रतिष्ठम् ॥ ८ ॥

विपर्ययः-मिथ्याज्ञानम्, अतद्रूपप्रतिष्ठम्.

विपर्ययः-खोटें ज्ञान, अतद्रूपप्रतिष्ठतम् न तद्रूपम् अतद्रूपम्, अतद्रूपे प्रतिष्ठा यस्य तम्.

पुस्तकाचें पुस्तकरूपानें ज्ञान होणें तें तद्रूप ज्ञान. रस्त्यांत चालतां चालतां शिंप पडलेला पाहून रुप्याचें नाणें पडलें आहे असा भास होणें, अंधारांतून चालतांना अंधुक उजेडानें दोरी न भासतां सर्प भासणें हें अतद्रूप ज्ञान, खोटें ज्ञान होय. "इदं स्याद्वा न स्याद्वा; स्थाणुर्वा पुरुषो वा" अशा प्रकारच्या भ्रांतिज्ञानाला विपर्यय म्हणतात.

**सूत्रार्थः**—भलत्याच वस्तूवर अन्य वस्तूचा आरोप करणें या मिथ्या ज्ञानाला विपर्यय ह्मणतात.

## शब्दज्ञानानुपाती वस्तुशून्यो विकल्पः ॥ ९ ॥

शब्दज्ञान, अनुपाती, वस्तुशून्यः, विकल्पः

शब्दज्ञानेन अनुपतति ( प्राप्त होतो ) इति शब्दज्ञानानुपाती.

शाब्दिक मात्र ऐकण्यांत येणारा पदार्थ, अर्थिक म्हणजे खरा खुरा न मिळणारा, वस्तुशून्यः—वस्तूचा अभाव;

**उदाहरण**—अमूक एक वटवृक्षावर भूत आहे; असें शाब्दिक ज्ञान होतें; परंतु भूतें ही वस्तु खरीखुरी कदाचित् असेल पण सहज दिसणारी नाहीं; तरी पण काल्पनिक भितीनें मात्र त्या वृक्षाजवळ कोणी जात नाहीं.

**घंटा राक्षसाची गोष्टः**-एका डोंगरावर एक घंटाराक्षस आहे तो माणसें खातो अशी खबर उठली. राक्षसाच्या भीतीनें त्या डोंगराजवळ जाण्याला लोकांना भीति उत्पन्न झाली. त्या भीतीला पुष्टी आली ती अशी—

एक चोर देवळांतील एक घंटा चोरून जंगलांतून पळत जात होता; त्यास वाटेंत वाघानें खाल्लें; त्या चोराजवळची ती घंटा वानरांनीं उचलून नेली; घंटेच्या आवाजानें वानर त्या घंटेशीं हिसकाहिसक करूं लागले; त्यामुळें आवाज होई; आवाजामुळें लोकांच्या भीतीला भर पडून संशय खरा वाटूं लागला. आतां ही भीति जावी कशी, त्या घंटाराक्षसाला कोण मारणार! एका हुषार बाईनें हा सर्व प्रकार तपासून राजाला म्हटलें महाराज मी घंटाराक्षसाचा वध करीन व लोकांची भीति घालवीन. मात्र मला लाख रुपये पाहिजेत; ते रुपये मिळाल्यावर प्रथम लोकांना भरंवसा पटण्यासाठीं कांहीं दांभिक यज्ञादि कृत्यें करून वानरांना प्रिय अशा वस्तु घेऊन ती बाई रानांत गेली व त्या वानरांस मिळाल्यावर त्यांनीं घंटा टाकिली. ती घंटा त्या बाईनें घेतली; त्यामुळें घंटा वाजण्याचें बंद झालें; घंटाराक्षस मेला; लोकांची भीति गेली. अशा प्रकारची भीति ही शब्दांतच असते, खरी नसते. राक्षसाचें नांव घंटाकर्ण. वास्तविक राक्षस खरा नसून, घंटा वानरांच्या जवळ होती व कर्ण लोकांच्या जवळ होते त्यामुळें घंटा व कर्ण यांच्या-मध्यें एक काल्पनिक राक्षस उत्पन्न झाला, इतकेंच. हा वस्तुशून्य विकल्प होय. तसेंच सशाचें शिंग, घोड्याचें शिंग, वंध्यापुत्र हे शब्द मात्र; खरा प्रकार नाहीं.

**सूत्रार्थः**—जें केवळ शाब्दिक ऐकण्यांत येणारें मात्र, खरोखर अस्तित्वांत नसतां ज्याचें शाब्दिक ज्ञान मात्र होतें, त्यास विकल्प म्हणतात.

## अभावप्रत्ययालम्बनावृत्तिर्निद्रा ॥ १० ॥

अभाव प्रत्यय आलंबना वृत्तिः निद्रा.

'अभाव म्हणजे गैरहजेरी Non-existence, Absence,

प्रत्यय=हेतु, ज्ञान, विश्वास शपथ वगैरे; Faith, knowledge, experience, intellect, oath.

अभावप्रत्यय म्हणजे तम, आलंबना म्हणजे विषय, Support, आलंबन Depending on, that on which one rests. अभावाला कारण तम.

निद्रावृत्तीचें स्मरण जागें झाल्यावर होतें; मला झोंप चांगली लागली होती अशी आठवण होते. ज्याचा अनुभव प्रत्यक्ष झालेला असतो त्याचीच आठवण आपणांस होते. ह्यावरून झोंपेचा अनुभव आपणांस प्रत्यक्ष होत असला पाहिजे. झोंपेंत बुद्धि साक्षीभूत असते. जर ज्ञानाचा अभाव अर.ता तर चांगली झोंप, वाईट झोंप गाढ निद्रा, स्वस्थ निद्रा असें स्मरण कोठून होणार ? स्मरण होतें त्या अर्थी त्या क्रियेचा ज्ञाता तेथें हजर असला पाहिजे. म्हणून ती एक वृत्तिच होय.

जेव्हां रजोगुणाच्या साहाय्यानें तमोगुण, निजून उठतांना प्रकट होतो तेव्हां मी दुःखानें निजलों होतों. मला स्वस्थ झोंप लागली नव्हती; त्यामुळें सारा दिवस फुकट जाणार; मला काम करण्यास उत्सुकता नाहीं असें प्राणी म्हणतो. सत्वगुणाच्या साहाय्यानें तमोगुण जागृत होतो तेव्हां म्हणतो मीं सुखानें निजलों होतों त्यामुळें मला हुषारी वाटते.

आतां केवळ तमोगुण निद्रेंत उठतो, तेव्हां जागा झाल्यावर म्हणतो, मला झोंप लागली होती. माझे डोळे व शरीर जड झालें आहे. अजून झोंप पुरी झाली नाहीं वगैरे. ही निद्रावृत्ति तमोगुणांत, एकाग्र, विषयशून्य, अशी असतां निरोध करण्याचें कारण काय ? अशी शंका येईल तर-निद्रावृत्ति ही इतर वृत्तींप्रमाणें सुखदुःखमोहात्मक असल्यानें समाधीस प्रतिबंध करणारी आहे; झोंपेच्या आधीन झोंपेला वश प्राण्याला व्हावें लागतें, झोंपेचा दास प्राणी बनतो, म्हणून ह्या निद्रावृत्तिचाही निरोध इष्ट आहे.

**सूत्रार्थः**—तम हा विषय आहे ज्या वृत्तीमध्यें ती निद्रावृत्ति होय.

## अनुभूतविषयाऽसंप्रमोषः स्मृतिः ॥ ११ ॥

अनुभूत–विषय–असंप्रमोषः स्मृतिः ।

अनुभूत विषय–अनुभविलेले विषय, असंप्रमोष, संप्रमोष म्हणजे चोरी, ह्यांत धातु मुष् म्हणजे चोरणें, असंप्रमोष म्हणजे चोरी नव्हे ती, स्मृति=स्मरण.

सुतार टेबल तयार करीत होता, व तें पुरें होण्यापूर्वी त्यास झोंप लागली. पुढें जागा झाल्यावर त्यास झोंपे पूर्वीच्या केलेल्या कामाची आठवण जशाची तशीच होऊन तें टेबल पुरें करण्याच्या कामास तो लागतो. मागील काम काय झालें होतें ह्याचें स्मरण करावें लागत नाहीं. आपोआप सहजच बिनचूक स्मृति होऊन

तो कामास लागतो. त्याचप्रमाणे गाईचें वासरू उपजतांच गाईला पिऊं लागतें; त्यास शिकवावें लागत नाहीं. त्यास मागील जन्मांतील जशीच्या तशीच आठवण गुप्तसंस्काररूपानें असते; ह्मणून पूर्वी अनुभविलेल्या संस्कानें कामास सुरवात तें वासरूं करितें;(ह्यावरून पुनर्जन्म शाबित होतो.)जागृतपणीं पूर्वसंस्कार जागे झाले असतां त्यास आपण स्मृति ह्मणतों, व झोंपेच्या वेळीं जागृत झाले असतां त्यास आपण स्वप्न ह्मणतों.

आतांपर्यंत वृत्तीचे पांचही प्रकार कोणते तें सांगितलें; जेव्हां ह्या वृत्ति सुखदायक असतात; तेव्हां ही त्याज्यच होत ह्याचें कारण सुखाच्या अनुभवानंतर त्या त्या विषयांवर प्रीति उत्पन्न होते. व त्या विषयांच्या अभावीं दुःख उत्पन्न होतें. प्रीतीमुळें मोह उत्पन्न होऊन अज्ञानमूलक सकल शोकादि दुःखांस कारण होतात ह्मणून त्याज्य.

दुःखद वृत्ति द्वेष उत्पन्न करितात ह्मणून त्याज्य होत. एवंच ह्या सर्व वृत्तींचा निरोध केला पाहिजे व त्या निरोधासाठीं प्रथम संप्रज्ञातसमाधि साधला पाहिजे; नंतर असंप्रज्ञात समाधि साधावयाचा असतो; ह्मणून वृत्तींच्या निरोधास पुढील सूत्रांत उपाय सांगतात.

**सूत्रार्थः**—( ११ ) अनुभविलेल्या विषयांचे संस्कारांचे जागृतकाळीं जसेंच्यातसेंच स्मरण होणें ही स्मृतिवृत्ती होय. ह्या स्मृतिवृत्तीत कोणतेंही चौर्य कर्म नसलें पाहिजे जशाचें तसेंच स्मरण होणें, ह्या वृत्तींस स्मृतिवृत्ति ह्मणतात.

## अभ्यासवैराग्याभ्यां तन्निरोधः ॥ १२ ॥

अभ्यास वैराग्याभ्यां तत् निरोधः

विगतः रागः विरागः; विरागस्य भावः वैराग्यं;

तन्निरोधः तासां ( त्या वृत्तींचा ) निरोध=तन्निरोधः

वृत्तींचे प्रवाह दोन आहेत. “ चित्तनदी नामोभयतो वाहिनी वहति कल्याणाय वहति पापाय च ” ( भाष्य ) पापाच्या प्रवाहाला बांध घातला कीं त्या मार्गानें वाहणें बंद झाल्यानें पुण्य प्रवाहानें वृत्तीरूपी नदी वाहूं लागेल; वाहविण्याचीं साधनें दोन आहेत.

अभ्यास आणि वैराग्य हीं तीं दोन साधनें होत.

चित्तवृत्तिरूपी नदीचा प्रवाह शब्दस्पर्शादि विषय भूमीवरून संसारसमुद्राकडे वाहत जाणारा वैराग्यरूपी बांधाच्या अडकणानें उलट दिशेनें फिरवून वाहविणें व तो प्रवाह कायम होण्याकरितां अभ्यासानें टिकविणें हीं तीं दोन साधनें.

**सूत्रार्थः**—चित्तवृत्ति निरोधाला साधनें दोन अभ्यास आणि वैराग्य हीं होत.

## तत्र स्थितौ यत्नोऽभ्यासः ॥ १३ ॥

तत्र स्थितौ यत्नः अभ्यासः

चित्त हें अत्यंत चंचल आहे.

**चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ।**
**तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥** [गीता अ.६. ३४.]
**असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।**
**अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ॥** [गी. अ.६. ३५.]

मनाच्या चंचलत्वामुळें चित्तावर अनेक प्रकारच्या वृत्ति उत्पन्न होतात. त्यामुळें चित्तक्षोभ होऊन आत्मदर्शनाला व्यत्यय येतो. चित्तावर वृत्ती उठूं नयेत व मनानें चित्तरूपांत लीन होऊन राहावें ह्मणून जो प्रयत्न करणें त्यास अभ्यास ह्मणतात.

ह्या सूत्राचे अर्थ दोन तऱ्हेनें करितां येतात.

१ ती स्थिती ( निरुद्धावस्था ) मिळविण्यासाठीं जो यत्न तो अभ्यास होय. ( २ ) किंवा सूत्र तीन ह्यांत सांगितल्याप्रमाणें. 'तदा द्रष्टुः स्वरूपे अवस्थानम् ।'

सत्वगुणाचें प्राबल्य व राजस तामस गुणांचा लोप अशी स्थिति प्राप्त झाल्या नंतर ह्मणजे एकाग्रावस्था प्राप्त झाल्यानंतर ती कायम टिकविण्याकरितां जो यत्न तो अभ्यास होय.

स्थितौ ह्याचा अर्थ एकदां सप्तमीचा, सूत्रांत सप्तमी आहे तसा करणें; व दुसऱ्यानदां चतुर्थीसारखा करावयाचा. सप्तमीचा अर्थ चतुर्थीसारखा करितात ह्यास उदाहरणः—

**चर्मणि द्वीपिनं** ( वाघ ) **हन्ति दन्तयोर्हन्ति कुंजरं ।**
**केशेषु चमरीं** ( हरिणी ) **हन्ति सीम्नि** ( अण्डकोश ) **पुष्कलको**
( गंध मृग ) **हतः ॥**

चांमड्याकरितां वाघाला मारितात; दांतांकरितां हत्तीला मारितात; चवरीचे केंसासाठीं हरिणीला मारतात आणि कस्तुरीसाठीं गंधमृगाला मारतात.

**सूत्रार्थ**:—निरुद्धावस्था मिळविण्याकरितां जो यत्न तो अभ्यास होय.

## स तु दीर्घकालनैरन्तर्यसत्कारासेवितो दृढभूमिः ॥ १४ ॥

सः, तु, दीर्घकाल, नैरन्तर्य, सत्कारासेवितः, दृढभूमिः

दीर्घकाल=बहुतकाल; नैरन्तर्य=सतत, निरन्तरस्य भावः नैरन्तर्य;

सत्कारासेवित=सत्कारेण आसेवित, सत्कारासेवितः

तो अभ्यास सतत, विश्वासानें, श्रद्धेनें यश मिळेल समजून कितीही वेळ लागला तरी सत्कारपूर्वक केला पाहिजे, तरच तो पक्का होतो मध्येंच सोडला तर फुकट जातो. उदाहरण.

दोन ऋषि एक बाभळीच्या झाडाखालीं व दुसरा चिंचेच्या झाडाखालीं असे तपश्चर्या करीत दूरदूरच्या अन्तरानें बसले होते. पुष्कळ दिवस लोटल्या-नंतर नारदमुनि तेथें आले. जो चिंचेच्या झाडाखालीं बसला होता त्यास ते प्रथम भेटले. नारदाची गांठ पडल्यानें तो ऋषि म्हणतो हे नारद मुने आपण त्रिकाळ ज्ञानी आहां तेव्हां मला सांगा कीं मला मोक्ष केव्हां मिळेल ? नारद तसेच दुसऱ्या ऋषीजवळ गेले. त्यानेंही तोच प्रश्न केला कीं तुम्हीं तपास करून मला सांगा कीं मला मोक्ष केव्हां मिळेल ? ब्रह्मदेवाकडे जाऊन नारद परत आल्यावर चिंचेच्या झाडाखालीं बसला होता त्यास त्याच्या प्रश्नाचें उत्तर नारदानीं दिलें कीं, ह्या चिंचेच्या झाडाला पानें आहेत इतकीं युगें गेल्यानंतर तुम्हांला मोक्ष मिळेल, तें ऐकून तो ऋषि हताश झाला व आपलें आसन गुंडाळलें इतका काळ कोणी बसावें; नसेना तो मोक्ष ! अशा समजुतीनें उठून त्यानें रस्ता धरिला. दुसऱ्या ऋषीकडे नारद गेले तेव्हां त्यासही त्याच्या प्रश्नाचें उत्तर दिलें कीं, ह्या बाभळीच्या झाडाला पानें आहेत इतकीं युगें गेल्यावर तुला मोक्ष मिळेल. तें ऐकून तो ऋषि फार आनंदीत झाला व म्हणाला, एकूण मजला मोक्ष मिळणार आहे; ह्या सम-जुतीनें त्यानें अभ्यास सोडिला नाहीं त्यामुळें त्याजवर प्रसन्न होऊन ईश्वरानें त्यास त्याच क्षणीं तूं मुक्त आहेस म्हणून सांगितलें. सारांश अशा प्रकारचा व इतक्या

धीराचा निरंतर अभ्यास सत्कारपूर्वक पाहिजे. तेव्हांच पक्केपणा येत असतो व त्यामुळें पुढें इष्ट ध्येय साधत असतें.

**सूत्रार्थः**—तो अभ्यास बहुतकालपर्यंत मध्यें खंड न करितां आदरपूर्वक (श्रद्धेनें) चालविला तर पक्का होतो. निरंतर न चालवितां मध्येंच सोडला तर फुकट जातो.

बाराव्या सूत्रांत सांगितलें कीं चित्तवृत्ति निरोध, अभ्यास आणि वैराग्य, या उपायांनीं केला जातो. अभ्यासाचें स्पष्टीकरण तेरा व चवदा ह्या दोन सूत्रांत सांगून आतां वैराग्याबद्दल बोलतात—

वैराग्यें दोन प्रकारचीं आहेत; एक अपर वैराग्य व दुसरें पर वैराग्य. पर वैराग्यासाठीं आधीं अपर वैराग्याची जरूरी आहे. अपर म्हणजे कनिष्ठ व पर ह्मणजे श्रेष्ठ प्रतीचें वैराग्य. अपर वैराग्याचें वर्णन १५ व्या सूत्रांत सांगतात—

## दृष्टानुश्रविकविषयवितृष्णस्य वशीकारसंज्ञा वैराग्यं ॥ १५ ॥

दृष्ट, अनुश्रविक विषय वितृष्णस्य वशीकार संज्ञा वैराग्यं.

दृष्ट ह्मणजे स्रक् ( हार माळा ) चंदन वनिता ( स्त्री ) वगैरे ऐहिक सुखें. अनुश्रविक=( अनुश्रवः Vedic or sacred tradition ) वेदांतील| कथांवरून इंद्रादिकांचीं सुखें ऐकलेलीं, इंद्राच्या रंभा, इंद्राचा ऐरावत इंद्राची बाग व त्या बागें- तील कल्पवृक्षाचें वर्णन वगैरे.

वितृष्णस्य=विगता तृष्णा यस्य वितृष्णः तस्य वितृष्णस्य. वशीकारसंज्ञा=हें वैराग्याचें नांव; वैराग्यं=विगतः राग; ( विषयप्रीतिं ) विरागस्य भावः वैराग्यम्

वैराग्यें चार प्रकारचीं आहेतः—त्यांचीं नावें, १ यतमान संज्ञक वैराग्य, २ व्यतिरेकसंज्ञक वैराग्य, ३ एकेंद्रियसंज्ञक वैराग्य ४ वशीकार संज्ञक वैराग्य.

आपले इंद्रियांपैकीं डोळे हें पाहाण्याचे इंद्रिय व कान ऐकण्याचें इंद्रिय; हीं दोन इंद्रियें फार जबरदस्त आहेत. डोळ्यांनीं ज्या ज्या वस्तु प्रत्यक्ष आपण पाहतों, उदाणार्थ रूप सौंदर्य वगैरे व कानानीं पोथ्या पुराणांतून ऐकितों त्या त्या मनोहर व प्रियकर वाटून आपणास त्या असाव्यांत अशी स्वाभाविक इच्छा होते व मन त्या वस्तूंबद्दल ललचावतें व त्या विषयांविषयीं तृष्णा उत्पन्न होते.त्या दोन्हीं सुखांच्या

तृष्णेबद्दल उपेक्षाबुद्धि उत्पन्न होऊन, विषय हे परिणामीं वीट आणणारे आहेत, विनाशी आहेत व त्यांचा नाश झाला असतां दुःखदच होणार अशी बुद्धि उत्पन्न झाल्यानें त्या विषयांच्या आधीन आपण न होतां त्यांनाच आपल्या स्वाधीन ठेवणें ह्या अशा प्रकारच्या वैराग्यास वशीकार संज्ञा वैराग्य म्हणतात. वशीकारसंज्ञक वैराग्य हें महत्वाचें होय. म्हणून ह्या वैराग्याचा मुख्यत्वें उल्लेख केला. पहिलीं तीन प्रकारचीं वैराग्यें हीं मनुष्यामध्यें विशेषप्रयत्नांवांचून येतात; म्हणून त्याचें वर्णन सूत्रांत नाहीं. ती अशीः—

**१ यतमान वैराग्यः**—शास्त्राभ्यासाबद्दल किंवा गुरुउपदेशाबद्दल मनामध्यें इच्छा उत्पन्न होणें; ग्रंथ वाचतांना किंवा गुरूचा उपदेश ऐकतानां नाटकाला जावयाचें नाहीं; चांगल्या गोष्टीचें अनुकरण करण्याची बुद्धि व वाइटाचा त्याग करण्याकडे कल होणें, ज्यामध्यें न कळत वैराग्याचा प्रयत्न होतो. अशा प्रकारच्या वैराग्यास यतमान वैराग्य ह्मणतात.

**२ व्यतिरेक वैराग्य**=व्यतिरेक (Separation from, Difference) निराळेपणा दाखविणें; ज्या वैराग्यामध्यें कांहीं वृत्तीचा विरोध झालेला आहे व कांहींचा होणें आहे, असा स्पष्ट भेदाचा निश्चय होतो त्यास व्यतिरेक संज्ञक वैराग्य म्हणतात.

**३ एकेंद्रिय संज्ञक वैराग्यः**—ज्यामध्यें वृत्ति पक्व (विनाशोन्मुख, कार्योन्मुख नव्हत) झाल्या व मनामध्यें फक्त उत्सूक रूपानें राहिलेल्या, जशी आंबा पक्का होऊन सडाला लागण्याच्या वेळच्या त्या आंब्याची स्थिती अशा तऱ्हेच्या वैराग्याला एकेंद्रिय वैराग्य म्हणतात.

ह्या तीन प्रकारच्या वैराग्यांना विशेषसे प्रयत्न करावें लागत नाहींत. चौथ्या प्रकारच्या वैराग्याला जोराचे प्रयत्न लागतात ह्मणून त्या वैराग्याचा सूत्रकारांनीं उल्लेख केला आहे.

**सूत्रार्थः**—पाहिलेल्या व ऐकिलेल्या विषयांबद्दल उपेक्षाबुद्धि उत्पन्न होणें ह्यास वशीकारसंज्ञावैराग्य ह्मणतात.

१६ अपर वैराग्याचें लक्षण सांगून १६ व्या सूत्रांत पर वैराग्याचे लक्षण सांगतात. विषयांचे वैराग्यानंतर गुणाविषयींचें तें वैराग्य होय.

## तत्परम्पुरुषख्यातेर्गुणवैतृष्ण्यम् ॥ १६ ॥

तत्, परम्, पुरुष, ख्यातेः, गुण, वैतृष्ण्यम्

तत्=तें; परम्=परवैराग्य; पुरुष=आत्मा; ख्याति=ज्ञान;

गुण=सत्व, रज, व, तम; वैतृष्ण्यम्=विगता तृष्णा यस्य सः वितृष्णः;वितृष्णस्य भावः वैतृष्ण्यम्.

वैराग्यें दोन प्रकारचीं, एक विषयांविषयीं व दुसरें गुणांविषयीं. १५ व्या सूत्रांत विषयां विषयींचें वैराग्य वर्णिलें. गुणाविषयींचें वैराग्य जे साक्षात्कारानें होतें तें पर वैराग्य होय. पुरुष ( आत्मा ) हा शुद्ध बुद्ध व निरंजन आहे. गुण त्याहून निराळे आहेत; गुण अशुद्ध व परिणामी नाश पावणारे; हे विचार मनांत घेतां त्यांच्या ठिकाणीं तिटकारा उत्पन्न होणें तें हें पर वैराग्य उत्कृष्ट व ज्ञान–प्रसाद मात्र आहे. ज्या ज्ञानाच्या योगानें, हा भव संक्रम निरंतर उत्पन्न होऊन, मरणें, मरून पुन्हां उत्पन्न होणें इत्यादि विचारानें जन्ममरण प्रवाह अति दुःख देणारा आहे इत्यादि ज्ञानाची जी परम मर्यादा तीच तें परवैराग्य होय. त्याच वैराग्यानें मोक्षसाधनाला ज्ञान हें कारण होतें. ह्मणून गुणांचाही त्याग करून जें वैराग्य प्राप्त होतें व ज्यामुळें आत्मदर्शन होतें तीच वैराग्याची अति उच्च दशा होय.

ज्याचा आपणांस त्याग करावयाचा ते गुण; व ज्याचें दर्शन करून घेणें तो पुरुष त्या पुरुषाचें स्वरूप बरोबर समजलें ह्मणजे साधनें व साध्य यांचा मेळ बसेल. हें सर्व विश्व त्रिगुणात्मक आहे. सत्व ह्मणजे प्रकाश, ज्ञान, किंवा ज्ञानाचें साधन. रजोगुणाचें लक्षणच चंचलता. अज्ञान हें तमोगुणाचें लक्षण. रजोगुणानें येणारे चंचलतेस सत्वगुणानें समतोलता आणितां येत्ये.

जगांतील सृष्ट पदार्थ तीन गुणांपासून उत्पन्न झालेले आहेत. मन बुद्धि विचार हेही सृष्ट पदार्थांत येत असल्यानें ते न दिसणारे असले तरी दगडाप्रमाणे सृष्ट अतएव जडच होत. पुरूष ह्मणजे आत्मा सृष्ट पदार्थांपलिकडील आहे. त्याचें वर्णन करितां येण्यायोगें नाहीं. बुद्धि प्रकाश वगैरें जें भासतें तें आत्माचेंच प्रतिबिंब होय. ह्या तेज बुद्धि वगैरे प्रकाशामुळेंच अचेतन वस्तु सचेतन होत असतात. सृष्ट पदार्थांचे आच्छादन आत्म्याभोवतालीं पडलेलें आहे तें आत्म्याभोंवतालचें आवरण

काढण्यासाठीं वैराग्य हें साधन होय. ज्याला हे तीव्र वैराग्य प्राप्त झालें त्यालाच समाधि द्वारा आत्मभेटीचा लाभ होतो.

त्या वैराग्यासाठीं दाखला देतात तो:—सांख्यशास्त्राधारें संसाराचा दाखला लागू केलेला आहे. समजा संसारांतील पुरुष हा आळशी आहे व प्रकृती त्याची बायको सर्व कांहीं याच्यासाठीं करीत आहे व तिच्या कर्तृत्वाचा भोगमात्र पुरुषाला ह्मणजे कर्तृत्व प्रकृतीचे नेतृत्व व भोक्तृत्व मात्र पुरुषाचें. **अकर्तुरपिफलोपभोगः अन्नाद्यवत्**

जसे कुणबीलोक मोठ्या शेत्याच्या शेतांत राबतात व पिकवून मालकाला धान्य देतात, त्या धान्याचा भोक्ता मालक होतो. त्याचप्रमाणें पुरुष हा भोक्ता होय. प्रकृतीने खपावें व त्यापासून निष्पन्न होणाऱ्या फलाचा भोग मी पुरुषानें घ्यावा हें गैरशिस्त. ही बुद्धि होऊन, मुळीं प्रकृतीचा जर संयोग टाळला ह्मणजे सहजच भोक्तृत्वाचा वियोग होईल. तो संयोग टाळण्यासाठीं, जें वैराग्य तें; **प्राप्तं प्रापणीयं क्षीणाः क्षेतव्याः क्लेशाः** नाशकरण्या जोग्या क्लेशाचा नाश होऊन जें काय मिळवावयाचें तें मिळविलें. मी कांहीं एक न करितां प्रकृतीशीं संबंध कशासाठीं ठेवावयाचा; तिचें ती पाहून घेईल ही स्थिति उत्पन्न होऊन कृतकृत्य वाटणें हें फळ ह्या वैराग्याचें होय. हें उच्चप्रतीचें वैराग्य होय. हें वैराग्य प्राप्त झाल्यानें आत्म ज्ञान तथातथ्य होतें. मुख्य मुद्दा गुणाचा त्याग करून गुणापलीकडे असणारा आत्मा याचें दर्शन हें होय.

आत्मा, ईश्वर, अकर्ता, अभोक्ता; सबब कर्तेपणाचा अभाव; अन्य शब्दानि नास्तिकता ह्याचा उलगडा कसा? "कर्तृत्वाचा अभाव म्हणजे नास्तिकता," यांतील "नास्तिकता" याचा अर्थ "नसणें"–कर्तृत्व नसणें, कर्तृत्व नसणें अर्थात् भोक्तृत्वहि नसणें.

लोहचुंबक व लोखंडः—लोहचुंबकांत लोखंडाला ओढण्याची व नाचविण्याची शक्ति अव्यक्त असते हें सर्वांस माहीत आहेच. ती शक्ति सहज पाहणाराला दिसत नाहीं. व भासतही नाहीं. परंतु लोखंड नजीक आल्यानें किंवा आणिल्यानें लगेंच लोखंड नाचूं लागतें म्ह. कर्तृत्व, व त्यामुळें पुढें भोक्तत्व सुरु होतें. साख्यांच्या दृष्टान्तानें कर्तृत्व प्रकृतीला येत आहे अर्थात् भोक्तृत्वही तिलाच आलें

पाहिजे. माझा कांहीं संबंध नाहीं " जो करील तो भरील " हे प्रकृतीचे सर्व खेळ आहेत तिचें ती पाहून घेईल असें ज्ञान होणें हेंच परवैराग्य.

**सूत्रार्थः**—मी कर्ता नसून भोग घेणें हें गैरशिस्त. ह्या गुणांचा व माझा कांहीं संबंध नाहीं असें पुरुषाच्या भोक्तृत्वाच्या ज्ञानावरून गुणांविषयीं वितृष्णा उत्पन्न होणें तें परवैराग्य होय.

## वितर्कविचारानन्दास्मितारूपानुगमात्संप्रज्ञातः ॥ १७ ॥

वितर्क, विचार, आनन्द, अस्मिता, रूप, अनुगमात्, संप्रज्ञातः ।

वितर्क म्हणजे प्रश्न किंवा प्रश्नयुक्त; अस्मिता–अस्मिभावः अस्मिता,

अहं अस्मि एवढाच भाव असणें; रूप=सह; अनुगमः=प्राप्ति.

सूत्रें समजण्याकरितां सांख्यशास्त्राचीं तत्वें जाणणें इष्ट आहे. कारण सूत्रांची उभारणी सांख्य शास्त्राधारें आहे ती सांख्यशास्त्राचीं तत्वें:—

**सांख्य सूत्रः**—सत्वरजस्तमसां साम्यावस्था प्रकृतिः । प्रकृतेर्महान् महतो अहंकारो अहंकारात्पंचतन्मात्राणि उभयमिंद्रियं तन्मात्रेभ्यः स्थूलभूतानि पुरुषः इति पश्चविंशतिर्गणः ॥ हा देह जड तत्वें २४ अचेतन, पंचवीसावें तत्व चेतन यांमिळून बनलेला आहे. तीं तत्वें:-

**महाभूतान्यंहकारो बुद्धिरव्यक्तमेव च ।**
**इंद्रियाणि दशैकंच पंचचेंद्रियगोचराः** ॥ [ गी. अ. १३–५

पांच ज्ञानेंद्रियें–डोळे, कान नाक जिह्वा व त्वक्. पांच कर्मेंद्रियें-हस्त, पाद, वाणी, पायु ( गुद ) उपस्थ इंद्रिय ( जननेंद्रिय ) पंचमहाभूतें–पृथ्वी, आप, तेज, वायु, आणि आकाश.

त्या पंचमहाभूतांचे विषय पांच–रूप रस गंध स्पर्श आणि शब्द. व मन बुद्धि अहंकार व प्रकृति ह्म० माया किंवा प्रकृतींची विकृती जें या सर्वांचें अधिष्ठान; हीं जड तत्वें. पुरुष किंवा आत्मा हें चेतन तत्व, मिळून २५. तत्वें.

साकारपरमेश्वराचें चिरंतन अस्तित्व आहे व तोच सर्वांचा आद्यगुरू आहे असें पतंजलींचें मत आहे परंतु परमेश्वराला चिरंतन अस्तित्व नसून जवळ जवळ पूर्ण ता पावलेला प्राणी प्रत्येक युगाच्या आंरभीं युगशास्ता ह्मणून असतो व त्यासच

आपण परमेश्वर ह्मणतों असें सांख्य मत आहे. आत्म्या प्रमाणेंच मनही सर्व व्यापी आहे हें पतंजलीचें मत सांख्यशास्त्रास मान्य नाहीं.

सांख्यशास्त्रामध्यें सेश्वर व निरीश्वर सांख्य असे दोन भेद आहेत. पैकीं कपिल मुनी हे निरीश्वर सांख्यशास्त्री होत. तपंजली मुनि ज्यांचीं हीं सूत्रें पातंजल योगसूत्रें ह्मणून प्रसिद्ध आहेत ते सेश्वरसांख्यशास्त्रमताचे आहेत.

हें पातंजल योगशास्त्र हें सेश्वरशास्त्र अतएव द्वैतमतवादी शास्त्र होय. घोटाळा होऊं नये ह्मणून सांगणें जरूर आहे कीं वेदान्तशास्त्र हें अद्वैतमताचें शास्त्र होय. वेदान्ती समजतात कीं हें जग हा रज्जूवर सर्पाचा भास आहे ह्मणून हें जग खोटें आहे " सदेव सोम्येदमग्र आसीत् एकमेवाद्वितीयम् । ब्रह्म सत्यं जगत् मिथ्या " हें थोडक्यांत वेदांत्यांचें वर्णन होय.

वर जें सांख्यसूत्र दिलें आहें त्यांतील प्रकृति ही ते नित्य मानतात. त्यामुळें गुणही नित्यच मानितात. वेदांन्ती प्रकृतीचा अर्थ माया करितात. माया=मा ह्मणजे नसणें, या ह्मणजे भासणे; नसलेल्याचा खोटा भास ती प्रकृति ह्मणजे माया. जीवात्मा नित्य नाहीं प्रकृति नित्य नाहीं, जग नित्य नाहीं; जेथें माया अज्ञान उत्पन्न होतें तेथेंच जगाची उत्पत्ति ह्मणून संसार खोटा; व संसार खोटा ह्मणून टाकणें.

अनीश्वर सांख्यशास्त्रमत–समुद्राला भरती ओहोटी चालली आहे. व भरती ओहोटीच्यामध्यें समा असतो. सम्याशिवाय भरती ओहोटी लागणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें त्रिगुणाची भरती ओहोटी चालली आहे; ह्या त्रिगुणाच्या भरती-ओहोटीलाही समा मानला पाहिजे; तो जो समा तीच प्रकृति होय.

तो समा नित्य असला पाहिजे; म्हणून प्रकृति ही नित्य आहे व त्रिगुणात्मक प्रकृतीचे गुणही नित्यच होत. त्या प्रकृतीपासून उत्पन्न होणारा संसारहि नित्यच. **कारणप्रकृती** जर नित्य तर **कार्यजग** हें नित्यच.

म्हणजे ' **यदृष्टं तन्न नष्टं** –'

**पुरुषस्तु पुष्कर** ( कमल ) **पलाशवत्** ( पान ) **निर्लेपः** ।

पुरुष निर्लेप कमळाच्या पानाला जसा पाण्याचा स्पर्श होत नाहीं तसा. प्रकृतीशीं संयोग झाला म्हणजे प्रकृतीचें कार्य जग, त्या जगाशींही पुरुषाचा संयोग होतो. ह्याचेंच नांव जग नित्य.

संयोगानें जग इत्यादि पाहिजे तें उत्पन्न करितां येतें, हें निरीश्वर सांख्य. असें जरी आहे तरिपण संसार हा दुःखांनीं मात्र भरलेला. कारण सुखाचा अभाव झाला कीं दुःखच म्हणून त्याज्य. म्हणजे संसार सोडणें ह्याबद्दल सांख्य तसेंच वेदान्त या शास्त्रांचा एक मेळ आहे वेदान्त्यांच्या मतें जग हें सत्वर असताचा रज्जूवर सर्पाप्रमाणें भास आहे हें बुद्धिमांद्य आहे तें बुद्धिमांद्य काढून टाकलें पाहिजे. बुद्धीवरील मळ आरशावरील मळाप्रमाणें काढला कीं आरसा लख्खच आहे. सांख्याची कल्पना प्रकृतीपुरुष या दोघांच्या संयोगानें संसार उत्पन्न होतो; वियोगानें नाश पावतो ह्मणजे मुक्ति मिळते. म्हणून संयोग त्याज्य होय.

परमेश्वराच्या संकल्पाशिवाय कार्य उत्पन्न होत नाहीं हें सेश्वर सांख्यशास्त्र व योगशास्त्र; सांख्य व योग एकच, पण सेश्वर उत्पत्तीकाळीं परमेश्वराच्या संकल्पानें मूळ शक्तीचा आघात आकाशावर होऊन तें स्पंदरूप होतें व उत्पत्तीला सुरवात होते. तेव्हां त्या स्थितीस **अव्यक्त** असें नांव ते देतात त्या अव्यक्तापासून **हिरण्यगर्भ** उत्पन्न होतो मग त्यास इच्छा होतेः—"**एकोहं बहु स्याम् प्रजायेय**" त्यापुढें व्यक्तावस्था; ह्याप्रमाणें जगाची उत्पत्ति तसेंच प्रलयकालीं विश्वाचा लय अर्थात् त्यामुळें अव्यक्त शक्तीचाही लय ते मानतात. त्या अव्यक्तादूनही निराळें असें पुरुषाचें ह्मणजे आत्म्याचें रूप आहे असे सेश्वर सांख्य वादी समजतात व विश्वाचा लय तीच निरीश्वर सांख्याची साम्यावस्था. ही सांख्यतत्वें समजून घेतल्यानें सूत्रें समजण्यास सोईचें होईल.

वितर्क ह्मणजे प्रश्न ह्यांत मन जडास तूं कोण तुझें स्वरूप काय असें प्रश्न करीत असतें.

**सवितर्क संप्रज्ञात समाधियोग**—स्थूल लक्ष्य उदारणार्थ मूर्ती घेऊन त्या एकाच लक्ष्यावर मन एकाग्र करणें व मन दुसऱ्या कोणत्याही वस्तुचें चिन्तन करीत नाहीं त्या स्थितीस सवितर्क संप्रज्ञात समाधि ह्मणतात. ह्या स्थितींत मन जरी एकाग्र जड पदार्थावर असलें, ( उदाहरणार्थ मूर्तीवर ) तरी जागा व काळ ह्या विषयीं ह्मणजे देशकालाचें ज्ञान किंवा तर्क थोडा बहुत जागृत असतो. तो विचार जेव्हां लुप्त होईल त्या स्थितीस **निर्वितर्क संप्रज्ञात समाधि** ह्मणतात.

**सविचार**—वर जें स्थूल लक्ष्य सांगितलें, त्याहून कमी स्थूल, ह्मणजे सूक्ष्म; सूक्ष्मांवर लक्ष ठेवून त्या एकाच सूक्ष्म पदार्थावर मन स्थिर करणें त्या सूक्ष्मांशिवाय अन्य विचार नसणें त्यास **सविचार संप्रज्ञात समाधि** ह्मणतात.

**निर्विचार संप्रज्ञात समाधि**—वरील प्रमाणें जरी सूक्ष्म लक्ष्य असलें तरी देशकाल हा विचार अल्प प्रमाणांत असणारच, तो जेव्हां अगदीं लुप्त होईल व केवल सूक्ष्म विषय तन्मात्रासूक्ष्माचेंच ध्यान चालेल त्या स्थितीस **निर्विचार संप्रज्ञात समाधि** ह्मणतात.

**सानंद संप्रज्ञात समाधि**—परमाणूरूप इंद्रियें घेऊन त्यांवर ध्यान करणें सूक्ष्म विषयांचा ध्यास टाकून मन स्वतःचाच विचार करूं लागतें अशा स्थितीला **सानंद संप्रज्ञात समाधि** ह्मणतात.

**अस्मिता संप्रज्ञात समाधि**—प्रकृतीचें पुरुषाशीं ऐक्य होणें तो अस्मिता संप्रज्ञात समाधियोग जाणावा. ह्यांत अस्मितेवर ध्यान ठेवणें, अस्मिभावः अस्मिता " सोऽहं सोऽहं " ह्याच्या रूपानें अनुगम ह्मणजे प्राप्ति होत असल्यानें तो **अस्मिता संप्रज्ञात** समाधियोग होय. वरील विवेचनावरून,

स्थूलध्येय, सूक्ष्मध्येय, इंद्रियरूपीध्येय, अस्मितारूपी ध्येय इत्यादि प्रकृति संयोग संप्रज्ञात समाधिमध्यें असतात.

संप्रज्ञात समाधिमध्यें अष्ट सिद्धि प्राप्त होत असतात. ह्या सिद्धींचें वर्णन पाद ३ सूत्र ४५ यांत दिलें आहे तें पाहावें. ह्या समाधिमध्यें, ध्येयाचें सम्यक् ज्ञान असतें सिद्धि मिळविणें हा समाधिचा हेतु नव्हे नाहींतर सिद्धिच्या मागें लागून योगी तेथेंच रमेल व त्या योगें ध्येय सुटून जाईल.

**सूत्रार्थः**—सवितर्क, सविचार, सानंद सास्मिता प्राप्तीशिवाय दुसऱ्या कोणत्याहि पदार्थाची प्रतीति ज्या स्थितींत होत नाहीं त्या स्थितीस संप्रज्ञात समाधि ह्मणतात; ह्मणजे संप्रज्ञात समाधीचे प्रकार चार सवितर्क, सविचार, सानंद, सास्मिता.

## विरामप्रत्ययाभ्यास पूर्वः संस्कारशेषोऽन्यः ॥ १८ ॥

विराम प्रत्यय अभ्यास पूर्वः संस्कारशेषः अन्यः

विराम ह्मणजे सर्व वृत्तीचा अभाव; प्रत्यय ह्मणजे कारण; विराम प्रत्यय ह्मणजे इच्छा नसणें सर्ववृत्तींच्या अभावाचें कारण—परवैराग्य; चित्ताच्या सर्व वृत्तींच्या अभावाला कारण जें पर वैराग्य. विरामस्य प्रत्ययः विराम प्रत्ययः; विरामप्रत्यस्य

अभ्यासः विराम प्रत्ययाभ्यासः; विरामप्रत्ययाभ्यासः पूर्वः यस्य सः विरामप्रत्ययाभ्यास पूर्वः; अन्यः ह्मणजे असंप्रज्ञात योग.

पर वैराग्यानें साधणारा हा असंप्रज्ञात योग यामध्यें चिंतनीय असें कांहीं नसतें वैराग्याभ्यासानें चित्त निर्विषयक होऊन वृत्तिरूप कार्ये करीत नसल्या कारणानें मृताप्रमाणें होतें व संस्कारसंज्ञक जें संसाराचें बीज त्याचा, असंप्रज्ञात योग सर्वथा नाश करितो ह्मणून यास निर्बीज समाधि ह्मणतात.

**अन्यः**—अन्य जो असंप्रज्ञात समाधि तो परवैराग्याच्या अभ्यासानें प्राप्त होऊन संप्रज्ञात समाधीचे पूर्व संस्कार जातात ( पूर्व संस्कारांचा अभाव होतो ) असंप्रज्ञात समाधीचे संस्कार सुरू होतात व तेच शेष राहतात. नवीन स्वसंस्कार राहतात. ह्मणजे ' स्वरूपे अवस्थानं ' हे संस्कार राहतात. हे संस्कार राहिले तरी अपायकारक नाहींत.

या असंप्रज्ञात किंवा निर्विकल्प समाधींत बाह्य जगाचें ज्ञान कोणत्याहि प्रकारें होत नसल्यानें योगी मुक्त होतो परंतु संप्रज्ञात किंवा सविकल्प समाधींत मुक्तता नाहीं ह्या समाधींत अहंकाराची झांक बीजरूपानें असल्यानें योगी भ्रष्ट होण्याचा संभव असतो. कारण सिद्धी त्याच्या करतलामलकवत् असल्यानें या विश्वांतील यच्च यावत् शक्ति त्याच्या घरच्या दासी बनतात. त्यामुळें इंद्रियें सुखाच्या लालचीनें जाळ्यांत पडण्याचा संभव असतो. असंप्रज्ञात योगसमाधींत योगी विश्वशक्तीच्या बाहेर असल्यानें पूर्णत्व पावून मुक्त होतो. हा समाधि साधण्याकरितां भगवानांनी सांगितलें आहे कीं—**शनैः शनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया । आत्मसंस्थं मनः कृत्वा न किंचिदपि चिंतयेत्** ॥ गी. ६,२५

**सूत्रार्थः**—परवैराग्य कारण आहे ज्या अभ्यासाच्यापूर्वीं व ज्यांत केवल संस्कार शेषरूपानें असतात. तो अन्यः ह्मणजे असंप्रज्ञात समाधि होय.

वरील या असंप्रज्ञात समाधीचे प्रकार दोन—

( १ ) उपायप्रत्यय व ( २ ) भवप्रत्यय. ( १ ) पैकीं उपायप्रत्यय जो, पुढील सूत्र २० ह्यांत सांगितला तो ग्राह्य होय. हा उपाय प्रत्यय असंप्रज्ञात योग हा ह्या लोकीं व ह्याच जन्मीं साध्य होणारा असल्यानें मुमुक्षूंनीं त्या विषयीं प्रयत्न करावा, व मुमुक्षूंनीं तो साधावा. ( २ ) भवप्रत्यय असंप्रज्ञात योग मुमुक्षूंनीं सो-

डून घावा कारण भवन्ति जायन्ते, अस्याम् जन्तवः स भवः, ह्मणजे अविद्या; अनात्मसु आत्मख्याति इति भवः.

## भवप्रत्ययो विदेहप्रकृतिलयानाम् ॥ १९ ॥

भव प्रत्ययः विदेह प्रकृति लयानाम्

भव ह्मणजे अविद्या किंवा अज्ञान, प्रत्यय ह्मणजे कारण; विदेह ह्मणजे देव; प्रकृति लयानाम् ह्मणजे प्रकृतींत लीन होणारे योगी, पूर्ण वैराग्य नसल्यानें पूर्ण मुक्तता प्राप्त न होतां देवत्व किंवा प्रकृतिलयत्व प्राप्त होणारे, प्रकृतीच्या साम्यावस्थेंत राहाणारे योगी, ह्मणजे साम्यावस्था आहे तों पर्यंत गुणांचा उपद्रव होणार नाहीं. परंतु त्या साम्यावस्थेंत चलबिचल झाली कीं गुण उपद्रव देतील. प्रकृतीशी लीन झालेले योगी प्रकृति विकृत होऊं लागली कीं तेही विकृत होतील; त्यामुळें पुनर्जन्म प्राप्त होईल मोक्ष प्राप्त होणार नाहीं, ह्मणून भव प्रत्यय हेय ह्मणजे त्याज्य आहे.

देव, आणि प्रकृतींत लीन झालेले योगी, यांस अविद्येमुळें भवप्रत्यय असंप्रज्ञात योग प्राप्त होतो; भव प्रत्ययानें देवत्व ह्मणजे सृष्टीच्या एखाद्या अंगाचें नियमन करण्याचा अधिकार प्राप्त होईल, परंतु **क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति** । [ गी. अ. ९. २१. ] देवत्व प्राप्त झाल्यावर तेथेंच रमत बसणारा योगी खसून जाईल. तेथेंच न रमतां जर तो पुढें अभ्यास चालवील तर पडणार नाहीं.

**सूत्रार्थः**—अविद्या हें कारण सुटलें नाहीं ज्याचें असा जो असंप्रज्ञात योग तो देवना म्ह. प्रकृतीलीन पुरुषांना होतो.

आतां उपाय प्रत्यय असंप्रज्ञातयोग सांगतात.

## श्रद्धावीर्यस्मृतिसमाधिप्रज्ञापूर्वक इतरेषां ॥ २० ॥

**श्रद्धाः**—गुरु वेदान्त वाक्येषु यो विश्वासः साश्रद्धा.

**श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः ।**

**ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिमचिरेणाधिगच्छति** ॥ [ गी.अ. ४. ३९-]

गुरुपदेश वेदान्त वाक्यें इत्यादि आप्त वाक्यांवर विश्वास. श्रद्धा ही मातेसारखें योग्याचें रक्षण करिते; श्रद्धेपासून वीर्य उत्पन्न होतें; वीर्याला कारण श्रद्धा;

'फलिष्यतीतिविश्वासः सिद्धेः प्रथमलक्षणं. वीर्य ह्मणजे Courage, vigour टिकाव धरण्याची ताकद, झटण्याविषयीं उमेद; वीर्यापासून स्मृति, म्हणजे धारण केलेला विषय चित्तांतून जाऊं न देणें. स्मृतीपासून समाधि ह्मणजे चित्ताची एकाग्रता; समाधीपासून प्रज्ञा, ' ह्मणजे ज्ञान जें जाणावयाचें त्याचा पूर्ण विचार. इतरेषाम्ः—देव, आणि प्रकृतींत लीन होणारे योगी यांशिवाय इतरांना.

हा उपाय प्रत्यय असंप्रज्ञात योग्य ग्राह्य आहे कारण ह्याचा अभ्यास करीत राहिलें तर अज्ञान नष्ट होतें.

**सूत्रार्थः**—देव आणि प्रकृतींत लीन होणारे योगी यां शिवाय करून इतरांना केवळ उत्पन्न झाल्याबरोबर असंप्रज्ञात योग होत नाहीं तर श्रद्धा वीर्य स्मृति समाधि प्रज्ञा इत्यादिकांच्या द्वारानें उपाय असंप्रज्ञातयोग प्राप्त होतो.

वर जे योग सांगितले त्यां विषयीं कोणी वेळाचा निश्चितपणा विचारतील तर सूत्रकार सांगतात तें सांगणें आमच्या आटोक्या बाहेरचें आहे, ज्या त्या योग्याच्या उत्कट इच्छेवर अवलंबून आहे.

## तीव्रसंवेगानामासन्नः ॥ २१ ॥

तीव्र संवेगानाम् आसन्नः ॥

तीव्र ह्मणजे कडकडीत; संवेग=उत्कट इच्छा, आसन्न=नजीक.

**सूत्रार्थः**—अत्यंत उत्कट इच्छा असणें हें योगाभ्यास लवकर सिद्ध होण्याचें कारण आहे.

## मृदुमध्याधिमात्रत्वात्ततोऽपि विशेषः ॥ २२ ॥

मृदु, मध्य, अधिमात्रत्वात् ततः अपि विशेषः

मृदु=थंड उपाय; मध्य=त्यांच्यापेक्षां तीव्र; अधिमात्र=अत्यंत वेगवान् शीघ्र उपायी ततः=त्यापेक्षां; विशेषः=श्रेष्ठ.

त्या प्रत्येकांत तीन तीन प्रकारचे फरक आहेत ते

मृदु उपायः—मृदु, मध्य, अधिमात्र.

मध्योपायः—मृदु, मध्य. अधिमात्र.

अधिमात्रोपायः—मृदु, मध्य, अधिमात्र.

प्रत्येकांत तीन तीन भेद मिळून, नऊ भेदांचे किंवा उपायांचे योगी. **ते खलू नवयोगिनो भवन्ति**.

| मृदु उपाय, | मध्योपाय. | अधिमात्रोपाय, |
| --- | --- | --- |
| \| | \| | \| |
| मृदू, मध्य, अधिमात्र, | मृदू मध्य अधिमात्र, | मृदू, मध्य, अधिमात्र |

असे एकंदर भेद झाल्यानें ९ नऊ प्रकारचे योगी झाले.

**सूत्रार्थः**–आतां जे नऊ प्रकारचे योगी सांगितले त्या सर्वांपेक्षां ज्यांचें वैराग्य कडकडीत अशा योग्यांस समाधीची प्राप्ति सर्वांपेक्षां फारच जलद होते. मात्र कडकडीत वैराग्य प्राप्त होण्यास प्रयत्नही तसेच पाहिजेत.

२३ पूर्वीं सांगितलें कीं ( सूत्र २ व १२ ) चित्तवृत्ति निरोधानें वैराग्य प्राप्त होतें व चित्तवृत्तिनिरोध करणें हें काम फार बिकट; तो बिकटपणा घालवून चित्त-वृत्तींच्या निरोधाला व वैराग्यप्राप्तीला व त्यायोगें ईश्वरप्राप्तीचा सोपा उपाय सांगतात,

## ईश्वर प्रणिधानात् वा ॥ २३ ॥

ईश्वर प्रणिधानात् वा ॥ प्रणिधान=भक्ति; वा अथवा. कर्मफलाची इच्छा न करितां सर्व कर्मं इश्वरास गुरू समजून अर्पण करणें व मोठ्या प्रेमानें त्याचें ध्यान करणें; त्या योगें ईश्वर प्रसन्न होऊन योग्यावर पूर्ण कृपा करितो; ईशकृपेनें सर्व व्याधींपासून तो मुक्त होऊन त्यास समाधि व मोक्ष प्राप्त होतात.

**सूत्रार्थः**—ईश्वराच्या भक्तीनें समाधि प्राप्त होतो.

२४ सांख्यशास्त्र हें सेश्वर आहे व निरीश्वरही आहे. हें पूर्वीं सांगितलेंच आहे, पातंजल मुनि हे सेश्वरवादी असल्यानें ईश्वर ह्मणजे काय ह्याची व्याख्या सांगतात.

## क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेष ईश्वरः ॥ २४ ॥

क्लेश, कर्म, विपाक आशयै; अपरामृष्टः, पुरुषविशेषः ईश्वरः

क्लेश=क्लेश पांच प्रकारचे–अविद्या, अस्मिता, राग, द्वेष, अभिनिवेश याप्रमाणें क्लेश ह्मणजे दुःखें पांच प्रकारचीं आहेत.

कर्म=कर्म Action हीं दोन प्रकारचीं १ पापात्मक २ पुण्यात्मक, विपाक= हें कर्माचें फल, दोन्हीं पापात्मक व पुण्यात्मक कर्मांचीं फळें तो विपाक.

आशय=फलानुकूल संस्कार; पापाचरणानें हत्तीचा जन्म आला हें पापाचरणाचें फळ; त्या फलाप्रमाणें लांकडें खाण्याचा संस्कार—तदनुरूप संस्कार, सर्व प्राणी वरील चार प्रकारांनीं क्लेश कर्म, विपाक, आशय यांनीं युक्त आहेत; ईश्वर त्यांच्या बाहेर ह्मणून तो ईश्वर; अपरामृष्टः=न स्पर्शलेला ( From मृष् to bear, suffer, endure ) मृष्ट ह्मणजे Besmeared, dressed

**सूत्रार्थ**—क्लेश, कर्म, विपाक, आशय यांनीं न माखलेला ह्मणजे परामर्ष, न घेललेला अशा प्रकारचा जो विशेष पुरुष तो ईश्वर होय.

२५ अशा पुरुष विशेषाचें ज्ञान कसें काय असतें तें सांगतात.

## तत्र निरतिशयं सर्वज्ञबीजम् ॥ २५ ॥

तत्र निरतिशयम् सर्वज्ञ बीजम्.

तत्र=त्या ईश्वराचे ठिकाणीं; निरतिशयं=निर्गतः अतिशयः यस्मात् तत्, तथा ह्मणजे पराकाष्ठेचें किंवा अमर्याद सर्वज्ञ, सर्वज्ञत्व; बीजम्=कारण.

**सूत्रार्थः**—ईश्वर हा निरतिशय ज्ञानामुळें सर्वज्ञ आहे.

२६ त्या पुरुषाचे शक्तीविषयीं सांगतात.

## स एष पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात् ॥ २६ ॥

सः एषः पूर्वेषाम् अपि गुरुः कालेन अनवच्छेदात्

पूर्वेषाम्=पूर्वी जे गुरू होऊन गेले त्यांच्या गुरूंचा गुरू अनवच्छेद=( अवच्छेद कालानें परिमित ) कालानें अपरिमित.

**सूत्रार्थः**—तो हा पुरुष होय कीं जो ब्रह्मादि पुरुषांना ज्ञानोपदेश करणारा, कारण ब्रह्मादि पुरुषांचा काल मापतां येईल, सांगतां येईल परंतु विशेष पुरुषाचा काल सांगतां येणें कठीण; तो तिन्हींकाळीं असणारा म्ह. त्याचा सदोदित वर्तमानकाळ, मरणारे प्राण्यांना तीन काळ; ह्मणजे काळ याला मर्यादित करूं शकत नाहीं.

अशा तऱ्हेनें वर्णन केलेला पुरुष मिळावा कसा तें सांगतात.

## तस्य वाचकः प्रणवः ॥ २७ ॥

वाचक हें नांव; वाच्य हा पदार्थ. उदाहरण-समजा आपल्यासमोर पुस्तक आहे; त्या पुस्तकाचें नांव हें वाचक; त्या पुस्तकांतील अर्थ ध्यानांत येणें तें वाच्य, सत्पुरूष ह्मटलें कीं त्यांचे बरोबर अर्थ धांवत येतो; त्यांच्या वाणीच्या पाठीमागें अर्थ नेहमीं असतो; ते जसे बोलतील तसेंच खरें व्हावयाचें. ह्मणजे खरें तेंच त्याना स्फुरतें व जें स्फुरतें तेंच ते बोलतात. आपण अर्थ पाहून बोलावयास लागतों; त्यामुळें अर्थाच्या पाठीमागें आपण असल्यानें अर्थ चुकला कीं, पुढील वाणी ( बोलणें ) चुकतें त्यामुळें बोलणें फिरवावें लागतें; तसें सत्पुरुषांचें नसतें त्याचे अर्थ, मुख व वाणी यांत हजर असतात. त्यांना अर्थ शोधावे लागत नाहींत.

**सूत्रार्थः**—प्रणव ह्मणजे ओंकार हा ईश्वर वाचक शब्द आहे. वर सांगितल्याप्रमाणें सत्पुरूष ह्मटलें कीं अर्थ मागें धावूं लागतो, त्याचप्रमाणें ईश्वरवाचक शब्द प्रणव ( ब्रह्म, ओंकार ) उच्चारल्यानें त्याचा वाच्य अर्थ ईश्वरशक्ति, ज्ञान हें बरोबरच धांवत येतें ह्मणजे वाच्य वाचक संबंध हा नित्य ठरतो त्यांत अनिश्चितपणा, अनित्यता नाहीं.

२८ तो ईश्वरवाचक शब्द प्रणव आहे, जो मिळविण्यासाठीं

## तज्जपस्तदर्थभावनम् ॥ २८ ॥

तत् जपः तदर्थ भावनम्

तदर्थ-त्या प्रणवाचा अर्थ; ईश्वर ह्मणजे व्यक्ति; भावना ह्मणजे आकार चित्त, कल्पना.

**सूत्रार्थः**—त्या ओंकाराचा जप करावा; त्यामुळें ओंकाराचा अर्थ जो ईश्वर त्याची भावना बरोबर होते.

जपापासून फलप्राप्ति काय तें सांगतात.

## ततः प्रत्यक्चेतनाधिगमोऽप्यन्तरायाभावश्च ॥ २९ ॥

ततः प्रत्यक् चेतन, अधिगमः अपि अन्तराय अभावः च.

ततः=त्यापासून; प्रत्यक्=आत्मा; चेतन=ज्ञानस्वरूप; प्रत्यक् चेतन=ज्ञानस्वरूप असा आत्मा; अधिगम=प्राप्ति; प्रत्यक् चेतनस्य अधिगमः प्रत्यक्चेतनाधिगमः; अपि=सुद्धां, अन्तराय=विघ्न.

**सूत्रार्थः**—त्या जपापासून चित्ताच्या अनेक वृत्तींच्या विघ्नांचा अभाव होतो. चित्तवृत्ति अन्तरमुख होऊं लागतात. चित्तवृत्तींच्या विघ्नांचा अभाव झाला कीं चित्तवृत्तिनिरोध झालाच; ह्मणजे ईश्वराचा जप केल्यानें समाधि सिद्ध होतो.

पूर्वी जे चित्तवृत्तिनिरोधाचे उपाय सांगितले त्या उपायांपेक्षां हा सोपा उपाय झाला.

चित्तवृतींना अडथळे करणारीं विघ्नें सांगतात.

## व्याधिस्त्यानसंशयप्रमादाऽऽलस्याविरतिभ्रान्तिदर्शनालब्धभूमिकत्वाऽनवस्थितत्वानिचित्तविक्षेपास्तेऽन्तरायाः॥ ३० ॥

व्याधि, स्त्यान, संशय, प्रमाद, आलस्य, अविरति, भ्रान्तिदर्शन, अलब्धभूमिकत्व, अनवास्थितत्वानि, चित्तविक्षेपाः ते, अन्तरायाः ॥

**शब्दार्थः**—व्याधि–रोग; स्त्यान sloth, idleness. निरुत्साह, योगांत अप्रवृत्ति वृत्ति कदाचित् उत्पन्न होईल पण कर्माबद्दल योग्यता नसणें; संशय=दोहों पैकीं कोणतें खरें, दोरी खरी का सर्प खरा हा संशय होय. आणि भ्रांति=संशयाचा निश्चितपणा, दोरी असतां, दोरी नसून तो सर्पच असें वाटणें ही भ्रांति होय. प्रमाद=चूक; आलस्य=आळस; अविरति=रति ह्मणजे विषयप्रीति, विरति ह्मणजे वैराग्य अविरति, ह्मणजे वैराग्याचा अभाव. हें विघ्नच. शिंप पाहून रुपेंसें वाटणें हें भ्रान्ति दर्शन; दर्शन=ज्ञान. अलब्धभूमिकत्व=भूमिका ह्मणजे पायरी; योगांत एका पुढें एक अभ्यास वाढविणें ह्यास पायऱ्या किंवा भूमिका ह्मणतात एक भूमिका साध्य झाली ह्मणजे दुसरी मिळविणें; पायऱ्या न मिळणें तें अलब्धभूमिकत्व; लब्धभूमिकत्व ह्मणजे स्थितिप्राप्ति. अनवस्थितिः=चंचलता, अनवस्थितत्व=जी भूमि प्राप्त झाली तिच्यावर मन कधींही रहावयाचें नाहीं, योगी एखादी भूमिका प्राप्त करून घेत असतां मन मागें खेंचित असतें. विक्षेप–अडथळे, अन्तराय–विघ्न.

**सूत्रार्थः**—चित्ताला विघ्नें करणारे हे नऊ अडथळे आहेत.

३१ या विघ्नाचीं दुसरीं भावंडें आहेत तीं.

## दुःखदौर्मनस्याङ्गमेजयत्वश्वासप्रश्वासा विक्षेपसहभुवः ॥ ३१॥

दुःख, दौर्मनस्य, अङ्गम्, एजयत्व, श्वास, प्रश्वासाः, विक्षेप, सहभुवः ।

दौर्मनस्य=विषाद, दुर्मनसः भावः दौर्मनस्यं ह्मणजे मनोविभंगः अङ्गम्=शरिराचा अवयव; एजयत्व=कम्प; अङ्गमेजयत्व=शरीराच्या अवयवांना कम्प सुटणें ( एज्=कम्पने ); श्वास=हें रेचकाला विघ्न; प्रश्वास=पूरकाला विघ्न; निक्षेप=अडथळा; सहभुवः भावंडें.

**सूत्रार्थः**—दुःख मनोविभंग, शरीराच्या अवयवांना कम्प सुटणें श्वास प्रश्वास हे जे विक्षेप ह्मणजे अडथळे तीं विक्षेपाचीं भावंडेंच आहेत.

सूत्र ३० यांत जीं विघ्नें सांगितलीं त्यांचीं भावंडें ३१ व्या सूत्रांत सांगितलीं; ह्या विघ्नांनीं समाधि साधत नाहीं.

तो समाधि साधण्यासाठीं विघ्न निवारण सांगतात–

**तत्प्रतिषेधार्थमेकतत्वाभ्यासः ॥ ३२ ॥**

तत्, प्रतिषेधार्थम्, एक तत्व अभ्यासः;

प्रतिषेध=निषेध, कांटे काढून टाकणें.

**सूत्रार्थः**—त्या विक्षेपांचा नाश करण्याकरितां एक तत्वाचा अभ्यास करावा.

चित्त चोहोंकडे फांकलेलें असतें तें एका ठिकाणीं आणण्याकरितां सूत्र ३२ यांत एक तत्वाचा अभ्यास सांगितला.

काय काय केलें असतां चित्त प्रसन्न होईल ते उपाय सांगतात.

**मैत्री करुणा मुदितोपेक्षाणांसुखदुःख पुण्यापुण्यविषयाणां भावनातश्चित्तप्रसादनम् ॥ ३३ ॥**

चित्त हें विशेष प्रकारच्या भावनेनें प्रसन्न होत असतें; संसारिक भावनेनें चित्त प्रसन्न होणार नाहीं; असूयादि दोष जोंपर्यंत अंतः करणांत आहेत तोंपर्यंत चित्त शुद्ध व्हावयाचें नाहीं; अधम मनुष्याचे हातून कांहींच होणार नाहीं.

| | |
|---|---|
| सुख, | मैत्री, |
| दुःख, | करुणा, |
| पुण्य, | मुदिता ( आनंद ) |
| अपुण्य, | उपेक्षा ( दुर्लक्ष्य ) |

भावना ह्मणजे संस्कार. उदाहरण. चटइचें; चटईला रोज गुंडाळीत असलें ह्मणजे कांहीं दिवसांनीं तिची गुंडाळी आपोआप होते, ही भावना ह्मच संस्कार त्या चटईला,

सुख=सुखी, सुखविषयक; मैत्री ह्मणजे सुखी प्राण्याशी मैत्री करावी, विषय-शब्दाचा अर्थ विषयीं करावा; सुखविषयक, दुःखविषयक, पुण्यविषयक, अपुण्य-विषयक,

प्रसादनम्=प्रसादस्तु प्रसन्नता.

**प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते ।**
**प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥** गी. २. ६५.
* **नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना ।**
**न चाभावयतः शान्तिरशान्तस्य कुतः सुखम् ॥** २. ६६.

सुखी प्राण्याच्या ठिकाणीं मैत्री; सुखी मनुष्याला पाहिलें ह्मणजे ईर्षा उत्पन्न होते, ही ईर्षा उत्पन्न होणें हा वृत्तीचा मळ काढून टाकण्यासाठीं सुखी मनुष्याची मैत्री करावी. दुःखी पुरुषाचें दुःख पाहून मनाला वाटणें भलें झालें ठीक झालें अशा प्रकारची अपकार बुद्धि हा अन्तःकरणाचा मळ काढून टाकण्यासाठीं दुःखी मनुष्याला पाहून मन कळवळलें पाहिजे द्रवले पाहिजे, पातळ झालें पाहिजे. अपकार बुद्धि नष्ट झाली कीं अन्तःकरण शुद्ध होतें. पुण्यवान् प्राणी पाहिला कीं त्या प्राण्याबद्दल लोक, चर्चा करितात व त्याच्या पुण्यकर्माबद्दल दांभिकपणाची भावना करून हा पुण्यमार्ग त्याचा दांभिकपणा आहे असें लोक उघडउघड बोलतात; चांगलेपणा पहातच नाहींत. ही असूया गुणेषु दोषाविष्करणं—अपुण्यवान् असेल तर त्याची उपेक्षा करावी; आपणांमध्यें शक्ति असेल तर त्या अपुण्य प्राण्याला सुधारावा; नसेल तर दुर्लक्ष करावें. उदाहरणार्थ—आपल्या शेजारीं दारूबाज आहे किंवा लोकांना पीडा देणारा आहे तर त्याजबद्दल तिटकारा आणूं नये; शक्ति असेल तर त्यास सुधारावा नसेल तर उपेक्षा ह्मणजे कानाडोळा करावा.

**सूत्रार्थः**—सुखी प्राण्याविषयीं मैत्री; दुःखी प्राण्याविषयीं करुणा, पुण्यवान् प्राण्याविषयीं आनंद, पापी मनुष्या विषयीं उपेक्षा, ह्याप्रमाणें चित्ताची भावना

---

* ज्याला बुद्धि ( ज्ञान ) नाहीं, त्याला ध्यान नाहीं, ध्यान नाहीं त्याला शान्ति नाहीं व ज्याला शान्ति नाहीं त्याला सुख कोठून मिळणार !

केली ( चटाईच्या गुंडाळण्याच्या संवईप्रमाणें ) ह्मणजे चित्त प्रसन्नतेंत चटईप्रमाणें गुंडाळतें ह्मणजे प्रसन्नता पावतें.

३४ चित्तप्रसन्नतेला आणखी उपाय सांगतात.

## प्रच्छर्दनविधारणाभ्याम् वा प्राणस्य ॥ ३४ ॥

प्रच्छर्दन=प्रयत्नानें बाहेर काढणें ह्मणजे रेचकविधी. कौष्ठस्य वायोः नासिका पुटाभ्याम् प्रयत्नविशेषात् वमनम् इति प्रच्छर्दनम्; विधारणं प्राणायामः प्राणायाम ह्मणजे रेचकयुक्त केलेला जो प्राणवायू त्याचा जो आयाम ह्मणजे बाहेरच ठेवणें त्यास प्राणायाम ह्मणतात. रेचितस्य प्राणस्य ( कौष्ठस्य वायोः ) य आयमः ( बहिरेव स्थापनं ) नतु सहसा प्रवेशनं सः प्राणायामः; पारिभाषिक शब्द विधारणा, विधारणा प्राणायामं कुंभकं, बहिः कुंभकं.

**सूत्रार्थः**—बहिःकुंभकानें लघुत्वशरीर असा प्राणी बनतो ह्मणजे शरीर हलकें होतें. त्या हलके होण्यानें चित्तावर विकार होत नाहींत आणि चित्त प्रसन्न होतें.

मनाला स्थीर करण्याला आणखी उपाय सांगतात.

## विषयवती वा प्रवृत्तिरुत्पन्ना मनसः स्थितिनिबन्धनी ॥ ३५ ॥

विषयवती, वा प्रवृत्तिः उत्पन्ना मनसः स्थिति निबन्धनी.

विषयवती प्रवृत्ति=दिव्य विषयांचें ज्ञान ज्यामध्यें असतें अशी प्रवृत्ति उत्पन्न झाली किंवा मनसः स्थितिनिबन्धनी, मनाच्या स्थितीचें निबंधन करणारी.

रूप, रस, गंध स्पर्श आणि शब्द हे पांच विषय. १ नासिकाग्रावर चित्ताचें संयमन केल्यानें दिव्य गंधाचा साक्षात्कार होतो. २ जिव्हाग्रावर चित्ताची एकाग्रता केल्यानें दिव्यरसाचा साक्षात्कार होतो. ३ ताळूवर चित्ताचीं एकाग्रता केल्यानें दिव्य रूपाचा साक्षात्कार होतो. ४ जिव्हेच्या मध्यावरच चित्ताची एकाग्रता केल्यानें दिव्य स्पर्शाचा साक्षात्कार होतो. ५ जिव्हामूलावर चिताची एकाग्रता केल्यानें शब्द संवित् ( ज्ञान ) ह्म. दिव्य शब्दांचें ज्ञान होतें; वर निर्दिष्ट केलेल्या विषयांवर चित्ताचा विश्वास अनेक दिव्य वस्तूंनीं बसतो, ह्मणजे चित्ताची विषयवती वृत्ति केल्यानें चित्ताला त्या विषयांपर रमविल्यानें ते मनाला नियमन करूं शकतात.

**सूत्रार्थः**—विषयवती प्रवृत्ति ही मनाच्या स्थितीचें नियमन करणारी आहे आणखी उपाय सांगतात.

## विशोका वा ज्योतिष्मती ॥ ३६ ॥

विशोका वृत्ति=शोकरहित. ज्योतिष्मती=सदर नावाची तेजस्वी वृत्ति; ज्योतिष् ह्मणजे तेज तें ज्यामध्यें आहे अशी वृत्ति.

ज्योतिष्मती वृत्ति तेजस्वि वृत्ति होय. हृदयाच्या ठिकाणीं आठ पाकळ्यांचें एक कमळ आहे ज्यास **मनश्चक्र** असें ह्मणतात. तें कमळ मिटलेलें असून त्याचें तोंड खालच्या बाजूस आहे तें त्यांचें तोंड वरच्या बाजूस होईल असें रेचक प्राणायामानें करावयाचें असतें व तें तोंड वर झाल्यानंतर तें कमळ पूरकानें फुलवावयाचें तें फुलल्यानें योग्याचें मन एकाग्र व्हावयास लागतें ह्मणजे तेथें शोकरहित अत्यंत तेजस्वी वृत्ति निर्माण होते. व त्याच्यायोगें मन प्रसन्न होतें.

**सूत्रार्थः**-शोकरहित ज्योतिष्मती वृत्ति जागृत झाल्यानें मनाची एकाग्रता होते. आणखी मनाचे एकाग्रतेचा उपाय सांगतात.

## वीतरागविषयं वा चित्तम् ॥ ३७ ॥

वीत ह्मणजे गेलेली; राग ह्मणजे विषयप्रीति वीतरागविषयम् वीतः राग यस्यसः वतिरागः; वीतरागः विषयः यस्य तत् वीतरागविषयं.

**सूत्रार्थः**—विषयांविषयीं प्रीति गेलेली आहे ज्याची, उदाहरणार्थ व्यास, व्यास शुक इत्यादि; अशा पुरुषांच्या ठिकाणीं तद्विषयक चित्त केलें असतां तें प्रसन्न होतें. शुकासारख्या पुरुषांची भावना चित्ताला दिल्यानें तें प्रसन्न होतें.

आणखी उपाय सांगतात.

## स्वप्ननिद्राज्ञानालंबनं वा ॥ ३८ ॥

स्वप्न, निद्रा ज्ञान आलंबनं वा.

स्वप्नश्च निद्राच स्वप्ननिद्रे; स्वप्ननिद्रयोः ज्ञानं स्वप्ननिद्राज्ञानं तस्य आलंबनम् स्वप्न निद्राज्ञानालंबनम्. स्वप्नज्ञानालंबनम् व निद्राज्ञानालंबनम्. आलम्बनम्-स्वीकार. आश्रय,

**स्वप्नज्ञानालंबनम्**-स्वप्नांत आपण अरण्यांत आहों व तेथें चतुर्भुज शंख-चक्र, गदा, पद्मधारी ईश्वर पाहिला; त्याची उपासना आपण करीत आहों व त्यापासून आपणांस अलौकिक सुख उत्पन्न होतें अशा स्थितींत जर मनुष्य जागा झाला तर जागेपणींसुद्धां त्याच वृत्तीचा अभ्यास चालू करावा. त्या स्थितींत सुखानें राहिल्यानें रज तम गुणांचीं कार्यें उत्पन्न होणार नाहींत ( ह्मणजे दुःख निवृत्ति झाली ) ही स्थिती प्राप्त झाल्यानें चित्त प्रसन्न राहील.

**निद्राज्ञानालंबनम्**-'सुखं अहं अवाप्स्यम्' निद्रा लागून चित्ताला अलौकिक सुख होतें अशा स्थितींतील ज्ञानाचा अवलंब जागृतावस्थेंत करावा ह्मणजे चित्त प्रसन्न होतें.

**सूत्रार्थः**—सुस्वप्न आणि निद्रा ह्या अवस्थांच्या ज्ञानाचा अवलंब केल्यानें चित्त प्रसन्न होतें.

## यथाभिमतध्यानाद्वा ॥ ३९ ॥

यथा अभिमत ध्यानात् वा,

अभिमत=मान्य; वा=अथवा

**सूत्रार्थ**—आपणांस जी वस्तु प्रिय असेल अशा वस्तूवर ध्यान धरिल्यानें चित्त स्थीर होतें. मात्र दुष्ट भावनेचें ध्यान वर्ज समजावें.

आणखीं मनाचे एकाग्रतेचा उपाय सांगतात.

## परमाणुपरममहत्त्वान्तोऽस्य वशीकारः ॥ ४० ॥

परमाणु=अतींद्रिय तो परमाणु; सूर्य किरणांत अतिशय बारीक दिसणाऱ्या कणाचा सहावा हिस्सा तो परमाणु.

**जालसूर्यमरीचिस्थं सूक्ष्मं यत् दृश्यते रजः ।**
**तस्य षष्ठतमो भागः परमाणुः स कथ्यते ॥**

स्थीर झालेलें चित्त अभ्यासानें परमाणूपासून महत्तत्त्वापर्यंत सर्व वस्तूंवर एकाग्र करण्यालायक होतें. व तें आकाश, काल, इत्यादि व्यापक तत्वें त्यांच्यावरसुद्धां एकाग्र होईल.

अस्य=चित्तस्य.

**परमाणु अन्तः**—लहान पदार्थाचा शेवट; महत्त्व अन्तः=मोठ्या पदार्थाचा शेवट ह्मणजे आकाश; वशीकार=ताब्यांत आणणें. चित्त प्रसन्न झालें कीं नाहीं ह्याची परीक्षा पाहाण्यासाठीं, हें ४० वें सूत्र आहे; चित्त हें लहान परमाणूपासून तों मोठा पदार्थ आकाशापर्यंत सर्व वस्तु ग्रहण करण्यालायक झालें ह्मणजे समजावें कीं चित्ताची तयारी झाली. ही चित्ताची प्रसन्नतेची कसोटीच आहे.

**सूत्रार्थः**—लहानांत लहान परमाणूपासून आरंभ करून मोठ्यांत मोठा आकाशापर्यंत अप्रतिघाताशिवाय एकाग्र मन होऊं लागलें म्हणजे मनाचा पूर्ण वशीकार झाला म्हणून समजावें.

मन पूर्ण ताब्यांत येणें हा मनाचा वशीकार आहे. मन पूर्ण ताब्यांत आल्याशिवाय विषय ताब्यांत येत नाहींत. मनवशीकार झाल्यावर वशीकारवैराग्य प्राप्त होतें. मन स्थीर झाल्यावर संप्रज्ञात समाधि प्राप्त होतो त्याचें लक्षण सांगतातः—

**क्षीणवृत्तेरभिजातस्येव मणेर्ग्रहीतृग्रहणग्राह्येषु तत्स्थतदञ्जनता समापत्तिः ॥ ४१ ॥**

क्षीणवृत्तेः, अभिजातस्य, इव मणेः ग्रहीतृ ग्रहण, ग्राह्येषु, तत्स्थ, तदञ्जनता, समापत्तिः ॥

क्षीणवृत्तेः वृत्ति क्षीण करणें ह्मणजे साफ काढून टाकणें; वृत्तींना जर कळलें ह्या वृत्ति काढून घालवून दुसऱ्या वृत्तीला जागा द्यावयाची आहे तर त्या वृत्ति निघणार नाहींत. जसें एकादे जागेंत स्त्रिया आहेत व त्यांस जर सांगितलें तुह्मीं जागा खालीं करा अमूकबाई यावयाची आहे तिला जागा ही दिली पाहिजे; तर त्या दुसऱ्या बाईकरितां ती जागा केव्हांही खालीं करून देणार नाहींत; ह्मणून प्रथम सर्व वृत्ति घालवून द्यावयाच्या; स्फटिकमणी हा खाणींतून काढल्यावर त्याच्यावरील मळ घांसून साफ करून स्वच्छ पांढरा झाल्यावर तो दुसरे रंग सांनिध्यानें घेण्यालायक बनतो, तसें चित्त प्रथम बनवावयाचें ह्मणजे मन निर्वृत्तिक करावयाचें. अभिजातस्य-अभिजातः, अभिजातस्य मणे इव; जसें स्फटिक मण्याला मळ जाण्याकरितां घांसून स्वच्छ करावा लागतो, तसेंच चित्ताला.

तत्स्थ=तस्मिन्तिष्ठति इति तत्स्थः त्याच्याठिकाणीं स्थित होणें; तदञ्जनता=तत्स्वरूप बनणें; समापत्तिः=संप्रज्ञातयोग; ग्राह्य, ग्रहण ग्रहीतृ असा पाठ पाहिजे

**ग्राह्य** म्हणजे ग्रहण करण्यास योग्य तें; ग्रहण करण्यास योग्य कोणतें तर सर्व विषय; म्हणजे **ग्राह्य ह्याचा अर्थ विषय.**

ह्या ग्राह्य विषयामध्यें भेद दोन-कांहीं विषय स्थूल असतात व कांहींसूक्ष्म असतात, म्हणजे स्थूल ग्राह्य व सूक्ष्मग्राह्य.

स्थूलग्राह्य—कृष्णाची मूर्ति ध्यानांत येऊन तत्स्थ तदञ्जनता करणें म्हणजे त्या स्थूल मूर्तीच्या ठिकाणीं चित्ताची स्थीरता करून तदाकार करणें; हा एक समापत्तीचा प्रकार हा सवितर्क समापत्तियोग होय.

आतां ग्राह्यापैकीं सूक्ष्मविषय घेतला व त्याच्यावर तत्स्थ तदञ्जनता उत्पन्न होणें हा सविचार संप्रज्ञातसमापत्तियोग होय.

**ग्रहण**—ज्यांच्या योगानें विषयांचें ग्रहण होतें म्हणजे घेणें होतें तें ग्रहण; इंद्रियांच्या द्वारें विषयाचें ग्रहण होतें म्हणून **ग्रहण म्हणजे इंद्रियें.** यावरून इंद्रियांच्या ठिकाणीं तत्स्थ तदञ्जनता उत्पन्न होणें हा तिसरा समापत्तीचा प्रकार झाला म्हणजे सानंद समापत्तियोग.

**गृहीतृ**=घेतो तो; घेणारा, मूळ द्रष्टा जो ज्ञानस्वरूप आहे तो ग्रहीता होत नाहीं, घेणें देणें हा प्रकार त्याचा मूळचा नाहीं हा प्रकार अस्मितेचा आहे. अस्मितेमुळें तो घेणारा देणारा होतो. उदाहणार्थ—झोपेमध्यें घेणें देणें बंद असतें. अस्मिता असली ह्मणजे त्या अस्मितेच्या ठिकाणीं तत्स्थ तदञ्जनता होते. ती स्थिती समापत्तीचा चवथा प्रकार झाला सूत्रामध्यें ग्रहीतृग्रहण ग्राह्येषु असे शब्द आहेत ते वास्तविक स्थूलापासून सुरूकरून सूक्ष्माकडे वळणें अशा प्रकारचे पाहिजे होते परंतु योग्यतेवरून सूक्ष्माला प्रथम मान दिला, नंतर मन इंद्रियाला मान दिला आणि मग स्थूलाला दिला. आपले समजुतीसाठीं ग्राह्यग्रहण गृहीतृ असा पाठ घ्यावा.

**सूत्रार्थः**—स्फटिक मण्याप्रमाणें प्रथम मळ घालवून चित्ताला स्वच्छ करावें, म्हणजे निवृत्तिक मन करावें ह्मणजे रंग घेण्याला तें लायक होतें. नंतर स्थूल विषय, सूक्ष्म विषय, इंद्रिय विषय, व अस्मिता यांच्या ठिकाणीं तें ( तत्स्थ ) राहणें व तदाकार होणें अशा चित्ताच्या वृत्तीला ( स्थितीला ) समापत्तियोग म्हणतात.

ग्राह्य ग्रहण समापत्तीचे विशेष भेद सांगतात.

## तत्र शब्दार्थज्ञानविकल्पैः सङ्कीर्णा सवितर्का समापत्तिः ॥४२॥

तत्र, शब्द, अर्थ, ज्ञान, विकल्पैः । सङ्कीर्णा, सवितर्का, समापत्तिः ।

संकीर्णा=व्याप्त, मिश्रित; अर्थ=आकार; आपल्यापुढें पुस्तक आहे व डबी आहे असें समजूं; पुस्तक शब्द उच्चारिल्यानें पुस्तकाचें ज्ञान होणें व डबीचें न होणें; तें ज्ञान त्याचा अर्थ ह्मणजे आकाराचें ज्ञान होणें म्हणजे पुस्तक ह्या शब्दाचें ज्ञान होणें ह्यास विकल्प म्हणतात.

शब्द अर्थ ( आकार ) ज्ञान हीं तिन्हीं निरनिराळीं आहेत. विकल्प ह्मणजे वस्तु एकच असून अनेक आहेत असा भास होणें, किंवा अनेक वस्तू असून एकच वस्तु आहे असा भास होणें; येथें विकल्पशब्दाचा अर्थ नेहेमीं संकल्प विकल्प मनामध्यें होतात, तो अर्थ विकल्पाचा येथें नव्हे येथें मिथ्याज्ञानमतद्रूपम् या अर्थी योजिलेला आहे. शब्द अर्थ व ज्ञान या तिघांचे धर्म निरनिराळे आहेत. धर्म जर निराळे आहेत तर धर्मीही ह्मणजे धर्म ज्यावर राहतात तेही निराळेच असले पाहिजेत. धर्म निरनिराळे असतां एकच आहेत असा भास होणें हा विकल्प होय. उदाहरणार्थ घोडा शब्द उच्चारल्यानें अर्थात् तीन घोडे येतात एक तोंडाने उच्चाराने निघाला तो घोडा एक कानांत शिरला तो घोडा व तिसरा प्रत्यक्ष दिसला तो घोडा.

ग्राह्य विषय ध्यानाचा विषय स्थूल असून त्या स्थूलग्राह्यामध्यें सवितर्क व निर्वितर्क असे दोन भेद आहेत, स्थूलामध्यें ( सवितर्क ) शब्द अर्थ ज्ञान या तिघांच्या मिश्रणानें भास होतो. निर्वितर्कामध्यें ध्यानाचा विषय जरी स्थूल आहे तरी स्मृति शुद्ध झाल्यानें केवळ अर्थाचाच भास होतो.

**सूत्रार्थः**—शब्द अर्थ व ज्ञान हीं ज्यामध्यें सामान्यत्वेंकरून असतात त्या स्थितीला किंवा शब्द अर्थ ( आकार ) व ज्ञान यांची मिश्रित स्थिती यांचे ज्ञानाचा प्रकार मिश्रित आहे ज्या समापत्तीमध्यें अशा समापत्तीला सवितर्क समापत्ति ह्मणतात.

ह्यामध्यें भेद दोन--स्थूलविषयक सवितर्का समापत्ति व सूक्ष्मविषयक सवितर्का समापत्ति.

तसेंच **सविचार व निर्विचार**--ज्या स्थितीमध्यें सूक्ष्म विषय ध्यानाचा असून शब्दअर्थ ज्ञान व देशकाल यांचा विचार असतो तो सविचार व नसतो तो निर्विचार समापत्ति; ह्यामध्यें पदार्थाविषयीं **सामान्य विचार चालतो व चालत नाहीं.**

## स्मृतिपरिशुद्धौ स्वरूपशून्येवार्थमात्रनिर्भासा निर्वितर्का ॥४३॥

स्मृति, परिशुद्धौ, स्वरूपशून्य, इव, अर्थ, मात्र, निर्भासा निर्वितर्का. स्मृति=स्मरण; परिशुद्धौ=अत्यंतशुद्ध; स्वरूपशून्य=स्वरूपरहित, निर्गुण; मात्र=केवल; निर्भास=नितरां भासः इव शब्दानें दाखविलें जातें कीं पूर्ण शून्यत्व न होतां समाधींतून निघाल्यावर मग प्रथम ध्यानात योगी येतो नंतर धारणेत नंतर नेहमी-सारखा पुन्हा आहेच.

सवितर्का समापत्तिमध्यें स्मृतीची शुद्धि नसते त्यामुळें शब्द, अर्थ, ज्ञान एकच भासतें; परंतु स्मृतीची विशेषप्रकारें शुद्धि झाल्यानें स्वरूपाची शून्यता भासून म्हणजे शब्द व ज्ञान याचा अभाव होऊन केवल अर्थाचें भान असतें अशी जी समापत्ति ती निर्वितर्का समापत्ति होय.

**सूत्रार्थः**—स्मृतीची विशेष प्रकारें शुद्धि झाल्यानें स्वरूपाची शून्यता भासून केवल अर्थाचें भान असतें अशी जी समापत्ति ती निर्वितर्का समापत्ति होय.

## एतयैव सविचारा निर्विचारा च सूक्ष्मविषया व्याख्याता॥४४॥

**सूत्रार्थः**—ज्यामध्यें सूक्ष्म विषय ध्यानाचा असून शब्द, अर्थ, ज्ञान, देश-काल याचा विचार असतो तो सविचार; नसतो तो निर्विचार; एतया म्हणजे या सूत्रानें सविचार निर्विचार या दोहोंचाही निकाल लागला. सूक्ष्म ध्येय ज्यामध्यें असतें अशी जी सविचार व निर्विचार समापत्ति ती व्याख्यात झाली.

## सूक्ष्मविषयं चालिङ्गपर्यवसानम् ॥ ४५ ॥

सूक्ष्मविषयं, च, अलिङ्ग, परि अवसानम्.

सूक्ष्म विषय=बारीक परमाणू, ध्यानाचा विषय; अलिङ्ग=प्रकृति;

परि=अलंकारार्थ योजिलेलें अव्यय; अवसान=शेवट.

**सूत्रार्थः**—ध्यानाचे सूक्ष्म विषयाचा शेवट प्रकृति होय.

४६ आतांपर्यंत जे समापत्तीचे प्रकार सांगितले तेः—

## ता एव सबीजः समाधिः ॥ ४६ ॥

**सबीज**=बीज ह्मणजे अविद्या तत्व, तें निराळें, व पुरुष निराळा हें ओळखण्याची प्रज्ञा नसते, ह्मणून सबीज.

**सूत्रार्थः**—आतांपर्यंत सांगितलेल्या समापत्ति ह्या सबीज होत.

४७ह्यांमध्यें अज्ञान, रज, तम, उठण्याचा संभव असतो ह्मणून ते गुण न उठतील अशी समापत्ती ह्मणजे निर्विचार समापत्ति त्यामध्यें कुशलताच मिळविली पाहिजे. ह्मणून—ती मिळविण्यासाठीं.

## निर्विचारवैशारद्येऽध्यात्मप्रसादः ॥ ४७ ॥

निर्विचार, वैशारद्ये, अध्यात्म, प्रसादः

वैशारद्यम्=विशारदस्य भावः वैशारद्यम् ( कुशलता. )

अध्यात्म=आत्मनि इति अध्यात्मं, आंतलीसत्ता. प्रसादः=प्रसन्नता.

**सूत्रार्थः**—सूक्ष्माचें ध्यान, केवल अर्थाचा भास ( अर्थमात्रभासः ) अशी जी समापत्ति त्यामध्यें कुशलता उत्पन्न झाली ह्मणजे अध्यात्मप्रसादाची प्राप्ति होते.

अशी कुशलता प्राप्त झाली ह्मणजे-

## ऋतम्भरा तत्र प्रज्ञा ॥ ४८ ॥

ऋतं बिभर्ति इति ऋतंभरा; ऋत ह्मणजे सत्य; सत्याला धारण करणारी प्रज्ञा तत्र=त्या ठिकाणीं, प्रज्ञा=अलौकिक ज्ञान.

**सूत्रार्थः**—त्या ठिकाणीं ह्मणजे निर्विचार समापत्तीमध्यें पूर्ण अभ्यासानें परिपाक झाल्यानंतर ऋतम्भरा नावाची अलौकिक प्रज्ञा उत्पन्न होते.

ती प्रज्ञा कशी असते तें सांगतात—

## श्रुतानुमानप्रज्ञाभ्यामन्यविषया विशेषार्थत्वात् ॥ ४९ ॥

श्रुत, अनुमान, प्रज्ञाभ्याम्, अन्यविषयाः विशेष, अर्थत्वात्. श्रुतं च अनुमानं च श्रुतानुमाने तयोः प्रज्ञा=श्रुतानुमानप्रज्ञा; अन्यः विषयः यस्याः सा अन्यविषया.

**सूत्रार्थः**—श्रुतानुमान प्रज्ञा सामान्यस्वरूप दाखविणारी असते; ती ऋतंभरा प्रज्ञा, ऐकलेल्या व तर्क केलेल्या प्रज्ञेपेक्षां विशेषार्थत्वामुळें अन्य पदार्थांचें विशेष स्वरूप दाखवीत असते.

आतां ऋतंभरा प्रज्ञेचा फायदा काय तो सांगतात.

**तज्जः संस्कारोऽन्यसंस्कारप्रतिबन्धी ॥ ५० ॥**

प्रतिबध्नाति इति प्रतिबन्धी. तज्जः तस्मात्जातः,

**सूत्रार्थः**—ऋतंभरा प्रज्ञेपासून जे संस्कार उत्पन्न होतात ते अनादि कालापासून उत्पन्न झालेले जे प्राकृत संस्कार त्यांचा नाश करितात (त्यांना बांधून टाकितात.)

व ऋतंभरा प्रज्ञेपासून उत्पन्न झालेले संस्कारांचा निरोध केल्यानें निर्बीज समाधि सिद्ध होतो. कसातर—

**तस्यापि निरोधे सर्वनिरोधान्निर्बीजः समाधिः ॥ ५१ ॥**

तस्य=संस्कारस्य. निरोधात्=निरोधामुळें.

**सूत्रार्थः**—त्या संस्काराच्या निरोधकाळीं सर्व वृत्तींचा निरोध होत असल्यामुळें निर्बीज समाधि सिद्ध होतो.

**समाधिपादः समाप्तः ॥ १ ॥**

**क्रियायुक्तस्य सिद्धिः स्यादक्रियस्यकथं भवेत् ।**
**न शास्त्रमात्रपाठेण योगसिद्धिः प्रजायते ॥**
**उद्यमः साहसं धैर्यबलं बुद्धिः पराक्रमः ।**
**षडिमे यस्य तिष्ठंति स सर्वं प्राप्नुयात् पुमान् ॥**

## साधनपादः ॥ २ ॥

पहिला पाद उत्तम अधिकाऱ्यांसाठीं, अभ्यास व वैराग्य या दोन साधनांनीं चित्तवृत्तीचे निरोधास्तव सांगितला, व तेच उत्तम अधिकारी धर्ममेघसमाधीपर्यंत ही पोंचतात. परंतु ज्यांचें चित्त ( अन्तःकरण ) वारंवार चंचल ( विक्षिप्त ) होतें व जे साधारण सामान्य लोक त्यांच्या करितां हा दुसरा पाद होय.

अनादि कालापासून विषयजालामध्यें पडलेलीं अन्तःकरणें साफ होण्यासाठीं क्रियायोग ( कर्मयोग ) उचित होय, त्या क्रियायोगाला किंवा कर्मयोगाला ह्या दुसऱ्या पादांत सुरवात करितात.

### तपःस्वाध्यायेश्वरप्रणिधानानि क्रियायोगः ॥ १ ॥

तपः स्वाध्याय ईश्वरप्रणिधानानि क्रियायोगः

तपः=ब्रह्मचर्य, गुरुसेवा इत्यादि स्वीकारून आपआपल्या आश्रमधर्माप्रमाणें वागणें तें तप. **नातपस्विनो योगः सिध्यति** ।

स्वाध्यायः=अभ्यास. प्रणवादि पवित्राणाम् जपो मोक्षशास्त्राध्ययनं वा । प्रणिधान=भक्ति. क्रियायोग=कर्मयोग

स्वाध्याय हा शब्द वास्तवीक प्रथम पाहिजे; कारण शास्त्राध्ययन झाल्याविना कार्य कोणतें अकार्य कोणतें याच्या निर्णयास्तव शास्त्रप्रमाण आहे ( **तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ** । गी. १६.२४ हें ठसणार नाहीं; जोंपर्यंत शास्त्रप्रमाण असें ठसलें नाहीं तोंपर्यंत तप व ईश्वरभक्ति करण्याला लायकी येणार नाहीं हें खरें आहे; तथापि, देहलीदीप न्यायानें ( देहली दीप न्यायः—उंभरठ्यावर दिवा ठेविला कीं उजेड दोहोंकडे पडतो; स्वयंपाकघरांत व माजघरांत तद्वत् ) वा काकाक्षिन्यायानें स्वाध्यायाचा प्रकाश तप ईश्वरभक्ति यांजवर पाडण्यासाठीं मध्यें स्वाध्याय शब्द घातला. ईश्वर प्रणिधान ( भक्ति ); आपण जीं काय बरीं वाईट कर्में आचरितों त्यांचीं फळें ईश्वरास अर्पण करणें, आपलें प्रत्येक कृत्य ईश्वरावर हवालून शांत राहणें यास ईश्वरप्रणिधान ह्मणतात. डोंगराराचे शिखरावर चढण्याला जशा पायऱ्या त्याचप्रमाणें समाधीपर्यंत पोंचण्याला ज्या पायऱ्या त्यांतील पहिली पायरी **क्रियायोग** ही होय.

## आरुरुक्षोर्मुने योगंकर्मकारणमुच्यते । गी. ६.३

चंचल मनाला आवरावयाचें आहे त्या आवरण्याचे साधनांपैकीं पहिला धडा स्वाध्याय; दुसरा धडा तप; व तिसरा धडा ईश्वर प्रणिधान; ह्या धड्यांस क्रिया योग ह्मणतात.

**सूत्रार्थः**—स्वाध्याय, तप, आणि ईश्वरभक्ति यांस क्रिया योग ह्मणतात.

२ प्रापंचिक माणसें, ज्या झाडाला फळें येणार नाहींत तें झाड लावण्यास प्रवृत्त होत नाहींत; तद्वत्च साधारण माणसांची फलाशेशिवाय कर्म करण्यांत प्रवृत्ति होणार नाहीं हें जाणून फलश्रुति देऊन क्रियायोग सांगतात. फलाशिवाय संसारीक ऐकणार नाहींत ह्मणून प्रत्येक विषयाला फलश्रुति सांगितली व जागो जाग फल दाखविलें आहे-

क्रियायोगाचें फल सांगतात.

## समाधिभावनार्थः क्लेशतनूकरणार्थश्च ॥ २ ॥

समाधि=सम्यक्आधीतये मनः अत्र इति समाधिः

भावना=Faith, Idea, Thought, Conception कल्पना अर्थः= प्राप्ति.

तनूकरण=कमी करणें, कृश करणें.

समाधेः भावना=समाधिभावना; समाधिभावनायै इति समाधिभावनार्थः=समाधि प्राप्त करून घेण्याकरितां.

क्लेशानां तनूकरणं=क्लेशतनूकरणं; क्लेशतनूकरणाय इति क्लेशतनूकरणार्थः

जसा धुमसत असणाऱ्या अग्नीचा धूर थोडा थोडा नाहिसा होत होत अग्नि प्रज्वलीत होऊन जळून जातो तद्वत् क्रियायोगाचा अभ्यास जसजसा वाढत जाईल तसतसें चित्तांतलि मलरूपी अज्ञान कमी होत जाऊन, अज्ञान नष्ट झाल्यानें समाधिसिद्धी प्राप्त होईल. आपल्या मनावर दाब नसल्यानें उच्छृंखळ घोड्याप्रमाणें विषयरूपी बनून बेफामपणें धांवणारें मन क्रियायोगाचा दाब बसल्यानें आटोक्यांत यावयास लागून जसा घोडा लगामीनें पाहिजे तसा वळवितां येतो त्याच प्रमाणें क्रियायोयाच्या लगामीनें वेसण पडल्यानें मन आवरण्यास सोपें जातें. समाधी मार्गांत जे अडथळे येतात, ते मनावरील दाब ढिला पडल्यानेंच येतात त्यामुळें त्रास

फार सोसावा लागतो. मनाच्या लहरीप्रमाणें मनाला जर वागूं न देतां त्याला मुलाप्रमाणें जरबेज ठेविलें तर मनाचे क्लेश कमी करण्याला क्रियायोग हें साधन आहे व साध्य क्लेश कमी करणें व समाधी साधणें हें होय.

**सूत्रार्थ**--समाधीची प्राप्ति करून घेण्याकरितां व पुढील सूत्रांत सांगितलेले क्लेश कमी करण्याकरितां हा पूर्वी सांगितलेला क्रियायोग साधावयाचा असतो.

३ क्लेश कमी करणें ह्मटल्यावरून क्लेश कोणते तें सांगतात.

## अविद्यास्मितारागद्वेषाभिनिवेशाः क्लेशाः ॥ ३ ॥

अविद्या, अस्मिता, राग, द्वेष, अभिनिवेशाः क्लेशाः

अविद्या=अज्ञान; अस्मिता=अस्मिभावः, अहंकार. राग=विषयप्रीति; द्वेष=तिटकारा, नावड. अभिनिवेशः=सांसारिक जीविताची अत्यंत इच्छा.

क्लेशांचे प्रकार पांच दाखविले. ह्या पांच प्रकारच्या क्लेशांनीं प्राणी जखडलेला आहे. अविद्या ह्मणजे अज्ञान हें कारण असल्यानें ह्या कारणाचें कार्य अस्मिता, राग, द्वेष, अभिवेश होय. आपल्या सर्व दुःखांचें कारण अज्ञान आहे. आत्मा सच्चिदानंद आहे परंतु अज्ञानानें आपणास आनंदमय तो भासत नाहीं. दारूबाजाप्रमाणें अज्ञानामुळें आपणास भ्रम झालेला आहे. तो भ्रम, अज्ञान निघाल्यानें निघणारा आहे. तो भ्रम काढण्याकरितांच सर्व शास्त्राची धडपड आहे.

**सूत्रार्थः**—क्लेश वर सांगितल्या नांवाचे पांच प्रकारचे आहेत.

४ सर्व तऱ्हेच्या क्लेशांचा अंतर्भाव या पांचांत होतो. प्रत्येक क्लेशाच्या अवस्था चार आहेत, व त्या अवस्थांचें मूळ कारण अविद्या होय. ती अविद्या ह्मणजे काय तें सांगतात.

## अविद्याक्षेत्रमुत्तरेषाम् प्रसुप्ततनु विच्छिन्नोदाराणाम् ॥ ४ ॥

अविद्या, क्षेत्रम्, उत्तरेषाम्, प्रसुप्त, तनु, विच्छिन्न, उदाराणाम् अविद्या आजी आहे; तिच्यापांसून मूल अस्मिता, त्या आस्मितेपासून रागद्वेष अभिनिवेश हे उत्पन्न होतात.

अविद्या=अज्ञान; क्षेत्र=शेत; उत्तरेषाम्=पुढील ह्या चार अवस्थेंत राहिलेले;

प्रसुतः—'बीजभावोपगमः प्रसुप्तः, एकदा उठलेला बाकी निजलेले क्लेश. ज्या क्लेशांना कोणी जागृत करणारा नसल्यानें गपचूप गुप्त असतात परंतु कोणी जागृत

करणारा भेटला कीं उठतात ते प्रसुप्त क्लेश. एकाद्याचा मनांत चोरी करावयाची नसते परंतु साथीदार भेटला कीं तो चोरीला प्रवृत्त होतो. त्याच प्रमाणें पूर्वकर्मांचे संस्कार निद्रितावस्थेंत जरी असले तरी सूक्ष्मरूपानें असतात. त्या संस्कारांचें नियमन करून योगी त्यांस उठूं देत नाहीं.

अविद्येचीच अवस्था उदार; उदार=वाढलेले ( क्लेश ) कार्य करावयास लागतात. संसारिक मनुष्याची वृत्ति सदोदित उदार व त्यामुळें संसार पाठीशीं लागलेला असतो, उत्तरेषां प्रसुप्ततनुविच्छिन्नोदारणामविद्याक्षेत्रम्. उत्तर=पुढले. क्लेश जसजसे उदार होतात तसतशा क्रिया घडूं लागतात. ' विषये यो लब्धवृत्तिः स उदारः,

विच्छिन्न=मधून मधून नष्ट झालेले, छिन्नाभिन्न; एका स्त्रीशीं रत आहे तरी दुसऱ्या स्त्रीविषयीं अनुरति नाहींशी झालेली नसते, एकाच क्लेशाची एकाच वेळीं जी सुप्तावस्था व उदार अवस्था ती विच्छिन्नावस्था-एक क्लेश उदार झाला असतां दुसऱ्या क्लेशाचा प्रादुर्भाव होत नाहीं त्यालाही विच्छिन्न ह्मणतात.

तनु=कृश द्वेष कमी व्हावयाचा व प्रीति वाढावयाची. त्याच वस्तूवर द्वेष होता पण कांहीं कारणानें प्रीति जडली; सरकसमधील क्रूर जनावरें प्रेमानें एक होऊन खेळतात; असें जरी आहे तरी पुन्हां द्वेष केव्हां उद्भवेल याचा नेम नाहीं.

**सूत्रार्थः**—पुढील जे प्रसुप्त, तनु, विच्छिन्न, उदार ह्या ज्या चार अवस्था, त्या अवस्थांचें मूळ अविद्येंत आहे. क्लेशांचें कारण अविद्या. ते क्लेश कधीं सूक्ष्म ( तनु ) कधीं विच्छिन्न ( गुप्त ) कधीं उदार ( प्रगट ) असतील.

५ आतां अविद्या ह्मणजे काय तें सांगतात—

## अनित्याशुचिदुःखानात्मसु नित्यशुचिसुखात्मख्यातिरविद्या ५

अनित्य, अशुचि, दुःख, अनात्मसु, नित्य, शुचि, सुख, आत्मख्यातिः अविद्या.

ख्यातिः=बुद्धि.

अनित्य ( ला ) नित्य.

अशुचि ( ला ) शुचि.

दुःख ( ला ) सुख.

अनात्मसु आत्मख्याति ( ज्ञान )

इति अविद्या=उलटें ज्ञान, मोह.

या सूत्रांत सूत्रकार दाखवितात कीं प्रत्येक प्राणी " मीं, " " माझें, " अशा अहंपणांत असून देह हेंच त्याचें सर्वस्व व त्यासच तो आत्मा समजतो. मी मी ह्मणून आपल्या देहाकडे छातीला हात लावून सदोदित मनुष्यप्राणी देहाला

उद्देशून गाणें गात असतो. परंतु मीं, माझें ह्मटल्यानें ह्या देहाहून माझें ह्मणणारा निराळा कोणी तरी असला पाहिजे असा स्पष्टार्थ असतां मीं ह्मणजे तो देहच समजतो. ‘ **षष्ठीव्यपदेशात् भेदत्वं** ’ ( व्यपदेशः=notice, representation ) माझें हा षष्ठीचा प्रयोग करितो खरा परंतु मी निराळा व माझा देह निराळा असा स्पष्ट अर्थ असतां समजूत मात्र ‘ **षष्ठीव्यपदेशात् अभेदत्वं** मानतो. म्हणजे उलटे ज्ञान समजतों; हेंच उलट ज्ञान विपरीत ज्ञान ह्यालाच अविद्या म्हणतात. अज्ञान तें हेंच होय. ह्या अज्ञानामुळें अनित्य जो देह त्याला नित्य मानतो. अशुचि जो देह, **मांस-मूत्रपूरिषास्थि निर्मितेच कलेवरे** अशा देहालाच शुची मानतो. देहाच्या उत्पत्तीकडे जर लक्ष दिलें **तर स्थानात्, बीजात् उपष्टंभात** (पोषकरस) **निःस्यन्दात्, निधनात् अपि, कायमाधेय शौचत्वात् पंडिता हि-अशुचिं विदुः** । एकादी सुंदर स्त्री पाहिली कीं अज्ञानातें मोहानें जरी ती स्त्री मांसमूत्र पुरीषादि घाणेरड्या वस्तूंचा पुतळा असतां तिला सुवर्णाची खाणच मानतो. “ नवेयं शशाङ्कलेखा कमनीयेयं कन्या मध्वमृतावयव निर्मितेवचंद्रंभित्वा निस्तृतेव ज्ञायते । नीलोत्पलपत्रायताक्षी हावगर्भाभ्यां लोचनाभ्यां जीवलोक-माश्वासयन्तीवेति कस्य केनाभि संबन्धः “ व्यासभाष्य ” अशा अमंगल देहाचा अपवित्र स्त्रीदेहाचा त्या चंद्रलेखा ( Digit ) शीं संबंध काय ? परंतु अशुचि देहाला पदार्थाला मोहानें इतका शुची मानतो.

**सूत्रार्थः**—उलटें ज्ञान ती अविद्या, शरीर हें अनित्य असून त्याच्या ठिकाणीं नित्यत्वाची बुद्धि होणें, अशुचि शरीर असतां मांसमूत्रानें भरलेलें असतां शुचि मानणें, दुःखदायक असतां सुखदायक मानणें, अशी बुद्धि करणें, म्ह. हें शरीर अनात्मक असून शरीरालाच आत्मा मानणें हीच अविद्या, मोह किंवा उलटें ज्ञान होय.

६ अविद्येचें फळ जी अस्मिता ती–

## दृग्दर्शन शक्त्योरेकात्मतेवाऽस्मिता ॥ ६ ॥

दृक्, दर्शन, शक्त्योः, एकात्मता, इव, अस्मिता.

दृग्=आत्मा ( द्रष्टा ); दर्शन=बुद्धि, प्रकृति; बुद्धि हा प्रकृतीचा विकार आहे; दृग् नुसता असून अस्मिताभाव उत्पन्न होणार नाहीं. दृक्शक्ति आणि दर्शन शक्ति

दोहोंचें जणूं काय एकत्वानें भासणें ती अस्मिता. एकत्वाचा भास होतो तो उडविणें तोच मोक्ष. एकात्मता=एकः आत्मा ययोः तौ एकात्मनौ, तयोः भावः एकात्मता इव=जणूं काय.

स्वच्छ स्फटिक व जपाकुसुम ( जास्वंदीचें फूल ) यांच्या सान्निध्यानें जसें प्रतिबिंब पडतें तसेंच आत्मा व बुद्धि यांच्या सान्निध्याने आत्म्याचें प्रतिबिंब बुद्धींत पडून अस्मिताभाव उत्पन्न होतो जसा प्लॅटिनमचाच उजेड असा अहंपणा त्या तारेला होतो परंतु तो खरा उजेड असतो निराळाच. सान्निध्यानें मीपणा उत्पन्न होतो. उदाहरण राजा व प्रधान; प्रधान राजाप्रमाणेंच वागतो परंतु त्याला राजानें सत्तेवरून काढला कीं फिका पडतो. दृच्छक्ति पाहणारापुरुष; दर्शनशक्ति पाहण्याचें साधन, चित्त, बुद्धि, मन व इतर इंद्रियें या बाह्य साधनद्वारें, पुरुष बाह्य जगाकडे पाहतो. या साधनांचें व पुरुषाचें एकच रूप आहे असें वाटणें हेंच अहंकारात्मक अज्ञान. राजाचाप्रधान राजसत्तेनें राज्याधिकारावर असतां स्वतःला राजा समजूनच अधिकार चालवितो ह्मणजे सान्निध्यानें तो राजाच बनतो परंतु जर का त्या राजानें त्याला अधिकारावरून काढला कीं फिका पडतो, राजाधिकार नष्ट झाल्यानें रस्त्यावरील यःकश्चित् माणसाहूनही निस्तेज दिसतो; ह्मणजे राजाच्या सान्निध्यानें राजाच्या प्रकाशानें प्रकाशीत असतां स्वयमेव प्रकाशित आहे असें समजत होता. परंतु राजाच्या नाराजीनें भोपळा फुटून खरें बाहेर पडतें. राजसत्ता हा कोणी उपभोग घेणारा चेतन पदार्थ, प्रधानामार्फत प्रधानशक्ति ( भोग्यदर्शनशक्ति ) उपभोग घेण्याला लायक असा अचेतन पदार्थ आहे. राजा व प्रधान हे दोघे अगदीं अलग असून तादात्म्यानें एकभावानें भोग होत होता. तसेंच पुरुष व बुद्धि यांची एकाकारता झाली असतां भोग संभवतो. राजसत्ता गेल्यानें सत्ता व व्यक्ति अलग झाल्यानें परस्परांचा वियोग होतो. मग भोगाचा संभव नाहीं. आत्मा निरामय शुद्ध बुद्ध निर्विकारी असतां मीं सुखी, दुःखी क्रोधावश हें आपण सदोदित ह्मणतों. सुख दुःख हे मनाचे धर्म आहेत. आत्म्याचे नव्हत. आत्म्यावर त्यांचा आरोप मात्र करितो, परंतु ह्मणतों कोणाला ? आत्मा व देह राजा प्रधानाप्रमाणें निराळे असतां ही भाषा संभवते कशी ? प्रधान ह्मणतो-माझा हुकूम ह्मणून पाळलाच पाहिजे परंतु हुकूम कोणाचा हा सत्तेवर असल्यानें राजाचा पण समजतो स्वतःचा हेंच अज्ञान व सत्तेशीं एकरूपता होणें व मग तसें

बोलणें हाच भ्रम, व्यावहारिक आणखीं उदाहरण–प्लॅटिनम वायर विजेच्या उजेडाला व्यक्त करिते व त्या उजेडामुळें त्या प्लॅटिनम वायरला जर माझा उजेड ह्मणून अहंपणा वाटूं लागला तर तो तिचा मूर्खपणा नव्हे काय ? प्लॅटिनम वायरची त्या विजेचा उजेड पाडण्याला जरूरी खरी; परंतु उजेड तिचा नसून विजेचा आहे तसेंच बुद्धीची जरूरी आत्मप्रकाश पाडण्याला सान्निध्यानें एकाकारतेची आहे. परंतु तो माझा प्रकाश ही बुद्धीची भावना हाच अहंपणा व हीच अस्मिता होय.

**सूत्रार्थः** -- आत्म्याच्या सान्निध्यानें बुद्धींत पडलेलें आत्म्याचें प्रतिबिंब त्यामुळें जणूंकाय दोघांची एकवटलेली शक्ति भासणें तोच अहंकार ( अस्मिताभाव ) होय.

## सुखानुशयी रागः ॥ ७ ॥

सुख, अनुशयी, रागः

अनुशेते इति अनुशयी; सुखे अनुशेते इति सुखानुशयी.

रागः=विषयप्रीति. कांहीं गोष्टीपासून आपणास सुख होतें किंवा सुख आहे असा भास होतो. व त्या सुखदायक वस्तूची आठवण झाली कीं ती वस्तू व त्या वस्तूपासून मिळविणारें सुख असावें असा एकसारखा मनाचा ओढा लागतो प्रवाह वाहूं लागतो, तोच राग तीच आसक्ती होय.

**सूत्रार्थः**—सुखाचा अनुभव घेतल्यानंतर त्याच्याबद्दल आसक्ति उत्पन्न होणें त्यास राग म्हणतात.

## दुःखानुशयी द्वेषः ॥ ८ ॥

**सूत्रार्थः**—दुःखाच्या अनुवानंतर त्या दुःखाबद्दल तिटकारा उत्पन्न होणें त्यास द्वेष म्हणतात.

९ पिपीलिकेपासून ब्रह्मदेवापर्यंत प्राण्यांना मृत्यूची जी भीति तिला अभिनिवेश म्हणतात. त्या अभिनिवेशाची व्याख्या सांगतात.

## स्वरसवाही विदुषोऽपि तथा रूढोऽभि निवेशः ॥ ९ ॥

स्वरसवाही, विदुषः अपि, तथारूढः अभिनिवेशः

स्वरसवाही=स्वाभाविक; स्वरस=स्वभाव, स्वरसेन वहति इति स्वरसवाही=

अनेकवेळा अनेक जन्मीं मृत्यूचे अनुभविलेले तडाके स्वाभाविकपणें आंगवळणीं पडलेले, ह्यांत स्वरसवाहिन् शब्द;

जगांत बारकाईनें लक्ष दिल्यास आढळून येतें कीं अत्यंत सूक्ष्म प्राण्यापासून तों ब्रह्मापर्यंत सर्व प्राण्यांला मरणापासून भीति वाटते, मरण नसावें असें वाटतें.

**जीर्यंति जीर्यतः केशाः दन्ता जीर्यंति जीर्यतः ।**
**जीवनाशा धनाशा च जीर्यतोऽपि न जीर्यति ॥**

शरीर गलित झालें तरि जीवनाशा, व धनाशा, गलित होत नाहीं.

जगांत बारकाईनें लक्ष दिल्यास आढळून येतें कीं अत्यंत सूक्ष्म प्राण्यापासून तों ब्रह्मापर्यंत सर्व प्राण्यांला मरणापासून भीति वाटते मरण नसावें असें वाटतें. ज्यानें जें दुःख अनुभविलें नाहीं त्याला त्या दुःखाची अशी इच्छा संस्कारा शिवाय कशी व्हावी ? अशी इच्छा होते ह्मणून अनुमान निघतें कीं त्यानें हें दुःख अनुभविलेलें असावें व त्या संस्काराच्या स्मृतीमुळें तें दुःख नको असावें. यावरून शरिराच्या ठिकाणीं अशी जी प्रीति ( न मरण्याची इच्छा ) तोच अभिनिवेश नांवाचा क्लेश होय. हा क्लेश हें अविद्येचें कारण. "सर्वस्य प्राणिनः इयम् आत्माशी र्नित्या भवति, 'मानभूवं भूयासम्' इति । "न चाऽननुभूतमरणधर्मकस्यैषा भवत्यात्माशीः । एतया च पूर्वजन्मानुभवः प्रतीयते । स चायमभिनिवेशः क्लेशः स्वरसवाही कृमेरपि जातमात्रस्य प्रत्यक्षानुमानागमैरसंभावितो मरणत्रास उच्छेददृष्ट्यात्मकःपूर्वजन्मानुभूतं मरणदुःखमनुमापयति । यथा चायमत्यन्तमूढेषु दृश्यते क्लेशस्तथा विदुषोऽपि विज्ञातपूर्वापरान्तस्य रूढः । कस्मात्, समाना हि तयोः कुशलाकुशलयोर्मरण दुःखानुभवादियं वासनेति" ।

**सूत्रार्थः**—स्वाभाविक लहानापासून ह्मणजे अत्यंत सूक्ष्म जीवापासून तों विदुषापर्यंत रूढ झालेला जो मृत्यूचा क्लेश तो अभिनिवेश नांवाचा क्लेश होय.

ह्या सूत्रावरून पुनर्जन्माची सिद्धता होते; मृत्यूचा तडाका माहीत नसता तर भीति वाटतीना. पण ज्या अर्थी प्रत्येक प्राणी मृत्यूला डरतो त्या अर्थी ज्याचा अनुभव आलेला असतो व त्या अनुभवाचें त्याला दुःख कळलेलें असतें त्या दुःखाबद्दल प्राणी डरतो; यावरून मृत्यू, पूर्वी त्यानें अनुभविलेला असला पाहिजे. जर मृत्यु अनुभविलेला आहे तर जीवदशा कोठेंतरी असली पाहिजे. ती जीवदशा तोच मागील जन्म होय.

१० पूर्वी सूत्र २ ह्यांत क्लेशतनू करण्याकरितां क्रियायोग सांगितला, आतां क्लेश तनू केल्यानें जी फलप्राप्ति होते ती सांगतात—

**ते प्रतिप्रसवहेयाः सूक्ष्माः ॥ १० ॥**

ते, प्रतिप्रसव, हेयाः सूक्ष्माः

प्रसव=उत्पत्ति; प्रतिप्रसव=प्रलय, नाश; प्रति हा उपसर्ग विरुद्धभाव दाखविणारा. जसें–वादी, प्रतिवादी; प्रसव, प्रतिप्रसव; पक्ष, प्रतिपक्ष; बिंब प्रतिबिंब. धर्मीचा नाश केला कीं धर्माचा नाश होतो जसा अग्नीच्या नाशानें उष्णतेचा नाश होतो. चित्ताचा प्रकृतींत लय; प्रतिप्रसवेन हेयाः प्रतिप्रसवहेयाः; हेय म्ह. त्याज्य; सूक्ष्माः=क्रियायोगानें सूक्ष्म केलेले क्लेश.

क्लेश दोन प्रकारचे-स्थूल व सूक्ष्म. क्रियायोगानें स्थूलाचें सूक्ष्म करणें, सूक्ष्म झालेले क्लेश विवेकज्ञानानें दग्धबीजकल्प करणें; जळालेल्या बीजाला जसा अंकुर येणें अशक्य, तसा ज्ञानाग्नीनें सूक्ष्म जळल्यासारख्या झालेल्या वासनांचे ( संस्कारांचे ) अंकूर उठणें अशक्य.

**सूत्रार्थः**—चित्ताचा लय प्रकृतींत केला ह्मणजे सूक्ष्म झालेले क्लेश नाश पावतात, क्लेशांचा नाश होतो.

११ प्रकृतीचा नाश नाहीं; ती नित्य आहे, तिला ओळखून तिच्यापासून आपणाला अलग व्हावें लागतें. सूक्ष्मः=दग्धबीजकल्पासारखे झालेले क्लेश ते सूक्ष्म, ध्यानरूपी अग्नीनें भाजावयाचे, क्रियायोगानें सूक्ष्मकरणें; दृक्शक्ति व दर्शनशक्ति निराळी आहे हें ध्यानांत आणणें हेंच ध्यान.

**ध्यानहेयास्तद्वृत्तयः ॥ ११ ॥**

ध्यान, हेयाः, तत्, वृत्तयः.

हातुं योग्याः हेयाः; उदार झालेले क्लेश, संसाऱ्याचे क्रियायोगानें सूक्ष्म करावे सूक्ष्म झाल्यावर ध्यानानें त्याग करावा, त्याग करावा ह्मणजे दग्धबीजासारखे करून टाकावे. दग्ध बीजासारखे झाले ह्मणजे खरे सूक्ष्म झाले. क्लेशांची उदारवृत्ति ध्यानानें सूक्ष्म करणें. ध्यानानें दुष्ट कृत्यांकडील ओढा कमी होत जातो व कमी होतां होतां सुकृतीकडे मन वळतें; मग सुकृती हा स्वभावधर्म चित्ताचा होऊन जातो; त्यामुळें सत्कृती होऊं लागते सत्कृतीचे संस्कार दृढीभूत झाले ह्मणजे,

ते वाईट संस्काराचें मूळ काढण्यास कारण होतील. यास वस्त्राचा दाखला देतात– " यथाच वस्त्राणां स्थूलो मलः पूर्वं निर्धूयते, पश्चात् सूक्ष्मो यत्नेनोपायेन चापनीयते तथा क्लेशानां स्थूला वृत्तयः स्वल्पप्रतिपक्षाः । सूक्ष्मास्तु महाप्रतिपक्षा, इति ॥ जसा वस्त्राचा जाडा मळ साबण लावून काढतात, मग बारीक मळ, आपटून व पाण्यांतून काढून काढून घालवितात, त्याप्रमाणें स्थूल वृत्ती क्रियायोगानें व सूक्ष्म ध्यानानें नाश करितां येतात. प्रथम वृत्ति क्रियायोगानें सूक्ष्म कराव्या लागतात. नंतर ध्यानानें दग्धबीजासारख्या कराव्या लागतात.

सूत्र १० ह्यांत सांगितल्याप्रमाणें सूक्ष्म झालेले क्लेश चित्ताच्या लयानें प्रकृतींत लीन होतात.

**सूत्रार्थः**—चित्ताच्या स्थूल वृत्ती ध्यानानें त्याग करण्यास योग्य आहेत. म्हणजे ध्यानानें वृत्ती रोकतां येतात.

## क्लेशमूलः कर्माशयो दृष्टादृष्टजन्मवेदनीयः ॥ १२ ॥

क्लेशमूलः, कर्म, आशयः, दृष्ट, अदृष्ट, जन्म, वेदनीयः.

क्लेशमूलः=क्लेशाचें मूळ; आशय=Seat, Asylum, Bed--Chamber, सांठा, सर्व प्रकारच्या कर्मांची उत्पत्ती होते तें स्थान. दृष्ट=दिसणारे, अनुभवास येणारे; अदृष्ट=न दिसणारे, अनुभवास न येणारे; वेदनीय=जाणण्यालायक.

" पुण्यापुण्यकर्माशयः काम लोभ मोहप्रसवः स दृष्टजन्मवेदनीयश्चादृष्ट जन्मवेदनीयश्च " । क्लेश हे पापमूलक किंवा पुण्यमूलकही असतात; पापात्मक कर्मापासून दुःख उत्पन्न होतें; पुण्यकर्मापासून सुख उत्पन्न होतें. दुःखाचे तडाके दुःखदायक आहेत, परंतु सुखाचेही तडाके कधींकधीं दुःखदायक होतात; ह्यास उदाहरणः—लाटरींत एकदम पैसा मिळाला तर, त्यापासून हर्षवायू होतो व त्या हर्षाचे तडाके न सोसल्यामुळें मृत्यु येतो; अन्य जन्मांतलि तसेंच ह्या जन्मांतील ही कर्मांचे फळांचा भोग मिळतो; अत्यंत उत्कट कर्म असेल तर तीनच वर्षांनीं फळ मिळतें; चालू जन्मांतील कर्मांचें फळ पुढील जन्मीं मिळतें परंतु उत्कट कर्म असेल तर, ह्याच जन्मीं फळ मिळतें; त्यापेक्षां उत्कट असेल तर, तीन महिन्यांनीं फलभोग मिळतो; त्यापेक्षां उत्कट असेल तर तीन आठवड्यांत मिळेल.

**उत्तानपात राजा** होता; त्याला दोन बायका होत्या; नावडतीचा ध्रुव हा मुलगा होता; तो नावडतीचा मुलगा ध्रुव, राजाच्या मांडीवर बसला असतां

आवडतीनें त्याला लोटून आपला मुलगा राजाच्या मांडीवर बसविला. ह्या कृत्याला राजाची संमती पाहून ध्रुव जरी ज्ञानी होता तरी त्याला हा अपमान असह्य वाटला. ह्या अपमानाचा प्रतिकार करण्यासाठीं ह्मणूं लागला, कीं ही बापाची मांडी उष्टी, खराब केलेली आहे; हिच्यावर मीं बसणारच नाहीं, तर असें ठिकाण शोधून काढीन कीं मला तेथून कोणीही हालविणार नाहीं. त्याप्रमाणें त्या ध्रुवाला अत्यंत उत्कट इच्छेचें फळ त्याच जन्मांत मिळालें; त्याला अढळपद मिळालें. कर्माशयाची उत्पत्ति क्लेशापासून; **क्लेशमूलः कर्माशयः** कर्मसांठ्याचें मूळ क्लेश होय. हे क्लेश पांच; अविद्या असेल तर अस्मिता, अस्मिता असेल तर राग (प्रीती) होईल, राग होईल तर द्वेष होईल, व द्वेष होईल तर अभिनिवेश होईल.

राग द्वेष हे चांगल्या वाईट कर्मांचें कारण. कर्माशयाचें मूळ शोधाल तर क्लेश आहे; क्लेशाः मूलं यस्य क्लेशमूलः, कर्माशय हें कार्य; परंतु गांवढळ माणूस कार्याला कारण जे पंचक्लेश अविद्या वगैरे त्या कार्यालाच कारण समजतो.

कर्मामध्यें प्रकार दोन दृष्टजन्मवेदनीय व अदृष्टजन्म वेदनीय. भविष्यत् जगत् हें अदृष्ट जन्मवेदनीय व चालूजन्म हा दृष्टजन्मवेदनीय. कर्माचें फळ ध्रुवासारखें ताबडतोब मिळतें, तो दृष्ट जन्मवेदनीय,. यास उदाहरणें **नंदीश्वर** व **नहुषराजा** यांचीं देतात. " यथा नन्दीश्वरः कुमारो मनुष्यपरिणामं हित्वा देवत्वेन परिणतः । तथा नहुषोऽपि देवानामिन्द्रः स्वकं परिणामं हित्वा तिर्यक्त्वेन परिणत इति । तत्र नारकाणां नास्ति दृष्टजन्मवेदनीयः कर्माशयः " इति । **नन्दीश्वर** बालपणांत मनुष्य शरीर टाकून देवशरीर पावला तसाच **नहुषराजा** देवांचा स्वामी झाला असतां अजगरत्व पावला. नारकानां दृष्टजन्मवेदनीयः कर्माशयः नास्ति. तसेंच क्षीणक्लेशानामपि नास्ति अदृष्ट जन्मवेदनीयः कर्माशयः

**सूत्रार्थः**—कर्माशयाचें मूल शोधलें तर क्लेश हें होय. त्या कर्माशयाचे प्रकार दोन—दृष्टजन्मवेदनीय व अदृष्टजन्मवेदनीय.

## सति मूले तद्विपाको जात्यायुर्भोगः ॥ १३ ॥

सति, मूले, तद्विपाकः, जाति आयुः भोगः.

विपाक=परिणाम; सति=जिवंत असतां;

कर्में फलोन्मुख होतात; मूळ असल्यानें फलोन्मुख होणारच. त्या कर्मांचे परिणाम जाति, आयुष्य व भोग हे होत. संस्कार जर सांठ्यांत कर्माशयांत पडून

राहिलेले असले तर, ते केव्हांतरी अनुकूळ स्थित्यनुसार उदयास येणारच. झाडाच्या बीजाप्रमाणें उगवणारच, त्यांना अंकूर येणारच; अंकूर आला कीं त्याचें दृश्य झाड बनून त्या झाडास फुलें फळें हीं ठेवलेलींच. मनुष्य जीं बरीं वाईट कर्मे करितो, तीं पूर्व जन्मांतील संस्काराचीं झाडें होत. एवढेंच नव्हे तर प्रथम हा मानवी पुतळा ह्याच मुळीं पूर्व संस्काराचा पुतळा होय. गीता अ. १५ श्लोक ७।८।९ हा पुतळा ( देह ) पडला तरी वासनारूपी बीजांचे ( जशीं झाडें मेलीं तरी त्यांचे खालीं त्यांचीं पाळें किंवा बीजें झाडाखालीं पडून दडून गुप्तजीवंत असतात, कळत नाहींत; उदाहरणार्थ सागाचे झाडाचें बीज कधीं त्याच सालीं उगवतें परंतु कधीं तीन तीन सालेंपर्यंत उगवत नाहीं ) संस्कार शिल्लक दडून राहिलेले असतात. नष्ट वाटले तरी सागाचे बीजाप्रमाणें गुप्तपणें असतात. हे बीजरूपी संस्कार दडून असले तरी जोंपर्यंत जिवंत रूपांत आहेत तोंपर्यंत त्यांस केव्हां तरी मोड येणार हें निश्चित. वासनारूपी बीजांचे अंकूर सजातीयच असतील असा नेम नाहीं कारण वासनारूपी बीजांत जर आपण फरक पाडला असेल तर तदनुसार अंकूर व फळें येणार. फणसाला जर मध केशर घालून मुरवून त्या फणसाच्या बीजाचे रोप तयार केले तर त्यास फळें मधुर व स्वादिष्ट येतात. पडवळ दोडका कांकडी यांचे वेल जर ढोरांनीं चावले तर त्यांस येणारीं फळें कडु निपजतात. ह्मणजे गोड फळांचे वेल असतांही हा फरक झाला ह्या फरकानें त्याचीं बीजें कडूच राहणार व तीं पुन्हां गोड होणें फारच मुष्कीलिचें होतें. जून झालेल्या पडवळाला भोंक पाडून त्यांत जर, कारेत्याच्या जून बिया ताज्या ओलेपणींच घालून ठेविल्या व तें पडवळ तसेंच वेलांवर लोंबत ठेऊन पिकूं दिलें. नंतर त्या कारेत्याच्या बिया उगवत घातल्या तर त्या बीजाला येणारीं फळें कारेतीं पडवळाच्या लांबपणाचा धर्म घेऊन लांब होतात. व कडूपणांतही फरक पडतो. याप्रमाणें कृतीच्या संस्कारानें चांगले वाईट परिणाम घडत असतात. तात्पर्यांश मनुष्य देहांतल्या वासना आहेत ह्मणून पुन्हां मनुष्यदेहच यावा असें नव्हे तर त्या वासनांत जर घातपातादि करून दुष्ट बीजें, संस्कारानें किंवा हिंसा करून हिंसात्मक बीजें कालवलीं असतील-सांठवलीं असतील तर, कोणता तरी प्राणिजन्म येईल व तदनुसार त्या वासनारूपी बीजांनां अंकूर येईल व त्या त्या जात्यनुसार आयुष्य, तद्योग्य भोग प्राप्त होतील. व पुन्हा मनुष्य देह जो मोक्षप्राप्तीचें व सुख प्राप्त करून घेण्याचें साधन, तो प्राप्त करून घेण्याला महाप्रयास

पडतील. सुकृतीच्या वासनारूपी बीजाचें फळ सुखदायक मिळेल. या सुष्ट दुष्ट वासना संस्कारांनीं, जगांत चित्रविचित्रता दिसून येते; कोणी चैनींत आयुष्य घालवितांनां आढळतात. कोणी कितीही व्यवस्थित असले तरी सारा जन्मच्या जन्म त्यांच्या पाठीस कष्टना कष्टच लागलेले आढळतात. कोणी अल्पायुषी कोणी दीर्घायुषी पण आढळतात; ह्मणून योगी सांगतात सुकृती करा त्यांपासून तुह्माला आतां नाहीं तरी पुढील जन्मांत सुखच मिळेल. दुष्कृतीपासून दुःखाचीच प्राप्ती होईल. आज जरी आपणास दुष्कृती करीत असतांही कोणी सुख भोगतांना आढळला तरी त्याचें दुष्कर्म योग्य काळीं फळास आल्याशिवाय राहणार नाहीं व त्याजकडून दुःख भोगवून घेतल्याशिवाय त्यास सोडणार नाहीं. याच न्यायानें राजाचा कुत्रा व इतरांचा कुत्रा सुखदुःख भोगतात.

**सूत्रार्थः**—क्लेशांचें मूल जिवंत राहिल्यानें त्याचा परिणाम कोणत्याहि प्राणिवर्गांतील जाति आयुष्य व भोग हीं उत्पन्न करितात.

## ते ह्लादपरितापफलाः पुण्यापुण्यहेतुत्वात् ॥ १४ ॥

ते ल्हादफलाः, वा परितापफलाः पुण्य, अपुण्य, हेतुत्वात्.

ल्हादफलाः=आनंददायक फल देणारे; परितापफलाः=दुःखदायक फल देणारे; ते " जन्मायुर्भोगाः पुण्यहेतुकाः सुखफलाः अपुण्यहेतुकाः दुःखफलाः इति. "

**सूत्रार्थः**—प्राण्यांना आयुष्य व भोग ह्यांना पुण्यकर्म किंवा पापकर्म हेतु असल्यानें ती जात किंवा तें आयुष्य मिळून भोग सुखदायक किंवा दुःखदायक होतात.

१५ वर जें पुण्यकर्मांचें फल सुख व पापकर्मांचें फल दुःख ह्मणून सांगितलें तें सामान्यलोकांचें ह्मणणें, संसारिक माणसांचें ह्मणणें होय; परंतु विवेकी यांचें ह्मणणें कसें तर—

## परिणामतापसंस्कारदुःखैर्गुणवृत्तिविरोधाच्च दुःखमेव सर्वं विवेकिनः ॥ १५ ॥

परिणाम, ताप, संस्कार, दुःखैः, गुणवृत्तिविरोधात् च दुःखं, एव, सर्वं, विवेकिनः.

परिणामदुःखैः, तापदुःखैः, संस्कारदुःखैः;

परिणाम=प्रत्येक कर्माचा शेवट; सुखाचा किंवा भोगाचा शेवट, पंचामृताचें ताट भरलेलें आहे व त्यांत विष कालवलेलें असतांही गोड लागतें ह्मणून खाणारा ह्मणतो मला सध्या तर गोड लागतें पुढें काय होईल तें होईल; परंतु परिणाम दुःखांतच होणार हें नक्की ठरलेलें, ह्मणून दुःखदायक; तात्पर्यांश विषय सेवन करितांना गोड लागतात परंतु परिणाम दुःखांतच होतो. ताप=व्याप तेवढा संताप; **पक्ष्याची गोष्टः**—एका पक्ष्यानें सुखाच्या लालचीनें मासाचा गोळा तोंडांत धरिला; परंतु त्याच्या पाठीमागें अनेक पक्षी लागले; तो चोहोंकडे भटकला; तरी पाठीमागला ससेमिरा सुटेना; ह्या झाडावर बसे त्या झाडावर बसे तरी तेंच; जमिनीवर उतरला तरी त्यास ते सोडीतना; दरीखोऱ्यांत चोहोंकडे त्यानें शिकस्त केली शेवटीं कंटाळला व तो मांसाचा तुकडा सोडून दिला; तेव्हां सर्व पक्षी त्या गोळ्याकडे धांवले व ह्याचे पाठीमागचा ससेमिरा सुटला. मांसाचा गोळा सुटला तेव्हां दुःख सुटलें.

संस्कारदुःख—पीच नांवाचें फळ खाण्याला फार गोड लागतें, असें ऐकून एकानें तें विकत घेतलें व खाल्लें त्यानें त्याचें मनाचें समाधान झालें. पुढें कांहीं दिवसांनीं त्याची आठवण झाली व फळ मिळेना; त्यामुळें तळमळ; म्हणून दुःख; पदार्थ पिचफळाप्रमाणें खाण्याला गोड, तसेच विषय गोड, लागतात, आठवणीच्या वेळीं तें फळ व भोग न मिळाल्यामुळें दुःख होतें, त्याप्रमाणेंच विषयांचे जे संस्कार मनावर राहातात ते फार तापदायक आहेत.

गुणवृत्तिनिरोधात्—सुखदुःख मोह हे सत्व रज तम ह्यांचे धर्म आहेत. सत्व रज तम ह्या तिन्ही गुणांकडे पाहतां ह्या तिन्ही गुणांची राहटी पाहतां ते आपआपसांत विरोध करणारे आहेत. सत्व गुण हा सुखोत्पादक होय; रज व तम दुःख व मोह उत्पन्न करणारे आहेत. ह्यावरून कालाचा थोडाच भाग सुखाच्या वांटणीस येतो; कारण रज तम हे दोघेही असल्यानें म्ह. मेज्यारिटी जास्त असल्यानें बराच भाग दुःखाकडे जातो.

परिणाम—अन्यथाभावः हा भविष्यकाळ.

ताप—हा वर्तमानकाळ, संपत्ती असतां इतर प्राण्यांपासून दुःख.

संस्कार—भूतकाळ, पदार्थ प्रथम मिळविण्यासाठीं दुःख. मिळाल्यावर दुःख; **लाभादपि दुःखं, अर्थानामर्जने क्लेशस्तथैव परिपालने । नष्टे**

**दुःखं व्यये दुःखं धिगर्थान् क्लेशकारिणः ।** मिळविल्यानंतर दुःख; कारण त्या पदार्थाला दुसरे वांटेकरी होतात त्यामुळें मिळालेल्या पदार्थाचा पूर्ण भोग लाभत नाहीं पूर्ण भोग लाभला अशी कल्पना करूं तर—**भोगात् रोगभयं, असंकोचे व्याधिः;**

विषय मिळाल्यानंतर तो टिकविण्यासाठीं दुःख भोगावें लागतें, बरें नाश करणारा भेटला तर द्वेष उत्पन्न होतो; **सुखभोगनाशे संस्कारो भवति.**

गुणाबद्दल—गुणानाम् वृत्तयः गुणवृत्तयः; गुणवृत्तीनाम् विरोधः तस्मात् गुणवृत्तिविरोधात्.

गुण कसे तर प्रत्येकाला प्रत्येकाची गरज आहे तरी भांडतात, शेजेवांचून चालेना व घटकाभर पडेना. सत्वगुणालाही रजतमाची आवश्यकता आहे व एकमेकांची एकमेकांना गरज आहेच. तरीपण ते एकमेक एकमेकांचा पाडाव करण्याला पाहतात व द्वेषही करितात. हे आपसांत जर इतके विरोधी आहेत तर काम करतात कसें अशी शंका येते; त्यास उदाहरण—

तेल, वात, ज्योतः—वात तेलाला शोषतें म्हणजे नाश करिते. ज्योत वातीला शोषते म्हणजे वातीचा नाश करिते. ज्योतीचा नाश करणारें तेल; याप्रमाणें आपआपसांत तंटा आहे ,असें असतां प्रकाश हें कार्य सयुक्त कार्य दिसतें, आपणास प्रकाश मिळतो. ह्यावरील विवेचनावरून विवेकी काय समजतात तर, सुखापासून दुःख व दुःखापासून सुख, असें राहाटगाडगें चालू आहे. ह्या रहाटगाडग्यांत आपण फसलों आहोंत आपण सर्व मनुष्यें मृग-जळाच्या मागें लागलों असून आपली विषयसुखाची वासना केव्हांच तृप्त होत नाहीं. इंद्रियाची तृष्णा भोगानें शांत होणें शक्य नाहीं. **भोगात् अपि न रागशान्तिः * सौभरी मुनिवत् ।** भोगानें भोगतृष्णा वाढते असें विवेकी जाणतो; अविवेकी परिणामताप झाल्यावर जाणतो. आपल्या भोंवताली मृत्यु मृत्युनीं मृत्यु सदोदीत पाहात असतांही प्रत्येक प्राणी आपणास अमर समजतो व तसाच व्यवहार करतो. इतकेंच नव्हे तर मीं शहाणा बाकी सर्व मूर्ख आहेत असें तो जाणीत असतो व दाखवितोही. कुटुम्बांतील माणसांवरील जें प्रेम तेंही क्षणिक असतां, आतां आहे क्षणभऱ्यानें नाहीं, आज आहे उद्यां नाहीं असें असतांही तो संसारिक माणूस त्यांतच गर्क झाला आहे. परंतु नश्वरतेनें पुढें दुःखच आहे. **भोजनान्ते**

**स्मशानान्ते मैथुनान्ते च या मतिः। सा मतिः सर्वदा चेत्स्यात्को न मुच्येत बंधनात्॥** वगैरे वैराग्य येतें परंतु तें क्षणिक येतें. परंतु तें जर कायम ठसेल तर त्यास आढळून येईल कीं इंद्रियजन्यसुख खरें सुख नव्हे तें सोडल्याशिवाय पारलौकिक मार्ग दिसणार नाहीं. ऐहिक सुखाला चिकटून चिरंतन सुखाचा मार्ग आजवर कोणीही क्रमिला नाहीं. ही कल्पना पक्की ठसली ह्मणजे या जगापलिकडे कांहीं तरी असलें पाहिजे अशी कल्पना होते. कल्पना झाल्यावर मग जर का माणूस विचार करूं लागला तर तो उच्च पदाला—उच्च सुखाप्रत जाईल; व तेंच खरें सुख होय.

योग्याच्या मतें सर्वच भासणारीं सुखें दुःखमय आहेत. कारण, परिणाम ( भविष्यत् ) दुःखांतच होतात. कारण सुखदायक वस्तु मिळाल्यावर त्यापासून ताप होतो ह्मणून दुःखदायक; तापदुःख ( वर्तमानकाळचें ), वस्तु मिळविण्याचे त्रासानें दुःख; संस्कारदुःख भूतकाळाचे; सुखदुःखाचे अनुभवानंतर असंख्यात संस्कार, संस्कारामुळें संसार तुटत नाहीं, व त्यापासून वाईट फळें मिळाल्यानें दुःख. तसेंच सत्व रज तम या गुणांच्या वृत्ती सुख, दुःख, मोह या रूपांनीं दृष्टोत्पत्तीस येतात. मोहामुळें कर्मसंचय, त्यांतून वासना, वासनेमुळें सुखदुःखाचे अनुभव, अनुभवापासून संस्कार, संस्कारापासून स्मृती, स्मृतीपासून राग, द्वेष याप्रमाणें क्रम; व त्या वृत्ती आपसांत झगडत असून आपसांत पराजय झाल्यानें एकमेकांचा विरोध करितात. हाच गुणवृत्ती विरोध होय. विवेकी माणसाला सुखदुःखभोगाचीं साधनें विष कालविलेल्या अन्नाप्रमाणें वाटतात. साधुपुरुष ह्मणतात सुखला आमंत्रण दिलें तर बरोबर सोबती दुःख आहेच. जसा दिवस व रात्र तसें, आंधळ्याला जेवावयास बोलाविलें तर एकटा येत नाहीं. सुखदुःखाचा सांधा। जैसा जोडफळांचा रांधा। ( जुळें केळें )। बोलवितां एका अन्धा दोघेचि येती। आपल्या डोळ्यांत जर बारीक केश गेला तर, तो झोंबतो त्याप्रमाणें विवेकी माणसाला क्लेशाचा लेश सुद्धां त्यांचा भोग येण्यापूर्वीच तापदायक वाटतो व इलाज अगोदरच करितो.

**सूत्रार्थः**—वर्तमान भूत व भविष्य, या तिन्ही काळीं पदार्थांपासून ( विषयापासून ) दुःख होत असल्यानें व तिन्ही गुणांच्या वृत्ती एकमेकांच्या विरोधी असल्यानें सुखदुःख मोहरूप गुणांच्या वृत्तीमुळें विवेकी पुरुषाला सर्वच दुःखमय वाटतें.

१६ ह्यावरून विवेकी पुरुषांना वाटतें आतां भूतकाळचें दुःख भोगून गेलें. वर्तमानकाळचें चालूच आहे. फक्त भविष्यत्काळचें दुःख टाळतां येणें शक्य आहे; ह्मणून तें टाळणें; त्यास उपाय सांगतात.

## हेयं दुःखमनागतम् ॥ १६ ॥

'हेयं, दुःखं अनागतम्'

हेयं=त्याज्यम्; अनागतम्ः न आगतम्, अनागतम् भविष्यकाळचें; वर्तमान काळचीं दुःखें फलोन्मुख आहेत भोगिलींच पाहिजेत. चालू कर्मे घडत असलेलीं टाळतां येत नाहींत. भूतकालचीं दुःखें नष्ट झालेलीं आहेत. घडून गेलेलीं आहेत.

**भोगेनैव क्षयः**—बाण सुटलेलेच त्यांचा परिणाम भोगलाच पाहिजे. मात्र जे सुटावयाचे बाण ते सोडणें न सोडणें हातचें आहे. पुढें येणारीं दुःखें विचारानें टाळतां येणें शक्य आहेत. भविष्यत्काळचीं कर्मे हातून घडलीं नसल्यानें त्यांचें नियमन करून जिंकतां येणें शक्य आहे.

बुद्धि ( प्रधान ) पुरुष ( राजा ) यांचा संयोग हा हेय हेतु, संसारास कारण होय. ह्या संयोगाची निवृत्ती होणें हें हान होय. हानाचा ( मोक्षाचा ) उपाय ह्मणजे प्रकृती पुरुष यांची ओळख करून घेणें साक्षात्कार होणें हाच मोक्षाचा उपाय होय; तो असंप्रज्ञात योगानें साधावयाचा आहे. त्यास उपायः—वर्तमान व भूतकाळांतील दुःखें हेय कोटींत येत नाहींत. फक्त अनागतं भविष्यत् काळचीं दुःखें हेय कोटींतील प्रयत्नानें टाळतां येण्याजोगीं आहेत.

**सूत्रार्थः**—भविष्यकाळीं येणारें दुःख टाळण्यास शक्य होय.

## द्रष्टृदृश्ययोः संयोगो हेयहेतुः ॥ १७ ॥

द्रष्टृदृश्ययोः संयोगः हेयहेतुः

द्रष्टृ=द्रष्टा ह्मणजे आत्मा, पुरुष; दृश्य=जगांतील सर्व बाह्य पदार्थ इतकेंच नव्हे तर मन बुद्धि इत्यादि सूक्ष्म इंद्रियेंही दृश्यांत येतात . संयोग=संबंध; हेय=त्याज्य; हेय हा शब्द दुःखाला लावतात. हेतु=कारण; संयोगो हेयहेतुः=दुःखाला कारण संयोग आहे. आत्मा आणि बाह्य वस्तु यांचा संयोग हें त्याज्य कारण आहे. कारण द्रष्टा आणि दृश्य यांच्या संयोगापासून दुःखाची उत्पत्ती होते. आत्मा

निर्विकार असून संयोगानें सुख दुःख भोगतोसा दिसतो, आत्मा भोक्ता व चित्त हें भोग्य होय. भोक्ता व भोग्य यांचा संबंध तो संयोग. संयोगापासून सुखदुःख होतें, संसाररूप जन्ममरण चालू होतें. हा संयोग नाहींसा झाला कीं जन्ममरण-रूप संसार नाहींसा होतो ह्मणजे पुरुष मुक्त होतो. वर्तमान काळचा संयोग हा दुःखाला कारण आहे. **बापलेंकाचें उदाहरण**—कोंकणांत बाप राहतो; कांशींत मुलगा राहतो. मुलग्याला आजार आला व बातमी कळली कीं बापाला दुःख होतें हा संयोग; ह्मणजे ह्यावरून संयोगशब्दानें नजीकचा संयोग नव्हे तर दूर-चाही संयोग. ह्मणजे ममत्वाचाही संयोग समजावा; ममत्वरूपी संयोग हा हेयाला दुःखाला कारण आहे; संयोग हा स्थूलावरून सूक्ष्माकडे घ्यावा; तपास करितां आढळेल कीं दुःखाला कारण संयोग.

द्रष्टा च दृश्यं च=द्रष्टृदृश्ये तयोः द्रष्टृदृश्ययोः

'**नास्ति, न मे,**'—ही बुद्धि होणें हें सुखदायक आहे. हाच मोक्ष.

**सूत्रार्थः**—पुरुषाचा बुद्धीशीं संयोग हा दुःखाला कारण आहे.

## प्रकाशक्रियास्थितिशीलं भूतेन्द्रियात्मकं भोगापवर्गार्थं दृश्यम् ॥ १८ ॥

प्रकाश, क्रिया, स्थितिशीलं, भूत, इंद्रिय, आत्मकं, भोग, अपवर्ग, अर्थ, दृश्यम्. प्रकाश=उजेड; क्रिया=कृति; आत्मकं=स्वरूप; अपवर्ग=मोक्ष जिवंतपणीं मिळणारा. आतां दृश्याचें लक्षण सांगतात. कोणत्याही पदार्थाचें लक्षण, करणें तर तीन प्रकारांनीं केलें पाहिजे; ते तीन प्रकार ह्मणजे स्वरूप, स्वभाव, प्रयोजन ( कार्य. )

दृश्य हें कधीं प्रकाशशील असेल कधीं क्रियाशील असेल कधीं स्थितिशील असेल.

कोणत्याही पदार्थाची प्रथम स्थिती असेल तेव्हांच मागून क्रिया घडेल. क्रिया घडेल तर प्रकाश पडेल; ह्मणून सूत्रसमजुतीसाठीं प्रथम स्थितिशील, मग क्रिया-शील व नंतर प्रकाशशील असें घ्यावें.

तमोगुण हा निन्दात्मक गणला जातो परंतु तो आल्याशिवाय ह्मणजे स्थितीशील पदार्थ झाल्याशिवाय प्राणी झोंप घेतल्याशिवाय काम करण्यालायक होत नसतो.

ह्मणून क्रियेला तमोगुणाची अवश्यकता आहे. तमोगुणाशिवाय क्रिया घडण्याला लायकता येत नाहीं ह्मणून तमोगुणाची जरूरी. रजोगुणक्रियात्मक आहे रजोगुणाशिवाय क्रिया घडत नाहीं व क्रियेशिवाय प्रकाश नाहीं. प्रकाश हा सत्वगुणाचा द्योतक, प्रकाश झाल्यानें सुखदुःख उत्पन्न होतें. सुखदायक पदार्थ असेल ह्मणजे सत्ववृत्तिप्रेरित पदार्थ असेल तर मोक्षप्राप्तीला कारण होईल, दुःखदायक असेल तर भोग पाठीशीं लागतील.

पूर्वी सांगितल्याप्रमाणें भेद तीन–१ प्रयोजन, दृश्याचें कार्य कोणतें तर भोगापवर्गार्थ. २ स्वभाव; दृश्याचा स्थितिशील, क्रियाशील, प्रकाशशील. ३ स्वरूप. भूतेन्द्रियात्मकम्.

भूत=पंच महाभूतें प्रत्येक पदार्थ पंचभौतिक आहे; भूतात्मक, व इंद्रियात्मक, आत्मस्वरूप, भूतस्वरूप व इंद्रियस्वरूप. भूतानि च इंद्रियाणि च भूतेन्द्रियाणि भूतेन्द्रियाणि आत्मा यस्य तत् भूतेन्द्रियात्मकम्.

दृश्याचें स्वरूप पंचमहाभूतें, पंचज्ञानेन्द्रियें, पंचकर्मेन्द्रियें मन, बुद्धि, अहंकार. पांच ज्ञानेन्द्रियें, पांच कर्मेन्द्रियें, मन, ज्याच्या साहाय्यावांचून कोणत्याही इंद्रियाचा व्यापार चालत नाहीं असें व पांच भूतें मिळून.

द्रष्ट्याहून निराळें तें दृश्य. दृश्य हें द्वैत आहे. दृश्याचीं मूळचीं स्वरूपें भूतें आणि इंद्रियें. बाकी सर्व दृष्टीस पडणारीं त्यांचीं रूपान्तरें आहेत.

दृश्य ह्मणजे बाह्यजग हें पुरुषाला भोग आणि मुक्ती करून देण्याकरितां आहे. हें बाह्य जग तीन गुण आणि इंद्रियें यांच्या संयोगानें उत्पन्न झालेलें आहे. (जग त्रिगुणात्मक आहे प्रत्येक पदार्थ त्रिगुणात्मक आहे ) त्याची स्थिति असेल तर तें क्रियावान् होईल व क्रियावान् होईल तेव्हांच प्रकाशशील होईल. प्रकाश देईल. स्थूल व सूक्ष्म तत्वें मनादि इंद्रियें या सर्वांच्या संयोगाचें कार्य विश्व होय. तें त्रिगुणात्मक आहे व त्याचीं तीन रूपें आहेत. सत्वगुणामुळें प्रकाशणारे, रजोगुणामुळें क्रिया करणारे व तमोगुणामुळें स्थिति–सुस्त असणारें असें आहे. पुरुषाला भोग व मुक्ती देणें हाच त्यांचा हेतु आहे. परंतु पुरुष तें सर्व विसरून गेला आहे. तो पुरुष ( आत्मा ) शुद्ध बुद्ध अमर नित्य निरामय आहे. तो सच्चिदानंद आहे. ह्मणजे हें त्याचें स्वरूप आहे. सत्, चित्, आनंद हे त्याचे गुण नसून तो त्यांचें अधिष्ठान आहे. गुणामुळें त्याचें अस्तित्व नसून त्याच्या अस्तित्वामुळें गुण दृश्यवान् झाले आहेत. त्याला जन्म नाहीं मरण नाहीं.

**न जायते म्रियते वा कदाचित् । नायं भूत्वा भविता वा न भूयः ।**
**अजो नित्यःशाश्वतोयं पुराणो । न हन्यते हन्यमाने शरीरे ।**

आपण अमर सुखमय असतां हजारों कल्पनांच्या मागें सुखासाठीं लागलों आहों. हा आपला भ्रम आहे हीच मिथ्या होय. माया ह्मणजे मा=नसणें. या= भासणें, ह्मणजे नसलेल्याच्या पाठीस लागणें असलेल्यास विसरणें होय. आपल्या माहेरघरीं जाण्याचा ओढा जरी आहे, तरी वाटेंतील मोहक पदार्थांच्या आकर्षणानें आपण फसलों आहों. आपली चालू स्थिती ही आपल्या माहेरघरीं ( सत्कडे ) जाण्याच्या मार्गांतील एक मुक्काम होय व त्या मुक्कामांतील विसाव्या करितां उतरण्याची ही धर्मशाळा होय. वाटेंतील कांटे, संकटें हीं मधील मोहक पदार्थांपासून अलग होण्याला जणूं काय उपदेशकच होत; त्यांपासूनच ताप झाल्यानें कांहीं विरक्ती ते मोहक पदार्थ सोडून देण्याला संभवेल. व प्राणी मधील मुक्काम टाकून सत्कडे धांव घ्यावयास लागेल. "प्रत्युक्तसामर्थ्यास्सन्निधिमात्रोपकारिणोऽयस्कान्तमणिकल्पाः प्रत्ययमन्तरेणैकतमस्य वृत्तिमनुवर्तमानाः प्रधानशब्दवाच्या भवन्ति । एतद्दृश्यमित्युच्यते । भोगापवर्गार्थं, हितदृश्यं पुरुषस्येति " अयस्कमणी ( लोहचुबंक ) लोखंडाला आकर्षण्याचा धर्म लोहचुबंकाचा जसा, तसा गुणाचा धर्म चित्ताचें आकर्षण करणें हा होय. हें आकर्षण सान्निध्यानें असतें. सान्निध्यानें गुण प्रधान व तेंच दृश्य होय. पुरुष राजा भोक्ता होय. भोक्त्याची तदाकार बुद्धिवृत्ति होणें यास भोग ह्मणावें. दृश्य हें पुरुषाचे भोगाकरितां व अपवर्गाकरितां आहे.

" तावेतौ भोगापवर्गौ बुद्धिकृतौ बुद्धावेव प्रवर्तमानौ कथं पुरुषेऽपदिश्येते इति । यथा विजयः पराजयो वा योद्धृषु वर्तमानः स्वामिन्यपदिश्यते 'स हि तस्य फलस्य भोक्ता ' इति "एवम्बन्धमोक्षौ बुद्धावेव वर्तमानौ पुरुषेऽपदिश्येते ' स हि तत्फलस्य भोक्ता ' इति । बुद्धेरेव पुरुषार्थापरिसमाप्तिर्बन्धस्तदर्थावसायो मोक्ष इति । "

**सूत्रार्थः**—दृश्याचे स्वभाव, स्वरूप, आणि प्रयोजन ( प्रथम समजुतीसाठीं भूतेन्द्रियात्मक प्रथम घेतलें ) हें ज्याचें स्वरूप तें,दृश्य, तें भोग आणि अपवर्ग ह्यांसाठीं आहे; त्याचा स्वभाव स्थितिशील, क्रियाशील व प्रकाशशील आहे.

**विशेषाविशेषलिङ्गमात्रालिङ्गानि गुणपर्वाणि ॥ १९ ॥**

विशेष, अविशेष, लिङ्ग, मात्र, अलिङ्गानि, गुण, पर्वाणि.

विशेष=दृश्याचें विशेष; पंचमहाभूतें व अकरा इंद्रियें ( बेरीज १६ ) अविशेष=सामान्य; पञ्चतन्मात्रा ( सूक्ष्म इन्द्रियें ) आणि अहंकार. लिङ्गमात्र=केवल महत्तत्व (बुद्धि); अलिङ्ग=प्रकृति, (अव्यक्त) गुण=सत्व, रज, तम; पर्वें=परिणाम. पेरें.

ह्या गुणवृक्षाचीं पर्वें ह्मणजे पेरें कोणतीं ? तर, बोरूच्या बीजांला प्रथम अंकूर फुटून नंतर बोरूला जशीं एकामागून एक पेरें फुटतात त्याप्रमाणें जगताचा मूळचा अंकूर जें महत्तत्व ह्मणजे बुद्धी हें पहिलें पेर, नंतर विशेष हीं अनेक पेरें फुटलीं. पांच भूतें, दहा इंद्रियें व मन मिळून सोळा यांस विशेष ही संज्ञा; पंचतन्मात्रा व अहंकार या सहांना अविशेष ही संज्ञा. या सहा अविशेषापूर्वी उत्पन्न झालेलें लिंगमात्र सर्व वस्तूंना व्यक्त करणारें असें बुद्धितत्व.

**सत्वरजस्तमसां साम्यावस्था प्रकृतिः ( अव्यक्तावस्था ) प्रकृतेर्महान् महतो अहंकारो अहंकारात् पंच तन्मात्राणि । उभयमिन्द्रियं तन्मात्रेभ्यः स्थूलभूतानि पुरुष इति पञ्चविंशतिर्गणः**

विश्वोत्पत्तीपूर्वी प्रकृती अव्यक्त स्थितींत होती. ज्या स्थितींत फक्त साम्यावस्था, व्यक्तावस्था नाहीं, नामनिर्देश नाहीं, त्या अव्यक्तांतून महत्तत्वाची उत्पत्ती—त्यापासून अहंकार, अहंकारापासून सूक्ष्म इंद्रियें निघालीं तीं सूक्ष्में शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हीं पांच तन्मात्रें, त्या सूक्ष्मापासून ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें, उभयमिंद्रियं, ज्ञानेंद्रियें ह्म. श्रोतृ त्वक् चक्षुर्जिव्हाघ्राणानि बुद्धींद्रियाणि कर्मेंद्रियें, वाक्पाणि पाद पायूपस्थानि, पायु=गुद, उपस्थ=जननेंद्रिय स्थूलभूतें ह्मणजे पृथ्वी आप्तेज वायू आकाश. स्थूलभूतें ५, सूक्ष्मतत्वें ५, ज्ञानेन्द्रियें ५, कर्मेंद्रियें ५ मिळून २०. महत्तत्वें ह्मणजे बुद्धि व अहंकार मिळून २२ आणि बुद्धीमध्यें मन व चित्त येतात कारण तीं जवळ जवळ आहेत; ह्मणून एकंदर तत्वें झालीं २४ व पुरुष २५ वा. मन, बुद्धि, चित्त ह्यांत फरक काय तो स्वतंत्र भागांत दिला आहे तो पहावा. बाहेरून आलेले संस्कार एकत्र करून ते बुद्धीकडे पाठविणें एवढेंच मनाचें काम; निश्चय करणें बुद्धीचें काम. स्थूल, सूक्ष्म पदार्थ एकाच महत्तत्वापासून झालेले आहेत असें हें सांख्यशास्त्राचें तत्व आहे. सूक्ष्म कारणापासून स्थूलकार्य झालेलें आहे व पुरुष हा अलग आहे. **यो बुद्धेः परस्तु सः** याप्रमाणें दृश्याचें स्वरूप आहे. पुरुष अलग आहे.

**सूत्रार्थः**—त्रिगुणांचा विस्तार किती, तर कांहीं विशेष, कांहीं अविशेष, केवल लिङ्ग व अलिङ्ग पण आहे. म्हणजे असे चार प्रकार गुणांत आहेत.

ही वरील व्याख्या दृश्याची झाली; आतां द्रष्ट्याबद्दल सांगतात.

## द्रष्टा दृशिमात्रः शुद्धोऽपि प्रत्ययानुपश्यः ॥ २० ॥

द्रष्टा दृशिमात्रः शुद्धः अपि प्रत्यय अनुपश्यः

पश्यति इति द्रष्टा; दृश् धातूचा अर्थ पाहणें, केवळ पाहणें असाच अर्थ नव्हे तर ज्ञान म्हणजे जाणणें असाही अर्थ आहे.

दृशिमात्र-मात्र ह्मणजे केवळ; केवळ ज्ञान हेंच स्वरूप आहे ज्याचें; अत्यंत शुद्ध आहे त्याला कसलाही लेप नाहीं अवर्णनीय आहे. ज्ञानस्वरूप असल्यानें शुद्ध आहे

प्रत्यय=बुद्धि; अनुपश्यः=धोरणानें पाहाणारा. द्रष्टा ज्याला आपण जीव ह्मणतों तो कसा आहे तर ह्यास उदाहरण—

दादा फार सज्जन आहे, दयाळू आहे, परोपकारी आहे, सर्वगुणसंपन्न आहे. पण वहिनीच्या धोरणानें वहीनीचें ऐकणारा असल्यानें बिघाड झाला आहे. तसा आत्मा शुद्ध, बुद्ध, आहे परंतु बुद्धीच्या नादीं लागलेला आहे. द्रष्टा हा बुद्धीहून वेगळा आहे.

" संहत्यकारित्वात् परार्था बुद्धिः, स्वार्थः पुरुषः बुद्धिस्त्रिगुणत्वादचेतनेति गुणानां तूपद्रष्टा पुरुषः शुद्धोऽप्यसौ प्रत्ययानुपश्यो यतः । प्रत्ययं बौद्धमनुपश्यति । तमनुपश्यन्न तदात्मापि तदात्मक इव प्रत्यवभासते " ।

पाद ४ सूत्र २४ हें पाहावें. पुरुष भोक्ता स्व अर्थाकरितांच ह्मणून स्वतंत्र आहे. बुद्धि समुदायांत काम करीत असल्यानें परतंत्र आहे, ह्मणजे भोग्य विषय आहे. त्रिगुणात्मक बुद्धि असल्यानें अचेतन आहे. गुणांचें निरीक्षण करणारा पुरुषच बुद्धीमार्फत पाहणारा असल्यानें बुद्धीच आत्मस्वरूप भासते.

प्रकृती व पुरुष हीं अगदीं अलगच आहेत. बुद्धितत्व हें शरिराप्रमाणें बदलणारें असून त्याचे शरिरासारखेच बहुतेक धर्म आहेत. बुद्धितत्व मिश्रणरूप असून कमी, अधिक, होणारें आहे. पुरुष, बुद्धितत्वापलिकडे आहे परंतु आपण जोंपर्यंत बुद्धीच्या मर्यादेंत आहोंपर्यंत सुखी दुःखी बद्ध आहोंत असें वाटणें साहजिक आहे.

कारण मन बुद्धि हे मिश्र पदार्थ असून परतंत्र व परप्रकाशित असल्यानें आपण त्यांच्या ताब्यांत गेल्यानें परतंत्र होतों व देहावर स्वातंत्र्याचा आत्म्याचा आरोप करितों. कारण देह मन बुद्धि इत्यादिकांचें स्वामित्व प्रकृतीकडे सोपविल्यानें तिच्या ताब्यांत आलेल्या पुरुषावर प्रकृतीचा ताबा चालतो असा भास होतो. परंतु बुद्धि ओलांडून पलिकडे गेलों ह्मणजे आत्म्याच्या छायेंत आपण शुद्ध बुद्ध नित्य स्वप्रकाशित आनंदमय आहों. बुद्धि ही नवोढा राणी मानल्यावर तिला माहेरीं पाठवितांना माणसें ( मोलकरीण ) वगैरे द्यावीं लागतात. ती मोलकरीण दरवाज्यापर्यंतच जाऊं शकते. तिचा आंत घरांत प्रवेश नाहीं, त्याचप्रमाणें बुद्धीच्या हद्दीपर्यंत इंद्रियें, मन, बुद्धीला घेऊन जातात, व तेथून परततात. बुद्धिची हद्द ओलांडली कीं, बुद्धि आत्म्यांत माहेरवासणीप्रमाणें फिरूं वागूं लागते. व आनंदांत दंग असते.

**सुखमात्यंतिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतींद्रियम् ।**
**वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्वतः ।** गी. ६-२१

**सूत्रार्थः**—आत्मा केवल ज्ञानस्वरूप आहे. शुद्ध असूनही बुद्धींत त्याचें प्रतिबिंब पडल्यानें तिच्या मार्फत अवलोकन करणारा आहे.

## तदर्थ एव दृश्यस्यात्मा ॥ २१ ॥

तत्, अर्थः, एव, दृश्यस्य, आत्मा.

तस्मै इति तदर्थः; आत्मा=स्वरूप. दृश्यस्य आत्मा ( स्वरूप ) तदर्थ एव त्या आत्म्याकरितांच आहे. दृश्य ह्मणजे बाह्य पदार्थ ह्यांचें ज्ञान आत्म्याला करून देण्याकरितांच चित्त आहे. चित्त अचेतन असल्यानें त्याला स्वतःचें कांहीं काम नाहीं.

चित्त हें प्रकृतीची विकृती होय. चित्त पर-प्रकाशित-आत्म्याकडून प्रकाश घेत असल्यानें दृश्यत्वास आलें आहे; ह्मणून चित्ताचें अस्तित्व भासतें. उदाहरणार्थ चंद्र, सूर्यापासून प्रकाश घेऊन आपलें सूर्यप्रकाशानें अस्तित्व दाखवितो.

**सूत्रार्थः**—आत्म्याच्या प्रकाशामुळें चित्त दृश्यत्वास आलें आहे. दृश्य चित्त त्या आत्म्याकरितांच आहे.

## कृतार्थम्प्रति नष्टमप्यनष्टंतदन्यसाधारणत्वात् ॥ २२ ॥

कृतार्थम्, प्रति, नष्टम्, अपि, अनष्टम्, तत्, अन्य, साधारणत्वात्

कृतार्थं प्रति=जे कृतार्थ झाले ( कृतः अर्थः येन सः ) जे मुक्त झाले नष्टं अपि अनष्टं-समजुतीसाठीं तत् हें प्रथम दृश्य घेऊं. अन्यसाधारणत्वात्=अन्य सामान्यत्वात् तें दृश्य इतरांशीं समान असल्यामुळें प्रकृतीचे मायेचे खेळ चालूच आहेत, आत्मा हा द्रष्टा पाहातच आहे व प्रकृतीच्या मोहजाळ्यांत सांपडून तेथेंच रमून अगदीं गुंग होऊन गेला आहे. परंतु जेव्हां का त्याला ज्ञान होतें-कीं अरे हिचा माझा संबंध काय ? मी अलग, प्रकृती अलग; तेव्हांच तो मुक्त होतो. प्रकृतीचे खेळ हे त्या आत्म्याला मुक्त करण्याकरितांच आहेत. परंतु भ्रमांत पडून तो आपल्याला विसरून गेल्यामुळें प्रकृतीचें कार्य त्याच्यावर घडतें. ज्ञान झाल्यानें कृतकृत्य झालेली प्रकृती-तिच्याशीं ओळख पटल्यानें तो संबंध ठेवीत नाहीं ती त्याच्यापासून अलग होते. तिचें कार्य ह्याच्या-वरचें संपतें व दुसरे कोणी जे तिच्या जाळ्यांत आटोक्यांत येतील त्यांच्यावर तिची झडप आहेच. जसा आत्मा अनंतकोटी ब्रह्मांडाला व्यापून राहिला आहे, सबब अनंत आहे, तो नित्य आहे तशी प्रकृती अनंत नसून एक अंतवाली आहे. मात्र तिचें कार्य नित्य आहे. जो तिच्या भोंवऱ्यांतून निसटला अलग झाला, तेवढा सुटतो. बाकीचे तिच्या फेऱ्यांत गिरक्या घालतात व ती त्यांना अज्ञान आहेपर्यंत नाचवीत असते. एकाची शंका. जर प्रकृति एकच तर निर-निराळे सृष्ट पदार्थ निरनिराळे प्राणी वगैरे दिसणारें सृष्टिवैचित्र्य कसें ? याजवर कपिलमुनि उत्तर देतात. एकच इसम बाराखडी लिहूं लागला असतां लिहिणारा असतो तोच, शाई तीच, लेखण पण तीच. परंतु थोडक्याच फरकानें कचा का बनतो व तसेंच की, कु वगैरे म्ह. कर्मवैचित्र्यामुळें सृष्टिवैचित्र्य होत असतें. त्यायोगें सृष्टिवैचित्र्य दिसतें.

बॅकबेवर आपण फिरावयास जातों, थकल्यावर बांकावर बसतों, त्या बांकाचा कंटाळा आला कीं उठून घरीं येतों. आतां त्या बांकाचें आपणास कारण नस-ल्यानें फेंकून टाकीत नाहीं; आपलें कार्य जरी झालें तरी दुसऱ्यांना बसावयाकरितां तें पाहिजे आहे. रस्त्यांत खेळ पाहतांना आपणास कंटाळा आला कीं आपण अलग होतों; परंतु गारुडी, दुसऱ्या येणाऱ्याकरितां, खेळ चालूच ठेवितो; तुमचें काम झालें ह्मणून तुह्मी त्यास हांकून लावीत नाहीं व तो खेळ आटपीत नाहीं; तसेंच प्रकृतीचें आहे. खेळ करणारी प्रकृती एकटीच, पाहाणारे अनंत. ज्याचें काम झालें तो मात्र अलग होतो एवढेंच.

प्रकृती एक व आत्मे अनंत कसे तर, समुद्र पाण्यानें भरलेला आहे त्या पाण्यांतून हजारों घडे भरून काढले ह्मणजे प्रत्येक घड्यांतील पाण्याची त्या समुद्रांतील पाण्यापासून च्यूतावस्था झाल्यानें स्थित्यंतर होऊं लागतें नासूं लागतें. जो अलग झाला त्याला शेंकडोशें संकटें यावयाचींच व नाश व्हावयाचाच. एकजूट नसल्यानें तो मार खावयाचाच त्याप्रमाणें प्रकृती त्याजवर हल्ला करून त्यास चीत करून मोहित करून टाकते व दशा उडवते. तो त्रासून कंटाळल्यावर हिचा माझा संबंध नाहीं, हिच्या जाळ्यांत आपण जावयाचें नाहीं समजून, जूट करण्याकरितां जेव्हां दुऱ्याशीं मिळतो तेव्हां त्या प्रकृतीचें, ( पुरुष अलग तिच्या पलीकडील सबब ) त्या एकजुटीमुळें कांहीं चालत नाहीं; तेव्हां हा सुटतो ( जसें गाईचा बच्चा गाईचा आश्रय केल्यावर डर उत्पन्न करणाऱ्याकडे धिटाईनें पाहतो ) मग, ती, प्रकृती दुसऱ्या अलग झालेल्यावर झडप घालते व त्याला नाचविते. असा हा अनंतकाळ नित्य प्रकृतीचा खेळ चालूच आहे. ह्या अलग होण्यानें प्रकृतीचे खेळ त्याच्यावर चालतात. ह्मणून प्राण्यांना च्युत ह्मणतात; व ईश्वराला अच्युत ह्मणतात. आतां प्रकृति पुरुषाचा संबंध कसा ? " दृग्दर्शनशक्त्योर्नित्यत्वादनादिः संयोगः व्याख्यात इति. धर्मिणामनादि संयोगाद्धर्ममात्राणामप्यनादिः संयोगः " । दर्शनशक्ती ह्मणजे बुद्धि. चित्त ह्मणजे प्रकृतीची विकृती हिचा, व दृक्शक्तीचा, या दोहोंच्या नित्यत्वामुळें संयोगही अनादि आहे. धर्मीचा जर अनादि संयोग तर त्यावर असणाऱ्या धर्मांचाही अनादि संयोग मानणें जरूर आहे.

**सूत्रार्थः**—तो कृतार्थ झालेला पुरुष व इतर अन्य पुरुष ह्या दोघांशीं समान दृश्य असल्यामुळें तें दृश्य कृतार्थाला नष्ट व अकृतार्थाला अनष्ट आहे. एक आत्मा उद्धरला ह्मणून इतरांसाठीं तें दृश्य नष्ट नाहीं.

## स्वस्वामीशक्त्योः स्वरूपोपलब्धिहेतुः संयोगः ॥ २३ ॥

स्व, स्वामीशक्त्योः स्वरूप, उपलब्धि हेतुः संयोगः—

स्व=दृश्य, जड; स्वामी=द्रष्टा, आत्मा. स्वरूपस्य+उपलब्धिः=स्वरूपोपलब्धि; स्वरूपोपलब्धेः हेतुः=स्वरूपोपलब्धिहेतुः । स्व=दृश्य=जग=प्रकृतीचें कार्य; स्वशक्ति आणि स्वामीशक्ती अर्थात् जड व चेतन, प्रकृती पुरुष यांचा संयोग झाला ह्मणजे दोघांचे निरनिराळे स्वभाव व्यक्तत्वास येतात. धन ज्याजवळ आहे त्यास त्या

धनाचा मालक—धनी ह्मणतात. धन तें त्याचें स्व, व धनाचा व त्याच्या मालकाचा संबंध तो स्वस्वामिसंबंध. त्याचप्रमाणें दृश्य हें पुरुषाचें स्व, व द्रष्टा त्याचा धनी मालिक होय. या दोघांची जी शक्ति ती स्व-स्वामीशक्ती; समजा माझ्या हातांत मातीचा गोळा आहे तो गोळा माझें स्व, व त्याची मडकी किंवा विजा बनविण्याची माझी शक्ति व त्याची बनण्याची शक्ति त्या दोघांच्या शक्तीचा संयोग त्यापासून दृश्याच्या स्वरूपाची उपलब्धि यास भोग ह्मणतात. द्रष्ट्याच्या स्वरूपाची उपलब्धि तोच मोक्ष. ह्मणजे दृश्याच्या ( बाह्य पदार्थाच्या ) संयोगानें सुखदुःखाची प्राप्ती व द्रष्ट्याच्या संयोगानें मोक्षाची प्राप्ती. दृश्याचा संयोग—ह्या संयोगाचें कारण अज्ञान आहे. अज्ञानानें संयोग, संयोगामुळें रूप व्यक्तत्वास येणें अपरिहार्य आहे ह्मणून संयोगच जर टाळतां आला तर रूपें दृश्य होणार कशीं ? असें ऋषी मुनी सांगतात. ह्मणून बाह्य वस्तूशीं असलेला संबंध तोडून अन्तर्दृष्टि करून मोक्ष मिळविण्याकरितां ऋषीमुनी उपदेश करितात. कारण दृश्याशीं वियोग झाला कीं द्रष्ट्याशीं संयोग होईल ह्मणजेच मोक्ष.

**सूत्रार्थः—**जडाचे व आत्म्याचे संयोगाविना एकमेकांचें स्वरूप प्रकट होत नाहीं. द्रष्टा आणि दृश्य या दोघांच्या प्रादुर्भावाला कारण तो संयोग होय.

२४ अध्यात्मशास्त्राचे प्रकार चार.

१ हेयं २ हेयहेतुः ३ हानं ४ हानोपायः

## तस्य हेतुरविद्या ॥ २४ ॥

तस्य हेतुः अविद्या. तस्य=संयोगस्य.

आपण अज्ञानानें आपल्या शरिरालाच आत्मा—सर्वस्व अशी समजूत करून घेऊन बसल्यामुळें आपणाला सुख दुःखें वगैरे अनेक प्रकारचे भोग भोगावे लागतात. ह्या शरिराबद्दल जेव्हां आपण बेफिकीर होऊं तेव्हां आपणाला त्या शरिराबद्दल कोणत्याही प्रकारची पर्वा करण्याचें कारणच उरणार नाहीं. आपलें शरीर किंवा अनेक शरीरें, अनंत प्राणी अनंत प्रकारच्या मिश्रणापासून उत्पन्न होतात. हें विश्व त्या अनंत पदार्थांच्या मिश्रणाचेंच कार्य आहे. दर्यामें खसखस ह्मणतात त्याप्रमाणें आपला देह त्या विश्वरूपी दर्यातील एक खसखशीचा कण होय. त्या कणांची प्रत्येक क्षणीं संघटना चालूच

आहे. आतांच्या घटकेची रचना बदलून दुसरीच होईल व तिची तिसरीच होईल ह्मणजे आपल्या शरिराचे कणांत दुसऱ्या कणांची भरती होईल किंवा आपल्यातील कण दुसऱ्याच वस्तू बनविण्याला कामास येतील. ह्मणजे विश्वांतील परमाणूंचे फेरबदल एकसारखे चालणारच तेथें माझें तुझें कोठें राहिलें ? ह्या परमाणूच्या रचनेला माझें तुझें ह्मणणें हेंच अज्ञान, ह्या अज्ञानामुळें माझा देह आपण ह्मणतों व त्यामुळें सुख दुःख विनाकारण ओढवून घेतों; हाच आपला भ्रम आहे. भ्रमाच्या पलीकडे जाणें हेंच ज्ञान; हेंच साध्य. हा जो भ्रम ( अविद्या ) त्याचा नाश झाल्यानें संयोग आपोआपच मोडेल, '**कारणनाशात् कार्यनाशः**' अज्ञानाचे कारणाचा नाश झाल्यानें त्या अज्ञानाचें कार्य जो संयोग त्याचा नाश सहजींच होईल.

नास्तिकाची ह्याजवर एक थट्टेची शंका–प्रश्न–एक सुंदर स्त्री नवऱ्याला ह्मणते "आर्ये पुत्रापत्यवती मे भगिनी किमर्थन्नाहमिति। स तामाह मृतस्तेहमपत्यमुत्पादयिष्यामीति तथेदं विद्यमानं ज्ञानं चित्तनिवृत्तिं न करोति विनष्टं करिष्यतीति का प्रत्याशा। उत्तर–ननु बुद्धिनिवृत्तिरेव मोक्षोऽदर्शनकारणाभावात्। बुद्धिनिवृत्तिस्तच्चादर्शनं बन्धकारणं दर्शनान्निवर्तते । तत्र चित्तनिवृत्तिरेव मोक्षः किमर्थमस्थान एवास्य मतिविभ्रमः"। स्त्री ह्मणते हे स्वामी माझ्या बहिणीला मूल आहे मला कां नाहीं ? तो तिला उत्तर देतो–मी मेल्यावर तुला अपत्य होईल; हें जसें अशक्य तसेंच विद्यमान ज्ञान चित्तनिवृत्ती करीत नाहीं तर नष्ट झालेलें ज्ञान चित्तनिवृत्ती करील कसें ? त्यावर आचार्यांच्याच तोंडाचा उत्तर देतो–ज्ञान, साक्षात् ज्ञान, मोक्षाला कारण असें ह्मणणें नव्हे तर ज्ञानानें–ज्ञान साधनानें बुद्धिनिवृत्ती व तद्वारा मोक्ष असें आमचें मत. बुद्धिसंयोग हें जर कारण, त्या कारणाचा अभाव झाला कीं कार्याचा अभाव होईल, ह्मणून मोक्षाला बुद्धिनिवृत्ती हें कारण होय. आचार्य ह्मणतात–चित्तनिवृत्तीच मोक्ष असें आमचें ठाम मत असतां ह्या नास्तिकांना उत्तर न देतां त्यांची उपेक्षा करणेंच इष्ट होय.

**सूत्रार्थः**—अविद्या हें त्या संयोगाचें कारण आहे.

**तदभावात्संयोगाभावो हानं तद्दृशेः कैवल्यम् ॥ २५ ॥**

तत्, अभावात्, संयोग, अभावः, हानं, तत्, दृशेः, कैवल्यम्.

संयोगाचा अभाव तेंच हान, दृश्याचें जें कैवल्य त्याला हान ह्मणतात. जड न ओळखणें हाच संयोग; व द्रष्टा ओळखणें हें कैवल्य.

" तस्य अदर्शनस्याभावात् बुद्धिपुरुषसंयोगाभावः पुनरसंयोगो गुणैरित्यर्थः। दुःखकारण निवृत्तौ दुःखोपरमो हानं तदा स्वरूपप्रतिष्ठः पुरुषः "

अदर्शन=अविद्या. अविद्येचा नाश झाल्यानें संयोगाचा नाश होतो गुणनिवृत्ति होते. पुन्हां गुणाच्या संयोगाचा वियोग होतो, दुःखाचें कारण नाहींसें होते. दुःखाची शान्ती हेंच हान. ती झाल्यानंतर पुरुषाचें स्वस्वरूपामध्यें स्थित होणें हा परिणाम होतो. तात्पर्यांश—अविद्येच्या नाशानें विवेकज्ञान उपन्न होतें. मग अज्ञानापासून होणारा संयोग आपोआप सुटतो. अज्ञानानें प्रकृतीच्या ताब्यांत आपण जातों. तिचा ताबा आहे तों पर्यंत, ती वाटेल तशी आपणास फिरवील; एवढ्याच करितां मन प्रथम स्वाधीन करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मन ताब्यांत कसें येईल ह्याजबद्दल यत्न निराळ्या प्रकरणीं दिला आहे तो पाहावा. मन ताब्यांत आल्यावर प्रकृतीवरही ताबा मिळवितां येतो. प्रकृतीवर ताबा मिळाला कीं ब्राह्य जग करतलामलकवत् होऊन जातें; आपले प्रत्येक हुकूम मानण्यास जणूं काय सज्ज—तयार होतें. बाह्य जगावर ताबा मिळविणें सोपें आहे; अन्तःसृष्टीवर ताबा मिळविणें फार बिकट आहे. तो ताबा योगाभ्यासानें–ध्यानानें मिळवावयाचा आहे. तो मिळाल्यानें अन्तर्बाह्य दोन्हीं सृष्टींवर ताबा प्राणी चालवूं शकतो.

**सूत्रार्थः**—त्या अज्ञानाचा अभाव ( नाश ) झाल्यानें संयोगाचा नाश होतो. त्यालाच हान ( त्याग ) म्हणतात. व तेंच दृश्याचें कैवल्य म्हणजे तोच मोक्ष होय.

## विवेकख्यातिरविप्लवा हानोपायः ॥ २६ ॥

विवेकख्यातिः=विचार; आत्मा व प्रकृतीचे गुण हे अगदीं निराळे, असें ज्ञान. ख्याति=ज्ञान विप्लव मिथ्याज्ञान Floating in different directions, confusion, opposition. प्लव=तरण्याचें साधन अविप्लवा=मिथ्याज्ञानरहीत, निश्चित; अडथळे, विघ्नें उत्पन्न न होणारें; कधींही नाश न पावणारें; टिकाऊ. हानोपायः=नाशाचा उपाय. दुःख निवृत्तीचा उपाय.

नित्य अनित्य वस्तूंचा विचार करितां करितां जड तेवढें सर्व अनित्य, व चेतन तेवढें नित्य आहे, असें ज्ञान झाल्यावर पुरुष प्रकृती पलीकडला, जो नित्य

असणारा त्याला प्रकृतीशीं काय करावयाचें आहे. ती विनाशी आहे असें जेव्हां मनाला पक्कें ठसतें तेव्हांच अशा तऱ्हेचें अविरत–कधींही नाहींसें न होणारें ज्ञान उत्पन्न होतें म्हणजे ज्ञानाचा उदय होतो; अर्थात् अज्ञान लयाला जातें. मग पुरुष स्वप्रकाशानें चमकूं लागतो. मग आपणच सर्वशक्तिमान् आहोंत, सर्वज्ञ आहोंत, सर्वव्यापक आहोंत अशी प्रतीती येते. अज्ञानानें ज्याच्या पाठीस आपण लागलों होतों तें आपणाजवळ असतांना अज्ञानानें गंधमृगवत् चोहोंकडे भडकत होतों तें भडकणें टाकून ठिकाणावर येतों. व हेंच मनुष्यमात्राचें साध्य आहे.

**सूत्रार्थः**—कायम टिकणारा नित्यानित्य विचार उत्पन्न होणें हाच हानाचा म्हणजे दुःखनिवृत्तीचा उपाय आहे.

## तस्य सप्तधा प्रान्तभूमिः प्रज्ञा ॥ २७ ॥

तस्य=हानोपायस्य. सप्तधा=सात प्रकारच्या.

प्रान्तभूमिः=प्रकृष्टः अन्तः यासां ताः प्रान्ताः; प्रान्ताः भूमयः यस्याः सा प्रान्तभूमिः; प्रान्तभूमि=उत्कर्षशाली भूमि, भूमि=अवस्था.

अवस्था, शेवटलें टोंक आहे जिचें अशा अवस्था आहेत जिच्या.

१ प्रथम अवस्था–नित्य अनित्य यांच्या विचारानें ज्ञानप्राप्ती होऊं लागते; त्याची खूण आपली तळमळ कमी होऊं लागते व सत्य भेटणार अशी मनाची खात्री पटते. जेवढें जाणावयाचें तेवढें जाणलें व तें हेय आहे ही बुद्धीची प्रथमावस्था होय. तिचा उत्कर्ष–आतां कांहीं जाणावयाचें राहिलें नाहीं.

२ हेयहेतु तेवढे क्षीण केले, ह्मणजे अनेक तऱ्हेचे संयोग ते क्षीण केले, ममत्वादि संयोग क्षीण केले. याचा उत्कर्ष–आतां कांहीं एक क्षीण करावयाचें नाहीं. दुःखाचा परिहार ही दुसरी पायरी. ह्या पायरींत जगांतील कोणत्याही वस्तूपासून आपणांस दुःख उत्पन्न होत नाहीं.

३ हानाचें बरोबर ज्ञान करून घेतलें, संयोगाच्या अभावाचें बरोबर ज्ञान करून घेतलें. जाणावयाचें कांहींच शिल्लक नाहीं. ही तिसरी पायरी.

४ हानाचे उपाय बरोबर जाणणें. सर्व कर्तव्य समाप्ति ही चवथी पायरी. ज्याला कशाची गरजच राहात नाहीं त्याला कर्तव्यही नाहीं. समजुतीसाठीं त्या सात अव-

स्थांचे दोन भाग समजून पहिल्या भागांत ह्या वरील चार अवस्था घालाव्या. ह्यांना कार्यविमुक्ती ह्मणतात, पुढील तिहींस चित्तविमुक्ती ह्मणतात.

५ बुद्धि ही चरितार्थ झाली ह्मणजे कृतकृत्य झाली. चित्तविमुक्ति ही पांचवी पायरी.

६ सत्व रज तम हे तीन गुण नेहमीं अधःपाती आहेत, शिखरावरील धोंड्याप्रमाणें; खालीं पडलेला धोंडा वर चढत नाहीं. त्याचप्रमाणें मन निष्क्रिय झाल्यावर वृत्ती उठत नाहींत. त्या आपआपल्या कारणांत लीन होतात ह्मणजे चित्ताचा लय ही सहावी पायरी.

७ आपल्या कारणांत लीन झाल्यावर प्रयोजन नसल्यानें गुण पुन्हां उद्भूत होणार नाहींत. गुणरहित आत्मा एकटाच चमकूं लागणें ही सातवी पायरी होय. इतक्या पायऱ्या चढलेल्या योग्याचें मन शांत होतें; त्याला दुःख कसलेंच उरत नाहीं.

**सूत्रार्थः**—उत्तरोत्तर उत्कर्षशाली अशी सात प्रकारची प्रज्ञा उत्पन्न होते. त्या हानोपायाच्या पायऱ्या सात.

## योगाङ्गानुष्ठानादशुद्धिक्षये ज्ञानदीप्तिराविवेकख्यातेः ॥२८॥

योग, अङ्ग, अनुष्ठानात्, अशुद्धि क्षये, ज्ञानदीप्तिः आविवेक ख्यातेः

अनुष्ठान = आचरण, अशुद्धिक्षये = अशुद्धीचा क्षय होतो.

ज्ञानदीप्ति = ज्ञानाची ज्योत, ज्ञानरूपी ज्योत उत्पन्न होते.

आविवेकख्यातेः = विवेकज्ञानापर्यंत योगाचीं जीं पुढें आठ अङ्गें दिलीं आहेत त्या प्रत्येकांत सांगितल्याप्रमाणें वागल्यानें पायरी पायरीनें गेल्यानें क्लेशरूपी मळ जाऊन ज्ञान प्राप्त होतें. हें ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठीं शारीरिक व मानसिक संयम केला पाहिजे. हा संयम साधला कीं स्थैर्य उत्पन्न होतें. कारण आजच्या स्थितींत आपण अगदीं चंचल मनानें व शरिरानेंही आहोंत.

**सूत्रार्थः**—योगाच्या अङ्गाचें अनुष्ठान आचरण्यानें अज्ञानरूपी मळ जाऊन ज्ञानरूपी ज्योत प्रदीप्त होते. व त्यापासून विवेकज्ञान उत्पन्न होतें.

## यमनियमासनप्राणायामप्रत्याहारधारणाध्यानसमाधयोऽष्टावङ्गानि ॥ २९ ॥

**सूत्रार्थः**—यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, व समाधि अशीं योगाचीं आठ अङ्गें आहेत. हा समाधी, योगाचें एक अंग असल्यानें, त्यास, योगाङ्ग समाधि म्हणतात.

## अहिंसासत्यास्तेयब्रह्मचर्याऽपरिग्रहा यमाः ॥ ३० ॥

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रहाः इति यमाः

अहिंसा:—न हिंसा अहिंसा सर्वथा सर्वदा सर्व भूतानामनभिद्रोहः अन्नासाठी किंवा स्वतःच्या लहरीसाठीं कोणाचाही कायावाचामनेंकरून, किंवा आचार विचार उच्चारानेंही घात न करणें. प्रत्यक्ष शरिरावर आघात केल्यानें जसें देहाला दुःख होतें तसेंच वाणीनेंही वर्मावर बोलल्यानें दुसऱ्याला दुःख होतें. ज्याला योगाचा अभ्यास करून परमानंद प्राप्त करून घ्यावयाचा आहे त्यानें हें व्रत पाळावें. इतकेंच नव्हे तर व्यावहारिक माणसांनीं सुद्धां जर हें व्रत पाळलें तर त्यापासून फायदाच आहे, तोटा नाहीं.

सत्य=" सत्यं यथार्थे वाङ्मनसे, यथादृष्टं यथा अनुमितं यथाश्रुतं; यदि चैवमप्यभिधीयमाना भूतोपघातपरैव स्यान्न सत्यम्भवेत्। पापमेव भवेत्तेन पुण्याभासेन पुण्यप्रतिरूपकेण कष्टन्तमः प्राप्नुयात्। तस्मात्परीक्ष्य सर्वभूतहितं सत्यं ब्रूयात् "। यथार्थवाणी ह्मणजे जसें पाहिलें असेल ऐकलें असेल त्याप्रमाणें विचार उच्चार करणें तें सत्य, याप्रमाणें सत्याबद्दल शास्त्र आहे. तरीपण वेळ प्रसंग पाहून पाहिल्याप्रमाणें व ऐकल्याप्रमाणें बोलून जर दुसऱ्याचा घात होत आहे तर तसें न बोलणें हेंही सत्य. उदाहरण तपस्वी योगी बसला असतां त्या समोरून एक इसम पळत गेला, त्याच्या पाठीवर दुसरे त्याचा घात करण्याकरितां धांवत आले; त्यांनीं त्या योग्याला विचारिलें या बाजूनें कोणी गेला का ? तर त्यावेळीं त्यानें नाहीं ह्मणून सांगणें हेंच सत्य व ह्यांतच पुण्य आहे. होय ह्मणेल तर त्या मनुष्याचा घात होण्याचा संभव असल्यानें त्याचें होय ह्मणणें पापाला कारण आहे. ह्मणून असत्य. धर्मराजाचें प्रसिद्ध उदाहरण—**नरो वा कुञ्जरो वा**. सबब—**सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् न ब्रूयात् सत्यमप्रियं। प्रियंच नानृतं ब्रूयात् इति धर्मः सनातनः॥** असें शास्त्रवचन आहे.

**सत्याय मितभाषणं**–रघुवंश. सत्याकरितां मितभाषी व्हावें; उगाच बडबड करीत बसल्यानें तोंडांतून खोटें जाण्याचा संभव असतो. ज्याला सत्य पाळावयाचें त्यानें वचनानें कोणाला बांधलें जाऊं नये कारण तें घडलें नाहीं ह्मणजे असत्याचा आरोप येणार.

अस्तेय=" स्तेयमशास्त्रपूर्वकद्रव्याणां परतः स्वीकरणं–तत्प्रतिषेधः पुनरस्पृहा रूपोऽयमिति " । दुसऱ्याची वस्तू त्याला विचारल्याशिवाय घेणें याला चोरी ह्मणतात. अशा चोरीचा निषेध तें अस्तेय. ही चोरी आचार विचार उच्चारानेंही होतां कामा नये. अशा तऱ्हेनें जो हें सत्याचें व्रत पाळील त्याची वाणी वायां जात नाहीं; तो जें बोलेल तसेंच होतें. नरो वा कुञ्जरोवा ह्मटल्यानें धर्मराजाचा रथ अधांत्रीं राहात नाहींसा काहीं वेळ तरी झाला.

ब्रह्मचर्य—' गुप्तेन्द्रियस्योपस्थस्यसंयमः ' उपस्थ इन्द्रियाचा ( जननेन्द्रियाचा ) निग्रह, ब्रह्मचर्यव्रत ह्या विषयावर निराळें प्रकरण आहे तें पाहावें.

अपरिग्रह=( परिग्रह=स्वीकार ) कोणाकडून कांहींही न घेणें.

" विषयाणामर्जनरक्षणक्षयसङ्गहिंसादोषदर्शनादस्वीकरणम् अपरिग्रह इत्येते यमाः " ॥ वस्तु मिळविण्यास श्रम, त्रास, मिळाल्यावर रक्षण करण्याला त्रास, ती नाश पावूं नये ह्मणून काळजी करणें हा त्रास. ( सङ्ग ), आसक्तीनें सहवासानें तिच्याबद्दल प्रीति उत्पन्न होते.

'संगात्संजायते कामः कामात्क्रोधोभिजायते ॥
क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ गी. २. ६३

प्राणिघातावांचून भोग नाहीं ह्मणून हिंसा इत्यादि दोष विचारांत घेतां, विषयांचा स्वीकार न करणें ह्यालाच अपरिग्रह ह्मणतात. हें अपरिग्रहत्व योग्यानें कडक पाळलें पाहिजे. कारण दुसऱ्यानें जर आपणास कांहीं दिलें तर, देतांना त्याच्या विचारांसह तो देत असतो. निस्पृहतेनें देणारा एकादाच असतो कांहींतरी हेतु धरून तो देत असतो. त्यामुळें त्या वस्तूंचा स्वीकार केल्यानें त्याबरोबर त्याच्या विचारांचा स्वीकार केला असें होतें. व योग्यास तर विचार शुद्ध सत्य करावयाचे असतात व देणारा जर दुष्ट बुद्धीचा दुष्ट विचारांचा असेल तर त्या

विचारांचा परिणाम घेणारांवर झाल्यावांचून रहात नाहीं. बिनतारेच्या यंत्रानें बातमी पोंचवितां येते यावरून आकर्षणाचा धर्म लक्षांत येईल कीं, दुष्ट मनुष्याच्या वस्तूचा परिग्रह केल्यानें त्याचे विचार आपले विचारांनां कसे खेचून धरतील व आपल्यावर त्याचा परिणाम होईल. तो होऊं नये ह्मणूनच परिग्रह करावयाचा नाहीं. बिनतारेचें निर्जीव यंत्र इतकें काम करितें तर सजीव यंत्र काय करणार नाहीं? **भात्याचा दाखला** चामड्याचा निर्जीव भाता लोखंडाला पातळ करितो मग मनुष्याचे तोंडांतून सजीव भात्यांतून निघालेल्या उद्गारानें काय होणार नाहीं? शंका येईल सुष्ट मनुष्यापासून घ्यावें कीं काय? परंतु दुष्ट सुष्ट ओळखणें कठीण सबब कोणापासून कांहींही न घेण्याची संवय ठेवणें चांगलें. सत्पुरुष सदोदित वंद्यच आहेत त्यांच्या पायांची धूळसुद्धां पावन करील. वर सांगितल्याप्रमाणें हे पांच यम आहेत; हे यम बोलायला सोपे दिसतात. परंतु पाळावयाला शब्दोचारा इतकेच यमाप्रमाणें उग्रस्वरूपाचे कठीण आहेत. ते साक्षात् यमच होत ते जर पाळतां आले तर फळ मात्र त्यापासून अपूर्व मिळेल.

**सूत्रार्थः**—अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह आहेत हे पांच यम आहेत.

## एते जातिदेशकालसमयानवच्छिन्नाः सार्वभौमा महाव्रतम् ॥ ३१ ॥

अनवच्छिन्नाः ( अवच्छिन्न=परिच्छेदः )=परिच्छेद न करितां परिछिन्न=P. P. Limited, cut off, ascertained परिच्छेदः=Cutting, Separating, Discriminating between right and wrong. Decision अनवच्छिन्न=Not bounded or marked off. Unlimited. अवच्छिन्न=P. P. cut off. Separated सार्वभौम=सर्व अवस्थेमध्यें. व्रत=A vow in general; a religious act of devotion.

" तत्राहिंसा जात्यवच्छिन्ना मत्स्यबन्धकस्य मत्स्येष्वेव नान्यत्र हिंसा । सैव देशावच्छिन्ना न तीर्थे हनिष्यामीति । सैव कालावच्छिन्ना न चतुर्दश्यान्न पुण्येऽहनि हनिष्यामीति । सैव त्रिभिरुपरतस्य समयावच्छिन्ना देवब्राह्मणार्थे नान्यथा हनि-

ध्यामीति । यथाच क्षत्रियाणां युद्ध एव हिंसा नान्यत्रेति । एभिर्जातिदेशकाल-समयैरनवाच्छिन्ना अहिंसादयः सर्वथैव परिपालनयिाः सर्वभूमिषु सर्वविषयेषु सर्वथैवाविदितव्यभिचाराः **सार्वभौमा** महाव्रतमित्युच्यते ।"

जाति=मत्स्याशिवाय इतर जात मारणें अवध्य आहे, हें कोळ्याला पटेल हा जातिपरिच्छेद.

देश=क्षेत्राच्या ठिकाणीं हिंसा न करणें हा देशपरिच्छेद.

काल=पुण्यकाळीं चतुर्दशीस व पुण्यदिवशीं हिंसा न करणें हा कालपरिच्छेद.

समय, ( उपरत stopped, ceased ) वर सांगितल्याप्रमाणें जाति, देश, काल यांचा परिच्छेद करितां करितां फक्त शिष्ट येतील त्याच दिवशीं त्याच निमित्तानें मार, इतर वेळीं अहिंसाधर्म पाळ, मारूं नको, हा समय परिच्छेद. ज्याप्रमाणें क्षत्रियांना युद्धामध्येंच हिंसा युक्त; इतर वेळीं नसल्यानें ही समयावच्छिन्न अहिंसा होय.

हीं वर सांगितल्या तऱ्हेचीं व्रतें जाती, देश, काळ, हेतु यांनीं मर्यादित नसून हीं मोठीं व्रतें आहेत. ह्या व्रताला वयाची देशाची, कालाची जातीची आडकाठी नाहीं. कोणत्याही देशांतील कोणत्याही जातींतील स्त्रीपुरुषांनीं कोणत्याही अवस्थेंत या व्रतांचें आचरण करावें.

**सूत्रार्थः**—अशा प्रकारें जाति देश काल समय यांचा परिच्छेद ( मर्यादा ) शिकतां शिकतां चारी प्रकारें हिंसा टाकणें हें योग्याचें महाव्रत होय.

## शौचसन्तोषतपःस्वाध्यायेश्वरप्रणिधानानि नियमाः ॥ ३२ ॥

शौच सन्तोष तपः स्वाध्याय ईश्वर प्रणिधानानि नियमाः " शौचं मृज्जलादि-जनितं बाह्यमाभ्यन्तरश्चित्तमलानामाक्षालनम् " शुद्धि दोन प्रकारची १ भांडें जसें मातीपाण्यानें आंतून बाहेरून साफ करितां येतें तशी शरीरशुद्धि व दुसरी २ चित्तशुद्धि जी पाद १ सूत्र ३३ मध्यें सांगितली. **शौचंतुद्विविधंप्रोक्तंबाह्य-माभ्यतरं यथा । मृज्जलाभ्यांस्मृतंबाह्यंमनःशुद्धिस्तथांतरम्** योग्याला भांड्याप्रमाणें शरीर आंतून बाहेरून साफ करून नाडीच्या शोधनानें अग्नि प्रदीप्त होऊन वायूचें इष्टस्थळीं अवधारण होण्यासाठीं सांगितलेले उपाय-धौति, बस्ति,

नेति, त्राटक, नौली, गजकर्णी कपाळ भाती व वज्रोलिः—ह्यासंबंधें माहिती स्वतंत्रपणें व्यावहारिक योग या पुस्तकांत दिली आहे ती पाहावी.

२ आभ्यंतर शुद्धि मैत्रादि सूत्र ३३ पाद, १ मध्यें सांगितल्याप्रमाणें द्वेष, काम, कोधादिक जे मनाचे मळ त्यांना घालविणें.

संतोष—मिळेल त्यांत संतोषी असणें. संतोषात् अनुत्तम सुखलाभः **स हि भवति दरिद्रो यस्य तृष्णा विशाला; । सर्पाः पिबन्ति पवनं नचदुर्बलास्ते शुष्कैस्तृणैर्वनगजाबलिनो भवन्ति । कंदैः फलैर्मुनिवरागमयंति कालं संतोष एव पुरुषस्य परं निधानम्** ॥ इच्छेला जों जों वाढवावी तों तों तिची तृप्ती होत नाहीं. कारण सौभरी मुनीनें अनुभव घेऊन सांगितलें आहे कीं ' न भोगात् रागशान्तिः ' ह्मणून अल्पसंतोषी असणें. केवळ शरीररक्षणाला लागणाऱ्या वस्तूंची प्राप्ती करून त्यांत तृप्त असणें. हेंच उत्तम.

तपः=द्वंद्व सहनं, शीत उष्ण, क्षुधा तृष्णा, इत्यादि जीं द्वन्द्वें आहेत तीं सहन करणें, स्वाध्याय=मोक्ष शास्त्राणामध्ययनं प्रणवजपो वा । जेणेंकरून मुक्ति मिळेल अशा शास्त्रांचें अध्ययन. ब्रह्मसूत्र, उपनिषद् गीता इत्यादि, व ओंकाराचा जप, ईश्वर प्रणिधानं=तस्मिन् परमगुरौ सर्वकर्मार्पणम्; सर्व कर्मांचें परमेश्वराचे ठिकाणीं अर्पण करणें. नियमाः=नि=नितरां ( Campletely Entirely. ) यमाः इति नियमाः—पूर्व ३० सूत्रांत यम सांगितले व ह्या सूत्रांत नियम सांगितले. नियम ह्मणजे पूर्ण यम हे भयंकर उग्रस्वरूपी यम पुरे झाले.

**सूत्रार्थः**—अन्तर्बाह्य शुद्धि, संतोष, तपः स्वाध्याय, आणि ईश्वरभक्ति असे हे पांच नियम आहेत.

## वितर्कबाधने प्रतिपक्षभावनम् ॥ ३३ ॥

वितर्क=विरुद्धतर्क. उलट आहेत विचार ज्याचे ते.[१] संसाराला त्रासून मीं माझा अपराध करणाऱ्याचा घात करणार नाहीं, खोटें बोलणार नाहीं शौच पाळीन वगैरे यम नियम यांत सांगितल्याप्रमाणें वागणूक सुरू केली असतां पुन्हां बदल खाऊन फिरणें ह्मणजे ( **यथा श्वा वान्तावलेहि तथा त्यक्तस्य पुनरादान** ) कुत्रा जसा एकदां ओकलेलें पुन्हां खातो त्याप्रमाणें ही श्वानवृत्ति आहे अशी शत्रुभावना करावी.

**सूत्रार्थः**--यम नियमाचें पालन करतांना प्रतिबंध करणारे वितर्क ह्मणजे हिंसादिक त्या वितर्कांकडून पीडा होऊं लागली ह्मणजे शत्रुत्व बुद्धि त्यांच्या ठिकाणीं कायम करावी.

**बितर्का हिंसादयः कृतकारितानुमोदिता लोभक्रोधमोहपूर्वका मृदुमध्याधिमात्रा दुःखाज्ञानान्तफला इति प्रतिपक्षभावनम् ।३४।**

लोभ, क्रोध, मोहपूर्वका मृदुमध्य, अधिमात्रा दुःख अज्ञान अनन्तफला इति प्रतिपक्ष भावनम्. मात्रा ( मा to measure ) प्रमाण. क्रोधानें मोहानें, लोभानें कृत, तसेंच कारित व अनुमोदित व त्या हिंसेचें प्रमाण जरी मृदु त्यापेक्षां मृदु व अधि मृदु असलें तरी दुःख अज्ञान वगैरे अनन्त फळ देणार.

वितर्कांचे प्रकार तीन,—कृत, कारित अनुमोदित; कृत=प्रत्यक्ष केलेलें; कारित = दुसऱ्याकडून करविलेलें; अनुमोदित = अनुमोदन दिलेलें; त्या प्रत्येकांत आणखी भेद,–कांहीं लोभानें कृत, कांहीं क्रोधानें कृत, कांहीं मोहानें ( अज्ञानानें ) कृत. ह्या हिंसादिक वितर्कांचें प्रमाण लहान, मध्यम, अगर मोठें असलें तरी त्याची बाधा सारखीच होते व त्यापासून अज्ञान व दुःख यांस कारण होतें अशी शत्रुबुद्धि त्याच्या ठिकाणीं करण्याचा अभ्यास करावा. दुःख व अज्ञान हें आहे अनंत फळ ज्याचें असे हे वितर्क आहेत. अशी प्रतिपक्षाची शत्रुत्वाची भावना करावी.

**सूत्रार्थः**--हिंसादिक हे वितर्क होत. ।

वितर्क

| कृत | कारित | अनुमोदित |
|---|---|---|
| लोभानें, क्रोधानें, मोहानें कृत | तसेंच लोभानें, क्रोधानें मोहानें कारित | लोभानें, क्रोधानें मोहानें अनुमोदित |
| मृदु मध्य अधिमात्र | मृदु मध्य अधिमात्र | मृदु मध्य अधिमात्र |

कृताचे प्रकार तीन, कारिताचे प्रकार तीन व अनुमोदिताचे तीन मिळून नऊ. व प्रत्येकांत मृदु मध्य अधिमात्र ह्मणजे सत्तावीस. एकंदर २७×३=८१ प्रकारचे हिंसादिक वितर्क झाले. शिवाय अनंत प्राण्यांच्या जातींनीं व इतर कारणांनीं अनंत प्रकार होतील ते निराळेच. हिंसादिक कृत्यें स्वतः केलीं. दुसऱ्याकडून करविलीं किंवा करणाऱ्याला अनुमोदन दिलें तरी सुद्धां खोट्याचें पातक लागतें. आपण दगड फेंकला व त्याला अडकाव झाला नाहीं ह्मणजे तो जेथून निघाला तेथेंच परत येईल. पाटीवर रेघ काढण्यास सुरवात केली व तशीच चालू ठेविली व तिला अडकाव झाला नाहीं तर, त्या रेघेला जेथून आरंभ झाला तेथें ती मिळेल तेव्हां तिचा शेवट होईल. ह्मणजे आपले विचार जर हिंसेनें सुरू झाले तर शेवट हिंसेंतच होणार; व परत येतांना वाटेंतील कांहीं दुष्कृतीचे दुःखाचे जास्त परमाणू घेऊन येणार; जास्त दुष्ट कल्पना त्याबरोबर येणार ही कल्पना हा विश्वाचा कायदा सदोदित लक्षांत ठेविला कीं सहजीं ध्यानांत येईल कीं असले प्रसंग टाळावे, त्यायोगें दुष्ट कृत्य हातून घडणार नाहीं. ह्मणूनच ह्मटलें आहे "आप भला तो जग भला"

## अहिंसाप्रतिष्ठायां तत्संनिधौ वैरत्यागः ॥ ३५ ॥

अहिंसा—न हिंसा अहिंसा. हिंसा ह्मणजे प्राणाचा वियोग होईल, घात होईल ती. हिंसा कायावाचामनानेंही होतां कामा नये. सर्वथा सर्वदा कायावाचामनसा सर्वभूतानामनभिद्रोहः

प्रतिष्ठा=स्थिरता. अहिंसेची स्थिरता झाली असतां त्या प्राण्याशीं वैरभाव कोणी करीत नाहीं, इतकेंच नव्हे तर त्याच्या सन्निध असणारे प्राणीसुद्धां वैर टाकतात. उदाहरणार्थ—वाघ गाय किंवा हरीण एका भांड्यांत पाणी त्याच्याजवळ पितात. अहि नकुल, मांजर उंदीर, हीं त्यांच्या छायेंत एकमेकाशीं नाचूं वागूं लागतात.

**सूत्रार्थः**—अहिंसेची स्थिरता झाली असतां त्याच्या सान्निध्यांत वैर रहात नाहीं.

## सत्यप्रतिष्ठायां क्रियाफलाश्रयत्वम् ॥ ३६ ॥

ज्याचे आचार, विचार, उच्चार सदोदित सत्यच राहतील त्यानें कांहींएक केल्याशिवाय त्याची वाणी सत्यच होईल. अमोघाऽस्य वाग्भवति. त्याच्या तोंडा-

तून निघेल तसेंच घडेल. त्याच्या सत्यवाणीचा फायदा क्रियेशिवाय स्वतःला होऊन दुसऱ्यालाही होतो. त्यामुळें शाप व वर देण्याची शक्ती त्याच्यांत उत्पन्न होते; व दुसऱ्यावर त्याचा परिणाम घडतो. एका बाईचा नवरा मेला सबब सती जाण्याचा विचार तिनें केला. सत्यप्रतिष्ठेच्या मुनीला नमस्कार करितांच " अष्ट पुत्री सौभाग्यवती भव" असा आशीर्वाद त्या मुनींनीं दिला. तिनें विचारिलें केव्हां? या जन्मीं का पुढील जन्मीं ? मुनीनीं उत्तर दिलें याच जन्मीं. तिला आश्चर्य वाटलें. परतल्यानंतर पाहते तों नवरा जिवंत झाला, व तिला सती जावें लागलें नाहीं.

**सूत्रार्थः**—आचार विचार उच्चारानें सर्व प्रकारें सत्याची स्थिरता झाली असतां क्रियेवांचून क्रियेचें फल स्वतःकरितां व दुसऱ्याकरितां मिळवितां येतें.

## अस्तेयप्रतिष्ठायां सर्वरत्नोपस्थानम् ॥ ३७ ॥

स्तेयस्य भावः स्तेयम्, न स्तेयम् अस्तेयम्. कायावाचामनेंकरून अस्तेय-चौर्यकर्म सुटलें, चौर्यकर्म न करण्याची प्रतिष्ठा झाली, म्हणजे जगांतील उत्कृष्ट ह्मणून जेवढें आहे तें सर्व आपल्यासमोर आपली सेवा करण्यास हजर होतें.

रत्न ह्मणजे ज्याची जी इष्ट वस्तु तें त्याचें रत्न. यत्र रति-प्रीति तत् रत्नं यत्र मनः रमते इति रत्नं.

**शंख व लिखित** असे दोघे भाऊ होते व जुन्या काळचे तपस्वी होते. लिखिताचे मनांत आलें आपले शंख भावाला भेटावयास जावें. तो शंखाच्या आश्रमांत गेला. आश्रमांत पाटाचें पाणी वाहात होतें. वारा मंजूळ वाहात होता. आंब्याच्या झाडाला फळें ओथंबून झाड लीन झालें होतें. थकल्यामुळें भावाला न विचारितां त्या आंब्याचीं एकदोन फळें त्यानें खाल्लीं. पुढें कांहीं वेळानें त्याचा भाऊ शंख तेथें आला व ह्मणाला फळें विचारिल्याशिवाय खाल्लींस, ह्या आमच्या अस्तेयप्रतिष्ठा झालेल्या आश्रमांत हें पाप घडलें, सबब राजाकडे जा व गुन्हा सांगून शिक्षा भोग. मनूचा कायदा.

**येन येन यथांगेन स्तेनो नृषु विचेष्टते ।**
**तत्तदेव हरेत्तस्य प्रत्यादेशाय पार्थिवः ॥ ३३४ ॥** मनुस्मृति अ० ८

तो राजाकडे गेला व राजापुढें हात जोडून आपला अपराध कळविला. राजानें सर्व ऐकून घेतलें व त्यास गुन्हा माफ केला ह्मणून सांगितलें. परंतु लिखिताचें ह्मणणें आतां गुन्हा या लोकीं माफ झाला तरी पुढें मला प्रायश्चित्त भोगावें लागेल, सबब शिक्षा द्या. दोघांचें भांडणादाखल भाषण झालें. राजा ह्मणे गुन्हा माफ. हा ह्मणे माफ झाल्यानें पुढें मलाच भोगावें लागणार. शेवटीं नाईलाजास्तव राजानें आपल्या प्रधानास शिक्षा देण्यास सांगितलें. मनूचे कायद्याप्रमाणें चोरीची शिक्षा हात तोडणें; त्याप्रमाणें त्यास शिक्षा झाली. शिक्षेनंतर तो आपले भावास भेटण्यास गेला. संध्याकाळ झाली असल्यानें भावानें सांगितलें—तीर्थावर संध्या करून ये. त्याप्रमाणें संध्या करावयास गेला व मनांत ह्मणतो अर्घ्यें द्यावीं कशीं, गंगेंत हात घालून काढतो तों पूर्ववत् हात झाले, व अर्घ्यें दिलीं. त्यास ह्याचें आश्चर्य वाटलें. भावाला पुन्हां भेटून सर्व हकीगत सांगितली; तेव्हां तो शंख ह्मणाला, राजाचें काम शिक्षा देण्याचें व माझें काम अस्तेयप्रतिष्ठेनें हात देण्याचें.

शिवाजी महाराज हे महाराष्ट्रांतील रत्न होय. रामदासस्वामी जे अस्तेयप्रतिष्ठेचें खां होते, त्यांच्यापुढें शिवाजी महाराज आपल्या सर्व वैभवासह डोक्याचा मुकूट उतरून स्वामीच्यापुढें लोटांगण घेत असत.

**सूत्रार्थः**—अस्तेयाची स्थिरता झाल्यानें इच्छा नसतां ही जगांतील उत्तम उत्तम रत्नें दासासारखीं हात जोडून उभीं राहातात.

## ब्रह्मचर्यप्रतिष्ठायां वीर्यलाभः ॥ ३८ ॥

ब्रह्मचर्य या विषयावर स्वतंत्र लेख आहे तो पाहावा.

वीर्य=पराक्रम. परेषां आक्रमः पराक्रमः

प्रज्ञा स्थीर होईल तर मन स्थीर होईल. चलिते घटे तास्मिन् स्थितं उदकं चलायमानं भवति. जसें भांडें हालल्यानें त्यांतील पाणी हालतें, स्थीर भांडें असेल तर त्यांतील पाणी हालणार नाहीं तसेंच बुद्धि स्थीर झाल्यानें मन स्थीर होतें. बिन्दु ( वीर्य ) स्थैर्यानें मनाला स्थैर्यत्व येतें व चंचलत्व जातें; मनाचें चंचलत्व गेल्यानें ब्रह्मचर्य हा धर्मच मनाचा बनतो ह्मणजे स्वभावच होऊन जातो. ब्रह्मचर्य पाळण्याचा प्रयत्न करावा लागत नाहीं. ब्रह्मचर्य पाळल्यानें दुसऱ्यांना आपले दास बनविण्याची ताकत आंगीं येते. दर्शनमात्रेण प्रणिपातं करोति. मनुष्याचे चित्तांत

वीर्य असेल तर विचारांत वार्णीत वीर्य येईल. पदार्थांमधील शक्ती तेंच वीर्य होय. मनुष्यामधील वीर्य भगवान् अत्रेय ऋषी जाणत होते. तसेंच परशुराम, भीष्माचे गुरु यांनीं ब्रह्मचर्यप्रतिष्ठेनें मृत्यूला आपला चाकर बनविला, ह्मणजे यांच्या तब्येतीवर मरण होतें. वीर्याचीं साधनें तीन; अन्न मनोवाहनाडी व संकल्प हीं वीर्याचीं साधनें होत. भीष्म पितामह ही ब्रह्मचर्याची प्रतिष्ठा होती. भीम ही ब्रह्मचर्याची प्रतिष्ठा ह्मणून प्रसिद्ध होता परंतु बायकोनें सुगंध मागितल्यानें व त्यानें तिला तो देऊन तिची इच्छा पुरविल्यानें त्याची अप्रतिष्ठा झाली त्याला भग-लंपट ह्मणून घेण्याची पाळी आली.

ब्रह्मचर्यप्रतिष्ठेनें मंत्रविद्या वीर्यवान् होतात. ज्यांच्या आश्रमांत ब्रह्मचर्य वास करील तेथें परक्यांना दास होऊन राहण्याची पाळी येते.

**सूत्रार्थः**—ब्रह्मचर्याची स्थिरता झाल्यानें अमोघवीर्याची प्राप्ति होतें. ह्मणजे अद्भूत सामर्थ्य प्राप्त होतें.

## अपरिग्रहस्थैर्ये जन्मकथन्तासम्बोधः ॥ ३९ ॥

परिग्रहः--स्वीकार, संग्रह=taking, belong-ings अपरिग्रहः न परिग्रहः अपरिग्रहः शरीरयात्रा चालण्याकरितां जो संग्रह तो परिग्रह, त्याव्यतिरिक्त साधनें तो अपरिग्रह. विषयाणां दोषदर्शनात् अपरिग्रहः इंद्रियांचे भोग्य विषय जितके कमी करितां येतील तितके करणें.

संबोधः=सम्यक् बोधः ह्मणजे ज्ञानं. **जन्मकथन्ता**=वर्तमान काळचा जन्म हा मागील जन्मातील कर्मांचा परिणाम असल्यानें वर्तमाम काळचा जन्म प्राप्त झाला, व वर्तमान काळच्या जन्माचा परिणाम पुढील जन्माला कारण होईल. वगैरे **जन्मकटकट. जीवन कथनाचें** सर्व **पुस्तक.** त्या पुस्तकांत सर्व कर्मांचा फाडा जसा असेल तसा, चागलें वाईटसुद्धां सांपडेल. " कोहमासं कथमहमासं किं स्विदिदं केवा भविष्यामः कथं वा भविष्यामः " । आपल्या खिशांतून नोट हरवली तर आपण एकसारखा ध्यास घेतों व तपास करितों; आपण कोठें कोठें बसलों होतों, कोठें गेलों होतों, खिशांतून कागद कोठें कोठें काढले होते वगैरे वगैरे इतका ध्यास लागतो कीं ती नोट सांपडेपर्यंत चैन

पडत नाहीं. तसेंच कोहमासं कथमहमासं चा ध्यास घेतल्यानें जन्मकथंतेचें स्मरण होतें. इतर बाजार बंद करावे तेव्हां जिज्ञासेनें विस्मरण झालेल्या वस्तूचें स्मरण होतें.

**सूत्रार्थः**—अपरिग्रहाची स्थिरता झाली असतां तीन जन्मांचें खरें व पुरें ज्ञान होतें.

## शौचात्स्वाङ्गजुगुप्सा परैरसंसर्गः ॥ ४० ॥

शौचात् स्वांग जुगुप्सा परैः असंसर्गः

शौचात्=बाह्य शुद्धीच्या विचारानें अन्तःशुद्धीवर गेलें असतां, स्वांग=स्वतांचें शरीर प्रिय, त्याचा तपास करितां करितां, शुक्रशोणितापासून उत्पन्न झालेले पाहून, जुगुप्सा=स्वरक्षणाविषयीं बेफिकीरी, तिटकारा, कंटाळा, येतो. स्वतः शरिराची ही स्थिती मग परक्याचें शरीर व संसर्ग ह्याजबद्दल तर पुसूंच नका. " स्थानात् बीजात् उपष्टंभात् निस्यंदनात् अपि कायमाधेय शौचत्वात् पण्डितो ह्यशुचिं विदुः। शरिराची उत्पत्ती शुक्रशोणितापासून, स्थान व बीजही वाईट, मल उपष्टंभ सामग्री, तीही वाईट. निस्यंदनात् पिघळण्यानें; नाभिनंदेत मरणं नाभिनंदेत जीवनं. याप्रमाणें शरिराचा तपास करितां करितां स्वशरिराचा तिटकारा येतो. पृथ्वी आप तेज वायु आकाश; वगैरे भूतांपैकीं मोठें भूत धाकट्याला शुद्ध करितें. पृथ्वी-पार्थिव शरीर बिघडलें तर पाण्यानें शुद्धता; पाणी बिघडलें तर आगीनें तापवून शुद्धता; अग्नि झाताऱ्यासारखा झाला तर वारा घालून शुद्धता; वायु बिघडला तर आकाशानें शुद्धता. परंतु शरिरांतील आकाश बिघडलें तर स्वधर्मशास्त्रानें शुद्धता, स्वाध्यायानें शुद्धता; घरचें आकाश बिघडलें तर भांडणें लागतात; शुद्धतेचें तत्व पाळण्यांत आलें तर रोगराई जाते. मातीनें माती शुद्ध; पाण्यानेंही माती शुद्ध; परंतु शरिराची शुद्धि तपासतां ती अशुद्धतेची मूर्तिमंत पुतळी असतां देह सुरेख दिसावा, सुखांत असावा, या इच्छेच्या मागें लागून मानवी जातीनें आपलें भयंकर नुकसान करून घेतलें आहे. यासाठीं देहबुद्धि कमी होऊं लागणें हें अन्तर्बाह्य शुचितेचें चिन्ह आहे. ही शुचिता राहूं लागल्याशिवाय देहबुद्धि नष्ट होणार नाहीं.

**सूत्रार्थः**—शौचतत्व पाळूं लागल्यानें, अन्तर्बाह्य शौचतपासानें, स्वशरीराचा तिटकारा येतो. स्वतः शरिराबद्दल ही भावना मग दुसऱ्याशीं संबंध ठेवण्याची इच्छाच होणार नाहीं.

## सत्वशुद्धिसौमनस्यैकाग्रेन्द्रियजयात्मदर्शनयोग्यत्वानि च॥४१॥

सत्वशुद्धि, सौमनस्य, एकाग्र, इन्द्रियजय, आत्मदर्शन योग्यत्वानि च.

सत्वशुद्धि=चित्तशुद्धि. सौमनस्य=सुमनसः भावः सौमनस्यं, मनं सज्जन बनणें. बुद्धि निर्मल झाली ह्मणजे मन जें बुद्धीचें गुलाम आहे तें शुद्ध होतें. प्रसन्न एकाग्र होतें, दौर्मनस्य जाऊन सौमनस्य बनतें. एकाग्र होत असल्यानें आत्म• दर्शनयोग्य ह्मणजे आत्मदर्शनाला योग्य होतें.

" शुचेः सत्वशुद्धिः ततः सौमनस्यं तत ऐकाग्र्यं तत इन्द्रियजयः ततश्चात्मदर्शनयोग्यत्वं बुद्धिसत्वस्य भवति । एतच्छौचस्थैर्यादधिगम्यत इति "
प्रसन्न मन ही मोठी चीज आहे. आपलें शरीर हा कःपदार्थ आहे, प्रसन्न मनानें आपल्या शरिरावर मनाचा ताबा चालतो, जेव्हां शरिराच्या ताब्यांत मन असतें तेव्हां अवनतीला आपणाला नेल्यावांचून तें राहणार नाहीं, ह्मणून मन सुप्रसन्न ठेविल्याचे परिणाम आहेत ते--

**सूत्रार्थः**—शुद्धतेची स्थिरता झाल्यानें बुद्धिशुद्धि, मनाचा प्रसाद, चित्ताची स्थिरता, इंद्रियजय, आत्मदर्शनाची योग्यता इतकीं प्राप्त होतात.

## सन्तोषादनुत्तमसुखलाभः ॥ ४२ ॥

संतोषात् अनुत्तम सुखलाभः

अनुत्तम = अत्यंत उत्तम. न विद्यते उत्तमो यस्मात् तत् अनुत्तमं, संतोषासारखी चीज नाहीं, संतोषानें चाकर, घरधन्याप्रमाणेंच वागतात. स हि भवति दरिद्रो यस्य तृष्णा विशाला. ज्याच्या इच्छा विशाल आहेत तो दरिद्रि पुरुष होय; परंतु ज्याच्या इच्छा अल्प तोच संतोषी पुरुष.

**संतोषैश्वर्यसुखिनां चिरं विश्रांतचेतसाम् ।**
**साम्राज्यमपिशांतानां जरतृणलवायते ॥**

शिवाजी महाराज आपले राज्याला तृणवत् समजत होते ह्मणून रामदासांच्या झोळींत तें,भिक्षा ह्मणून लेखानें टाकलें. इतकी संतोषवृत्ति त्यांची होती. एक संतोषी पण दरिद्री ह्मणतो.

**अहंच त्वंच राजेन्द्र लोकनाथावुभावपि ।**
**बहुव्रीहिरहं राजन् षष्ठीतत्पुरुषो हि त्वम् ॥**

तो ह्मणतो राजा तूं व मी दोघेही लोकनाथच आहोंत. मग राजा तुझ्या-माझ्यामध्यें फरक काय ? **तूं लोकनाथ** व **लोक माझे नाथ** एवढाच. संतोष हा मात्र ज्ञानपुरस्सर असावा, अज्ञानपुरस्सर संतोष तो संतोष नव्हे. कपिल मुनी संतोषाला आपल्या दरवाजांत उभासुद्धां राहूं देत नसत.

**संतोष स्त्रिषु कर्तव्यः स्वदारे भोजने धने ।**
**त्रिषु चैव न कर्तव्यो दाने तपसि पाठने ॥**

**सूत्रार्थः**--संतोषवृत्तीनें अत्यंत सुखलाभ होतो.

## कायेन्द्रियसिद्धिरशुद्धिक्षयात्तपसः ॥ ४३ ॥

कायेन्द्रियसिद्धिः अशुद्धिक्षयात् तपसः

काय=नवीन मनुष्य ह्या जगांत आल्यावर हें काय तें काय विचारितो, परंतु हृदयाला हात लावून ह्मणजे शरिराकडे पाहून हें काय हें काय ह्मणून विचारीत नाहीं. जगांतील सर्व वस्तूंबद्दल 'हें काय' 'तें काय' असा तपास चालवितो, परंतु स्वतःच्या शरिराबद्दल बेफिकीर राहतो. ज्याचा तपास करावयाचा त्याचा तर तो मुळींच करीत नाहीं. ह्या काय काय प्रश्नावरूनच शरीराला कायः ह्मणतात. त्यांत धातूची to collect चिनोति संचिनोति पुष्पाणि. त्या चि; धातूपासूनच काय शब्द निघाला. संचयाचा जो समुदाय तें काय. हें शरीर बऱ्याच वस्तूंच्या संचयांनीं बनलेलें आहे ह्मणून शरीराला कायः ह्मणतात.

कायिक, वाचिक, मानासिक. कायिक वाचिकमध्यें कायाचें-शरिराचें रक्षण मानिसकमध्यें इंद्रियांचें रक्षण.

सिद्धिः--अजायबिक चमत्कार. भीम हा कायसिद्धीचें उदाहरण, हनुमान हा इंद्रियसिद्धीचें उदाहरण. यानें लंका दहन केली. अग्नि रावणालाहि भीत होता परंतु रामाचा दूत व दास हनुमान कायसिद्धीवाला त्याला अग्नि नम्र झाला. अनुकूल झाला. हीच सिद्धी. सिद्धीनें, तपाचे सामर्थ्यानें दूरचें दिसणें, लांबचें ऐकं, येणें इत्यादि इंद्रियांचें सामर्थ्य वाढतें. अशुद्धिक्षयात्-अशुद्धरूपी मळ दूर झाल्यानें, अणिमादि अष्टसिद्धी शरीरसंबंधीं सिद्धी ही कायसिद्धि होय.

**सूत्रार्थः**--तपानें अशुद्धीचा क्षय होतो व तो क्षय झाल्यानें शरीरसिद्धि व इंद्रियसिद्धि प्राप्त होतात.

## स्वाध्यायादिष्टदेवतासम्प्रयोगः ॥ ४४ ॥

स्वाध्याय=प्रणवादि पवित्राणां जपः मोक्षशास्त्राध्ययनं वा; संप्रयोगः=सं+प्र योगः from युज् योजणें, योग Union सं=सम्यक्. प्र=प्रकर्षेण योगः; स्वाध्याय वेदाध्ययन; स्वाध्याय हें तत्व आहे, व त्या स्वाध्यायाची देवता आहे. त्या देवतेचें ध्यान केल्यानें ती देवता, येणारीं विघ्नें पार घालविते. व तिच्याशीं सायुज्यता होते. इष्टदेवतेचा जप करितां करितां अनुष्टान पूर्ण झाल्यावर ती देवता दर्शन देऊन तिच्याशीं, योग्याचे भाषणादि प्रकार घडून येतात.

**सूत्रार्थः**—स्वाध्यायतत्व पाळिल्यानें आपली इष्टदेवता प्रसन्न होते, व भाषणादि प्रकार घडतात.

## समाधिसिद्धिरीश्वरप्रणिधानात् ॥ ४५ ॥

समाधि सम्+आ+धि यांत धातु धा To put to fix सम्यक् आधीयते मनः अत्र इति समाधिः That particular position of the mind in which one's mind is well fixed without any attempt is called समाधि. प्रयत्न करून समाधि लावणें ही खरी समाधी नव्हे तर सहज आपोआप समाधी लागेल.ती खरी समाधी होय. गाण्यानें, भजनानें एकतानता होऊन इतर विषयांचा विसर पडून, काळाचेंही भान राहत नाहीं, अशी जेव्हां मनाची स्थिती होते, ती समाधी. **यत्करोषि यज्जुहोषि यदश्नासि तत्परमगुरौ परमात्मनि निवेदय**—प्रत्येक कृती ईश्वरावर हवालली ह्मणजे त्याचा भार ईश्वरावर हवालला जातो, ह्यामुळें ईश्वरी प्रसाद होतो। त्यायोगें आपलें मन प्रसन्न होतें. प्रसादस्तु प्रसन्नता । प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते । दुःखनिवृत्तीनें मनाची इष्टस्थिती ती प्राप्त होते. तीच समाधि. प्रणिधान=भक्ति.

**सूत्रार्थः**—ईश्वराच्या ठिकाणीं सर्व व्यापार जो अर्पण करितो, व ईश्वराची भक्ति करितो त्याला समाधी सिद्धी होते.

## स्थिरसुखमासनम् ॥ ४६ ॥

आसनम्=आस्यते, ( सुखेन आस्यते ) इति आसनं. आसन हें स्थीर मुहूर्तावर घालावें; कारण जसें चलमुहूर्तावर बांधलेलें घर नांदत नाहीं तसेंच चल लग्नावर आसन घालण्यास सुरवात केली असतां, आसनापासून जी स्थिरता मिळवावयाची

नी मिळणार नाहीं. आसन हा तीन अक्षरी शब्द आहे. ह्याचीं सूत्रेंही तीन ४६।४७।४८ हीं होत. तीं सूत्रें आसनाचें लक्षण, आसनाचें साधन व फळ, हीं दाखवितात. आसन हें एक भूमीचें आसन, दुसरें शरिराचें आसन, व तिसरें वसण्याकरितां दर्भाचें वगैरे केलेलें आसन.

**शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः।**
**नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरं॥** गी. ६-११

शुचौ देशे—शुद्ध जागा पसंत करणें; भूमीचें आसन शुद्ध मातीचा एक हात भर उंच ओटा बनविणें, कीड मुंग्यापासून उपद्रव होऊं नये ह्मणून; एक पावलानेंच चढतां येईल, जास्त चढण्याचा प्रयत्न करावा लागणार नाहीं इतक्याच उंचीचा ओटा बांधणें; जास्त उंच बांधल्यानें पडण्याची धास्ती ह्मणून हातभरच उंच. नीच सखल असल्यानें भूमीगत दोष येतील ते न यावे, ओल बाधण्याची व जनावरांची धास्ती, सबब कांसवाचे पाठीसारखें मध्यें जरा उंच व दोहों बाजूंस निमूळता असा ओटा तयार झाल्यानंतर चैलाजिनकुशोत्तरं-दर्भावर हरणाचें चामडें व त्याजवर वस्त्र हें एक आसन, ह्मणजे शुचि देश ठरवून पसंत झाल्यावर ओटा, वर सांगितल्याप्रमाणें तयार करणें हें एक आसन ह्म. स्थंडिल त्याजवर चैलाजिनकुशोत्तरं हें दुसरें आसन व स्वतःचें आसन मिळून तीन ह्मणजे स्थंडिल, (स्वयंदासः तपस्विनः); स्वतः तयार केलेला ओटा त्यावर दर्भ, कृष्णाजिन व वस्त्र हें एक आसन, स्थिरमासनमात्मनः हें एक मिळून तीन; ह्या सर्वांमिळून मूर्त दिसणारें जें आसन तें शास्त्रोक्त खरें आसन होय. ह्या आसनापूर्वीं प्रथम निश्चयासन आसनावर बसण्याचें पाहिजे. आसनाचा हिशोब असेपर्यंत समाधी नाहीं, आसनाचा हिशोब नाहींसा झाला कीं समाधी नजीकच आहे. आपण चालतों व शरीराचा एवढा बोजा उठवितों परंतु समजत नाहीं. एवढ्या बोजाचें कांहीं वाटत नाहीं. तो बोजा उठविण्याला आपण यत्न करीत नाहीं. तसें आसन सहज स्थिर, यत्नाशिवाय होणें तें स्थिर आसन, तेंच सुखासन. शरीर जसें बाजारांत अयत्नानें बोजा न वाटतां उठविलें जातें, तसें आंतील बाहेरील चित्ताच्या व शरीराच्या यत्नाशिवाय स्थीर बसणें तें आसन.

**समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः।**
**संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन्॥** गी. ६-१३

आसनावर बसल्यावर शरीर, मान व मस्तक हीं एका रेषेंत काठीसारखीं आलीं पाहिजेत. व दृष्टि नासिकाग्र पाहिजे. इकडे तिकडे दिशांकडे पाहावयाचें नाहीं. व अचल याप्रमाणें सहज प्रयत्न न करितां, बोजा न वाटतां बसतां येईल तें आसन. आपलें शरीर अस्तित्वांतच नाहीं असें वाटणें याचें नांव आसनस्थैर्य, व तेंच स्थिर सुखमासनम्. आसनें अनेक आहेत परंतु ज्याला जें आसन अनायासें घालतां येईल तें त्यानें घालावें. आसनासंबंधें निराळें प्रकरण सचित्र योग पुस्तकांत आहे तें पाहावें.

**सूत्रार्थः**— तेंच आसन होय कीं जें आंग हलल्याशिवाय अचल, व सुखानें शरीर, काठी सारखें सरळ ठेऊन बसतां येईल.

## प्रयत्नशैथिल्यानन्तसमापत्तिभ्याम् ॥ ४७ ॥

प्रयत्न=व्यापार; स्थिरतेचा विघातक असा स्वाभाविक यत्न; शैथिल्य, शिथिलस्य भावःशैथिल्यं. प्रयत्नशैथिल्य ह्मणजे शरीरव्यापाराला शैथिल्य आणणें. अनन्त=शेष; समापत्ति=तादात्म्य.

अनन्तसमापत्तिभ्याम्=शेषाच्या ठिकाणीं तादात्म्यवृत्ती राहणें.

आपलें शरीर उभें राहण्याकरितां आंतून चित्ताचा व बाहेरून शरिराचा प्रयत्न ह्या असतो, परंतु तो समजण्यांत येत नाहीं; तसेंच आसन घातल्यावर शरीर सरळ पण सुखानें राहण्याला प्रयत्न करावा लागला नाहीं, ह्मणजे प्रयत्न शैथिल्य झालें. तसेंच अनन्त ह्मणजे नाग, नाग फडा करून उभा राहिला ह्मणजे समं काय शिरोग्रीवं असा असतो, त्या अनंताप्रमाणें आपली स्थिती आसन घातल्यावर झाली पाहिजे; सहज आपणाला नागाप्रमाणें सरळ ओळंब्यांत बसतां आलें पाहिजे, हीच अनंताच्या ठिकाणीं समापत्ति ह्मणजे तादात्म्यता होय. एका सरळ रेषेंत नागासारखे आकृतीचा फायदा असा;—कमळाचा देंठ, शेंडा व बूड कापून समोर घेऊन तो पाण्यांत धरावा; व तोंडानें फुंकावा ह्मणजे तोंडांत पाणी येतें. त्या देंठाला दिसण्यासारखीं भोकें नसतात बारीक सूक्ष्म छिद्रें असतात, त्यांतून पाणी वर खेंचलें जातें; व खेंचणाऱ्याच्या तोंडांत पाणी येतें; परंतु तोच देंठ जर मध्यें बांक असलेला घेतला तर, सरळ असतां जसें पाणी खेंचलें जातें, तसें वांकडा दांडा घेऊन खेचलें जात नाहीं; त्याचप्रमाणें आपल्या शरिराची स्थिती होय. हवेंतून हवा खेंचून आपण प्राण घेत असतों. जेव्हां आपलें शरीर सरळ असेल

तेव्हां हवेंतील प्राण अनायासें खेंचला जाईल परंतु त्या शरीराला जर बांक असेल तर सरळ असतां जसा प्राण खेंचला जाईल तसा वांकडेपणीं खेंचला जाणार नाहीं; ह्मणून शरीर सरळ एका रेषेंत ठेविलें पाहिजे. शिवाय शरीर सरळ असल्यानें शरिरांतील जो मध्य पडदा ह्मणजे Diaphragm त्याच्या नियमित एकतंत्री गतीनें अन्नपचनाला व आंतील शरीरव्यापाराला मदत होत असते.

**सूत्रार्थः**—शरीरव्यापाराची शिथिलता व अनंत ( शेष ) त्याच्या ठिकाणीं तादात्म्यता केल्यानें आसन सिद्ध होतें.

**ततो द्वन्द्वानभिघातः ॥ ४८ ॥**

ततः द्वन्द्व अनभिघातः; अनभिघातः=नाश. अभिघातः=Striking, Attack, Complete destruction or removal.

आसनस्थैर्य नसल्यानें सुख दुःख शीत उष्ण वगैरे द्वंद्वांची बाधा होत असल्यानें, चित्तस्थैर्याचा भंग होतो तो चित्तविक्षेप आसनस्थैर्यानें जातो.

**सूत्रार्थः**—आसनजय झाल्यानें शीत उष्ण दुखदुःख वगैरे जीं द्वंद्वें त्यांपासून योग्याला पीडा होत नाहीं.

**तस्मिन्सति श्वासप्रश्वासयोर्गतिविच्छेदः प्राणायामः ॥४९॥**

तस्मिन्सति=आसन जय झाल्यानंतर, श्वासः बाह्यवायोः आचमनं श्वासः; प्रश्वासः कोष्ठस्य वायोः निस्सारणं प्रश्वासः तयोः गतिविच्छेदः उभयाभावः. बाहेरचा वायू आंत घेणें तो श्वास, आंतला वायू बाहेर टाकणें तो प्रश्वास; विच्छेदः अभाव करणें. आंत शरीरांत येणारा वायू व बाहेर जाणारा या दोहोंचे गतीचा अभाव करणें तो प्राणायाम होय.

प्राणायाम, ह्यांत प्राण+आयम; प्राण हा शब्द प्र+अन मिळोन झाला प्र= forth अन् to breathe अनः Breath Resperation आयाम Length extention, control stopping; आयामे दैर्घ्यं.

प्राण ही एक विश्वशक्ति आहे. प्राण्यांचे श्वासोच्छ्वास हे त्या शक्तीचें व्यक्त रूप आहे, त्या शक्तीच्या धक्कयानें फुप्फुसांत गति उत्पन्न होऊन ज्याला ह्मणून प्राण आहे जीवपणा आहे ( प्राणः अस्य अस्ति इति प्राणी* ) त्याला श्वासोच्छ्वास

* प्राणी हा शब्द श्वासोच्छ्वास करणाऱ्या जीवांनाच लावतात. नाहींतर झाडांनाही जीव आहे व प्राण आहे पण त्यांना प्राणी म्हणत नाहींत.

निर्माण होतात. लोकांमध्यें श्वासोच्छ्वासाला प्राण समजतात; परंतु श्वासोच्छ्वास हे प्राण नसून शरीरांत प्राण असल्याची ती खूण आहे. जसे मशीनमध्यें ( Flying wheel मोठें पळतें चाक ) मोठें चाक असतें, तसेच श्वासोच्छ्वास हें शरीरांतील मोठें पळतें चाक असून शरीरांतील प्रत्येक भागाला व त्यांतील त्याचे परमाणू परमाणूला चलन देणारे व नियमन करणारें मुख्य साधन आहे. प्राण ही एक ईश्वरी शक्ति आहे, ज्या शक्तीनें चराचराला आस्तित्व येतें. प्राणिमात्रांना ही शक्ति अन्न पाणी हवा सूर्यतेज यांपासून मिळते व विशेषतः वायूपासून मिळते; ह्मणून लोकांमध्यें नाकांतून येणाऱ्या जाणाऱ्या वाऱ्याला प्राण समजला जातो. परंतु खरी स्थिति तशी नसून नाकांतून वारा वाहणें ह्मणजे आंतबाहेर घुसळण चालणें, ह्मणजे श्वासोच्छ्वास चालणें, हें शरीरांत प्राण असल्याचें स्पष्ट चिन्ह आहे. जर शरीरांत प्राण नसेल तर श्वासोच्छ्वास घुसळण बंद राहील, व त्यालाच मृत शरीर समजलें जाईल.

प्रत्येक प्राणिमात्राला जीव म्हणून एक ईश्वरी अंश अग्नीचे ठिणगीप्रमाणें असतो. गीता अ. १५ श्लोक ७।८, पहा; जीव प्राणांना धारण करितो. जीव प्राणावांचून असणें शक्य नाहीं म्हणजे जीवाला प्राणावांचून व्यक्तत्व व व्यक्तित्व नाहीं. यत्र यत्र जीवःतत्र तत्र प्राणः (प्राण–प्राणशक्तिः) **वर्षशतपर्यंतं तव** (जीवाला) **च प्राणानां संगतिरस्तु प्राणानां तव च वियोगो मा भवतु**. जेथें जीवरूपी राजा असतो तेथें प्राण हा त्याचा अमात्य पाहिजे; कारण राजाला प्रधानाची जरूरी असते. राजाचें प्रधानावांचून चालत नाहीं. जीवानें जरी ह्या स्थूल देह सोडला तरी लिङ्ग शरीर त्याला सुटत नाहीं. राजा बरोबर प्रधान म्हटल्यानें शोभतें; परंतु प्रधानाबरोबर राजा म्हणणें ठीक नाहीं. राजा असल्यानें प्रधानाला शोभा येते; व तो राजा सारखाच शोभतो. जीव हा राजा आहे. व प्राण हा त्याचा प्रधानच होय. राजा म्हटल्यानें प्रधानाची कल्पना येतेच. राजाबरोबर तो पाहिजेच. परंतु अमात्य म्हटल्यानें राजा असलाच पाहिजे असें नाहीं. अमात्य बरोबर असणें नसणें ही राजाच्या खुषीची गोष्ट आहे. म्हणूनच मुक्तीची कल्पना आहे. साळींत जीव आहे व प्राणही आहे, कारण जमीनींत टाकल्यानें बरसातींत उगवते. परंतु साल कुटून तांदूळ केले कीं उगवत नाहींत. जीव जातो परंतु समष्टी जो प्राण तो राहतो. तांदूळाचें अन्न खाऊन त्यांतून प्राण जीवांना घेतां येतो.

चेतन देणारा प्राण निराळा तो मरणानंतर राहत नाहीं. तो नसणें हेंच मरण. सर्वव्यापी समष्टी प्राण निराळा; प्राण्याच्या मरणानंतर मृत शरीर हें दुसऱ्या जीवांचें भक्ष्य होऊन, त्यांतून दुसऱ्या प्राण्याचें जीवन ह्मणजे अन्न बनतें. त्यांत तो असतोच; ह्या अन्नापासून मिळणाऱ्या शक्तीच्या योगानें अयत्नसिद्ध श्वासोच्छ्वास चालण्यास प्राणोष्म्याला मदत होऊन, मूळ चेतनशक्ति वाढून संयुक्त-शरीर कार्याला मदत होते.

प्रत्येक प्राणिमात्रामध्यें जी ही चेतनशक्ती-ईशशक्ती जीवनशक्ती Vital energy तो प्राण. प्राणाच्या ज्या ज्या चैतन्ययुक्त क्रिया तें त्याचें कार्य होय. हा प्राण फुप्फुसें हाल-वितो;व फुप्फुसानां गति देतो. फुप्फसाच्या गतीनें हवा आंत ओढली जाते. फुप्फुसांना हालचाल मिळाल्यानें स्नायूंची हालचाल सुरू होते; स्नायूंची हालचाल झाल्यानें ज्ञानतं-तूंच्या द्वारें ती स्नायूंत शिरतें,स्नायूंतून फुप्फुसांत येते. आणि विवक्षित रीतीनें त्यांना हालविते. ती स्नायूंची शक्ति तोच प्राण; तो अभ्यासानें आपल्या ताब्यांत आणणें त्याचेंच नाव प्राणायाम; तो प्राणायामाचा अभ्यास ह्मणजे प्राणवायूच्या गतीचे नियमन; जी प्राणशक्ति सूक्ष्मरीत्या आपल्या शरीरांत असून, ज्या शक्तीच्या आघातानें फुप्फुसांत गति उत्पन्न होऊन श्वासोच्छ्वास निर्माण होतात त्या श्वासो-च्छ्वासाचे नियमनाचा अभ्यास तोच प्राणायाम होय.

दुधाचें दहीं होतें; व तें दहीं घुसळून घुसळून त्याचें रूपान्तर होतें. हें घुसळण हेंच रूपान्तराचें कारण होय. दहीं घुसळण्याला माथ्या व दोन बाजूंनीं दिस-णाऱ्या दोन दोऱ्या-पण एकाच दोरीचीं तीं दोन टोकें होत. तसेंच प्राण्याचें रूपांतर श्वासोच्छ्वासाच्या घुसळण्यानें होत असतें. ह्या घुसळण्यानें रूपांतर होणें नको असेल तर प्राणायाम हा अटकाव त्या घुसळण्याला घातला पाहिजे. हें घुसळणें रीतसर जर बंद केलें तर देहाचें रूपांतर लवकर किंवा उशीरां होणें हें आपल्या हातचें होईल; ह्मणजे आयुष्यवृद्धि होईल. ह्मणून प्राणायाम हा उपाय त्याला सांगितला आहे.

प्राण हा पवन नव्हे हें वर सांगण्यांत आलेंच आहे. प्राणाचें आयतन सूर्य आहे. मन प्राणाचा गुलाम आहे मन प्राणाचा आश्रय करून असतें.

**प्राणो विलीयते यत्र मनस्तत्र विलीयते ।**
**मनो विलीयते यत्र प्राणस्तत्र विलीयते ॥**

"**स यथाशकुनिः सूत्रेण प्रबद्धोदिशं दिशं पतित्वान्यत्रायतनमलब्ध्वा बन्धनमेवोपश्रयत एवमेव खलु सोम्य तन्मनो दिशं दिशं पतित्वान्यत्रायतनमलब्ध्वा प्राणमेवोपश्रयते प्राणबन्धन ँ हिसोम्यमन इति**" च्छांदोग्य; प्राण हा मनाचें बंधन आहे. प्राणाशिवाय मन नाहीं. मनाचें प्राणाशिवाय वास्तव्य व्यक्तत्व नाहीं. तापलेल्या तव्यावर टाकलेलें पाणी जसें हळू हळू नाहींसें होत जातें तसेंच प्राणायामानें मन सहित इंद्रियें प्राणांत गुपचुप बसतात. ह्मणून जरी नेहमींच्या स्थितींत, स्वाभाविक वाहणारा घ्राणेंद्रियाचा वारा बंद करून, प्राण्यांना जगतां येणें शक्य नाहीं, तरी तो अभ्यासानें नाकाचा वारा, प्राणी न मरतां प्रमाणसूद बंद करून त्या वाऱ्याला शास्त्रीय वळण लावणें ह्मणजे श्वासोछ्वासानें जी प्राणाची–प्राणशक्तीची गती आंत बाहेर चालते, त्या गतीचा विच्छेद करणें तो प्राणायाम होय.

'मनाचा शरीराशीं निकट संबंध आहे मन हें देहाचा एक श्रेष्ठ भाग असून देहावर सत्ता करितें. देहही मनावर सत्ता चालवितो. शरीर व्याधी ग्रस्त असेल तर मनालाही व्याधी उत्पन्न होते. शरीर निकोप असेल तर मनही निकोप व मजबूत असतें; शरीर क्षुब्ध झालें तर मनाची चलबिचल होते. सुदृढ निरोगी शरीर हें मनावर व देहावर सत्ता चालविण्यास साह्यकारी होतें. शरीरावर सत्ता चालवितां आल्यानें मनाला कह्यांत आणण्यास वेळ लागत नाहीं. मन ताब्यांत आल्यानें इच्छेप्रमाणें त्याजकडून काम करून घेतां येतें; व एकाग्रतेंत त्यास घालवितां येतें. मनाची एकाग्रता साधल्यानें, बसल्या जाग्यावर सुद्धा कांहींएक न करतां रागद्वेषानें जी मनाची व शरीराची होणारी खळबळ तीही कमी होते; त्यामुळें शांती मिळते; शांतीमुळें सुख लागतें; सुख लागल्यानें आयुष्यवृद्धि होते. ह्या सर्वांना कारण प्राणायाम होय. श्वासोछ्वासानें स्नायूं खेचले जाऊन आकुंचन प्रसरण पावत असतात. नेहमींच्या श्वासोछ्वासानें स्नायूंचें आकुचन प्रसरण होत असतेंच; तें प्राणायामाच्या अभ्यासानें श्वासोछ्वास दीर्घ केल्यानें आकुंचन प्रसरण दीर्घ होतें. आकुंचनाबरोबर त्यांतील रक्त ढकललें जातें. स्थायूंनीं शोषून राहिलेलें निःसत्व रक्त उच्छ्वासानें बाहेर पडतें. आकुंचनानंतर प्रसरण पावलें म्हणजे त्यांत नवें दुसरें रक्त, नाड्यांतून आंत घुसतें; व जुन्या निघालेल्या रक्ताची भर करितें. आकुंचनप्रसरणानें नव्या जुन्या रक्ताची अदलाबदल होते. नवीन रक्ताचा पुरवठा झाल्यानें स्थायूची शक्ति

कायम राहून रक्ताचा खप वाढतो; व तो खप अन्नांतून किंवा हवेंतून मिळणाऱ्या प्राणानें भरून येतो. अग्नि प्रदीप्त होतो. दीर्घश्वासोच्छ्वास झाल्यानें आक्सिजन किंवा प्राण जास्त मिळतो. त्यायोगें, ज्ञानतंतूची शुद्धि होऊन, प्राणसंचय होण्यास सुलभ जातें. कारण, ज्ञानतंतूच्या शुद्धिशिवाय, प्राणायाम साध्य होत नाहीं अशा रीतीनें प्राणायामानें शरीर मजबूत निरोगी होतें. व याप्रमाणें, प्राणायामानें, सुखप्राप्ती, रोगनिवृत्ती, दीर्घायुष्य, हीं प्राप्त होतात.

आंबा खाऊन जेव्हां रसास्वाद आपण घेतों तेव्हां प्राणविरोध होत असतो, व तेव्हां नाकांतून वारा वाहात नसतो; व जेव्हां प्राणनिरोध असतो तेव्हांच सुख मिळतें. ज्या वेळेस रसाची चव लागते, त्यावेळेस तपास केला तर नाकांतून वारा वाहणें बंद होतें, तेव्हांच स्वाद लागतो. स्वाद लागण्याला प्राणायाम करावा लागतो; व स्वाद घेतांना स्वाद उत्तम लागला कीं सुख वाटतें; ह्मणजे सुखप्राप्तीकरितां प्राणायाम पाहिजे. तसेंच विषयांचा भोग घेतांना प्राण थांबत असतात; मन एकाग्र होऊन प्राणनिरोध होत असतो, तेव्हांच सुखाचा अनुभव येतो. मलमूत्रविसर्जनाला प्राणायामच लागतो. प्राणायामावांचून विसर्जन नाहीं. आंबा खातांना प्राण रस घेण्यांत जातात, तेव्हां सुख होतें. असें सुख बरेच तास घेतां आलें तर तें इष्ट नव्हे का ? तेंच सुख प्राणायामानें साधावयाचें आहे.

आसन सिद्ध झालें तर प्राणायाम साधेल; नाक धरून प्राणायाम साधेलच असा नियम नाहीं. तर मन प्राणाला धरून असल्यानें नाकाला धरण्यापेक्षां मनाला धरल्यानें प्राणायाम साधेल. लिहितांनां प्राण लिहिण्यांत जातात.

शास्त्र व हृदय एक झालीं कीं त्या शास्त्राचा रस येतो, वक्त्या श्रोत्याची मन मिळवणी हें काम प्राण करितो. आपल्या सर्व क्रिया प्राणावर आहेत. ज्यांत चित्त त्यांत प्राण. ज्याचा प्राणनिरोध जास्त, त्याची क्रिया जास्त. कोणीं हिशोब विचारिला कीं, ७०–२० वजा टाकले तर बाकी काय ? याचें उत्तर देण्याकरितां प्राणायाम करावा लागतो, जीभ आंत ओढून उस्स करून जिभेवरील रस आंत ओढून आपण विचार करावयास लागतों; ह्मणजे प्राणायाम करून प्राण ध्यानांत आणावे लागतात. मन एकाग्र होऊन प्राणनिरोध होत असतो, मन शांत होतें, स्थिर होतें, तेव्हांच धारणेला योग्य होतें; धारणेनंतर समाधी, समाधीनंतर ज्ञान होतें, ज्ञानानंतर उत्तर देतां येतें. रीतसर मन

लागेल तर समाधी लागेल, व बरोबर उत्तर येईल; नाहीं तर ती समाधी नव्हे, तर आधी ह्मणजे व्याधी होय.

कमळाच्या पानावर पाण्याचा बिंदु जसा क्षणिक तसाच प्राण हा केव्हां जाईल याचा नियम नाहीं; तो चंचल प्राण, देहांत राहीसा करणें, स्थिर करणें ह्मणजे त्याला दीर्घ केल्यानें " आयामे दैर्घ्ये " स्थीर होईल. यासाठीं प्राणाचा आयाम दीर्घत्वासाठीं शास्त्ररीत्या नेहमींच्या श्वासोच्छ्वासाच्या संवयींत प्रयत्नानें फरक पाडावयाचा आहे.

**सूत्रार्थः**—आसनसिद्धि झाल्यानंतर श्वास व प्रश्वास यांची स्वाभाविक गती बंद करून शास्त्रीय गति चालू करणें तो प्राणायाम होय.

**बाह्याभ्यन्तरस्तम्भवृत्तिर्देशकालसंख्याभिः परिदृष्टो दीर्घसूक्ष्मः ॥ ५० ॥**

बाह्यवृत्तिः अभ्यन्तरवृत्तिः, स्तम्भवृत्तिः प्राणायाम तीन प्रकारचा आहे; बाह्यवृत्ति, अभ्यंतरवृत्ति, व स्तम्भवृत्ति असे हे तीन प्रकार होत.

बाह्यवृत्ति--रेचक-आंतील वायू बाहेर काढणें व तसाच बाहेर ठेवणें, पुन्हां आंत गती न करणें.

अभ्यंतरवृत्ति--पूरक-बाहेरचा वायू आंत घेणें व तो आंतल्याआंतच ठेवणें, बाहेर गती न होऊं देणें.

स्तम्भवृत्ति--कुंभक-बाहेरचा बाहेर ठेवणें व आंतला आंत ठेवणें. श्वास व प्रश्वास ह्या दोहोंच्या गतीचा एकदम निरोध करणें. याप्रमाणें हे तीन प्रकार आहेत. पूरकानें वायू घड्याप्रमाणें भरल्यानें आंतील शुद्धीला कारण होऊन आंतील नाडीगत अशुद्धता, शुद्ध हेवच्या शोधनानें अशुद्धतेला चालन मिळोन ती अशुद्धि रेचकानें बाहेर ढकलली जाते. मस्तहत्तीला वळविण्याला साधन जसा अंकुश तसेंच प्रमाथी-हट्टी मनाला वळविण्याला कुंभक हें साधन होय. **कुंभके रुंधते प्राणं मत्तनागा इवं मनः। वशीभूतक्षणार्थं तु महांकुशप्रभावतः॥** हे तिन्ही प्रकारचे प्राणायाम दीर्घ व सूक्ष्म पण होतात. प्रत्येकाचे दोन दोन भेद आहेत, ते, दीर्घपूरक, सूक्ष्मपूरक, दीर्घरेचक, सूक्ष्मरेचक; दीर्घकुंभक, सूक्ष्मकुंभक.

दीर्घ आणि सूक्ष्म हे भेद देशकाल आणि संख्या या तिहींनीं होतात. दीर्घ व सूक्ष्म हे सापेक्ष शब्द आहेत. दीर्घापेक्षां कमी त्यास सूक्ष्म ह्मणतात. सूक्ष्मापेक्षां

अधिक त्याला दीर्घ ह्मणतात. देश—वीतभर हातभर इत्यादि अन्तर बाह्यदेश. परिदृष्ट=अनुमित केलेला, जाणलेला.

देश——रेचकाचा देश, सर्व बाहेरचा प्रदेश हा रेचकाचा प्रदेश; रेचक वायु किती देशपर्यंत आला आहे हें कापसावरून समजतें. कापूस सुताला बांधून ठेवावयाचा व तें अंतर, जसा श्वासोच्छ्वास दीर्घ सूक्ष्म होईल तसें कमजास्त करावयाचें; एक वीतीचा देश, दोन वीतींचा देश, याप्रमाणें देश, ह्मणजे प्रदेश जाणावयाचा. जी वायूची धारा ती नाकापासून १२ अंगुळेंपर्यंत, या प्रमाणांत घेणें. शरीराच्या विशिष्ट भागांत प्राणशक्ति थांबवून धरावयाची तो भाग. १२ अंगुळें प्राण नाकावाटे आला, आंतला देश कांहीं १० अंगुळें झाला त्याला नाभीपर्यंत न्यावयाचा आहे. चार महिन्यांत अमुक अंगुळें झाला. दीर्घकाळपर्यंत राहतो, आणि सूक्ष्म होतो, किती काळपर्यंत प्राणायाम केला तो काल. संख्या, प्राणायाम इतके वेळ एवढ्या श्वासोच्छ्वासांनीं पहिला उद्घात झाला. उद्घात ह्मणजे कुंडलिनी जागृत करणें. देश-पायाच्या तळव्यापासून सुरवात करून ती मस्तकापर्यंत आंतील मुंगीसारख्या स्पर्शावरून पूरकाच्या देशाचें अनुमान करावयाचें आंत मुंगीसारखासुद्धां स्पर्श समजतां कामा नये असें झालें ह्मणजे ज्या भागापर्यंत समजणार नाहीं तो त्याचा देश याप्रमाणें देश, काल, आणि संख्या यांनीं तो दीर्घ किंवा सूक्ष्म समजला जातो.

" यत्र प्रश्वासपूर्वको गत्यभाव स बाह्यः यत्र श्वासपूर्वको गत्यभाव स आभ्यन्तरः तृतीयस्तम्भवृत्तिर्यत्रोभयाभावः सकृत्प्रयत्नाद्भवति यथा तप्ते न्यस्तमुपले जलं सर्वतः संकोचमापद्यते तथा द्वयोर्युगपद्गत्यभाव इति त्रयोऽप्येते देशेन परिदृष्टा इयानस्य विषयो देश इति कालेन परिदृष्टाः क्षणानामियत्तावधारणेनावच्छिन्ना इत्यर्थः संख्याभिः परिदृष्टा एतावद्भिः श्वासप्रश्वासैः प्रथम उद्घातस्तद्वन्निगृहीतस्यैतावद्भिर्द्वितीय उद्घात एवं मृदुरेवं मध्य एवं तीव्र इति संख्यापरिदृष्टाः । स खल्वयमेवमभ्यस्तो दीर्घसूक्ष्मः " ।

**सूत्रार्थः**——पूरक, रेचक व कुंभक असे प्राणायामाचे तीन प्रकार आहेत. व देशकाल व संख्या यांनीं व तसेच दीर्घत्व व सूक्ष्मत्व या योगें त्यांत आणखी प्रकार उत्पन्न होतात.

## बाह्याभ्यन्तरविषयाक्षेपी चतुर्थः ॥ ५१ ॥

बाह्य, अभ्यन्तर, विषय, आक्षेपी, चतुर्थः

आक्षेपी=फेंकणारा, फेंकून देणारा;

विषय=देश; बाह्यदेश आणि अभ्यन्तर देश यांचा त्याग करणें त्यांच्याकडे ध्यान न ठेवणें. त्याग ह्मणजे ध्यान न ठेवणें; आरंभ काळीं उत्साहवृत्ति होण्याकरितां (इतका साधला पुढें चला असें) ध्यान ठेवणें, हें जरी विहित असलें, तरी किती देशपर्यंत आपला प्राणायाम गेला आहे, हें ध्यान योग्यांनीं ठेवणें उचित नाहीं, त्याचा त्याग करणें. प्राणायामांत योगी पवनवृत्ति स्तब्ध करून बसतात. त्यास कुंभक प्राणायाम ह्मणतात त्यात प्रकार दोन एक बहिःकुंभक, व एक अन्तः कुंभक, परंतु कुंभकाचा परिपक्पणा तोच चवथा प्राणायाम. बाहेर देश व आंतला देश याचा त्याग करणें ह्मणजे केवल कुंभकावस्था तोच चवथा प्राणायाम होय. गीता अ. ४ श्लो. २९ प्राणापानगती रुद्ध्वा प्राणायाम परायणाः। **रेचकं पूरकं त्यक्त्वा सुखं यद्वायुधारणं प्राणायामः स कथितः स वै केवलकुंभकः** ज्यांत वृत्तिचा लय तोच केवल कुंभक प्राणायाम होय. बाहेरचा वायु घेतलेला नाहीं, व आंतला टाकलेला नाहीं, जसा पाण्याचा घडा भरून पाण्यांतच ठेवावा तसा; शरीरांतील आकाशघडा हा बंद करून ह्म. स्तंभक करून ठेविला कीं बिघाड होणार नाहीं. नदीचे पाण्यानें घडा भरून पाण्याबाहेर हवेवर घडा ठेविला, तर त्या घड्यांतील पाणी नासतें. परंतु तोच भरलेला घडा पाण्यांतच नदींत ठेविला, तर आंतील पाणी न बिघडतां जसेंच्यातसेंच राहतें. शरीरांतील वायूची श्वासोच्छ्वासद्वारा होणारी घुसळाघुसळ प्राणी जीवंत राहून जर बंद ठेवितां आली, तर शरीरांत बिघाड न होतां शरीर जास्त टिकवितां येतें. दह्याचें घुसळण्यानें जसें रूपान्तर होतें, तसेंच ह्या देहाचेंही रूपान्तर होत असतें. ही जी वायूची आंतील बाहेरील घुसळाघुसळ ती बंद ठेवणें तोच चतुर्थ प्राणायाम होय.

" आयामे दैर्घ्ये " शरीरांतील प्राणतत्व, घुसळण्यानें, कमी होणें, ह्मणजे अल्पायुषी होणें, प्राणतत्व जास्त होणें ह्म. दीर्घायुषी होणें. शरीरांत जरी पञ्चप्राण आहेत समजतात तरी मुलें गडबड करीत असलीं ह्म. जसें एखाद्याला थप्पड लगावलीं कीं बाकी सर्व गप्प बसतात; तसेंच ह्या पंचप्राणांपैकीं एकाला आवरला कीं बाकीच्यांची गडबड बंद होते. फलश्रुति

**केवले कुंभके सिद्धे रेचपूरकवर्जिते ।**
**न तस्य दुर्लभं किंचित् त्रिषु लोकेषु विद्यते ॥**

**सूत्रार्थः**—बाह्य अभ्यंतर देशाचा त्याग करणारा तोच चवथा प्राणायाम होय.

## ततः क्षीयते प्रकाशावरणम् ॥ ५२ ॥

ततः क्षीयते प्रकाश आवरणम् ।

ततः=त्यापासून; क्षीयते=नाश पावतो, दूर होतो.

प्रकाश=ज्ञान; आवरणम्=विद्येवर आच्छादन, अविद्या, ज्ञानावर आच्छादन अज्ञान. चित्त हें स्वभावतः ज्ञानस्वरूप आहे मूळचेंच ज्ञान त्याच्या ठिकाणीं आहे.

**चित्तं चिदिति जानीयात् तकाररहितं यदा ।**
**तकारो विषयाध्यासो ऊपारागो यथा मणौ ॥**

सत्वगुणापासून त्याची उत्पत्ती आहे. परंतु रजतम या दोन गुणांमुळें त्याच्यावर पडदा आलेला आहे त्यामुळें त्याचें स्वरूप झांकून गेलें आहे तें झांकण प्राणायामाच्या योगें निघून जातें.

**दह्यंते ध्मायमानानां धातूनां च यथा मलाः ।**
**तथेंद्रियाणां दह्यंते दोषाः प्राणस्य निग्रहात् ॥**

**सूत्रार्थः**—प्राणायामाचे सिद्धीपासून ज्ञानावर ( बुद्धि ) आलेलें आच्छादन दूर होतें.

## धारणासु च योग्यता मनसः ॥ ५३ ॥

चित्तावरचें ( बुद्धीवरचें ) आवरण दूर झालें ह्मणजे चित्ताला सूक्ष्म विषय ग्रहण करण्याची लायकी येते. नाकांतून प्रमाणसूद वायू बाहेर सोडणें व आंत घेणें या अभ्यासानें चित्त एकाग्र होऊं लागतें.

**सूत्रार्थः**—आणि मनाची लायकता धारणेला योग्य अशी होते ह्मणजे ज्या ज्या विषयावर मन लावावें तेथें स्थीर होण्यास तें लायक होतें.

## स्वविषयासम्प्रयोगे चित्तस्य स्वरूपानुकार इवेन्द्रियाणां प्रत्याहारः ॥ ५४ ॥

स्वविषय, असंप्रयोगे, चित्तस्य स्वरूप अनुकारः इव इन्द्रियाणां प्रत्याहारः

स्वविषय=इंद्रिय विषय; इंद्रियांचे विषय, त्याचा असंप्रयोग-संप्रयोग ह्मणजे जोडणें असंप्रयोग म्ह. तोडणें, ह्मणजे वियोग, अभाव, संबंध न ठेवणें. इन्द्रियांचा विषयांशीं संबंध ठेविला नाहीं ह्मणजे जणूं काय तीं चित्तांत लीन होतात. झोंपेमध्यें चक्षुरिन्द्रिय चित्तांत लीन होतें. जागें झाल्यावर पुन्हां बाहेर विषयांत जातें ह्मणून इव ह्मणजे जणूं काय घातलें.

अनुकार=अनुकरण; ( प्रति=विरुद्ध ) प्रत्याहार=आंत घेणें, हरण करणें, खाणें.

इंद्रस्य ( आत्मनः ) इदं इंद्रियं, इंद्रियांचें विषयद्वारें सेवन तो इंद्रियांचा आहार. नाकानें वास घेणें हा नाकाचा आहार. पंच ज्ञानेन्द्रियांचे पंच विषय हे आहार आहेत. त्वक् इन्द्रियाचा स्पर्श हा आहार, इद्रियांची प्रवृत्ती नेहमीं बाहेर आहे. आपल्या विषयांत इन्द्रियें जातात, त्यांचा रस घेतात, प्रत्येक विषयाचा चोथा झाला कीं तो टाकतात. प्रत्येक इंन्द्रियाचा आहार योग्य झाला पाहिजे. गोचर हा विषयांचा पर्याय शब्द, गो=इंद्रिय, किंवा गाय. गाय जशी कुरणांत तशींच इन्द्रियें विषयांत संचार करीत असतात.

एखादी वस्तु आपण पाहिली असतां वास्तविक ती वस्तु दिसत नसून आपल्या चित्तांतील एक विशिष्ट आकार त्या बाह्य वस्तूमुळें जागृत होऊन आपणाला दिसतो व त्यास आपण अमुक वस्तु ह्मणून ह्मणतों. वस्तुतः बाह्य जग आपण पाहात नसून बाह्य जगाच्या आघातानें आपल्या चित्तांतलि आकार जागृत होऊन जें स्वरूप ते धारण करितात, तें आपणाला दिसतें. त्यास आपण बाह्य जग अशी संज्ञा देतों. अशा स्थितींत खरोखर आपल्या चित्तांतील आकारच आपण पाहात असतों. आंतलि जग पाहात असतां बाह्य जग पाहात आहों अशी भावना उत्पन्न होते. त्याचें कारण इंद्रियें बाह्य वस्तु पाहूं लागलीं ह्मणजे त्या वस्तूंत गुंगून तिचाच आकार धारण करितात. ज्या ज्या वस्तूंवर इंद्रियें आकर्षिलीं जातात, त्या त्या वस्तूंचा आकार तीं धारण करितात मग आपण बाह्य जग पाहात आहों असा भ्रम आपल्या ठिकाणीं उत्पन्न होतो. चित्त स्थीर करून बाह्य वस्तूच्या आकारांत इंद्रियांनीं तद्रूप न होणें यासच इंद्रियनिरोध किंवा प्रत्याहार ह्मणतात. प्रति आहार उलट आहार तो प्रत्याहार; प्रत्याहार साधणें ह्मणजे समाधीच्या ( मोक्ष मार्गाच्या ) नाक्यावर येणें होय.

**सूत्रार्थः**—इन्द्रियाचे जे विषय, त्या विषयांजवळचा इन्द्रियांचा संबंध तुटला असतां जणूं काय चित्ताच्या स्वरूपामध्यें, किंवा चित्तावें अनुकरण करणें, असा इंद्रियांचा प्रत्याहार होतो. ह्मणजे इंद्रियांना त्यांच्या विषयापासून परतवून, त्यांची स्थापना चित्तांत करणें तोच प्रत्याहार.

**ततःपरमावश्यतेन्द्रियाणाम् ॥ ५५ ॥**

ततः परमा वश्यता इन्द्रियाणाम्

ततः=प्रत्याहार सिद्ध झाल्यामुळें; परमा=अत्यंत; वश्यता=ताब्यांत राहणेपणा प्रत्याहार साध्य झाला ह्मणजे मन चित्ताकार होऊन राहतें, अर्थात् इंद्रियांचा निरोध आपोआप पूर्णपणें होतो. इंद्रियांवर जय मिळाला कीं, शरिरांतील प्रत्येक ज्ञान तंतु, व मांसपिंड, आपल्या ताब्यांत येतात. शरीर ताब्यांत आल्यामुळें, अननुभूत आनंद प्राप्त होतो. आपला देह ह्मणजे परमेश्वराचें एक कौतुकच आहे, असें दिसावयास लागतें. इंद्रियें विषयांत जात नाहींत, ती ( इंद्रियांची ) परमावस्यता होय. इंद्रियें जिंकल्याची खूण मनूनें सांगितल्याप्रमाणें—

**श्रुत्वास्पृष्ट्वाचदृष्ट्वाच भुक्त्वा घ्रात्वाच यो नरः ॥**
**न हृष्यति ग्लायति वा स विज्ञेयो जितेंद्रियः ॥ ९८ ॥**

मनुस्मृति अ. २

**सूत्रार्थः**—प्रत्याहार सिद्ध झाल्यानें इंद्रियें आपोआप ताब्यांत रहावयास लागतात.

**साधनपादः समाप्तः ॥ २ ॥**

---

**आरभ्यते न खलु विघ्नभयेन नीचैः ।**
**प्रारभ्य विघ्नविहता विरमंति मध्याः ॥**
**विघ्नै पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः ।**
**प्रारब्धमुत्तमजना न परित्यजंति ॥**
**घृष्टोघृष्टः पुनरपि पुनश्चंदनश्चारुगंधः**
**छिन्नश्छिन्नः पुनरपि पुनः स्वादुरेवेक्षुदंडः**
**दग्धं दग्धं पुनरपि पुनः कांचनं कांतवर्णं ॥**
**न प्राणांते प्रकृतिविकृतिर्जायते सज्जनानाम्**

---

# विभूतिपादः ॥ ३ ॥

समाधि ह्मणजे काय व समाधीचीं साधनें हीं प्रथम व द्वितीय पादांत सांगितलीं. ह्या पादांत श्रद्धा उत्पन्न होण्यासाठीं, योगाभ्यासानें प्राप्त होणाऱ्या अद्भूत शक्तीचें वर्णन आहे. अर्थात् योगांतील विभूति (ऐश्वर्य) सांगावयाच्या आहेत. कारण विभूति ऐकून श्रद्धा उत्पन्न होते. त्या श्रद्धेनें मनुष्याची प्रवृत्ति योगाकडे वळते; ह्मणून ह्या तिसऱ्या पादाची योजना आहे.

विभूति ह्या संयमसाध्य असल्यानें, त्या संयमाचें वर्णन केलेलें आहे. अष्टांग योगापैकीं यम नियम इत्यादि पांच अंगांचें दुसऱ्या पादांत वर्णन करून, या पादांत अष्ट अङ्गांपैकीं राहिल्या तीन अङ्गांचेंही वर्णन आहे.

## देशबन्धश्चित्तस्य धारणा ॥ १ ॥

देश बन्ध चित्तस्य धारणा-

ज्याचें ध्यान धरावयाचें तो देश. देश=अन्तरबाह्य देश. अन्तर देश व बाह्य देश असे दोन प्रकार घेणें. बाह्यदेश=मूर्ती वगैरे पवित्र व इष्टदेवता, ज्या ज्यांच्या आवडीच्या असतील किंवा कुलदैवतें असतील तीं घेणें; ह्म. बाह्यदेश झाला. अन्तरदेश=नाभिचक्र, हृदय, नाकाचा अग्रभाग, भ्रूमध्य, वगैरे ठिकाणें, हा अन्तरदेश; ह्या ठिकाणीं, चित्ताला दुसरीकडे न भडकूं देतां, स्थीर करण्याचा प्रयत्न करणें, तोच चित्ताचा बन्ध होय. ज्या पवित्र जाग्यावर, आपलें मन रमेल, तेथें स्मृत्तिवृत्तीनें, चित्तवृत्तीरूप दोरानेंच मनाला बांधणें, ती धारणा.

"नाभिचक्रे हृदयपुण्डरीके मूर्ध्नि ज्योतिषि नासिकाग्रे जिह्वाग्र इत्येवमादिषु देशेषु बाह्ये वा विषये चित्तस्य वृत्तिमात्रेण बन्ध इति बन्धो धारणा" ज्याला आसनसिद्धि झाली, ह्मणजे एका जागेवर स्थीर रीतीनें कांहीं तास बसण्याची संवय झाली, व ज्यानें यमनियमाचें अनुष्ठान उत्तम रीतीनें केलें, व प्राणायामही साधला, ज्यानें इंद्रियांनाही बाह्य रम्य वस्तूंकडून काढून अन्तर्मुख करण्याचा प्रयत्न केला, त्यानेंच यापुढें चित्ताला बांधण्याकरितां वेसण घालण्याचा जो प्रयत्न, तचि धारणा होय.

वर दर्शविल्याप्रमाणें देश ह्मणजे अन्तरङ्गें व बहिरङ्गें, घेणें.

**सूत्रार्थः**—चित्ताला विवक्षित ठिकाणीं बद्ध करून ठेवणें, ह्याला धारणा ह्मणतात.

## तत्र प्रत्ययैकतानता ध्यानम् ॥ २ ॥

तत्र, तत्रदेशे; प्रत्यय=ज्ञान. एकतानता=एकसारखा प्रवाह चालू राहणें, दुसरी कांहीं आडकाठी न येणें.

" तस्मिन्देशे ध्येयालम्बनस्य प्रत्ययस्यैकतानता सदृशः प्रवाहः प्रत्ययान्तरेणापरामृष्टो ध्यानम् "

धारणेंत चित्त शरिराच्या विशिष्ट भागावर स्थीर करावयाचें असतें. धारणेसाठीं मूर्तीसारखा स्थूलभाग, नंतर नाभिचक्रासारखा सूक्ष्म भाग घेतात. धारणेमध्यें चित्ताला पुन्हा पुन्हा विवक्षित देशांत ठेवण्याचा प्रयत्न असतो; परंतु तें तेथून पुन्हा पुन्हा खचत असतें; दुसऱ्या विषयाकडे भराऱ्या मारतें; असें जें चित्त क्षणोक्षणीं खचतें, तें ध्यानामध्यें खचत नाहीं. जेव्हां चित्त खचत नाहींसें होतें, तेव्हां त्याला ध्यान म्हणतात.

**प्राणायामद्विषट्केन प्रत्याहारः प्रकीर्तितः ।**
**प्रत्याहारद्विषट्केन जायते धारणा शुभम् ॥**
**धारणा द्वादश प्रोक्ता ध्यानं ध्यानविशेषतः ।**
**ध्यानं द्वादशैकेन समाधिश्च विधीयते ॥ गों. श.**

ध्यान धारणा यांमध्यें फरक—धारणेमध्यें एकच प्रकारचें ज्ञान नसतें. धारणा ह्मणजे ध्यानाचा अभ्यास, प्रयत्न. धारणेमध्यें तीन वृत्ति असतात. १ देशाची ह्मणजे मूर्तीची, माझ्यापुढें अमूक ( कृष्ण ) मूर्ती आहे. २ त्या मूर्तीचें ज्ञान असणें. ३ त्याबरोबर इतर ज्ञानेंही उठतात; ह्मणजे एकाच वस्तूचे ज्ञानाशीं चित्त संलग्न होत नसतें; प्रयत्नानें अभ्यासानें एकाच ठिकाणीं चित्ताला संलग्न करावयाचें असतें; एका ठिकाणीं मनाला जखडणें तें ध्यान. ध्यानामध्यें वस्तूशिवाय इतर ज्ञानें नसतात; इतर ज्ञान जें धारणेंत येतें तें ध्यानांत बंद होतें, व तैलधारेप्रमाणें एकतानता होते.

**सूत्रार्थः**—त्या देशावर ज्ञानाचा प्रकार तैलधारेसारखा ( एकसारखा ) चालू राहणें तें ध्यान.

## तदेवार्थमात्रनिर्भासं स्वरूपशून्यमिव समाधिः ॥ ३ ॥

तत् एव, अर्थमात्र, निर्भासं, स्वरूप शून्यम् इव समाधिः

तत् एव=तेंच ध्यान; अर्थ मात्र=फक्त अर्थ; निर्भासः निः=नितरां, पूर्ण ( Completely) भासः निर्भासः समाधि=सम्+आ+धी; धी ह्यांत धा धातु धारण करणें. आधी शब्द एकत्र घेतल्यास त्याचा अर्थ मनांतील व्यथा. योग्यरीत्या ह्मणजे शास्त्रोक्त मनाला आवरलें तर तो समाधि ह्मणजे Well fixed position of the mind होय. नाहीं तर अयोग्यरीत्या, ती मनाची आधी ह्म. व्याधीच होय. तदेव ह्म. तेंच ध्यान, तो समाधि; ज्यामध्यें स्वरूपाची शून्यता होते, व ध्येयवस्तूचा मात्र भास राहतो, ह्म. ध्यान धारणा हीं जाऊन, फक्त अर्थाचा–ध्येयवस्तूचा ध्यास ज्यांत असतो; ध्याता स्वस्वरूप विसरून ध्येयच बनतो तो समाधी.

स्वरूपाचें केवळ ज्ञानच राहणें बाह्यस्वरूप सोडून अन्तःस्वरूपांत मन तदाकार होणें, तो समाधी; ह्मणजे केलेलें ध्यान केवळ ज्ञानवृत्ती राहून, स्वरूपाची जणूं काय शून्यावस्था उत्पन्न होणें, त्याला समाधि ह्मणतात. तात्पर्यांश बाह्य जगाची पूर्ण विस्मृति.

ध्यान करणारा तो ध्याता, ज्याचें ध्यान करावयाचें तें ध्येय. ज्याच्यावर धारणा केली, ज्या ठिकाणीं चित्तवृत्तीची एकाग्रता केली तें ध्यान, ध्यानांत धरलेली मूर्ती एकसारखी मनांत आणणें, दुसऱ्या विषयाला बिलकूल येऊं न देणें, याला ध्यान ह्मणतात.

ध्याता, ध्येय व ध्यान ह्याचें भान असणें तें ध्यान. ध्याता ध्येय व ध्यान ह्या त्रिपुटीचें भान नसून, स्वतःला व मूर्तीला विसरून जाऊन, चित्त मूर्तीकार बनणें, ह्मणजे चित्त एकाकार बनणें तो समाधि.

कौरव पांडवांचे गुरू, द्रोणाचार्य ह्यांची कौरवांपेक्षां पांडवांवर, व विशेषेंकरून अर्जुनावर प्रीति पाहून, दुर्योधनास वैषम्य वाटे. हें गुरुजींच्या ध्यान्यांत आलें. हें असें पांडवांवर प्रेम सकारण असल्याचें कौरवांना दाखवावें, असें गुरूंच्या मनांत येऊन, गुरुजींनीं आपल्या सर्व शिष्यांची, कौरवपांडवांची धनुर्विद्येंत परीक्षा घेण्याचें ठरविलें, व अप्रत्यक्षरीतीनें, अर्जुन प्रीतीस पात्र आहे असें त्यास दाखवावयाचें मनांत आणलें.

एका झाडावर एक पोपट बांधून ठेविला, व सांगितलें, ह्या पोपटाच्या इतर अंगाला धक्का न लावतां, व त्याचा प्राण न घेतां, फक्त डाव्या डोळ्याला बाण मारावयाचा, व डोळ्यांतील फक्त बुबुळ फोडावयाचा. हा परीक्षेचा विषय ठेवून कौरव-पांडव या सर्वांची परीक्षा घेण्याचें ठरविलें.

परीक्षेकरितां जेव्हां दुर्योधन आला, तेव्हां त्यास सांगितलें त्या झाडाकडे पहा, व तेथें काय काय दिसतें, असा प्रश्न केला. त्यानें उत्तर दिलें झाड दिसतें. पुन्हा पुन्हा अनेक प्रश्न केले, व सांगितलें नीट पहा. त्याचें उत्तर त्यानें दिलें, झाड दिसतें, पोपट दिसतो, डावा डोळा दिसतो. पुन्हा एकवार नीट पाहण्यास सांगितलें तरी त्याचें उत्तर पोपट, झाड, डावा डोळा वगैरे सर्व दिसतें. त्याजवर गुरुजी ह्मणाले तूं धनुर्विद्येंत नापास आहेस. नंतर दुसरे कौरवांची परीक्षा घेतली, परंतु प्रत्येकाचीं उत्तरें गुरुजींना समाधानकारक मिळालीं नाहींत. शेवटीं अर्जुनाला बोलाविलें, त्यालाही तसेच प्रश्न केले. त्यानें झाड, पोपट, डोळा वगैरे दिसत असल्याचें सांगितलें. त्यास नीट पहा ह्मणून इतरांप्रमाणें प्रश्न करितां, शेवटच्या प्रश्नाचें उत्तर दिलें, फक्त आतां जेथें बाण मारावयाचा त्या बुबुळाशिवाय कांहीं दिसत नाहीं; झाड दिसत नाहीं, पोपट दिसत नाहीं, फक्त बुबुळ दिसत आहे. लगेच गुरुजींनीं त्यास पास सदरांत घातलें. ह्यावरून अर्जुनाचें लक्ष्याकडे ध्यान कसें लागलें होतें तें दिसतें. असें चित्त लक्ष्यावर स्थीर होणें, व इतर सर्व ज्ञान विसरणें हाच समाधि. समाधिमध्यें मूर्तीचें ज्ञान नसतें; मूर्ति नष्ट होते. स्वस्वरूपही नष्ट झालेलें असलें पाहिजे.

**सूत्रार्थ**—ध्यान केवळ ज्ञानवृत्ती राहून स्वरूपाची जणूं काय शून्यावस्था होणें त्याला समाधि ह्मणतात.

## त्रयमेकत्र संयमः ॥ ४ ॥

त्रयम् एकत्र संयमः

संयम हा शब्द पारिभाषिक आहे.

" तदेतद् धारणाध्यानसमाधित्रयमेकत्र संयमः । एकविषयाणि त्रीणि साधनानि संयम इत्युच्यते । तदस्य त्रयस्य तान्त्रिकी परिभाषा संयम " इति ।

संयम शब्दाचा जेथें जेथें उपयोग केलेला आढळेल, तेथें तेथें त्या एकाच वस्तू-

विषयीं ध्यान धारणा समाधि असें समजावयाचें. एकाच वस्तूवर ध्यान, धारणा, समाधि, हीं एकामागून सिद्ध होत गेलीं कीं, त्या स्थितीस संयम असें ह्मणतात.

**सूत्रार्थः**—जेथें जेथें संयमशब्दाचा उच्चार होतो तेथें तेथें ध्यान, धारणा समाधि समजावयाचें आहे.

**तज्जयात्प्रज्ञालोकः ॥ ५ ॥**

तत् जयात् प्रज्ञा आलोकः

तत्=संयमाचा जय; प्रज्ञा=बुद्धि. संयमाचा जय झाला असतां सर्व प्रकारच्या शक्ती योग्याच्या ताब्यांत येतात. योगी पूर्णज्ञानी होतो–भ्रम रहात नाहीं. ज्या ज्या वस्तूचें ध्यान, त्या त्या वस्तूचें पूर्ण ज्ञान होतें. आलोकः ह्म. प्रकाश; बुद्धींत एक प्रकारचा बुद्धिप्रकाश येतो.

**सूत्रार्थः**—संयमाचा जय झाला ह्मणजे बुद्धींत उत्तम प्रकारचा प्रकाश पडावयास लागतो, व सर्व वस्तूंचें ज्ञान होतें.

**तस्य भूमिषु विनियोगः ॥ ६ ॥**

तस्य=संयमस्य; भूमि=ध्येयाच्या अवस्था, ह्मणजे पायरी.

विनियोग=योजना.

पहिली पायरी जिंकल्याशिवाय दुसऱ्या पायरीवर चढतां येत नाहीं. ह्या पायऱ्या अमुकच असा नियम घालतां येत नाहीं. अभ्यासी असेल त्याला आपोआप कळूं लागतात; एकाची जी पहिली पायरी असेल, तिची दुसऱ्या अभ्याशाला मुळींच जरूर लागणार नाहीं; सबब ह्या पायऱ्या ज्याच्या त्यानें ठरवावयाच्या. ह्या कामांत गुरु कोण, तर **योग एवोपाध्यायः** असें ह्मटलें आहे. योग पायऱ्या शिकवितो. प्रथम स्थूल विषय ह्मणजे मूर्ति आयुधांसह विषय ध्यानाचा असतो. प्रथम सायुध, मग निरायुध नंतर किरीट मयूरवान रहित मूर्ति, ध्यानाचा विषय करावा; तात्पर्य गुरूनें अमुकच पायरी पहिली, असें सांगतां येणें शक्य नाहीं; अभ्यास करतांना त्या आपोआपच सुचतात.

मृच्छकटिकांत, **वसंतसेनेला वीट सांगतो,** रागाचा अतिरेक करूं नको. "**कुप्य च कोपय च त्वं प्रसीदच त्वं प्रसादय च कान्तं.**" तात्पर्य-अमुक तऱ्हेनें वाग, असें सांगणें बरोबर होणार नाहीं; वेळ प्रसंग पाहून वर्तणें भाग आहे.

**योगेन योगो ज्ञातव्यः योगो योगात्प्रवर्तते ।**
**योऽप्रमत्तस्तु योगेन स योगी रमते चिरम् ॥**

भूमिका ही नक्की ठरवितां येणार नाहीं आपण ठरविलेल्या भूमीवर ध्यान, धारणा समाधि साधल्यावर पुढें सूक्ष्मावर जावयाचें. शिशुपाल ह्यानें भूमिकेचा अभ्यास मुळींच केला नव्हता; तरीपण सिद्धि मिळविली; ज्याचा त्याचा अधिकार व योग्यता ह्यांवर सर्व अवलंबून आहे.

**सूत्रार्थः**—त्या संयमाची, पायरी पायरीनें योजना करावी.

## त्रयमन्तरङ्गं पूर्वेभ्यः ॥ ७ ॥

त्रयम्, अन्तरङ्गम्, पूर्वेभ्यः.

त्रयम्—योगाचीं अङ्गें आठ, पैकीं यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार अशीं पांच, दुसऱ्या पादांत सांगितलीं. त्रयं=धारणादित्रयं ह्म. त्रिकूट, तिन्हीं एकदम घेणें. हे परस्पर सापेक्ष शब्द आहेत. योग हा पुरुष मानला तर यमनियमादि पांच अङ्गें, बहिरङ्गें होत. धारणादि अन्तरंगें होत. जसें घर हें बहिरङ्ग, व सोनें अन्तरंग. सोनें असल्यावर पाहिजे तें घरादि तयार करितां येतें, तसें. चित्त, शरीर, प्राण, व इंद्रियें यांचा मल दूर करण्यास पूर्वी सांगितलेलीं पांच अङ्गें यम नियम वगैरे उपयोगी आहेत, ह्मणून ती बहिरङ्गें होत. ह्यांचा अभ्यास हा स्थूल स्वरूपाचा आहे, बाकी राहिलीं तीन तीं—धारणा ध्यान व समाधि. हीं त्रय साधनें प्रत्यक्ष साधनें समाधीस उपयोगी पडणारीं आहेत. ह्मणून हीं तीन, धारणा ध्यान समाधि हीं अन्तरङ्गें होत. ह्यांचा अभ्यास हा सूक्ष्मस्वरूपाचा होय. हा सूक्ष्माचा अभ्यास साध्य झाला कीं योगी सर्वज्ञ होतो.

पूर्वेभ्यः=यम नियम आसन प्राणायाम प्रत्याहार ह्या पांच अंगांपेक्षां.

**सूत्रार्थः**—यम नियम इत्यादि पांच अंगांपेक्षां धारणा ध्यान व समाधि हीं तीन अन्तरंगें प्रत्यक्ष साधनें समाधीस उपयोगी पडणारीं आहेत.

## तदपि बहिरंगं निर्बीजस्य ॥ ८ ॥

तदपि=हीं अन्तरंगें आहेत, तथापि, निर्बीज ह्मणजे असंप्रज्ञात योगाच्या दृष्टीनें, हीं तिन्ही बहिरंगें आहेत; संप्रज्ञात योगाला हीं अन्तरंगें होत. संप्रज्ञात ( सबीज ) समाधीसंबंधें जरी हीं ध्यान धारणा समाधी हीं तीन अंगें अन्तरंगें

मानलीं आहेत, तरी निर्बीज समाधीच्या संबंधानें ( असंप्रज्ञात समाधीसंबंधें ) हीं बहिरंगेंच होत. असंप्रज्ञात समाधीकरितां साधन, संप्रज्ञात समाधी होय.

" तदप्यन्तरंगसाधनत्रयं निर्बीजस्य योगस्य बहिरंगम्भवति । कस्मात् । तदभावे भावादिति " ।

**सूत्रार्थः**—संप्रज्ञात योगाला जीं हीं तीन अन्तरंगें, तीं असंप्रज्ञात योगाला बहिरंगेंच होत.

आतां सूत्र ९ पासून १६ सूत्रपर्यंत एकच विषय प्रतिपादिलेला आहे व समजुतीसाठीं प्रथम ११।१२।९।१६ याप्रमाणें अभ्यासाला सूत्रें घ्यावीं, ह्मणजे विषयाला बरें पडेल. सूत्रकारांना निरोधपरिणाम प्रिय वाटल्याकारणानें निरोध परिणामाचें सूत्र अगोदर घेतलें.

## व्युत्थाननिरोधसंस्कारयोरभिभवप्रादुर्भावौ निरोधक्षणचित्तान्वयो निरोधपरिणामः ॥ ९ ॥

व्युत्थान, निरोध, संस्कारयोः, अभिभव, प्रादुर्भावौ, निरोध क्षण चित्त अन्वयः निरोध, परिणामः

व्युत्थान=संप्रज्ञात, निरोध=असंप्रज्ञात. अभिभव=नाश किंवा कमी कमी होत जाणें व प्रादुर्भाव=अधिकाधिक वाढत जाणें.

अन्वय=संबंध, परिणाम=अवस्था. योगांगसमाधीला चित्ताची सर्वार्थता ही जशी व्युत्थानदशा आहे; तशीच असंप्रज्ञात समाधीला संप्रज्ञात समाधि ही व्युत्थानदशा होय. झोंप ही एक प्रकारची समाधीच होय. परंतु ती, तम वृत्तिखालीं येत असल्याने, झोंपेंतून माणूस उठला, झोंपेंतून खचला, ह्म. ह्या दशेस, उत्थान दशा ह्मणतात. संप्रज्ञातमध्यें योग्याची, प्रमाणवृत्ति असते, व चित्तध्येयाकार होते. त्या संप्रज्ञातसमाधींतून योगी खचला, ह्मणजे त्या अवस्थेस, व्युत्थान अवस्था ह्मणतात. झोंपेंत, तसेंच प्रमाण वृत्तींत सुख आहेच; परंतु निर्वृत्तिक मन होणें, तेंच अक्षय, टिकाऊ सुख होय.

व्युत्थान=समाधीच्या निरुद्ध दशा ( अवस्था ) निरुद्धावस्थेच्या तुलनेनें एकाग्रता हा जरी संप्रज्ञात समाधि आहे, तरी ही एकाग्रता, निरुद्धअवस्थेच्या दृष्टीनें व्युत्थानदशाच होय. व्युत्थानसमाधियोग ( संप्रज्ञात ) हा शब्द निरोध ह्मणजे

असंप्रज्ञात योगाच्या संबंधें सापेक्ष शब्द होय. व्युत्थानाचा अभिनव ( नाश ) व्हावयास लागतो, आणि निरोध संस्काराचा उदय व्हावयास लागतो, जुने परिणाम सुटूं लागतात, नवे धारण करूं लागतात, ( जसें काळोख जाऊं लागला कीं, उजेडाचें प्राबल्य होतें तसें, ) व सजातीय परिणाम टिकला, कीं निरोध परिणाम झाला. ह्य. एकाच चित्ताजी त्या क्षणाची अवस्था; एकाचा अस्त, व दुसऱ्याचा उदय; एकाचें जाणें दुसऱ्याचें येणें, एकाचे नाशाला सुरवात व दुसऱ्याचे उदयाला प्रारंभ होतां, ज्याची बाजू जास्त, ज्याची वाढ जास्त, त्याचेच नांवाचा डंका.

निरोधसंस्काराच्या संबंधें ( असंप्रज्ञात योग ) व्युत्थानसंस्कार हा शब्द सापेक्ष असल्यानें, व तो असंप्रज्ञाताचा ( निरोधाचा ) विघातकच होय. त्या व्युत्थानाचा संप्रज्ञाताचा नाश, व निरोधाचा उदय होऊं लागला, ह्मणजे त्या निरोधाची परिपक्व दशा होणें, ह्मणजे जो असंप्रज्ञात योग, त्यालाच निरोधाचा परिणाम ह्मणजे परिपक्व दशा किंवा धर्ममेघसमाधि ह्मणतात. **यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया । यत्रचैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनितुष्यति** ॥ गी. ६. २०

**सूत्रार्थः**—व्युत्थानापासून उत्पन्न झालेला संस्कार जसजसा कमी होईल, तसतसा निरोधापासून उत्पन्न होणारा संस्कार वाढत जाईल. संप्रज्ञात व असंप्रज्ञात या दोन अवस्थांमधील चित्ताचे परिणाम, ह्मणजे निरोधकाळच्या चित्ताचा परिणाम, व्युत्थानअवस्थेकडून व निरुद्धअवस्थेकडे वळतां वळतां, व सजातीय निरुद्ध प्रवाहपरंपरा उत्पन्न होऊन तोच निरुद्धअवस्थेत, टिकाव धरल्यावर, त्या क्षणाच्या चित्ताच्या स्थितीस, निरोध परिणाम ह्मणतात.

## तस्य प्रशान्तवाहिता संस्कारात् ॥ १० ॥

तस्य संस्कारात्=निरोधसंस्कारात्.

प्रशान्तं यथा स्यात् तथा वहति इति प्रशान्तवाही; प्रशान्तवाहिनः भावः प्रशान्तवाहिता. नदीचे शान्त प्रवाहाप्रमाणें मनाचा शांत प्रवाह वाहूं लागणें.

**सूत्रार्थः**— निरोधसंस्काराच्या अभ्यासामध्यें योग्याची कुशलता जास्त होऊं लागली, ह्मणजे मनाचा शान्त प्रवाह वाहूं लागतो.

## सर्वार्थतैकाग्रतयोः क्षयोदयौ चित्तस्य समाधि—परिणामः ॥ ११ ॥

सर्वार्थता, एकाग्रतयोः, क्षय उदयौ, चित्तस्य समाधि परिणामः.

सर्वार्थता=मनाचा चंचलपणा किंवा विक्षिप्तपणा; चोहोंकडे मनाचें, आत्म्याव्यतिरिक्त, इंद्रियें व विषय यांवर आथडणें, मनाची सर्वार्थता पाद ४ सूत्र २३ यांत पहा.

एकाग्रता=तप स्वाध्याय व ईश्वरप्रणिधान; या तीन क्रियांच्या योगें मनाची एकाग्रता होऊं लागते; हा पहिला समाधि परिणाम, हा योगांग समाधि; ह्या समाधि परिणामाची जी परिपक्क अवस्था ( एकाग्रता परिणाम ) यायोगें एकाग्र भूमी तयार होत असते; व सर्वार्थतेचा क्षय होऊन एकाग्रतेचा उदय होऊं लागतो. सर्वार्थतेचा क्षय ह्मणजे लुप्त होणें; व उदय ह्मणजे प्रकट होणें; समाधीचे प्रकार तीन १ मनाची एकाग्रता होणें, एकाग्र भूमी तयार करणें, तो योगांग समाधी. २ एकाग्र भूमीवर चित्त राहून निरोध भूमी तयार करणें, तो संप्रज्ञात समाधि. ३ निरोध भूमीवर चित्त रमणें तो असंप्रज्ञात समाधी होय. समाधींत चित्त नसेल विक्षिप्त असेल तेव्हां चित्ताची सर्वार्थता; त्या सर्वार्थतेवरून एकाग्रतेवर चित्त जाऊं लागलें ह्य. सर्वार्थतेचा लय होण्यास सुरवात होऊन एकाग्रतेचा उदय व्हावयास लागतो. एकाग्रतेचा उदय झाल्यानें चित्ताला भूमिका प्रथम एकाग्र व निरुद्ध अशा दोन. **यदाविनियतं चित्तं आत्मन्येवावतिष्ठते। निस्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा ॥** गी. ६-१८

हा निरोध परिणाम, सूत्र ९ मध्यें सांगितलेला, असंप्रज्ञात योग होय.

चंचल गुण वृत्तिः गूण तीन—सत्व, रज, तम. सर्वार्थता—मन अनेक विषयांच्या मागें धांवतें व अनेक विषयांचा आकार घेऊन चित्तास क्षुब्ध करितें; ह्या स्थितीचा ह्य. सर्वार्थतेचा क्षय झाला ह्मणजे मन एक विषयाकार होतें. दुसरे विषय चित्त घेत नाहीं, त्यास **समाधिपरिणाम** ह्मणतात, विषय व इंद्रियें यांवर मनाची एकाग्रता केल्यानें, व आत्म्यावर नसल्यानें, त्यासही सर्वार्थता पाद ४ सूत्र २३ मधें म्हटलें आहे. ह्यांत सत्वगुणाची वृद्धि होत असते. ह्या समाधिपरिणामांत सर्वार्थता नाहींशी होत असल्यानें, एकाग्रता हा परिणाम होतो. परंतु तो विषय व इंद्रियें यांवरील होय. निरोधपरिणाम ९ सूत्रांत सांगितला, त्यांत व्युत्थानसंस्कार जरी नष्ट दिसला, तरी गुप्त असतो. जसा अग्नीचा स्वभाव दाहकता तसा, चंचलपणा हा स्वभाव मनाचा होय; तो चंचलपणा नाहींसा केव्हां होईल, मन नष्ट होईल तेव्हां. परंतु जो मनुष्यांचा स्वभाव असतो तो केव्हांही नष्ट होत नाहीं; कारण **स्वभावो दुरतिक्रमः; स्वभावो मूर्ध्नि वर्तते.**

पदार्थ असेपर्यंत स्वभाव नष्ट होणें शक्य नाहीं; अग्नि नष्ट झाल्यावर मग उष्णता नसणारच. अग्नि नष्ट झाल्यावर मग उष्णता असली काय किंवा नसली काय एकच. तसेंच मन नष्ट झाल्यावर मग मनाचा चंचलपणा नसला ह्मणून त्याचा काय फायदा? मन असून चंचलपणा काढतां आला, तर विशेष होय. ह्मणून मन कायम ठेऊन त्याला नष्टत्वाचे अचलतेचे धर्म आणण्यांत विशेष आहे. ह्मणजे सत्वगुणांतील अति उच्च दशा, ती जीवंत राहून प्राप्त करून घेणें होय. ती-ही चंचलताच, पण सत्वगुणाची; परंतु जलद फिरणाऱ्या भोंवऱ्याप्रमाणें, किंवा ध्रुव नक्षत्राप्रमाणें, स्थिरावस्थाच मानतात.

मन हें तीन गुणांनीं युक्त असतें; रजतमाचे प्राबल्यानें सत्वगुण दबलेला असतो; प्रत्येक गुणाच्या प्राबल्यानें ज्याचें प्राबल्य, तो, वरचढपणा करितो. व दुसरे बाकी दोन दबून असतात. ह्मणजे गुणांचें वर्तन फारच चंचल असतें. तिन्ही गूण आपल्यामध्यें वर्तून भोंवऱ्याप्रमाणें फिरून राहिलेले आहेत, ह्मणून, त्यायोगें मनाची ओढाताण फार होते. असें जर आहे तर मनाची एकाग्रता सत्ववृत्ति असली तरी संभवते कशी? असा प्रश्न सहजीं निघतो, तर वरील सिद्धांताप्रमाणें एकोग्रतेमध्यें मन चंचल असेल तर मनाची स्थिती कशी असते? एकाग्रतेमध्यें मन चंचल असेल, पण चंचलत्व, त्या एकाग्रतेंतच पुन्हां जाईल. गणपतीचें ध्यान असेल तर गणपतिमय चित्त होईल. प्रत्येक परमाणू परमाणू शरीराचे गणपतीच्या भावनेनें, भारवले जातील. ह्मणजे मन खचलें तरी पुन्हां सत्वगुणांतच, ह्मणजे एकाग्रतेंतच जाईल. कारण अशावेळीं, योग्याचे मनाचे रज तम हे गुण नष्ट झालेले असतात. ते अंगुष्ठ मात्र आत्म्याचे एकाग्रतेचे ज्ञानांत लीन असतात. त्याचें ज्ञान एकाग्रतेचें तीन क्षणांत असतें, तें; प्रथम क्षणीं एकाग्रता त्या अंगुष्ठ मात्र ज्ञानावर होईल. दुसऱ्या क्षणांत तें ज्ञान स्थित होईल. तिसऱ्या क्षणाला नष्ट होईल; चतुर्थक्षणीं योग्याची प्रथम क्षणीं झालेली वृत्ति तीच पुन्हां होईल. सांसारिक मनुष्याची रज, तम, निर्वृत्ति होणारच नाहीं, ती वास्तविक व्हावयास पाहिजे. योग्याचे मनाची चंचलता होते ती—सत्वगुणांत प्रथमक्षणीं जी वृत्ति उठली, तीच वृत्ति चंचलपणाची राहील. सांसारिक मनुष्याची-तिन्ही, वाटेल त्या गुणांत वृत्ति होते. एकदां एक तर पुन्हां दुसरी याप्रमाणें पाहिजे ती वृत्ति उठेल.

ज्या चंचलपणापासून, विघात होईल ती दोषास्पद वृत्ति. चतुर्थक्षणीं योग्याची वृत्ति सात्विकपणाचीच; ती विघातक होत नाहीं ह्मणजे जरी चंचलवृत्ति गणली गेली तरी ती दोषास्पद नव्हे. म्हणजे चतुर्थक्षणीं प्रथम वृत्तीचीच छाया पडेल, त्याला एकाग्रताच ह्मणतील. ती एकाग्रता सिद्ध करण्याकरितां तीन परिणाम सांगितले. व्युत्थान, निरोध, व समाधि परिणाम.

**सूत्रार्थः**-सर्वार्थतेचा ( विक्षिप्तचित्ताचा ) क्षय, व एकाग्रतेचा उदय होणें याला चित्ताचा समाधीपरिणाम म्हणतात.

१२ समाधिपरिणाम सांगून नंतर एकाग्रता परिणाम कसा तो सांगतात—

## ततः पुनः शान्तोदितौ तुल्यप्रत्ययौ चितस्यैकाग्रता परिणामः१२

ततः पुनः शान्त उदित तुल्य प्रत्ययौ चित्तस्य एकाग्रता परिणामः

शान्त=नष्ट गुप्त; उदित=प्रकट झालेला. तुल्य=सदृश, सारखी, सजातीय. विजातीय ज्ञान मध्यें येत नाहीं. प्रत्यय=वृत्ति, ज्ञानाचे प्रवाह, ज्ञान; मागील क्षणांतील ज्ञान नष्ट होऊन पुढील वृद्धिंगत होतें. असें मन होऊं लागलें ह्मणजे हा एकाग्रतेचा पायाच होय. एकाग्रतेमध्यें शांत व उदित अशीं दोन ज्ञानें व्हावयास लागतात. एकाग्रतेची परिपक्व अवस्था ह्मणजे मागील गेलेले क्षण शांत होतात, व पुढील क्षण उदित होतात; ह्मणजे एकाग्रतेंतच शांत व उदित दोन परिणाम होतात. एकाचा नाश होण्यास सुरवात होतां दुसऱ्याच्या उदयास आरंभ होतो. जसे प्रातःकाळीं, रात्रीचे काळोखाचा नाश होण्यासच सुरवात होतां होतां, तो उजेड एकजातच टिकून, कायम होतो; तसेच चित्तवृत्तीचे प्रवाह मागील विषय सोडून, नवीन प्रवाह, ध्यान धरलेल्या मूर्तीचा आकार घेऊन चित्ताचे प्रवाह तुल्यप्रत्यय तुल्यवृत्तिप्रवाह—सजातीय प्रवाह परंपरा वाहूं लागले, ह्मणजे त्या चित्ताच्या प्रवाहाला, एकाग्रता परिणाम म्हणतात. आपण पत्त्यांनीं खेळण्यांत गुंतलों असतां, किंवा पुस्तक वाचीत असतां, काळाचें भान मुळींच राहत नाहीं. चोहोंकडे भडकणारें मन पत्त्यांच्या खेळांत एकाग्र होतें. बारा वाजतां बसलें असतां, चारपांच तास मध्यें गेले तरी बारापेक्षां जास्त थोडासा वेळ गेला असावा असें वाटतें; परंतु घड्याळ पाहतां ५।६ वाजलेले आढळतात. ह्या गेलेल्या भूतकाळाला वर्तमानकाळाचा भास, हीच एकाग्रता, हाच चित्ताचा एकाग्र परिणाम. म्हणजे कालकल्पना चित्तांतून जाणें, व त्या एका विषयावर मन एकाग्र होणें.

**सूत्रार्थः**--मागील क्षणांतील ज्ञान नष्ट होऊन पुढील वृद्धिंगत होऊं लागतें, व ज्ञानाचे सदृश प्रवाह वृद्धिंगत होऊं लागतात, असें मन होऊं लागलें, ह्मणजे तो एकाग्रतेचा पायाच होय, या पायावर सजातीयसदृश प्रवाहपरंपरा वाहूं लागणें. भूत व वर्तमान काळाचें ज्ञान एकरूप वाटणें,ःहा मनाचा एकाग्र परिणाम होय.

## एतेन भूतेन्द्रियेषु धर्मलक्षणावस्थापरिणामा व्याख्याताः॥१३॥

एतेन भूतइन्द्रियेषु धर्म, लक्षण, अवस्था, परिणामाः व्याख्याताः

एतेन=९ या सूत्रांत चित्ताचे तीन परिणाम सांगितल्यानें, चित्तत्रयपरिणाम वर्णनेन. भूतेन्द्रियेषु=भूतें ह्मणजे स्थूल सूक्ष्म भूतें व इंन्द्रिय=ज्ञानेन्द्रियें व कर्मेंद्रियें =स्थूलभूतांचे व सूक्ष्म भूतांचे-तसेंच ज्ञानेंद्रियें कर्मेंद्रियांचेही परिणाम सांगितले. कारण, शरीर तसेंच इन्द्रियें हींही प्राकृतच म्ह० प्रकृतीपासूनच आहेत; तसेंच धर्म परिणाम, लक्षणपरिणाम, अवस्था परिणाम, असे चित्ताचे तीन परिणाम आहेत. जसे चित्ताचे तसे प्रत्येक वस्तूचेही तीन परिणाम होतात पृथ्वी आप तेज वायू आकाश या सर्वांवर परिणाम-फरक-वर चित्ताचे सांगितल्याप्रमाणें होतात. कारण चित्तापासूनच सर्व उत्पत्ती आहे.

**उदाहरणार्थ**-पृथ्वी ही धर्मी ( ज्याच्यावर धर्म राहतात तो धर्मी ) पिंडावस्थेचा धर्म, लक्षण परिणाम, कालपरिणाम हाही त्यावर आहेच. प्रथम चूर्णावस्था, पृथ्वी ( मृत्तिका ) हा मातीचा गोळा बनला. त्या मातीचा घट बनविणें हा परिणाम. कालपरिणाम ह्मणजे भूत, भविष्य, वर्तमान, या तीन काळांना लक्षण परिणाम असें नांव आहे. मातीचें प्रत्येकक्षणीं नवें जुनें होणें हा अवस्था परिणाम.

भूतकाळाला अतीतअध्वा, वर्तमानकाळाला वर्तमानअध्वा, भविष्यकाळाला अनागत अध्वा असे पारिभाषिक शब्द आहेत. ज्यावेळीं मृत्तिकेचें मृत्तिकाच रूप होतें, तेव्हां पिंडाचा परिणाम, अनागत अध्वा; गोळा बनण्यापूर्वी चूर्णावस्थेंत माती होती, नंतर गोळा बनला तेव्हां वर्तमान अध्वा, हा पिंडाचा अध्वा परिणाम आहे. जुनें नवें होणें हा अवस्था परिणाम. हे गौण आहेत; मुख्य परिणाम चित्ताचे वर सांगितलेले निरोध, एकाग्रता व समाधि हे होत.

**एतेन**-चित्ताचे हे जे वर तीन परिणाम सांगीतले ह्याचा अर्थ भूतें तसेंच

इंद्रियें याचे धर्म परिणाम, लक्षण परिणाम, व अवस्था परिणाम, सांगितले गेले. कारण विश्वाची रचना एका चित्ताकर आहे. चित्तामुळें सर्व विश्व ह्मणजे त्यांतील सर्व सृष्ट पदार्थ अस्तित्वास आले आहेत " **धाता यथा पूर्वमकल्पयत्** " प्रकृतीची विकृती तें चित्त;चित्त,सृष्टी उत्पन्न करणारें आहे. शरीर हें प्रकृतीचाच विकार; इंद्रियें पण प्राकृतच; चित्तावर जे परिणाम तेच प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या भूतांवर व इंद्रियांवर असणार. सबब त्या एका चित्ताचे परिणाम सांगितल्यानें, सर्वांचे परिणाम त्यांत आले. सृष्टांतील यच्चयावत पदार्थ चक्राकार फिरत आहेत. यत्चराचरं तत् अखंडमंडलाकारं चित्तत्रिगुणात्मक, चलंच गुणवृत्ति. **नहि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् कार्यते ह्यवशः कर्म सर्वःप्रकृतिजैर्गुणैः** गी ३. ५. तें चित्त नेहमीं गुणांत भडकणार; भडकणें हा त्याचा स्वभाव. एवी तेवीं चित्त भडकणारच; मग अनिष्टांत त्याला न भडकूं देतां, इष्टांत ढकलणें हें त्या चित्ताचें साध्य होय. तें साध्य साधतांना चित्ताचे जे परिणाम होतात ते मागील सूत्रांत सांगितले. त्या योगें भूतें इंद्रियें यांचेही धर्मपरिणाम, लक्षणपरिणाम अवस्थापरिणाम कथित झाले, कसे ? तर धर्म ह्म. आकारानें परिणाम, लक्षण=कालानें परिणाम, अवस्था, स्थितीनें परिणाम.

चित्त हें यंत्र समजलें तर देह हा त्या यंत्रावरील मातीचा गोळा होय. मातीचें चूर्ण, मातीचा गोळा, मातीचें मडकें, ह्या तिन्ही स्थितींत मातीपणाच, पृथ्वीचा मातीचा धर्म प्रत्येकांत कायमच आहे. पण आकाराच्या फरकानें परिणाम, कालानें परिणाम, व अवस्थेनें परिणाम, चूर्णपणा, गोळेपणा, मडकेपणा व बाल्यत्व, तारुण्य, वृद्धत्व; मडकें नाश पावणें हा लक्षणपरिणाम, कालानें परिणाम, मडकें तयार झाल्यापासून क्षणाक्षणाला त्याचे नाशाला सुरवात होतेच, शेवटीं नाश, कालानें दिसला, तेव्हां कळला; हिरव्या आंब्याचा आंबटपणा जाऊन गोड होणें हा अवस्था परिणाम.

पीठ किंवा माती घेतली, पाणी घालून गोळा बनविला-पिंड तयार झाला. त्याची भाकरी किंवा मडकें केलें; हा एक भाकरीपणाचा किंवा मडकेपणाचा धर्म आला, धर्म बदलला एवढेंच, गोळा किंवा मडकें चुरल्यानें भग्न होईल; परंतु मातीचा कायमपणाच राहील. गोळ्याची भाकरी होणें किंवा मडकें बनणें ह्म. एक धर्म जाऊन दुसऱ्या धर्माचा फरक होणें. सोन्याचे कांबीचे दागिने बनविले ह्मणून आकार

बदलेल पण सोनेपणा कायमच राहील. मात्र धर्म परिणामावर लक्षण परिणाम, व लक्षणपरिणामावर अवस्थापरिणाम असणार. समजा एका शेटचे दोन तीन बंगले आहेत, एका बंगल्यांत शेट नसले ह्म. ते नाहींत, असें नव्हे, दुसऱ्या बंगल्यांत आहेत, इतकेंच. वस्तुचा नाश नाहीं, मृत्तिकेंत घडा असल्याशिवाय बाहेर येणें शक्य नाहीं. धर्मांमध्यें भेद होईल एवढेंच. धर्मी केव्हांही बदलणार नाहीं. पाद ४ सू. १२ मध्यें ह्याहून विस्तृतवर्णन आहे तें पहा. सारांश, जगांत नवें येत नाहीं, आहे तें जात नाहीं. एकच जागा एका धर्मानें सोडली, कीं दुसऱ्यानें व्यापली. रविवारचा दिवस जाऊं लागला कीं सोमवार त्याची जागा घेऊं लागतो; जितक्या प्रहरानें रविवार वाढत गेला ह्मणतों तितक्या प्रहरानें सोमवार त्याची जागा व्यापीत होता–घेत होता. पूर्ण रविवारचा अस्त झाला व सोमवारची व्यापकता दिसूं लागली, कीं आपण त्यास सोमवार ह्मणूं लागतों. तोही सोमवार आपली जागा मंगळवाराला देऊं लागतो. याप्रमाणें चक्रगती चालते. तात्पर्य–वस्तूचें स्थित्यंतर होईल, पण वस्तुपणाचा नाश होणार नाहीं. ती कायमच असणार.

**सूत्रार्थः**—चित्ताचे परिणाम सांगितले यांच्या योगानें भूतें आणि इंद्रियें, यांच्या ठिकाणचे धर्म, लक्षण, व अवस्था, यांचे परिणामांची व्याख्या सांगितली गेली ( हे गौण परिणाम; वरील मुख्य होत. )

## शान्तोदिताव्यपदेश्यधर्मानुपाती धर्मी ।। १४ ।।

शान्त, उदित, अव्यपदेश्य, धर्मानुपाती, धर्मी.

शान्त=नष्ट, भूतकाळांत चाललेले; उदित=उदयाला आलेले, वर्तमान काळांतील. अव्यपदेश्य=ज्यांचा निर्देश दाखवितां येत नाहीं, जे शक्तिरूपानें राहिलेले असतात, भविष्य काळांतील.

धर्मानुपाती=संबंध ठेवणारे, धर्माला अनुसरणारे; धर्मं अनुपतति इति धर्मानुपाती. ज्याच्यावर धर्म राहतात ते. ज्याच्यावर काळानें व संस्कारानें बदल होऊन फेर रूप व्यक्तत्वास येतें, परंतु ज्यांचा मूळपणा सुटत नाहीं, त्यांस धर्मी ह्मणतात. उदाहरणार्थ–सोनें वेळोवेळीं, मोडून, गाळून त्यांचे निरनिराळे दागिने केले, रूप बदललें, तरी सोनेपणाचा गुण व सोन्याचा धर्म, त्या दागिन्यांच्या बदलाबरोबर जात नाहीं; ह्मणून सोनें हें धर्मी होय. धर्म तीन प्रकारचे, शान्त,

उदित, व अव्यपदेश्य; सोनें ही वस्तु एकच, परंतु त्या सोन्याची लगड घेऊन, त्या लगडीचे प्रथम कडें बनविलें. तें कडें मोडून पुन्हां कुंडल तयार केलें, म्ह. कडें हें शान्त धर्मांत गेलें. कुंडल हें उदित झालें व पुढें कुंडल मोडून त्या सोन्याचें काय होईल, तें करणाऱ्याच्या मर्जीवर राहील, ह्मणून अव्यपदेश्य ह्म. ज्याचा नाम निर्देश करतां येणें शक्य नाहीं तें.

**सूत्रार्थः—** भूत भविष्य वर्तमान या तिन्ही काळच्या धर्मांना नियमानें अनुसरणारे ते धर्मी; ह्मणजे ज्याच्यावर तिन्ही काळचे धर्म राहणारे आहेत त्यास सगुण ह्मणतात.

## क्रमान्यत्वं परिणामान्यत्वे हेतुः ॥ १५ ॥

क्रम अन्यत्वं परिणाम अन्यत्वे हेतुः

अन्यत्व–अनेकत्व दुसरेपणा, निराळेपणा; क्रमाबद्दल विस्तारपूर्वक वर्णन पाद ४ सूत्र ३३ यांत दिलें आहे तें पहावें.

**सूत्रार्थः—** क्रमाचा निराळेपणा हा परिणामाच्या निराळेपणाला कारण आहे.

## परिणामत्रयसंयमादतीतानागतज्ञानम् ॥ १६ ॥

परिणाम, त्रय, संयमात्, अतीत अनागतज्ञानम्.

परिणाम=परिपाक, वर्तमानकाळचें ज्ञान, चालू ज्ञान.

"धर्मलक्षणावस्थापरिणामेषु संयमाद्योगिनां भवत्यतीतानागतज्ञानम्"। अतीत= भूतकाळचें, अनागत=भविष्यकाळचें; परिणामत्रय=चित्ताचे तीन परिणाम–निरोधपरिणाम, समाधिपरिणाम आणि एकाग्रतापरिणाम. अभ्यासांतील क्रम प्रथम समाधि परिणाम, मग एकाग्रतापरिणाम व मग निरोधपरिणाम, समजूतीसाठीं घ्यावयाचा. ह्मणजे सूत्रें प्रथम ११।१२।९ या प्रमाणें घ्यावयाचीं. नंतर परिणामत्रय ह्मणून हें सूत्र घेणें.

**सूत्रार्थः—**( वर्तमानकाळाचें ज्ञान तर चालूच आहे ) धर्म लक्षण व अवस्था या तीन ठिकाणच्या परिपक्वदशेंत संयम केल्यानें भूत व भविष्यकाळचें ज्ञान होतें. कारण चित्त हें सत्वगुणाच्या योगें प्रकाशरूप झाल्यानें त्याला, सर्व पदार्थ जाणण्याची शक्ति येते.

## शब्दार्थप्रत्ययानामितरेतराध्यासात्संकरस्त-त्प्रविभागसंयमात्सर्वभूतरुतज्ञानम् ॥ १७ ॥

शब्द, अर्थ, प्रत्ययानाम्, इतरेतर, अध्यासात्, संकरः, तत्प्रविभाग संयमात्, सर्व भूतरुत ज्ञानम्.

प्रत्यय=ज्ञान; अध्यास=आरोप; तादात्म्य=ऐक्य; संकर=भेसळ; रुत शब्द.

शब्द, अर्थ, आणि प्रत्यय ह्मणजे ज्ञान यांच्या परस्परांच्या भेसळीनें, तें त्यांचे ज्ञान एकरूपच एकर्त्रे भासतें. परंतु या तिहींचे निरनिराळे भाग पाडून, त्या प्रत्येकावर संयम केला तर, सर्व प्रकारच्या प्राण्यांच्या शब्दाचें ज्ञान होतें. गाय शब्द उच्चारिला तेव्हां १ उच्चारानें तोंडांतून निघाली ती गाय २ कानांत शिरली ती गाय ३ व प्रत्यक्ष गाय, प्रथम शब्दाचा आघात, नंतर अर्थ ह्मणजे त्या योगें ज्ञानतंतूचे स्पंद होऊन इंद्रियद्वारा तो आघात मेंदूस पोंचविणें, मग मनाकडून प्रत्याघात होणें इतक्या क्रिया घडल्यावर मग बाह्य गाईचें ज्ञान होतें. ह्म. शब्दोच्चारानें गाय, कर्णप्रवेशानें गाय, व प्रत्यक्ष गाय; अशी तीन असून आपल्यासारख्या सामान्य माणसांस भेसळ ज्ञान होतें तें एकच गाय, पण अभ्यासानें योग्याला हें निरनिराळें ज्ञान करून घेतां येतें. १ प्रथम गाय शब्द ज्याच्या वाणींतून निघाला तो शब्द वर्णात्मक, २ ऐक-णारानें कर्णेंद्रियद्वारा ग्रहण केला तो ध्वन्यात्मक. ३ बुद्धीवर परिणाम होऊन होणारें ज्ञान ह्मणजे ज्ञानात्मक. याप्रमाणें शब्द, अर्थ, ज्ञान यांचे मार्ग निरनिराळे असतां लहानापासून तों विद्वानापर्यंत सर्वांचा गोंधळ होऊन एकच वाटणें हा संकर. हा संकर न करितां निरनिराळे भाग पाडून त्यांजवर संयम केला असतां, निर-निराळ्या सर्व प्राण्यांचे ह्मणजे पशू, पक्षी इत्यादिकांचे शब्दाचें ज्ञान होतें.

ऋषीचें ह्मणणें एक एक पायरी सांगितल्याप्रमाणें अनुभव घेऊन पुढें चला; अनुभव आला तर पुढें गती होत जाईल, विश्वास बसेल, व प्रत्ययास अनुभव नच आला तर सोडून द्या; पण प्रथम उद्योग करून पहा. उगाच अशक्य कोटीं-तील समजून टाकूं नका.

**सूत्रार्थः**—शब्द तो अर्थ नव्हे; अर्थ तें ज्ञान नव्हे; ज्ञान ते शब्द नव्हे; परंतु आपण सर्व गोंधळ करितों, म्हणजे संकर करितों, तो न करितां त्या प्रत्ये-काच्या ठिकाणीं संयम केल्यानें सर्व प्राण्यांचे शब्दाचें ज्ञान होतें.

## संस्कारसाक्षात्करणात्पूर्वजातिज्ञानम् ॥ १८ ॥

संस्कार साक्षात्करणात् पूर्वजाति ज्ञानम्

पाद दुसरा सूत्र ३९ पहा. संस्कार दोन प्रकारचे-एक वासनारूप व दुसरा प्रत्यक्ष क्रियात्मक; वासना उत्पन्न होणें, हा एक संस्कार, व त्या वासनेनुरूप करूं लागणें, हा दुसरा; हा वासना संस्कार सूक्ष्म असतो, दुसरा पापपुण्यात्मक असून स्थूल असतो. साक्षात्कार=प्रत्यक्ष संयमानें दिसणें. **जैगीषव्यानें**, असा संयम केला होता; व त्याला पूर्व जातीचें ज्ञान झालें होतें.

**आटव्य व जैगीषव्य यांचा संवाद**—आटव्य योग्याचे प्रश्नाला उत्तर जैगीषव्य ऋषी देतात–दहा महासर्गामध्यें जो सुखःदुखांचा अनुभव घेतला त्यांत सर्व दुःखाचाच अनुभव आला. विषयसुखापेक्षां संतोषसुख अत्यंत उत्तम आहे.

संस्कार हे क्रियात्मक नसले, तरी सूक्ष्मरीत्या गुप्तपणें दबलेले असतात; अनुकूल स्थिति प्राप्त होतांच ते उठतात. त्यासच आपण आठवण स्मरण, म्हणतों. ते संस्कार योग्याला जागृत करतां आले तर पूर्व जन्माचें स्मरण होतें.

**सूत्रार्थः**—वासनांचे संस्कार जे आपल्या ठिकाणीं गुप्तपणें दबलेले असतात, त्यांच्या ठिकाणीं संयम करून साक्षात्कार करून घेतल्यानें, पूर्व जन्मांतील आपल्या जातीचें ज्ञान होतें.

## प्रत्ययस्य परचित्तज्ञानम् ॥ १९ ॥

प्रत्यय=चित्त, ह्यामध्यें संयम स्व किंवा पराचित्तावर हें सांगितलेलें नाहीं; परंतु कार्यावरून कारण जें चित्त, तें ओळखितां येतें. कार्य नसतांना सुद्धां, आपलें चित्त समजतें, तेव्हां संयम कोठें करावयाचा हा प्रश्न. उत्तर–परचित्ताच्या ठिकाणीं संयम केला असतां, त्याच्या चित्तांत काय आहे, ह्याचें जर ज्ञान होतें, तर स्वचित्ताचें होणारच.

**सूत्रार्थः**—परचित्ताच्या ठिकाणीं संयम केला असतां त्याच्या मनांत काय आहे ह्याचें ज्ञान होतें.

२० परक्याच्या चेहऱ्यावरील हर्ष पाहून योगी त्याच्या ठिकाणीं संयम करील; परंतु तो हर्ष कोणत्या विषयासंबंधें आहे, त्याचें ज्ञान होणार नाहीं. कारण संयम त्या विषयासहित नाहीं, म्हणून पुढील सूत्रांत सांगतात—

## न च तत्सालम्बनं तस्याविषयीभूतत्वात् ॥ २० ॥

न च तत्सालम्बनं तस्य अविषयीभूतत्वात्,

आलंबनेन सहितं यथा स्यात् तथा सालंबनम्; त्याच्या अंतःकरणानें ज्या विषयांचें ग्रहण केलें असेल, त्या विषयासहित योग्यानें संयम केलेला नाहीं; अविषयीभूतत्वात्=विषय न होणें. विषय न केल्यामुळें योग्याला, सविषय ज्ञान, त्याच्या चित्तावरील संयमानें होत नाहीं.

**सूत्रार्थः**—दुसऱ्याच्या मनांतील, योग्याच्या संयमाचा विषय न झाल्यामुळें, त्याच्या मनांतील असलेल्या विषयांचें अवलंबन होऊं शकणार नाहीं. त्याच्या मनांत काय आहे त्याचें ज्ञान होणार नाहीं.

## कायरूपसंयमात्तद्ग्राह्यशक्तिस्तम्भेचक्षुष्प्रका-शासम्प्रयोगेऽन्तर्द्धानम् ॥ २१ ॥

कायरूप, संयमात्, तद्ग्राह्य शक्ति स्तम्भे, चक्षुः प्रकाश असंप्रयोगे अन्तर्द्धानम्

अन्तर्द्धानम्=गुप्त होणें; कायरूपसंयमात्—आपल्या शरीराच्या रूपांत संयम केल्यामुळें, आपणास दुसऱ्याचें शरीर दिसतें, तें कां ? तर दृक् इन्द्रियावर क्रिया प्रक्रिया होऊन, तो पदार्थ अमूक असें ज्ञान होतें; ह्मणून रूपावर जें रूपत्व आहे, तें चक्षुरिन्द्रियावर येतें, तेव्हां दिसतेंः उदाहरण—ब्राह्मण आहे त्याचें ब्राह्मणत्व नष्ट केलें ह्मणजे, तो ब्राह्मण असून नाहींसा होतो; ब्राह्मणत्व जसें नाहींसें करतां येतें, तसेंच योग्याला रूपाचें रूपत्व, कांहीं क्रियेनें नष्ट करतां येतें; तो नष्ट करूं शकतो. " कायरूपे संयमाद्रूपस्य या ग्राह्या शक्तिस्तां प्रतिबध्नाति । ग्राह्यशक्तिस्तम्भे सति चक्षुष्प्रकाशासंयोगेऽन्तर्द्धानमुत्पद्यते योगिनः । एतेन शब्दाद्यन्तर्द्धानमुक्तं वेदितव्यम्"।ग्राह्यशक्ति=चक्षुरिन्द्रियाचें ग्राह्यरूप, ग्रहण इन्द्रियरूपत्व. स्तम्भे=ग्राह्यशक्तीचा स्तम्भ, ह्मणजे ग्राह्यशक्ति आच्छादित होणें. असंप्रयोग=असंबंध, योग=जोडणें, संप्रयोग=योग्य जोडवण, असंप्रयोग ह्म. प्रतिबंध करणें; रूपावर जी ग्राह्यशक्ति आहे, तिचा स्तम्भ झाला ह्मणजे, चक्षुरिन्द्रियाशीं रूपाचा संयोग होत नाहीं. पुस्तकावर पुस्तकत्व हा धर्म विशिष्ट असतो; तो गंधावरचा गंधत्व होऊं शकत नाहीं, तोच्या तोच राहतो. पुस्तकत्व हें गंधत्व नव्हे, ब्राह्मण बाटला, ब्राह्मणत्व नष्ट झालें, ह्मणजे ब्राह्मण असून सुद्धां बाटल्यामुळें, ब्राह्मणत्वाच्या रूपाचें नष्टत्व झाल्यामुळें, ब्राह्मण

असूनहि, जसा त्याचा उपयोग, ब्राह्मण या रूपानें होत नाहीं, तसेंच वस्तूचें रूपत्व नष्ट झाल्यानें त्याचे रूपाचा उपयोग होत नाहीं. यालाच **अन्तर्द्धान** ह्मणतात. याप्रमाणें योग्यानें आपल्या, शरीराच्या रूपावर संयम केला असतां दुसऱ्याची रूप पाहण्याची ( ग्रहण करण्याची ) जी शक्ति, तिचा स्तंभ होतो; यामुळें, योगी जागचे जागीं मंडळींत असतांही दिसेनासा होतो.

**सूत्रार्थः**—कायेच्या ठिकाणीं-शरीराच्या ठिकाणीं, जें रूप त्याच्या ठिकाणीं संयम केल्यानें, त्या रूपावर असलेली जी ग्राह्य शक्ति, त्या ग्राह्य शक्तीचा स्तम्भ होतो. स्तम्भ झाला ह्मणजे चक्षुःप्रकाशाशीं संयोग होत नाहीं, असा संयोग न होणें त्यालाच अन्तर्द्धान ह्मणतात.

## सोपक्रमं निरुपक्रमश्च कर्म, तत्संयमादपरान्त-ज्ञानमरिष्टेभ्यो वा ॥ २२ ॥

सोपक्रमं निरुपक्रमं च कर्म, तत् संयमात् अपरान्त ज्ञानं अरिष्टेभ्यो वा

सोपक्रमं=उपक्रमेण सहितं सोपक्रमं कर्म. निरुपक्रमं=निर्गतः उपक्रमः यस्मात् तत् कर्म, उपक्रमं=आरंभ; कर्में दोन प्रकारचीं; ताबडतोब फळ देणारीं, व उशीरां फळ देणारीं; पैकीं सोपक्रमं ह्मणजे ताबडतोब फळ देणारीं कर्में, निरुपक्रमं=उशीरां फळ देणारीं कर्में. अपरान्त=मरण अरिष्ट=येणारीं संकटें. स्वतांच्या कर्मावर योग्यानें संयम केला, ह्मणजे चालू व पुढील कर्मेंही त्याला समजतात व त्याच्या देहपाताचीही वेळ समजते. देहपाताची वेळ समजणें हें योग्याला हिताचें आहे. कारण " अन्ते मतिः सा गतिः " त्यावेळीं योग्याला चांगली मती करितां येईल, ईश्वराकडे ध्यान लावतां येईल, किंवा पुन्हा जन्म न घेण्याची इच्छा असल्यास अनेक देह धारण करून, आपलीं कर्में मरण्यापूर्वी योगी संपवून मुक्ति मिळवील.

प्रासंगिक अरिष्टें तीन प्रकारचीं—**आध्यात्मिक, आधिभौतिक आधिदैविक.**

**आध्यात्मिक अरिष्ट**—कानांत बोटें घातलीं असतां, कांहीं आवाज आंत होत असतो तो न होणें, असें झालें ह्मणजे समजावें मरण नजीक आलें, डोळे मिटून बोट घातलें असतां काजवे किंवा कांहीं प्रकाश दिसतो, तो दिसेनासा झाला कीं, समजावें मरण नजीक आलें.

**आधिभौतिक**—यमरूपी पुरुषांचें दर्शन होऊं लागतें. पितरांचें दर्शन व्हावयास लागतें. हें मरणाचें अरिष्ट.

**आधिदैविक**—एकदम सिद्ध पुरुष दिसूं लागतात. किंवा स्वर्गावरील कल्पना होऊं लागते. अरिष्ट होय.

**सूत्रार्थः**—सोपक्रम व निरुपक्रम यांच्या ठिकाणीं संयम केल्यानें मरणाचें ज्ञान होतें; किंवा अरिष्टांचें ज्ञान होतें; ह्मणजे कोणत्या अरिष्टापासून कोठें व कधीं मरण येणार ह्याचें ज्ञान होतें.

## मैत्र्यादिषु बलानि ॥ २३ ॥

मैत्री आदिषु बलानि " मैत्री करुणा मुदितेति तिस्रो भावनाः । भूतेषु तत्र सुखितेषु मैत्रीं भावयित्वा मैत्रीबलं लभते । दुःखितेषु करुणां भावयित्वा करुणाबलं लभते । पुण्यशीलेषु मुदिताम्भावयित्वा मुदिताबलं लभते " ।

मित्रस्य भावः मैत्री; आदिशब्दानें करुणा मुदिता वगैरे पाद १ सूत्र ३३ यांत सांगितल्याप्रमाणें घेणें; सुखी प्राण्याचे ठिकाणीं मैत्री केल्यानें मित्रत्वाचें बल वाढतें.

**सूत्रार्थः**—मैत्री इत्यादि गुणांवर संयम केल्यानें, ते ते गुण, आपल्या ठिकाणीं योगी बलवान् करूं शकतो.

## बलेषु हस्तिबलादीनि ॥ २४ ॥

बलेषु हस्ति बल आदीनि.

आपणामध्यें अमर्याद सामर्थ्य आहे; परंतु तें मिळवावें कसें हेंच योगबलानें शिकावयाचें आहे.

**सूत्रार्थः**—हस्ति इत्यादि बलाढ्य प्राण्याच्या शक्तीच्या ठिकाणीं संयम केल्यानें, हस्तिबलादिक बलें उत्पन्न होतील. एवढेंच नव्हे तर—

ज्या बलावर संयम करावा तें बल प्राप्त होईल.

## प्रवृत्त्यालोकन्यासात्सूक्ष्मव्यवहितविप्रकृष्टज्ञानम् ॥ २५॥

प्रवृत्ति, आलोक, न्यासात्, सूक्ष्म, व्यवहित, विप्रकृष्ट, ज्ञानम्.

प्रवृत्ति=मनःप्रवृत्ति; आलोक=तेज, न्यास=फेंकणें व्यवहित=दूर असलेलें; भिंतीआड असलेला पदार्थ, तिसऱ्या पदार्थाचें व्यवधान ( Obstruction ) तो.

भिंत आड असल्यानें, झालेला दूरचा; जमिनींतील द्रव्य. विप्रकृष्ट=दूरचा, लांबचा, भूमिगत, प्रवृत्त्यालोकन्यासात्=हृदयांतील तेजोमय कमलावर ( ज्योतिष्मती नांवाच्या मनाच्या प्रवृत्तीवर ) संयम केल्यानें.

**सूत्रार्थः**—मनामधील ज्योतिष्मती नांवाची प्रवृत्ति, त्यांत जें तेज असतें, त्या तेजाचा न्यास ह्मणजे फेंकणें केलें, तर सूक्ष्माचें ज्ञान होतें. भिंतीआड पदार्थांचें, व भूमिगत द्रव्याचें, ज्ञान होतें. मध्यें डोंगर नद्या आड असल्या तरी त्या पलीकडे घडणाऱ्या गोष्टींचें ज्ञान होतें.

## भुवनज्ञानं सूर्ये संयमात् ॥ २६ ॥

भुवन=त्रिभुवन, चतुर्दश भुवने.

**सूत्रार्थः**—सूर्याचे ठिकाणीं संयम केल्यानें, त्रिभुवनाचें, चतुर्दश भुवनांचें ज्ञान होतें.

## चन्द्रे ताराव्यूहज्ञानम् ॥ २७ ॥

व्यूह=समूह.

**सूत्रार्थः**—चंद्राचे ठिकाणीं संयम केल्यानें तारागणाचें ज्ञान होतें.

## ध्रुवे तद्गतिज्ञानम् ॥ २८ ॥

**सूत्रार्थः**—ध्रुवाच्या ठिकाणीं संयम केल्यानें तारांच्या गतीचें ज्ञान होतें.

## नाभिचक्रे कायव्यूहज्ञानम् ॥ २९ ॥

व्यूह=रचना; नाभिचक्र १६ पाकळ्यांचें आहे.

**सूत्रार्थः**—नाभिकमळाच्या ठिकाणीं संयम केल्यानें शरिराच्या अन्तररचनेचें ज्ञान होतें पाद ४ सूत्र ४ पहा. अनेक चित्तें.

## कण्ठकूपे क्षुत्पिपासानिवृत्तिः ॥ ३० ॥

कण्ठकूप=जिव्हेच्या खालीं तंतु आहे,तंतूच्याखालीं कण्ठ, कण्ठाच्या खालीं खड्डा-खाडा आहे, त्याला कण्ठकूप ह्मणतात.

**सूत्रार्थः**—त्या कण्ठकूपाच्या ठिकाणीं संयम केल्यानें, क्षुधा, व तृषा, ह्यांची निवृत्ति ह्मणजे शान्ति होते.

## कूर्मनाड्यां स्थैर्यम् ॥ ३१ ॥

**सूत्रार्थः**—कूपाच्या खालीं छातींत, उरामध्यें कूर्माकार नाडी आहे, त्या नाडीवर संयम केल्यानें, स्थीरता येते; ती स्थीरता गोधा ह्मणजे घोरपड किंवा सर्प यांच्या इतकी येते.

शिवाजीनें घोरपडीच्या साहाय्यानें राज्य कमाविलें, ही गोष्ट प्रसिद्धच आहे; यशवन्ती घोरपड, किल्ले सर करण्यास फार उपयोगी पडत असे. ती एकदां चिकटली कीं, दोराप्रमाणें तिचा आधार घेऊन, पाहिजे तितकें सैन्य किल्ल्यांत चढे; वाटेल तितकें सैन्य आंत जाऊं शके.

## मूर्द्धज्योतिषि सिद्धदर्शनम् ॥ ३२ ॥

मूर्द्धज्योतिः=मूर्द्धः ज्योतिः मूर्द्धज्योतिः=ब्रह्मरन्ध्र. मस्तकांत ब्रह्मरंध्र नांवाचें छिद्र आहे. त्या ब्रह्मरन्ध्रांत तेज आहे.

**सूत्रार्थः**—ब्रह्मरन्ध्राच्या ठिकाणीं संमय केल्यानें सिद्धपुरुषांचें दर्शन होतें.

## प्रातिभाद्वा सर्वम् ॥ ३३ ॥

प्रातिभ='नवनवोन्मेषशालीबुद्धिः' तर्कशक्ति; विवेकापासून जें ज्ञान उत्पन्न होतें, त्याचें पूर्वरूप ती प्रतिभा. प्रतिभा, सामर्थ्याची आपोआप प्राप्ति. त्या प्रतिभेपासून मिळणाऱ्या ज्ञानाला प्रातिभ ह्मणतात. जसें श्रवणापासून श्रावण तसें; प्रातिभ=ज्ञान

**सूत्रार्थः**—प्रातिभेच्या ठिकाणीं संयम केल्यानें सर्व ज्ञान होतें.

## हृदये चित्तसंवित् ॥ ३४ ॥

संवित्=ज्ञान.

**सूत्रार्थः**—हृत्कमलाचे ठिकाणीं संमय केल्यानें सर्व चित्ताचें ज्ञान होतें.

## सत्त्वपुरुषयोरत्यन्तासङ्कीर्णयोः प्रत्ययाविशेषो भोगः परार्थत्वात् स्वार्थसंयमात् पुरुषज्ञानम् ॥ ३५ ॥

सत्व पुरुषयोः अत्यंत, असङ्कीर्णयोः प्रत्यय, अविशेषः भोगः पदार्थत्वात्, स्वार्थसंयमात् पुरुषज्ञानम्.

सत्व=बुद्धि; पुरुष=आत्मा; अत्यंत=फार, साफ; असंकीर्ण=भिन्न; प्रत्यय=ज्ञान

अविशेष=ऐक्य. परार्थत्वात्=दुसऱ्याकरितां; बुद्धि व पुरुष साफ निराळीं आहेत. बुद्धि तो पुरुष नव्हे, व पुरुष ती बुद्धि नव्हे, परंतु दोघांच्या ऐक्यानें दोघे एकच आहेत, असें ज्ञान होतें व भास होतो; ह्मणजे दोघांच्या एकत्वाचें ज्ञान होतें; भोग=दोघे एकच आहेत असें ज्ञान होणं, त्याला भोग ह्मणतात. तो भोग दुसऱ्याकरितां आहे; बुद्धि अचेतन आहे; आत्मा चेतन आहे; आत्मा अकर्ता आहे; बुद्धि कर्त्री आहे. परंतु एकमेकांच्या सान्निध्यानें बुद्धि सचेतन वाटते; व भोग उत्पन्न करिते; ते पुरुषाकरितां, ह्मणजे दुसऱ्याकरितां; पुरुषाकडून बुद्धीला ज्ञान येतें; बुद्धि आपला कर्तृत्व धर्म, पुरुषाला देते. पुरुष आपलें चैतन्य बुद्धीला देत असल्यानें, भोग उत्पन्न होतात. ह्मणून सुख दुःख इत्यादि भोगांची उत्पत्ति होते.

परार्थ, स्वार्थ, पुरुष कांहीं करीत नाहीं, असें बुद्धीला ज्ञान होणें तो स्वार्थ. व बुद्धीचा व आत्म्याच्या एकमेकांचा एकमेकांवर जो कर्तृत्व भोक्तृत्वाचा आरोप तो परार्थ.

बुद्धीचें कर्तृत्व आत्म्याकरितां, आत्म्याचें भोक्तृत्व बुद्धीमुळें, बुद्धि नसेल तर आत्म्याला भोग होणार नाहींत. अन्य शब्दांनीं स्वार्थ ह्मणजे बुद्धीला वाटणें माझेंच सर्व, आत्म्याचा संबंध कांहीं नाहीं तो स्वार्थ. " बुद्धिसत्त्वं प्रख्याशीलं समानसत्त्वोपनिबन्धे रजस्तमसी वशीकृत्य सत्त्वपुरुषान्यताप्रत्ययेन परिणतम्। तस्माच्च सत्वात्परिणामिनोऽत्यन्तविधर्मा शुद्धोऽन्यश्चितिमात्ररूपः पुरुषस्तयोरत्यन्तासंकीर्णयोः प्रत्ययाविशेषो भोगः पुरुषस्य, दर्शितविषयत्वात् । स भोगप्रत्ययः सत्त्वस्य परार्थत्वाद्दृश्यः । यस्तु तस्माद्विशिष्टश्चितिमात्ररूपोऽन्यः पौरुषेयः प्रत्ययस्तत्र संयमात्पुरुषविषया प्रज्ञा जायते । नच पुरुषप्रत्ययेन बुद्धिसत्त्वात्मना पुरुषो दृश्यते पुरुष एव प्रत्ययं स्वात्मालम्बनं पश्यति " । तथा ह्युक्तम् । ' विज्ञातारमरे केन विजानीयात् ' इति । बुद्धिभोग्य विषय असून अचेतन आहे, पुरुष भोक्ता असून चेतन आहे. दोघे अगदीं निराळे असतां एक भासणें तो भोग. रजतमाचा पराभव होऊन सत्वाचा जेव्हां जोर होतो तेव्हां ते रजतम गुण सत्वाच्या स्वाधीन झाल्यावर, परस्परांचें भिन्नत्व साक्षात्काररूपानें परिणाम पावतें. सत्वगुणाहून सुद्धां विलक्षण धर्माचा पुरुष आहे; शुद्ध बुद्ध चैतन्यस्वरूप परिणाम न पावणारा आहे. परंतु अज्ञानानें भोग काळीं दोघांचें एकत्व भासणारें बिंब प्रतिबिंब, ज्यावेळीं विषयांचें ग्रहण करूं लागतें, तेव्हां पुरुषाचे पडलेले बुद्धींत प्रतिबिंबही विषयाकार भासूं लागतें. व अज्ञानानें, पुरुषच विषयांचें ग्रहण करितो असें वाटतें. व त्या विषयापा-

सून होणारा सुखदुःखाचा आरोप, मिळून गेलेल्या आत्मबिंबावर केला जातो. अशाप्रकारचा आत्मा भोक्ता आहे व बुद्धिभोग्य विषय आहे. पाण्याचा दाखला--पाण्यांत पडलेलें सूर्याचें बिंब पाणी हललयानें किंवा गढूळ झाल्यानें तें प्रतिबिंब हालतें, किंवा मलीन दिसतें, परंतु मूळ बिंब जें सूर्याचें, त्याला कांहींच होत नाहीं. तशीच आत्म्याची स्थिति आहे. आत्म्याचा विषयाशीं कांहीं संबंध नाहीं. तो भोग बुद्धीचा असून परार्थ असल्यामुळें, बुद्धि दृश्य व भोग्य पदार्थ होय. व त्या पदार्थाचा भोक्ता आत्मा होय. ह्मणून पदार्थ प्रत्ययाहून निराळा, तो स्वार्थप्रत्यय. स्वार्थप्रत्यय ह्मणजे बुद्धींतील अहंकार. तो, प्रकृतीच्या गुणधर्माशीं संबंध न राहिल्यानें निघून जाऊन पुरुषाच्या ज्ञानरूपानें ती प्रकाशित होते. तिला स्वार्थप्रत्यय संज्ञा प्राप्त होते. त्या स्वार्थप्रत्ययावर संयम केल्यानें पुरुषाचें ( आत्म्याचें ) ज्ञान होतें.

**सूत्रार्थः**—बुद्धि व आत्मा हे साफ निराळे आहेत; असें असून विशेष कारणानें ह्मणजे सांनिध्यानें, जें ऐक्यज्ञान होतें, तें, वास्तविक परार्थ असल्यानें, त्याला भोग ह्मणतात. पुरुष कांहीं करीत नाहीं, असें बुद्धीला ज्ञान होणें, तो स्वार्थ; व बुद्धीच्या सांनिध्यानें आत्म्याला होणारे भोग, त्या स्वार्थभोगांच्या ठिकाणीं संयम केला असतां, योग्याला पुरुषाचें ज्ञान होतें.

३६ पुरुषज्ञान मिळविण्यापूर्वी आवांतर फळ मिळवावें लागतें तें कोणतें तर सांगतात—

**ततःप्रातिभश्रावणवेदनादर्शास्वादवार्त्ता जायन्ते ॥ ३६ ॥**

ततः प्रातिभ, श्रावण, वेदन, आदर्श, आस्वाद, वार्त्ता, जायन्ते.

ततः=त्या संयमापासून; प्रातिभ=मनाचें उत्तम ज्ञान; प्रतिभा=Intellect; अन्तः-करण; सर्वविषयक ज्ञान, व लौकिक ज्ञानें मनाला कळतात. मानसिक बल वाढतें, मनाकडून मोठमोठीं कामें करून घेतां येतात.

श्रावण=दिव्यशब्दांचें ज्ञान त्याला मिळतें. वेदन=त्वगिन्द्रियाचें स्पर्श ज्ञान उत्तम प्रकारचें होतें. आदर्शः=चक्षुरिन्द्रियाचें दिव्यज्ञान. आस्वाद=रसनेन्द्रियाचें दिव्य ज्ञान. वार्ता=घ्राणेन्द्रियांचें दिव्यज्ञान. त्या स्वार्थप्रत्ययसंयमापासून सूक्ष्म इन्द्रिय-द्वारा स्वर्गांतील सर्व प्रकारचें ज्ञान होतें.

" प्रातिभात्सूक्ष्मव्यवहितविप्रकृष्टातीतानागतज्ञानम् । श्रावणाद्दिव्यशब्दश्रवणम् । वेदनाया दिव्यस्पर्शाधिगमः । आदर्शाद्दिव्यरूपसंवित् । आस्वादाद्दिव्यरससंवित् । वार्तातो दिव्यगन्धविज्ञानमित्येतानि नित्यं जायन्ते "।

**सूत्रार्थः**—सारांश स्वार्थ भोगाच्या ठिकाणीं संयम केल्यानें रूप, रस, गन्ध स्पर्श, शब्द यांचें दिव्यज्ञान उत्पन्न होतें. अन्तःकरण, श्रावण, कान ( शब्द ) वेदन ( स्पर्श ). आदर्श ( रूप ), आस्वाद ( रस ), वार्ता ( गन्ध ),

## ते समाधावुपसर्गा व्युत्थाने सिद्धयः ॥ ३७ ॥

ते समाधौ, उपसर्गाः व्युत्थाने सिद्धयः

ते=त्या सिद्धि, समाधौ=समाधिविषयांत, उपसर्गाः=विघ्नें, व्युत्थाने=व्यवहारिक काळाच्या दृष्टीनें. त्या प्रातिभ इत्यादि वर सांगितल्या सिद्धि, व्यवहारिकदृष्ट्या आश्चर्यकारक सुखदायक आहेत, परंतु असंप्रज्ञात योग साधणाऱ्यांना, सिद्धि, विघ्नें करतात. त्यामुळें पुरुषज्ञान होत नाहीं. ह्मणून तीं विघ्नें आहेत कारण, योगी जर येथेंच रमून राहील तर, पुढें जाणारच नाहीं. योग्याचें साध्य सिद्धि हें नसून मोक्ष हें आहे.

**सूत्रार्थः**--त्या सिद्धि व्यावहारिक काळाच्या दृष्टीनें सिद्धि आहेत. समाधि दृष्टीनें विघ्नें आहेत. ( योगामध्यें व्यावहारिक दृष्टी कमी करून समाधि दृष्टी केली पाहिजे. )

## बन्धकारणशैथिल्यात्प्रचारसंवेदनाच्च चित्तस्य परशरीरावेशः ॥ ३८ ॥

बन्ध कारण शैथिल्यात्, प्रचार संवेदनात् च चित्तस्य, परशरीर आवेशः

बन्धकारण=बंधाचें कारण; शैथिल्य=ढिलेपणा; प्रचार=नाडीसमूह; संवेदन=ज्ञान. आवेश=प्रवेश, गृहप्रवेश, भूतावेश; भूतसंचार होतो त्याला आवेश ह्मणतात. ह्मणजे दृश्य पदार्थासंबंधें प्रवेशशब्द वापरतात. अदृश्यासंबंधें आवेश हा शब्द वापरतात.

पुरुष व्यापक आहे व चित्त चंचल आहे. जर चित्त चंचल आहे तर एका ठिकाणीं एका शरिरांत शंभर वर्षेपर्यंत जखडून तेंच चल चित्त कसें राहतें ? शरीर हा कैदखाना व चित्त त्यामध्यें अडकून राहतें; त्याला कांहींतरी कारण असलें पाहिजे; तें कारण पापपुण्य. बन्धकारणाचें शैथिल्य झालें ह्मणजे पापपुण्य कमी

व्हावयास लागतें; व पापपुण्य कर्मी व्हावयास लागलें ह्मणजे-जसें पुस्तकाचें ज्ञान होण्याला चित्ताला बाहेर यावें लागतें, व आंत जावें लागतें, तेव्हां पुस्तकाचें पुस्तक असें ज्ञान होतें, त्याचप्रमाणें चित्त कोणत्या नाड्यांनीं बाहेर येतें, व आंत जातें, त्या नाडीसमूहाचें ज्ञान पाहिजे, ह्मणजे तें आंत जाऊं शकतें. चित्तानें त्या नाड्यांमार्फत आंत प्रवेश केला, कीं त्याबरोबर सर्व इंद्रियेंसुद्धां जातात.

" लोलीभूतस्य मनसोऽप्रतिष्ठस्य शरीरे कर्माशयवशाद्बन्धः प्रतिष्ठेत्यर्थः। तस्य कर्मणो बन्धकारणस्य शैथिल्यं समाधिबलाद्भवति प्रचारसंवेदनं च चित्तस्य समाधिजमेव । कर्मबन्धक्षयात् स्वचित्तस्य प्रचारसंवेदनाच्च योगी चित्तं स्वशरीरान्निष्कृष्य शरीरान्तरेषु निःक्षिपति, निःक्षिप्तं चित्तं चेन्द्रियाण्यनुपतन्ति, यथा मधुकरराजानं मक्षिका उत्पतन्तमनूत्पतन्ति निविशमानमनु निविशन्ते, तथेन्द्रियाणि परशरीरावेशे चित्तमनु विधीयन्त " इति । योगी स्वतां शरिराची क्रिया चालू ठेवून, प्रेतांत प्रवेश करून, चलन वलन उत्पन्न करूं शकतो. किंवा दुसऱ्याच्या मनांत शिरून, त्याच्यावर ताबा चालवितो. तात्पर्य योगी आपलें शरीर-मनासह वायुरूप बनवितो, व वाटेल, त्या प्राण्यांत प्रवेश करितो. त्याचें मन सर्वव्यापी असतें. त्या मनाचा अंश दुसऱ्यांत प्रवेश करवितो. स्वतः आपणही असूं शकतो. चित्ताचा प्रवेश झाल्यावर मागून बाकी इंद्रियेंसुद्धां प्रवेश करितात. ज्याप्रमाणें मधमाशांचा राजा-मक्षिका राणी-ती जिकडे जाईल तिकडे सर्व माशा जातात त्याप्रमाणें.

शंकराचार्य व मंडनमिश्र यांचा वाद झाल्यामुळें शंकरचार्यांनीं असा परकाया प्रवेश केला होता.

**सूत्रार्थः**—ज्याच्या योगानें चित्त शरीरांत बांधून राहिलें आहे, तीं कारणें शिथिल झालीं ह्मणजे, परकायागमन करितां येतें; आणि नाड्यांच्या समुदायाचें, व ज्या नाड्यांनीं चित्त आंत जातें, व बाहेर येतें, त्या नाड्यांचें ज्ञान झालें ह्मणजे, परकायागमन करितां येतें.

## उदानजयाज्जलपङ्ककण्टकादिष्वसङ्ग उत्क्रान्तिश्च ॥ ३९ ॥

उदानजयात्. जलपङ्क कण्टक आदिषु असङ्गः उत्क्रान्तिः च.

१ प्राण २ व्यान ३ समान ४ उदान ५ अपान असे प्राणवायु आहेत. जल= पाणी. पङ्क=चिखल- कण्टक=कांटे. आदि=विघ्न करणारे पदार्थ. असङ्ग=स्पर्श

होत नसणें. उत्क्रान्ति=इच्छामरणी. समस्तेन्द्रियवृत्तिः प्राणादिलक्षण।जीवनं, तस्य क्रिया पञ्चतयी । प्राणो मुखनासिकागतिराहृदयवृत्तिः । समुन्नयनात्समानश्चानाभिवृत्तिः । अपनयनात् ( विसर्जन ) अपान आपादतलवृत्तिः उन्नयनादुदान आशिरोवृत्तिः । व्यापी व्यान इति " । एषां प्रधानः प्राणः । उदानजयात् जलपङ्ककण्टकादिष्वसङ्ग उत्क्रान्तिश्च प्रयाणकाले भवति ।

प्राण, व्यान, समान, उदान, अपान ह्या ज्या इंद्रियांच्या वृत्ती, त्या वृत्तींच्या समवायी वृत्तीला जीवन ह्मणतात. त्या पांचांचा, पांच प्रकारचा व्यापार चालतो.

तोंडनाकापासून हृदयापर्यंत जो वायु—व्यापार चालवितो त्याला **प्राणवायू** ह्मणतात. नाड्यांना जरूर त्या रसांचा पुरवठा करणारा जो वायू—ज्याचा हृदयापासून नाभीपर्यंत व्यापार चालतो, तो **समान वायू**. नाभीपासून तळपायांपर्यंत संचार करणारा वायू—जो मूत्र मळ पुरीष ( विष्ठा ) गर्भ वगैरेनां खालीं ढकलण्याला मदत करितो, त्याला **अपानवायू** ह्मणतात. नाकापासून तों मस्तकापर्यंत संचार ( व्यापार ) करणारा व जो ऊर्ध्वगति देऊन रसादिकानां वर मस्तकाकडे जाण्याला मदत करितो तो **उदानवायू**. सर्व शरीरभर व्यापून राहिलेला तो **व्यान**. सर्वांत श्रेष्ठ प्राण. सर्वांत प्राणवायू श्रेष्ठ होय.

नाकातोंडांतून जाऊन फुप्फुसापर्यंत जाणारा तो प्राणवायु, हृदयापासून बेंबीपर्यंत अन्नरसाची विल्हेवाट लावणारा समान. नाभीपासून पायांपर्यंतचा जो अन्नमलाचें अपनयन विसर्जन करणारा तो अपान, नाकापासून मस्तकापर्यंत मेंदूला उद्दीपित करणारा तो उदान, शरिराभर संचार ज्याचा तो व्यान. प्राण जाण्याला कारण उदान, ह्या उदानाचा जय, संयमानें झाल्यानें, बाकीचे दबून जातात; त्यामुळें ऊर्ध्व गती प्राप्त होते; व माणूस अगदीं हलका होतो.

**सूत्रार्थः**—संयमानें उदानवायूचा जय झाल्यानें, योग्याला पाणी चिखल व कांटें ह्यांवरून चालत जातां येतें, त्यांपासून कोणताही अडथळा होत नाहीं. व तो इच्छामरणी होतो.

## समानजयाज्ज्वलनम् ॥ ४० ॥

समान जयात् ज्वलनम्

ज्वलन=तेज; जठराग्नीच्या वाटोळें समानवायूचें वेष्टन आहे. त्या समान वायूचे ठिकाणीं संयम करून जय केल्यानें, अग्नीचें आच्छादन सरकून ज्वाला, वर

येऊं लागतात. यायोगें योगी अग्निवेष्टित दिसतो; अग्नी त्याच्या ताब्यांत राहतो. धृतराष्ट्र व गांधारीनें तसें केलें; याच योगें विश्वामित्र व अर्जुन मस्तकांतून अग्नि काढूं शकत.

पाशुपतास्त्र मिळविण्यासाठीं जेव्हां अर्जुन गेला, तेव्हां त्यानें हा प्रयोग केला. जगाचा दाह करण्याकरितां विश्वामित्रानें द्वेषानें अग्नि बाहेर काढिला होता; व लोकांना भिवविलें होतें.

**सूत्रार्थः**—समान वायूचे ठिकाणीं संयम करून जय केल्यानें, योगी अग्नी-सारखा प्रदीप्त दिसतो.

## श्रोत्राकाशयोः सम्बन्धसंयमाद्दिव्यं श्रोत्रम् ॥ ४१ ॥

श्रोत्र, आकाशयोः सम्बन्ध संयमात् दिव्यं श्रोत्रम्,

श्रोत्र=श्रोत्रेंद्रिय; आकाश=बाहेरचें आकाश; दिव्य श्रोत्रम्=सूक्ष्म शब्दग्राहक श्रोत्रेंद्रिय.

**सूत्रार्थः**—श्रोत्रेंद्रिय व बाह्य आकाश यांच्यामधील जो संबंध, त्या संबंधाच्या ठिकाणीं संयम केला असतां, श्रोत्रेंद्रिय दिव्य होतें. वाटेल तेथील शब्द त्याला स्पष्ट ऐकूं येतो.

## कायाकाशयोः सम्बन्धसंयमाल्लघुतूलसमापत्तेश्चाकाशगमनम् ॥ ४२ ॥

काय आकाशयोःसम्बन्ध संयमात्, लघु तूल समापत्तेः च आकाशगमनम्.

काय=शरीर; आकाश=शरीर आकाश, आंतलि आकाश, लघु=हलके पदार्थ, तूल=कापूस. समापत्ति=एकाग्रता; शरीर व आकाश हीं व्याप्य व्यापक आहेत; शरीर व्याप्य, व आकाश व्यापक आहे. जेथें जेथें शरीर जाईल, तेथें तेथें, आकाश त्याला जागा देतें; कारण अवकाश देणें हा आकाशाचा धर्म आहे. शरीर हें, प्राण ज्याला असतात व हालचाल असते, त्यांत जाऊं शकतें. दगडांत जाऊं शकत नाहीं. दगड शरीराला जागा देत नाहीं; ज्यासंबंधानें गमन क्रिया, तो संबंध ध्यानांत घेऊन त्याच्यावर संयम ठेविला असतां लघु तूला ( कापूस ) दिक त्यांच्यावर संयम केला असतां, योगी आकाशांत गमन करूं शकतो.

**सूत्रार्थः**—शरीर व शरीरआकाश, यांचा जो संबन्ध, त्या संबंधाच्या ठिकाणीं संयम केला असतां, आकाशांत गमन करितां येतें. किंवा तसेच लघु पदार्थ व कापूस यांच्या ठिकाणीं समापत्ति ह्मणजे एकाग्रता केली असतां, आकाशगमन करितां येतें.

**बहिरकल्पिता वृत्तिर्महाविदेहा ततः प्रकाशावरणक्षयः ॥४३॥**

बहिः अकल्पिता, वृत्तिः महाविदेहा, ततः प्रकाश, आवरण, क्षयः.

चित्ताच्या वृत्ति—वृत्ति दोन प्रकारच्या; एक कल्पित वृत्ति आणि दुसरी अकल्पित वृत्ति. ह्या कल्पित वृत्तीला **विदेहावृत्ति** असेंही म्हणतात; व अकल्पित वृत्तीला **महाविदेहा** वृत्ति म्हणतात.

शरीरावर अभिमान राहून नंतर बाह्य पदार्थांवर चित्ताची वृत्ति जाणें, त्या वृत्तीला **कल्पितवृत्ति** म्हणतात. शरिरावरील अभिमान सोडून देऊन बाह्य पदार्थांवर चित्ताची वृत्ति जाणें, त्याला **अकल्पित वृत्ति** ह्मणतात.

महाविदेहा वृत्ति साध्य आहे; व कल्पितवृत्ति तिचें साधन आहे. मन सर्वव्यापी आहे त्याचें सामर्थ्यही विशाल आहे. ह्या अकल्पिता महाविदेहा वृत्तीवर संयम केल्यानें चित्तमलाचा नाश होतो, सर्वच ज्ञान प्राप्त होतें.

**सूत्रार्थः**—चित्त सत्वप्रकाश आहे; त्या प्रकाशावर रजतमाचें आवरण असतें, तें आवरण ह्या बहिरकल्पिता महाविदेहा वृत्तीवर संयम केल्यानें जातें.

**स्थूलस्वरूपसूक्ष्मान्वयार्थवत्त्व संयमाद्भूतजयः ॥ ४४ ॥**

स्थूल, स्वरूप, सूक्ष्म, अन्वय, अर्थवत्त्व, संयमात् भूतजयः

अन्वय=सत्वादिगुणत्रय, व्यापकतेला अन्वय ह्मणतात. पृथ्वी आप तेज वायु इत्यादि पांच रूपें. पहिलें रूप स्थूल; स्थूल म्हणजे मूर्तिमान् आकार दिसतो तें, स्थूलरूप ( रूप ह्मणजे प्रकार ) भूतांचें स्वरूप, भूतांचें काठिण्य, मार्दव, कृशत्व, उष्णता, इत्यादि धर्मांनीं युक्त असतें तें, त्या भूतांचें स्वरूप असतें. भूतांच्या ठिकाणीं स्थूलत्व स्वरूपत्व, सूक्ष्मत्व, अन्वयत्व, अर्थवत्व अशा अवस्था आहेत, त्या प्रत्येक अवस्थेमध्यें संयम केल्यानें पंचमहाभूतें ताब्यांत राहतात.—अर्थवत्व=पुरुषाला भोग व अपवर्ग देण्याचें सामर्थ्य भूतस्वरूपांत असल्यानें, ती भूतांची अवस्था.

**सूत्रार्थः**—भूतांचीं पांच रूपें स्थूल व सूक्ष्म इ० त्यांच्या ठिकाणीं संयम केल्यानें भूतजय होतो ह्मणजे प्राणी ताब्यांत राहतात.

**ततोऽणिमादिप्रादुर्भावः कायसम्पत्तद्धर्म्मानभिघातश्च ॥ ४५ ॥**

ततः अणिमादि प्रादुर्भावः कायसम्पत् तत् धर्म अनभिघातः च. प्रादुर्भाव= उत्पत्ति, अनभिघातः=नाश न होणें. तत् धर्मस्य अनभिघातः=तद्धर्मानभिघातः. अणिमादि अष्टसिद्धि प्राप्त होतात. अत्यंत हलक्यांत हलकें होणें. अणिमादि सिद्धि- **अणिमा महिमा चैव लघिमा गरिमा तथा ॥ प्राप्तिः प्राकाम्य- मीशित्वं वशित्वं चाष्ट सिद्धयः ॥** ह्मणजे योगी( मोठा असला तरी ) अणू होतो. लहान असला तरी अवाढव्य मोठा होऊं शकतो, लघिमा, लघु होतो, कापसासारखा पिंडासारखा गोळा होतो. गरिमा, मेरू पर्वताप्रमाणें बळकट होतो; प्राप्ति ही सिद्धि, यायोगें, आसनावर, बसून, चंद्रमंडळावर अंगुली लावतां येते, ह्मणजे जागच्याजाग्यावरून, सर्व प्राप्ती करून घेतां येते. प्राकाम्य ही सहावी सिद्धि. सत्यसंकल्पत्वं, वशित्वं, सर्व भूतांना वश करणें; ईशित्वं-प्राणी उत्पन्न कर- ण्याची शक्ति, प्रतिसृष्टि निर्माण करण्याची ताकद, जशी विश्वामित्राचे आंगांत ताकद होती त्याप्रमाणें. कायसंपद्=शरीरसंपत्ती; अनभिघात=नाश न होणें; शरीरधर्म गमन करणें हा होय. गमन करितांनां मध्यें खांब आला भिंत आली तर योगी थांबणार नाहीं, शरीरधर्माचा नाश होणार नाहीं.

**सूत्रार्थ**--भूतजय साधल्यानें अणिमादि सिद्धि प्राप्त होतात. कायसंपत्ती प्राप्त होते. शरिराचे रूपाचा नाश होत नाहीं.

**रूपलावण्यबलवज्रसंहननत्वानि कायसंपत् ॥ ४६ ॥**

रूप, लावण्य, बल, वज्र संहननत्वानि कायसंपत्.

बलवज्रसंहननत्वानि=अलौकिक बल, वज्रानें हनन न होणारें शरीर बनणें. " दर्शनीयः कान्तिमान् अतिशयबलः वज्रसंहननश्चेति । "

**सूत्रार्थ**—सौंदर्य, कान्ति, शरीरबल, व वज्रासारखा कठीण देह अशी प्राप्ति होते.

**ग्रहणस्वरूपास्मितान्वयार्थवत्त्वसंयमादिन्द्रियजयः ॥४७॥**

ग्रहण, स्वरूप, आस्मिता, अन्वय, अर्थवत्त्व, संयमात् इंद्रियजयः

ग्रहण=विषयाभिमुख इन्द्रियवृत्ति तें ग्रहण, त्या ठिकाणीं संयम

स्वरूप=इन्द्रियांचें मूळचें रूप त्यांच्या ठिकाणीं संयम. अस्मिता=इन्द्रियांची अस्मिता; अस्मितेला सात्विक अहंकार ह्मणतात. अन्वयत्व व अर्थवत्त्व ४४ सूत्रांत वर्णिल्याप्रमाणें.

**सूत्रार्थः**—वर सांगितल्याप्रमाणें इंद्रियांच्या पांच अवस्था; त्यांच्या ठिकाणीं संमय केल्यानें इन्द्रिय जय होतो.

## ततो मनोजवित्वं विकरणभावः प्रधानजयश्च ॥ ४८ ॥

ततः मनोजवित्वं विकरणभावः प्रधान जयः च.

मनोजवित्वं=मन जसें वेगवान असतें तसें योग्याचें शरीर वेगवान होतें, विकरण भावः वि=रहित करण=साधन=इंद्रियांच्या मदतीशिवाय पदार्थांचे विषयाचें ज्ञान होतें. आपल्याला इद्रियांच्या साधनांशिवाय ज्ञान होत नाहीं. प्रधान=प्रकृति, प्रधान जय=ह्मणजे प्रकृति ताब्यांत राहते.

**सूत्रार्थः**—इंद्रियजय झाल्यानें शरीर मनाप्रमाणें गतिवान होतें, इंद्रियें शरीर साधनावांचून कार्यें करितात. सर्व जग आपल्या ताब्यांत राहतें.

## सत्वपुरुषान्यताख्यातिमात्रस्य सर्वभावाधिष्ठातृत्वं सर्वज्ञातृत्वं च ॥ ४९ ॥

सत्व, पुरुष, अन्यता, ख्यातिमात्रस्य, सर्वभाव अधिष्ठातृत्वं च. सत्व=बुद्धि. पुरुष=आत्मा. अन्यता=निराळेपणा; ख्याति=ज्ञान, बुद्धि व आत्मा यांच्या ऐक्याचें ज्ञान असल्यानें संसार होतो.

अधिष्ठातृत्व=नियंतृत्व; अधिष्ठाता=नियंता. सत्वपुरुषामध्यें राहिलेला जो योगी तो सर्व पदार्थांचा नियन्ता बनतो, व सर्वज्ञ होतो. सूत्र ३५ ह्यांत स्वार्थसंमय ( चित्प्रतिबिंब ) सांगितला. त्यायोगें परवैराग्य प्राप्त होऊन, अन्यता ख्याति ( भेदज्ञान ) उत्पन्न होतें. व सर्व भावाधिष्ठातृत्व व ज्ञातृत्व प्राप्त होतें; ह्या सिद्धींना **विशोका** नांव आहे.

**सूत्रार्थः**—बुद्धि व आत्मा हे निरनिराळे आहेत, असें केवळ ज्ञान ज्या योग्याला होतें, तो योगी सर्व पदार्थांचा नियन्ता, बनतो व सर्वज्ञ होतो.

## तद्वैराग्यादपि दोषबीजक्षये कैवल्यम् ॥५०॥

तत् वैराग्यात् अपि दोषबीज क्षये कैवल्यम्

रागद्वेष हे दोष, त्या दोषाचें बीज अविद्या, यांचा क्षय झाला असतां, कैवल्य प्राप्त होतें. ४९ सूत्रांत सांगितलेलें सर्वज्ञत्व, त्याचीही जो पर्वा करित नाहीं, त्याला स्वर्गसुखेंही अडविणार नाहींत, जो सिद्धींची उपेक्षा करितो, तोच मुक्त होतो. सर्व सत्तावान् असणें, हेंही क्षणभंगुर आहे. जोंपर्यंत चित्ताचा चित्तपणा मोडला नाहीं, तोंपर्यंतच सुख दुःख वाटणार. मुक्ति·चित्तपणा मोडल्यानेंच मिळेल.

**सूत्रार्थः**—सिद्धींची उपेक्षा केली असतां ( वैराग्य धारण केलें असतां ), येणारे दोषांचीं बीजें, समूळ नष्ट होतात. त्यामुळें कैवल्याची प्राप्ती होते.

## स्थान्युपनिमन्त्रणे सङ्गस्मयाकरणं पुनरनिष्टप्रसङ्गात् ॥ ५१ ॥

स्थानि उपनिमंत्रणे सङ्ग स्मय अकरणं पुनः अनिष्ट प्रसङ्गात्

स्थानि=देव. उपनिमंत्रणे=आमंत्रण. सङ्ग=आसक्ति. स्मय=गर्व. अनिष्ट प्रसंग= जन्ममरणाच्या फेऱ्यांत येईल. पुन्हां संसारांत पडेल.

योगांतील सर्व पायऱ्या चढून, शेवटल्या पायरीवर योगी पोंचला असतां, स्वर्गांतील देवता, त्या योग्याला भ्रष्ट करण्याकरितां अप्सरांना पाठवितात. त्यावेळीं त्यानें त्यांनां भुलूं नये, व आपल्या प्रभावाचें आश्चर्यही करूं नये, नाहींतर तो भ्रष्ट होईल. व पुनः फेऱ्यांत सांपडेल. स्थानि, उपनिमंत्रणे सति, संग अकरणं, स्मय अकरणं, पुनरनिष्ट प्रसंगात्.

**सूत्रार्थः**—समाधिसिद्धीच्या वेळीं, देवांनीं जर मोहित वस्तूंनीं भुरळ घातली, तर त्यांची आसक्ति करूं नये. व आपल्या ह्या प्रभावामुळें, अप्सरा वगैरे येण्याच्या प्रभावाचा, गर्व करूं नये, नाहींतर पुन्हा अनिष्ट प्रसंग येईल.

## क्षणतत्क्रमयोः संयमाद्विवेकजं ज्ञानम् ॥ ५२ ॥

क्षण तत्क्रमयोः संयमात् विवेकजं ज्ञानम्.

क्षण=एकामागून एक जात्तात ते क्षण; क्रम=परंपरा. क्षण व क्षणाचा क्रम या दोघांच्या ठिकाणीं संयम.

विवेक=पृथक्करण; प्रत्येक क्षणाक्षणाचें पृथक्करण करितां येतें. ह्मणजे सर्व पदार्थांचें ज्ञान होतें; विवेकजं ज्ञानं=परमाणू परमाणूचें ज्ञान; उदाहरणार्थ-पुस्तक

घेतलें तर तें कशाचें बनलेलें आहे, त्या परमाणू परमाणूचें ज्ञान होतें. मोह व सिद्धी यांच्या त्यागाचा उपाय या सूत्रानें सुचविला आहे. क्षण आणि क्रम यांची व्याख्या पाद ४ सूत्र ३३ मध्यें पाहावी.

**सूत्रार्थः**—क्षण व त्या क्षणांचा पूर्वापार क्रम, यांच्या ठिकाणीं संयम केल्यानें, प्रत्येक क्षणाक्षणाचें पृथक्करण करितां येतें, प्रत्येक क्षणाक्षणाच्या ठिकाणीं होणारे पदार्थांचे भेद, फरक, व त्या फरकांचें ज्ञान होतें ह्मणजे सर्व पदार्थांचें ज्ञान होतें.

## जातिलक्षणदेशैरन्यतानवच्छेदात्तुल्ययोस्ततः प्रतिपत्तिः ॥५३॥

जाति, लक्षण, देशैः, अन्यता, अनवच्छेदात्, तुल्ययोः, ततः, प्रतिपत्तिः

प्रतिपत्तिः=ज्ञान. अनवच्छेदात्=ओळखल्या जात नाहींत. अन्यता=दुसरेपणा-क्षण आणि त्यांचे क्रम यांचें निराळें फळ आहे, तें ह्या सूत्रांत सांगतात. एका पदार्थाहून दुसरा पदार्थ निराळा आहे असा भेद पडण्याला कारण जाति लक्षण व देश; परंतु पदार्थ एकतुल्य झाल्यानें ओळखतां येत नाहींत, भेदज्ञान होत नाहीं. दोन पदार्थांची जात निरनिराळी असतां, एकच होणें. उदाहरणार्थ.—हळदचुना, दूध पाणी; पाणी तें दूध नव्हे व दूध तें पाणी नव्हे परंतु मिश्रणानें एकच पदार्थ, दूध होतें. कांहीं पदार्थ जात लक्षण व देश यांनीं एकच झालेले असतात; देश=प्रदेश; एकाच ग्लासांत पडलेलें दूध व पाणी; जात व त्याचें लक्षण. क्षण किंवा क्षणाचा क्रम ( परंपरा ) यांच्या ठिकाणीं संमय ठेविल्यानें, योग्याला दूध व पाणी यांचा दुसरेपणाचा लोप झाल्यानें, जे दोन्ही पदार्थ एकच झालेले म्हणजे, तत्तुल्य झालेले ज्या एक झालेल्या पदार्थांचें ज्ञान होत नाहीं अशा पदार्थांचें ज्ञान होतें.

**सूत्रार्थः**—जाति लक्षण व देश यांनीं दुसरेपणाचा नाश होऊन, एकच होऊन गेलेलें, ज्याचें भिन्नत्वाचें ज्ञान होणें अशक्य, अशाचें ज्ञान होतें; क्षण व क्षणांचा क्रम यांच्यावर संयम केल्यानें भेदज्ञान ह्मणजे न होणारें भेदज्ञान होतें, ह्मणजे दूध किती व पाणी किती हें सांगतां येतें.

## तारकं सर्वविषयं सर्वथाविषयमक्रमं चेति विवेकजं ज्ञानम् ॥५४॥

तारकं, सर्व विषयं, सर्वथाविषयम् अक्रमं च इति विवेकजं ज्ञानम् .

तारकं=उद्धार करणारे.तरविणारे; तारकं ज्ञानं=जन्ममृत्यूच्या पलिकडे नेणारें ज्ञान. सर्वविषयं=सर्व प्रकारचे विषय ओळखूं शकतात. सर्वथा विषयं=सर्व प्रकारचे विषयांची सर्व प्रकारची परिस्थिति त्याला समजते; परिस्थितीचें ज्ञान होतें. अक्रमं =क्रमविरहित; क्रमाची जरूरी नाहीं एकदम ज्ञान होतें. तारकं च सर्वविषयं च सर्वथा विषयं च अक्रमं इति विवेकजं ज्ञानं.

**सूत्रार्थः**—संयमांनीं उत्पन्न होणारें ज्ञान, सर्व वस्तूंचें सर्वप्रकारच्या अवस्थांचें क्रमशः होत असल्यानें, या भवसागरांतून तरण्याला उपयोगी पडतें; व तेंच विवेकज ज्ञान होय.

## सत्वपुरुषयोः शुद्धिसाम्येकैवल्यमिति ॥५५॥

सत्व=बुद्धि; पुरुष=आत्मा; शुद्धिसाम्ये=शुद्धेः साम्यं शुद्धिसाम्यं. कैवल्यं=मोक्ष. आत्मा शुद्ध तरी मलीन झालेला भासतो; तें मालिन्य जाऊन बुद्धि व आत्मा यांचे शुद्धीचें साम्य झालें ह्मणजे कैवल्यप्राप्ती होते.

**सूत्रार्थः**—बुद्धीची व आत्म्याची सारखी शुद्धि झाली ह्मणजे, बुद्धींत आत्म्याचें शुद्ध बिंब पडतें, तोच मोक्ष होय. कारण गढूळ पाण्यांतील प्रतिबिंब मलीन असतें; स्वच्छ पाण्यांतील प्रतिबिंब बिंबाइतकेंच स्वच्छ असतें, तसेंच शुद्ध झालेल्या बुद्धींत पडणारें प्रतिबिंब, बिंबाइतकेंच शुद्ध स्वच्छ असणार ह्मणजेच एकरूपता, तादात्म्यता.

## विभूतिपादः समाप्तः ॥ ३ ॥

---

**पिबंति नद्यः स्वयमेव नोदकं स्वयं न खादंति फलानि वृक्षाः**
**धाराधरो वर्षति नात्महेतवे परोपकाराय सतां विभूतयः ॥**
**सीदंति संतो विलसंत्यसंतो पुत्रा म्रियंते पितरश्चिरायवः ।**
**परेषु मैत्री स्वजनेषु वैरं पश्यंति लोकाः [redacted] ॥**

# कैवल्यपादः ॥ ४ ॥

१ मागील दोन पादांत मोक्षाचीं साधनें सांगून, सिद्धींचेंहि वर्णन झालें. ह्या चवथ्या पादांत, मोक्ष विस्तारपूर्वक वर्णिला असून, लायक चित्र मोक्षाला कोणतें, व कोणत्या सिद्धींनीं मोक्ष हा सुलभ, व सहज आंगवणी होईल, त्या कैवल्याबद्दल चर्चा आहे.

प्रथम सूत्रें-पंचविधसिद्धि निरूपणं—पांच प्रकारच्या सिद्धींचें निरूपण प्रथम सूत्रांत केलें आहे.

## जन्मौषधिमन्त्रतपःसमाधिजाः सिद्धयः ॥ १ ॥

जन्म, औषधि, मन्त्र, तपः समाधिजाः सिद्धयः

जन्मजा सिद्धिः किंवा जन्मजाः सिद्धीयः, औषधिजाः सिद्धयः, मन्त्रजाः सिद्धयः तपोजाः सिद्धयः समाधिजाः सिद्धयः

कित्येक महात्मे जन्मतः सिद्धी मिळवितात. उदाहरणार्थः—**वामदेव** उपजल्याबरोबर तत्वज्ञानी होता. ह्यावरून असें अनुमान काढिलें पाहिजे कीं, त्याच्या प्रकृतीच्या फळांचा परिपाक होण्यापूर्वीं, त्याचा देहपात झाला असला पाहिजे. त्याच्या सुकृतीचीं फळें, त्याच्या नवीन देहाबरोबर, त्यास भोग देऊं लागलीं असलीं पाहिजेत; ह्मणजे चांगल्या कृतीचा भोग घेणें राहिल्यानें, त्या भोगाकरितांच नवीन शरीर धारण करणें भाग झालें; त्याचप्रमाणें, एकाद्यानें कडकडीत तप बहुत काळ करून, फळ भोगण्यापूर्वीं, देह ठेविला तर, त्या इसमास पुढील जन्मीं, जन्मतः त्या तपाचा भोग सुरू होतो. सुतार निजून उठला कीं, पूर्वी सुरू केलेल्या टेबलाचें पुढील कामाला, मागील केलेल्या कामाचा क्रम न सोडतां, सुरवात करितो. व पुरें जाहाल्यानंतर उत्कृष्ट बनलें ह्मणून त्याजकडे पाहात आनंद भोगतो. तद्वत्च प्राण्याच्या कृत्यांचा फलक्रम न सुटतां, त्याच्या सत्कृतीपासून, किंवा दुष्कृतीपासून, मिळणाऱ्या फळाचा भोग घेण्यास, जन्माबराबर सुरवात होते. त्यानें केलेल्या कडकडीत तपाचरणानें, त्यास सामर्थ्य प्राप्त होत असतें, व त्या सामर्थ्यानें त्यास सिद्धि प्राप्त होते. तसेंच कित्येक योगी औषधीनें, व कित्येक मन्त्रानेंहि, सिद्धी करून घेत असतात. मंत्रांचा जप विशेषप्रकारें, विशेष वेळीं केला तर, त्यामुळें, विलक्षण सामर्थ्य प्राप्त होत असतें. ह्यास उदाहरणें जागोजाग अनेक

आहेत. ग्रहणांत मंत्रजप, पाण्यांत उभे राहून करणारे लोक, अद्याप हिंदुस्थानांत आढळतात. व ते ज्या मंत्राची उपासना करितात, त्यापासून त्यांना फळसिद्धी मिळते. सर्पदंशाचें वीष, मंत्रानें उतरणारे लोकही हिंदुस्थानांत आहेत. मुक्काम, पाचोळी, तालुके दापोली, जिल्हा रत्नागिरी येथें, सर्पाचें किंवा कोणत्याही विषारी जनावराचें वीष, मंत्रानें उतरतात, व हजारों लोक त्याचा फायदा घेत आहेत. मुक्काम कोळथरें, तालुके दापोली येथें फाल्गुन महिन्यांत, जळजळीत अग्नीवर चालणारे लोक अद्याप आहेत. उपासनेनें, अग्नीवर चालावयास सांगण्याचा, ज्याचा तो अधिकार, त्यानेंच सांगितल्यावर, पायांना कांहीं एक न लावतां, वाटेल तो माणूस त्याच्या हुकूमानें विस्तवावर चालूं शकतो. पायाला अग्नीची बिलकूल बाधा होत नाहीं; त्याच्या हुकूमाशिवाय स्वतः चालेल, तर मात्र पाय भाजतात. ज्याला ह्याची शंका असेल, त्यानें अनुभव घेऊन मग काय तें मत द्यावें. अशक्य कोटींतील गोष्ट, आपल्या कल्पनेनें समजून, उगाच निन्दा करीत सुटूं नये. उपरसळी ह्या वनस्पतीचा उपयोग, अडलेल्या बाळंतिणीस होतो. काबुली लोक आपल्या देशांतून एक प्रकारचें कमळ आणितात, त्याचा उपयोग बाळंतिणीस विलक्षण तऱ्हेनें होत असल्यानें ती गोष्ट येथें नमूद करून ठेवितों. त्या कमळाचें नांव प्रसूति कमळ किंवा गर्भकमळ. अडलेल्या स्त्रीस त्याचा उपयोग होतो ह्मणतात. तो असाः— ज्या खोलींत अडलेली स्त्री असेल, त्या खोलीत, तें कमळ आणावें. कांचेच्या किंवा कोणत्या तरी मोठ्याशा भांड्यांत पाणी घालून, त्यांत तें कमळ टाकावें. कमळ टाकल्यानंतर, पाण्यांत तें उमलूं लागतें. जसजसें कमळ उमलूं लागतें, तसतसें गर्भिणीचें प्रसूति द्वार खुलें होत जातें, व मूल उपजतें. मूल उपजतांच, तें कमळ पाण्यांतून काढून टाकावें. व पाणी प्रसूतीच्या अंगावर शिंपावें. तें कमळ काढल्यानंतर, तें पुन्हां मिटूं लागतें. जर तें कमळ पाण्यांतून काढण्याचें विस्मरणानें राहिलें, तर प्रसूतीला फार त्रास होतो ह्मणतात. व प्रसूतिद्वार जास्त मोकळें होत जाऊन, रक्तस्राव वगैरे होऊं लागतो. परंतु पाण्यांतून काढल्यानें, गर्भाशयाचें आकुंचन व्हावयास लागून, प्रसूतीला त्रास होत नाहीं. ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट होय. एका कमळाचा सात आठ स्त्रियांना उपयोग होतो. पुढें त्याची उकलण्याची शक्ती राहत नाहीं; त्यामुळें उपयोग होत नाहीं.

सृष्टींत अगाध शक्ती भरलेली आहे. परंतु, ती व्यक्त करण्याचें साधन, मन

होय. मनाची व्यक्तता शरीराशिवाय नाहीं. शरीरामार्फत मनोद्वारें, कोणत्याही मूळ सांठ्यांतून निघालेल्या शक्तीचा उपयोग होणें शक्य असल्यामुळें, औषधीद्वारें, मंत्रद्वारें, तपद्वारें सामर्थ्याचा भोग प्राण्यांना होणें शक्य आहे.

योगशास्त्राचें साध्य समाधी हें होय. समाधीपासून सिद्धी प्राप्त होत असते. वर ज्या पांच प्रकारच्या सिद्धी सांगितल्या, त्या सर्व सिद्धींपेक्षां, समाधिसिद्धी ही मुख्य होय. ह्या सिद्धीनेंच मोक्ष मिळेल; इतरांनीं मिळणार नाहीं. समाधींत ऐहिक, व पारमार्थिकही इच्छा पुरविण्याचें सामर्थ्य असल्यानें, ऐहिक सोडून पारमार्थिकाकडे जर कोणी लक्ष पुरवील तर, मुक्ती मिळण्याचें तें साधन होय. ह्मणून ही सिद्धी मुख्य होय.

**सूत्रार्थ**—कांहीं औषधीच्या द्वारें सिद्धी होतात. कांहीं मंत्रापासून, तपापासून व समाधीपासूनही सिद्धी प्राप्त होत असतात.

२ चालू जन्मांतील सिद्धी, मागील जन्मांतील सुकृतीचें फळ, वगैरे कथन केल्यानें नंदीकेश्वराला त्याच जन्मांत देवपणाची सिद्धी जाहल्याचें, पुराणांतून असल्यानें, हें व्हावें कसें, असा प्रश्न सहजीं येतो; त्यास उत्तरा दाखलं पुढील सूत्र आहे.

## जात्यन्तरपरिणामः प्रकृत्यापूरात् ॥ २ ॥

जात्यंतर परिणामः प्रकृति, आपूरात्

प्रकृत्यापूरात् जात्यंतरपरिणामः । अन्या जातिः जात्यन्तरं । नंदिकेश्वराला मनुष्य देह टाकून, दिव्य देह एकाच जन्मांत प्राप्त झाला. देहान्तर मिळालें. हीच सिद्धी. शंकराचा भक्त बनला व कैलासावर राहिला.

आपूरात्=पूर्णतेमुळें. देव देहांतले परमाणू हे आपूर्ण झाले, ह्मणजे परमाणूचें भरणें पूर्ण झालें. मनुष्य देहाचे प्रकृति परमाणू निराळे, ते मनुष्य देहाचे परमाणू बदलूं लागले, व देवदेहाचे परमाणू परमाणू मिळूं लागले, व पूर्ण झाले ह्मणजे, अन्य जाति प्राप्त झाली.

प्रकृत्यापूरात्—प्रकृती जर स्थिर नाहीं, तर क्षणोक्षणीं स्थित्यंतर कां होत नाहीं? असा प्रश्न; तर विशिष्टत्व नष्ट झाल्यानें, अन्य स्थित्यंतर होईल. जें स्थित्यंतर, कांहीं अडकावानें, सामान्य प्राण्यांना मिळणें अशक्य, तें एकाच जन्मांत

योग्यांना होऊं शकते. प्रकृतीचें स्थित्यंतर न होतां, ती देहांत अडकून राहिली आहे, त्या अडकावाचें कारण काढून टाकलें, ह्मणजे अग्नीप्रमाणें, जसा रानांत अग्नि एक ठिकाणीं असतां, अडकावानें–प्रतिबंधानें गुंतलेला असतो; परंतु तो अडकाव काढिल्यानें, पुष्कळ ठिणग्या होऊं शकतात, व वणवा लागतो, ह्मणजे अग्नीचें सामान्यत्व आग लागणें, हें, अडकाव निघाल्यानें, प्रकट होतें, तसेंच प्रकृतीचें सामान्यत्व, तें दुसऱ्या जातींना उत्पन्न करितें. प्रकृतीचें विशिष्टत्व नष्ट केलें ( जसें ब्राह्मणाचें ब्राह्मणत्व ) ह्मणजे, सामान्यत्व राहिलें. तें सामान्यत्व जात्यंतराला कारण होईल.

नंदिकेश्वराला अन्य जातीचा त्याच देहांत ( परिणाम झाला, ) मनुष्यशरीर व इंद्रियें, यांचा पालट होऊन, देवशरीर व दिव्य विषय यांचा संग्रह करणारीं इंद्रियें, प्राप्त झालीं; हा जो फरक झाला, तो संकल्पमात्रें झालेला नव्हे, तर प्रकृतीच्या परमाणू परमाणूंच्या, पंचभूतें, अस्मिता, वगैरेच्या पुरवठ्यानें, ( मोबदल्यानें ) झाला. योगबलानें, इंद्रियांची प्रकृती दूर होऊन, देवशरीर व तदनुकूल प्रकृतीची भरती झाली. तात्पर्य, योगबलानें देहान्तर करितां येणें शक्य आहे असें सिद्ध झालें.

**सूत्रार्थः**—एका देहांतील प्रकृतीचे परमाणू पूर्ण झाले, ह्मणजे अन्य जाती हा परिणाम होतो.

धर्मादि ह्मणजे धर्म, अधर्म, हीं कारणें प्रकृती बदलण्याला सांगितलीं, व प्रकृतीचा पुरवठा झाल्यानें, अन्य जाती उत्पन्न होते ह्मणून ह्या सूत्रांत सांगितलें, हा विरोध खुला करण्यासाठीं हें तिसरें सूत्र होय.

**निमित्तमप्रयोजकं प्रकृतीनां वरणभेदस्तु ततःक्षेत्रिकवत् ॥३ ॥**

निमित्तं अप्रयोजकं प्रकृतीनां वरणभेदः तु ततः क्षेत्रिकवत्

निमित्तं=पापपुण्य धर्मादि ( धर्म किंवा अधर्म ) जात्यंतर होण्याला धर्मादि कारण नाहीं; पापपुण्याचा अडकाव होता, ह्मणून देव परमाणू येऊं शकले नाहींत. वरण=Surrounding wall, Bridge, A Rampart आच्छादन, बांध. भेद=फोडणें. अप्रयोजकं. प्रयोजक=कारण. अप्रयोजकं=कारण होत नाहीं. जात्यंतर परिणामाला पापपुण्य हें कारण होत नाहीं. नंदिकेश्वराच्या पुण्यानें प्रकृतीला खालीं जाऊं दिली नाहीं, वरचा बांध पापाचा असल्यानें, वरती ती जात नाहीं व पुण्याचा

बांध खालीं असल्यानें, अधोगतीला जात नाहीं. प्रकृतीचा ओघ ऊर्ध्व किंवा अधोगतीला पाहिजे असेल, तर, पापपुण्याचे बांधांनीं, शेतकऱ्याप्रमाणें फिरवावा. पुण्याचा बांध घातला तर, खालीं जाणार नाहीं पापाचा असला तर वर जाणार नाहीं.

"प्रकृतीनां निमित्तं ( धर्मादि ) अप्रयोजकं प्रकृतीनां वरण ( बांध ) भेदस्तु क्षेत्रिकवत् । नहि धर्मादि निमित्तं तत्प्रयोजकं प्रकृतीनां भवति । न कार्येण कारणं प्रवर्त्यते इति । कथं तर्हि वरणभेदस्तु ततः क्षेत्रिकवत् ।"

धर्म अधर्म हीं कारणें, प्रकृतीला निमित्त मात्र आहेत. तीं जातीचा वगैरे फेरफार करीत नाहींत. कार्यानें कारण प्रवृत्त होत नसतें. धर्माधर्म, हीं प्रकृतीचीं कार्ये आहेत. धर्माधर्म हे, देवशरीर प्राप्त होण्याला मधील अडथळे दूर करितात. जसा शेतकरी, खालच्या शेतांत पाणी नेण्याकरितां, मधील अडथळा जो मातीचा उंचवटा, तो काढून टाकतो, मग तें पाणी अडथळा निघाल्यानें, पुढें सरकून, खालील शेताला आपोआप मिळतें. तद्वत्च धर्म हा प्रकृतीचा प्रतिबंधक जो अधर्म त्याला दूर करितो; मग प्रकृती पाण्याप्रमाणें आपोआपच आपले विकार पुढें सरकविते.

शेतकरी शेतांत धान्य पेरतो, परंतु त्या धान्यांत रस घालूं शकत नाहीं. शेताला पाणी दिल्यानें, लागणारा रस आपोआप धान्य मातींतून घेऊं शकतें. जशीं मनुष्यें धान्य वगैरे शिजवून पोटांत ढकलतात, तें पचविण्याचें काम त्यांच्या हातचें नाहीं, तें मानवी शक्ती बाहेरचें आहे. ( गीता अ. १५ श्लो. १४ **अहं वैश्वानरो भूत्वा वगैरे.** ) त्याचप्रमाणें धर्म हा अधर्माच्या नाशाला ( ओघ फिरविण्याला ) कारण मात्र होतो. शेतकरी जसा पाण्याच्या मार्गातील अडथळे दूर करितो, मग पाण्याचा प्रवाह, सहज पुढें सरकतो, त्याचप्रमाणें धर्म, अधर्म हीं, प्रकृति बदलण्याचीं कारणें नसून, अडथळे दूर करणारीं साधनें मात्र आहेत.

मनुष्यामध्यें सर्व सामर्थ्य आहे; परंतु तें सामर्थ्य प्रकट होण्याच्या मार्गात अडथळे आहेत, त्यामुळें तें व्यक्त होत नाहीं. ते अडथळे दूर झाले म्हणजे मनुष्याचें सामर्थ्य, अर्थात् पूर्णत्व, स्वभावतः प्रकट होईल. मग त्याच्या सामर्थ्याची प्रतीति त्यास येईल. मनुष्याची धडपड पूर्णत्वाकडेच सदोदित असते. मधील लालचीचे अडथळे असल्यामुळें, तो धोक्यांत व घोटाळ्यांत पडतो. धार्मिक खटपटी ह्या पूर्णत्वास जाण्याचीं साधनें आहेत. अज्ञान हें शेताप्रमाणें मधील बांध होय. तो बांध, फोडावा कसा, व कोठें, हेंच आपणास शिकलें पाहिजे. आपलें

जीवित हें, अडथळे, किंवा अज्ञान, यांचेंच फळ होय. जगांतील चढाओढ, व सुंदर वस्तूकडे ओढा, हीं अज्ञानाचींच फळें आहेत. सारांश—आपलें जीवित हा अज्ञानाचा मूर्तिमंत पुतळाच होय.

**सूत्रार्थः**—जात्यंतर होण्याला धर्म, अधर्म हीं कारणें होत नाहींत. तर शेतकऱ्याप्रमाणें प्रकृतीचे मधील अडथळे काढून टाण्याला, साधनें मात्र आहेत.

## ४ निर्माणचित्तान्यस्मितामात्रात् ॥ ४ ॥

निर्माण चित्तानि अस्मिता मात्रात्

अस्मितामात्रात्=केवळ अहंकारानें; निर्माणानि च तानि चित्तानि च, निर्माण चित्तानि, उत्पन्न केलेलीं योग्याचीं चित्तें अनेक असतात. योगी एकाच जन्मांत भिन्न भिन्न देह उत्पन्न करूं शकतो. उदाहरणार्थ—**किंतम ऋषीनें** हरणाचें स्वरूप धारण केलें होतें. जेव्हां योगी भिन्न भिन्न देह धारण करितो तेव्हां त्याचीं मनें भिन्न भिन्न, का एकच, हा प्रश्न. तो जी कायाव्यूह (अनेक शरीरें) शक्ति धारण करितो, ती शक्ती, अनेक देहांना, चित्तांचा पुरवठा करिते.

योगी अनेक शरीरें धारण करण्याचें कारण, अनेक शरीरांच्या द्वारें, आपले भोग संपवून, ते नष्ट व्हावे. ह्या अनेक शरीरांकरितां अनेक चित्तें निर्माण करितो.

आत्मा हा निर्लेप, शुद्ध, बुद्ध, निरंजन आहे; मग अशीं अनेक शरीरें धारण केल्यानें, त्यापासून आत्म्याला लेप होईल कीं काय ? तर अनेक शरीरांच्या द्वारें बऱ्यावाईट कृत्त्यांपासून आत्म्याला लेप तर होणार नाहींच; परंतु अनेक शरीराद्वारें जर तो चांगलीं कृत्यें करील तर, आत्म्यावरील आवरणें कमी होऊन, त्याच्या प्रकाशाला मदत होईल; वाईट कृत्यें करील तर, आत्म्यावर मळाचें आवरण वाढून, त्याच्या प्रकाशाला तीं कृत्यें लोपवितील, व हा योगी त्या आत्म्याच्या प्रकाशाला मुकेल.

**सूत्रार्थः**—अहंकारापासून उत्पन्न झालेलीं योग्याचीं चित्तें, अनेक असतात. अनेक देह धारण केले तर, प्रत्येक शरीरागणीत चित्तें, योगी धारण करितो.

## प्रवृत्तिभेदे प्रयोजकं चित्तमेकमनेकेषाम् ॥ ५ ॥

प्रवृत्तिभेदे प्रयोजकं चित्तम् एकम् अनेकेषां; प्रवृत्तिभेदे=भिन्न प्रकारची प्रवृत्ति, प्रयोजक ( A founder, an institutor, Legislator. ) अनेक चित्तें

निर्माण झालीं, व त्या अनेक चित्तांना भोग झाले; पण ज्यानें अनेक चित्तें उत्पन्न केलीं, त्या चित्ताला भोग कसे मिळावे. भिन्न भिन्न प्रकारच्या प्रवृत्तीला, एकं चित्तं प्रयोजकं. एक चित्त हेंच प्रयोजक असतें. ह्मणून त्या प्रयोजकचित्तानें, केलेल्या भिन्न भिन्न प्रवृत्ती, त्यांचे भोग मुख्य प्रयोजक चित्ताला, सुख, दुःखाला कारण होतात. निरनिराळ्या चित्तांचे भोग, हे मुख्य प्रयोजक चित्ताला घडतात. आपण ज्याप्रमाणें कान, डोळे, जिव्हा वगैरे इंद्रियांकडून कामें करवून भोग घेतों, त्याप्रमाणें, योगप्रभावेंकरून, योगी एकट्या चित्ताचा अंमल, उत्पन्न केलेल्या अनेक चित्तांवर चालवून, त्याजकडून, अनुकूल कार्यें करून घेतो. भिन्न शरीरें, व चित्तें, अस्मितेपासून उत्पन्न झालेलीं असल्यामुळें, त्या दोघांचीही जननी अस्मिता, अहंकारच होय. त्या अस्मितेवर ताबा मिळाल्यानें, निर्माण-केलेल्या अनेक देहांवर, व चित्तांवर, ताबा योगी सहज मिळवूं शकतो.

**सूत्रार्थः**—अनेक चित्तें निर्माण केलीं तरी, मुख्य चित्त अनेक चित्तांचें नियमन करितें.

६ अनेक चित्तें उत्पन्न झालीं तरी मोक्षाला योग्य चित्त–

## तत्र ध्यानजमनाशयम् ॥ ६ ॥

तत्र=सूत्र १ यांत सांगितलेल्या पांच प्रकारच्या सिद्धींनीं, तयार झालेलीं जीं पांच प्रकारचीं चित्तें, त्यामध्यें. ध्यानजं=ध्यानात् जातं ध्यानजं=समाधिजसिद्धीनें सिद्ध-झालेलें चित्त, हें अनाशय होतें. अनाशय ह्म० अन+आशय. आशय=कर्मांचा सांठा, अनाशय=वासना रहित. कर्मांचा सांठा नष्ट होतो.

नाना प्रकारच्या माणसांत, नाना प्रकारचीं मनें, जरी आढळलीं, तरी ध्यान धरून तयार केलेलें जें चित्त, ह्मणजे समाधीपर्यंत ज्याची मजल पोंचली, त्याचें चित्त, उच्च दर्जाचें होय. पहिल्या सूत्रांत सांगितल्याप्रमाणें, औषधींच्या सेवनानें, मंत्रानें, तपानें, किंवा पूर्ण सुकृतीनें, जरी सिद्धी मिळविल्या, तरी त्या सिद्धींपासून तो माणूस वासनारहित होणार नाहीं. जेव्हां ध्यानानें समाधी साधून, त्यांत मग्न झाला, तोच माणूस, व तें त्याचें चित्त, निरिच्छ होईल.

**सूत्रार्थः**—प्रथम सूत्रांत सांगितलेल्या पांच प्रकारच्या सिद्धींपासून, तयार झालेलीं जीं मनें, त्यामध्यें समाधीपासून सिद्ध झालेलें चित्त, हें कर्मांच्या सांठ्याविरहित होतें-कर्मवासना टाकतें.

७ कर्मांचा सांठा टाकतें, तर, योग्याचें कर्म कसें ?

**कर्माशुक्लाकृष्णं योगिनस्त्रिविधमितरेषाम् ॥ ७ ॥**

कर्म अशुक्ल अकृष्णं योगिनः त्रिविधं इतरेषाम् ।

योग्याचें कर्म अशुक्ल ह्मणजे पांढरें नव्हे, व अकृष्ण ह्मणजे काळें नव्हे. योग्यांशिवाय इतरांचें कर्म त्रिविध असतें.

कर्मांचे भेद चार आहेत.

१ दुर्जनांचीं सर्व कर्मे, कृष्ण कर्मे असतात. २ यज्ञ कर्म, शुक्ल व कृष्ण पण असतें. पुण्यामुळें शुक्ल व हिंसेमुळें कृष्ण कर्म असतें. यज्ञांत पशूचा वध होतो; मुंग्या वगैरे मरतात. १ कंडणी २ पेषणी, ३ चुल्ली ४ उदकुम्भीच ५ मार्जनी वगैरे मुळें पांच प्रकारें दोष लागतात, नाना प्रकारच्या झाडांच्या समिधा तोडून आणतात, ह्मणून झाडांना त्रास होतो. ३ तपश्चर्या कर्म केवल शुक्ल. तपःस्वाध्यायध्यानवतां शुक्ला जातिः ४ ह्मणून योग्याचें कर्म शुक्ल नाहीं, व कृष्ण नाहीं, असें कर्म. याप्रमाणें कर्मांचे प्रकार चार झाले १ कृष्ण कर्म. २ शुक्लकर्म. ३ शुक्लकृष्णकर्म. ४ शुक्ल नव्हे व कृष्ण नव्हे असें कर्म.

१ कृष्णकर्मानें दुसऱ्यास पीडा होते; दुष्ट, हिंसा करणारे यांच्या हातून होणारें तें. २ शुक्ल कर्म. मनांत कांहीं कामना धरून मंत्र, जप, तप, वगैरे बाह्य साधनांशिवाय मनानेंच होत असल्यानें, तीं दुसऱ्यास पीडा देणारीं कर्मे नव्हत, ह्मणून शुक्ल कर्मे--

३ शुक्लकृष्णकर्म—यज्ञयागादि कर्मे, ज्यामध्यें बाह्य सामग्री तयार करितांना पशू, मुंग्या, झाडांच्या समिधा वगैरेंना त्रास होतो. परंतु देवतांची आराधना असल्यानें, त्यांचा अनुग्रह होतो, ह्मणून तीं कर्मे शुक्लकृष्ण होत.

आतां चवथें कर्म योग्याचें.—ज्यांनीं सर्वसंगपरित्याग केला आहे, अशाच्या हातून शुक्लकर्म घडत नाहीं, व कृष्ण कर्मांचें तर नांवच नको; याचें निष्काम कर्म असल्यानें, तें अशुक्ल व अकृष्ण असें असतें. इतरांचीं कर्मे वर सांगितल्याप्रमाणें तीन प्रकारचीं असतात.

**सूत्रार्थः**—अशुक्ल व अकृष्ण असें योग्याचें कर्म असतें; व इतरांचें ह्मणजे सामान्य माणसांचें वर सांगितल्याप्रमाणें कृष्ण, शुक्ल, व शुक्लकृष्ण अशीं त्रिविध कर्मे असतात.

## ८ तीन प्रकारच्या कर्मांचें फळ.

### ततस्तद्विपाकानुगुणानामेवाभिव्यक्तिर्वासनानाम् ॥८॥

ततः तत् विपाक अनुगुणानाम् एव अभिव्यक्तिः वासनानाम्

ततः= त्या त्रिविध कर्मांपासून; विपाक= परिणाम, अनुगुण= अनुरूप. कर्मणः यो विपाकः तस्य अनुगुणा या वासनाः तासां एव अभिव्यक्तिः अभिव्यक्तिः= स्पष्टता. त्या विपाकाला अनुरूप अशी वासना, व अभिव्यक्ति=चित्ताची स्पष्टता होते, वासना उत्पन्न होतात. वासना उत्पन्न होण्याचें कारण, तीं कर्मे सांसारिक माणसांचीं होत—योग्याचीं नव्हत. माणसाला, चोरी करण्याची बुद्धि होते, ती बुद्धि होणें, हें मागील कर्मांचें फळ होय; जर पुढें वाईट फळें नको असतील, तर ह्या जन्मांत सुकृति—शुक्ल कर्मे आचरावीं, ह्मणजे पुढील वाईट वासना टळतील. तद्विपाकानुगुणानामेव=ज्या प्रकारच्या कर्मांपासून परिणाम झाला, त्याला अनुरूप ( अनुकूल ) अशाच वासनांची स्पष्टता दिसूं लागते. वासना दोन प्रकारच्या, कांहीं वासनांनीं आयुष्य, जाती, व भोग, प्राप्त होतात. व कांहींचे संस्कार Impression स्मरण फक्त राहतें. ह्या स्मरणरूपानें राहिलेल्या वासना, ज्या शरिरांतील राहिलेल्या असतील, त्या त्या, शरिराच्या उत्पत्तिकाळीं, शरिरास उत्पन्न करणाऱ्या कर्मफलास, अनुकूल, अशाच प्रकारच्या वासना, प्रकट होतात. व त्या वासनानुरूप स्मृति जागृत होते. मनुष्यशरीर प्राप्त झालें ह्मणजे, क्षुधा, तृष्णा, उत्पन्न होते. व इतर शरिरांतील वासना, तशाच संचित राहतात! देवयोनींत जन्म घेतला तर, क्षुधा तृष्णा, ह्या वासना संचित राहतील; देवयोनींतील विलासांची आठवण येईल, ह्मणजे परिस्थिती अनुरूप वासना उद्भवतात. वासना तृप्त होण्याजोगी परिस्थिती प्राप्त झाली कीं, त्याबरहुकूम, वासना स्पष्टतेस येतात. बाकीच्या गुप्त राहतात. मानवी देहांत अनेक वासना उद्भवतात. त्यांत कांहीं दैवी, कांहीं मानवी, कांहीं आसुरी वासना असतात. क्रूर पशुयोनींत, आसुरी वासना प्रकट होतील, बाकीच्या संचित राहतील. कारण क्रूर पशुयोनींत, त्या वासनांना प्रकट होण्यास, अनुकूल परिस्थिती झालेली असते. यावरून परिस्थित्यनुरूप कर्मे, व कर्मविपाक, उदय पावून, फलद्रूप होतात, हें सिद्ध होतें. योगबलानें आपली परिस्थिती जर बदलतां आली, तर, वाईट कर्मे, व त्या कर्मांचे परिणाम, टाळतां येणें शक्य आहे.

**सूत्रार्थः**—त्या विविध कर्मांपासून, जो विपाक, जें फळ मिळतें, तें वासनांना अनुरूप असतें. ( अशी कर्मांची फलप्राप्ति होते. )

**जातिदेशकालव्यवहितानामप्यानन्तर्यं स्मृतिसंस्कारयोरेकरूपत्वात् ॥ ९ ॥**

जाति, देश, काल, व्यवहितानाम् अपि आनन्तर्यंत स्मृतिसंस्कारयोः एकरूपत्वात्

अनेक कर्मे क्षणोक्षणीं होतात. परंतु तीं उन्मुख होतील, तेव्हांच फळें देणारीं होतील. कर्मफलांना मध्यें जरी अनेक जन्मांचें अवधान, Obstruction, Intervention, Cover असलें, तरी कर्मफलकाळींच, तशा अनुकूल वासना स्पष्ट होतात. जवळचीं जीं कर्मे असतात त्यांनीं वासना त्वरित बनण्याचा संभव असतो. व्यवहित=Placed apart, Obstructed, Separated by anything intervening दूर भासणारीं. जातीनें व्यवहित, कालानें व देशानें व्यवहित, जरी कर्मे असलीं तरी, आनन्तर्य=सामीप्यं, कारण संस्काराशिवाय स्मृति व्हावयाची नाहीं. स्मृतीमध्यें संस्कार आहेतच; संस्काराशिवाय स्मृति होणार नाहीं. अन्ते मतिः सा गतिः त्या वेळच्या कर्मांच्या वासना नष्ट असल्या, तरी जवळच आहेत. स्मृतिसंस्कारयोः एकरूपत्वात् स्मृती व संस्कार एकरूप—समान जातीय असल्यामुळें.

" स्मृतिसंस्कारयोः एकरूपत्वात् यथानुभवास्तथा संस्कारास्तेच कर्मवासनानुरूपाः। यथाच वासनास्तथा स्मृतिः । इति जातिदेशकालव्यवहितेभ्यः संस्कारेभ्यः स्मृतिः । स्मृतेश्च पुनः संस्कारा इत्येते स्मृतिसंस्काराः कर्माशयवृत्तिलाभात् व्यज्यन्ते अतश्च व्यवहितानामपि निमित्तनैमित्तिकभावानुच्छेदादानन्तर्यमेव सिद्धमिति । "

स्मृति व संस्कार एकच असल्यामुळें, जसे ( सुख दुःखाचे ) अनुभव, तसेच संस्कार, व जसे संस्कार, तशा कर्मवासना; वासना तसें स्मरण; याप्रमाणें या वानना व संस्कारचक्रामध्यें जन्म, देश व काल याचें व्यवधान (Obstruction) असलें तरी, संस्कारापासून स्मृति, व स्मृतीपासून संस्कार, या एकामागून एक गोलांटा खात असल्यानें, स्मृतीला हेतुभूत संस्कार प्रकट होतात. कार्यकारणभाव जर कायम आहे, तर त्यांचा जवळपणाच सिद्ध होतो. एक जन्म घेतल्यानंतर मध्यें

अनेक जन्म गेले, त्यामुळें अनेक जाति झाली; अनेक देश येऊन गेले, व अनेक काळ लोटून गेला, त्यामुळें व्यवधान जरी ह्या दोन एकरूप जन्मांमध्यें आलें, तरी प्रथम जन्मानंतर हजारों योनी अनुभविल्या खऱ्या, परंतु त्या स्वरूपाचा जन्म येतांच, त्या जन्माला अनुकूल ( अनुरूप ) अशाच वासना, मधल्या योनींतील वासना, लुप्त ( गुप्त ) होऊन प्रकट होतात. कारण त्या वासनांना अनुरूप असा देह उत्पन्न झाल्याबरोबर, तशाच त्या पूर्वींच्या जन्मांतल्या वासना उद्भूत होऊं लागतात मध्यंतरींचे, जाति, देश, काल, अनेक प्रकारें, पुष्कळ गेले असले, तरी ह्या शरीरानुकूल वासनांना मधील धारण केलेल्या अन्य योनींतील वासनांचें व्यवधान होत नाहीं. कारण स्मृती इत्यादि वासना फळाचीं साधनें, तदनुरूप नसल्यानें, मधल्यांनीं व्यवाहित होत नाहींत; तर आनन्तर्य-समीपच होतात, कारण स्मृति-संस्कार एकच आहेत. त्या पूर्व जन्मांतील कर्मांनीं, वासनेचे संस्कार, संस्कारामुळें स्मृति, स्मृतमुळें सुख दुःखांचा अनुभव, अनुभवामुळें पुन्हां संस्कार, हा क्रम चालणार; तो क्रम बंद करण्याचें साधन, उलट गेलें ह्मणजे वासना टाकून कर्म बंद केलें, तर, हें चक्र बंद पडून, ह्या भवसागरांतून प्राणी सुटेल; एरव्हीं हा क्रम चालणारच.

**सूत्रार्थः**—स्मृति संस्कार-हे एकरूपच असल्यानें, एक जन्मांतील वासना, ह्या, मधील अनंत योनींतील अनंत जन्मांच्या वासनांनीं, जाति, देश, काल ह्यांनीं ( व्यवाहित ) दूर झालेल्या असल्या तरी, त्या जवळच आहेत असें समजावें.

## तासामनादित्वं चाशिषो नित्यत्वात् ॥ १० ॥

तासाम् अनादित्वं च आशिषः नित्यत्वात्. तासाम्, वासनानाम् नित्यत्वात् आशिषः अनादित्वं-तासाम्=वासनानाम्. आशिष, Wish, Desire इच्छा, वासना अनादि आहेत, ह्मणून इच्छा नित्य झाल्या आहेत. मनुष्याला सुखदुःखाचा अनुभव आल्यानंतरच, सुखाबद्दल वासना, व दुःखाबद्दल तिटकारा उत्पन्न होतो; ह्मणजे अनुभवानंतर वासना, वासनेचे संस्कार, संस्काराची स्मृती, याप्रमाणें हें चक्र चालतें. तेव्हां आतां असा प्रश्न निघतो कीं, आधीं वासना, का आधीं अनुभवः, आरंभ कोठून धरावयाचा ? त्यास उत्तर-प्रत्येक प्राणी सुखाच्या पाठीस लागलेला आढळतो; मला सदोदित सुख मिळावें, दुःख नसावें, व आपण सदोदित जगावें, मरण मला नसावें, अशी इच्छा करितो. मरण नसावें अशी इच्छा करण्याचें कारण, मर-

णाचा कांहीं तरी त्रास असला पाहिजे, व तो त्रास, पूर्व जन्मांत अनुभविल्याचा संस्कार, ह्याच्या मनावर होऊन, त्या संस्काराची स्मृति, प्राण्याला होत असावी. त्यामुळें मरणाचा तो तिटकारा करितो, व सदोदित सुख, सुख, अशी इच्छा करितो. ह्या सुखाच्या इच्छेनें, कर्म करूं लागतो; कर्मोपासून सुखदुःखाचा अनुभव, अनुभवापासून संस्कार, ह्मणजे संस्कार पुढील कर्मास बीजरूप होतात. ह्मणजे संस्कार हे जन्माला कारण झाले. जन्मतः इच्छा ह्या आहेतच; त्यांची नष्टता जन्म सुटेपर्यंत होणें शक्य नाहीं. **सहयज्ञाः** ( स्वकर्मासह ) **प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः** गी. ३.१०

मनुष्याची उत्पत्तीच मुळीं कर्मासह ह्म. वासनांनीं आहे. इतकेंच नव्हे तर मनुष्यदेह वासनांचा पुतळाच आहे. ह्मणून इच्छांचें वासनांचें अनादित्व मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं. इच्छा नित्य मानल्या ह्मणजे वासनांचें अनादित्व सहजीं सिद्ध होतें. ह्मणून वासना अनादि व सान्त मानल्या पाहिजेत. कारण हिरण्यगर्भापासूनच अहंकारानें, वासनांनीं, मूळ उत्पत्ती, मानली आहे. मूळ, वासनांनीं सरकेलेलें आहे.

**सूत्रार्थः**—इच्छेच्या नित्यत्वामुळें वासनांचें अनादित्व सिद्ध होतें. मोहक सुखदायक भासणाऱ्या वस्तूंविषयीं नेहमीं इच्छा होते, ह्मणून वासना अनादि आहेत.

## हेतुफलाश्रयालम्बनैः संगृहीतत्वादेषामभावे तदभावः॥११॥

हेतु फल, आश्रय, आलम्बनैः, संगृहतित्वात् , एषां अभावे, तत् अभावः

हेतु=कारण; फल=कार्य; आश्रय=ठिकाण; आलंबन Support आधार. Depending on, हेतु=कारण घेतलेलें असतें तें; धर्मात् सुखं । अधर्मात् दुःखं । सुखाच्या वासना धर्म ( पुण्य ) करितात. दुःखाच्या वासना, अधर्माला प्रवृत्त करितात. धर्म अधर्माला कारण ( हेतु ) अविद्या जें वासनांचें मूळ कारण. अविद्या तोच हेतु. फल, वासनांचें फळ मिळतें तें वासनांचें कार्य होय.

आश्रय=आश्रय आहे मन, मनांत वासना उत्पन्न होतात, मनाचा आश्रय मिळाल्यानें, वासनेंना ठिकाणा झाला. ठिकाणा मिळाल्यानें, त्या वास करितात. आलम्बन=दुष्यंत राजाच्या दरबारांत शकुन्तला आली, तेव्हां तो ह्मणे-तुझी ओळख काय ? तूं कोण ? तुझा माझा कांहीं संबंध तरी ! असें जरी राजा बोलत होता, तरी त्याचें मन, आंतून,' कोठें तरी पाहिल्याचें, ह्मणजे

आलम्बनाची आठवण देत होतें. आलम्बन ह्मणजे बाह्य पदार्थांचा अनुभव घेतल्या-नंतर सन्मुख पुढें पदार्थ असतांना, स्मृतिरूप वासना उत्पन्न होते, त्यालाच त्या पदार्थांचें आलम्बन ह्मणतात. दुर्योधन राजाला आपलें पांडवांशीं वर्तन नीट नसल्याचें आंतून भासत होतें. परंतु आंतील संस्काराश्रय तसेंच असल्यानें त्यापासून तो फिरेना. तो ह्मणतो. **जानामि धर्मं न च मे प्रवृत्तिः। जानाम्यधर्मं न च मे निवृत्तिः। केनापि देवेन हृदि स्थितेन । यथा प्रयुक्तोस्मि तथा करोमि ।** सूत्र १० यांत सांगितलें कीं वासना अनादि आहेत; त्यांपासून सुटावें कसें ? तर वासना ह्या ज्याच्या आश्रयानें राहतात, तो आश्रय जर नाहींसा केला, त्या वासनांचा आश्रयच जर उडविला, तर त्या येणार कोठून ? **संकल्प-मूलः कामो वै यज्ञाः संकल्पसंभवाः। काम जानामि ते मूलं संक-ल्पात्त्वं हि जायसे॥ न त्वां तं कल्पयिष्यामि तेन मे न भविष्यसि** इति स्मृतेः अज्ञान हें वासनांचे कारण ( हेतु ) आहे. सुखदुःखांचा अनुभव, व त्यामुळें प्रीति, किंवा द्वेष, हें त्याचें कार्य आहे. ह्मणजे कार्य कारण हा वासनांचा आश्रय झाला. त्या वासनांचे अनुभवाचे संस्कार, संस्कारामुळें स्मृती, ही, वासनांचें कारण होय. तृप्त न झालेल्या वासना जरी कांहीं वेळ नष्ट झाल्याशा दिसल्या, तरी त्यांचें संस्कार राहातात. संस्कारामुळें बीज-रूपानें त्या राहतात. संस्कार स्मृति यांचें रूप एकच असल्यानें, स्मृतीनें त्या उठतात. बुद्धी हा वासनांचा आश्रय, अनुभवानें आलंबन, स्मृतिद्वारें आलंबन ह्मणजे कार्य कारण आश्रयालम्बन हीं वासनांचीं बीजें होत. त्या बीजांना ठिकाणा मिळा-ल्यानें, त्या सांठून, त्यांचा संग्रह होतो. कर्म घडून त्या फलद्रूप होईपर्यंत, त्या नष्ट होत नाहींत चित्त इंद्रियद्वारा बाह्य विषयांचें ग्रहण करीत आहे तोंपर्यंत, नवीन नवीन वासना उत्पन्न होणार. जर, त्या वासनांचा हेतु, फल, आश्रय, आलम्बन यांचा नायनाट केला तर, त्या वासनांचा नायनाट होईल. हेतुफलाश्रयालम्बनैः संगृहीताः सर्वाः वासनाः एषां अभावे तत्संश्रयाणामपि वासनानामभावः ।

**सूत्रार्थः**—हेतु, फल, आश्रय आणि आलम्बन, यांच्याशीं वासनांचा संबंध असल्यानें, ह्यांचा अभाव झाला कीं, वासनांचा अभाव झाला ह्मणून समजावें. अनन्तावधी वासनांचा संग्रह, हा, हेतु, फल, आश्रय व आलम्बन याच्यायोगें झालेला आहे. हेतु वगैरेंचा नाश झाला ह्मणजे त्यांच्या आश्रयानें राहणाऱ्या वासना, यांचाही नाश होतो. कारणनाशात् कार्यनाशो भवति.

१२ सत्कार्यवादामुळें वासनांचा समूळ नाश संभवतो कसा ?

## अतीतानागतं स्वरूपतोऽस्त्यध्वभेदाद्धर्माणाम् ॥ १२ ॥

अतीत, अनागतं, स्वरूपतः, अस्ति, अध्वभेदात्, धर्माणाम्.

अतीत=भूत, अनागत=भविष्य. अतीतानागतं=भूत व भविष्य. अध्वभेदात् ( अध्वन्=मार्ग, भेद=निराळेपणा ) निराळे मार्ग असल्यामुळें, अतीतं च अनागतं च अनयोः समाहारः—अतीतानागतं । स्वरूपतः=प्रत्यक्ष.

सांख्य, योग, व वेदान्त यांचें ह्मणणें दृष्टीस पडणारें नष्ट झालेंसें वाटलें तरी, या तिघांच्या मतें, मूल वस्तूचा नाश केव्हांही होत नाहीं; वस्तु अविनाशी आहे. नाश कशाचाही होत नाहीं. उदाहरणार्थ—पंखा घेतलेला व तो जाळला. जाळल्यानंतर पंख्याचा पंखेपणा नाहींसा झाला, तरी वस्तूचा नाश झाला नाहीं. रज्जूवर सर्पाचा भास झाला; तो सर्पाचा भास नाहींसा झाला ह्मणून रज्जुत्व नाहींसें होत नाहीं. संसाराचा नाश झाला ह्मणून, ज्या ब्रह्मावर संसार, त्याचा नाश नाहीं. ( नास्त्यसतः संभवो न वास्ति सतो विनाशः ) ह्मणजे ज्या वस्तूवर भ्रम झाला आहे, त्या वस्तूचा नाश नाहीं. हा सत्कार्यवाद होय. हें जर खरें मानिलें तर सूत्र ११ यांत "**एषां अभावे तदभावः**" हें कसें ह्मटलें, तर, वस्तू नाहींशा होत नाहींत; त्या स्वरूपानें असतात; त्यांचे धर्म मात्र बदलतात. भूत भविष्यत् काळच्या त्या असतात. भूत काळांत होत्या, वर्तमान काळांत आहेत, व भविष्यत् काळांत असणारच. पण धर्मांचे मार्ग मात्र वेगळे झाले. धर्म वर्तमान काळांत आहेत, भूतकाळांत जातील, व भविष्य काळांत येतील; परंतु वस्तु नष्ट होणार नाहीं.

मृत्तिकेंत घडा असल्याशिवाय तो बनवितां येणार कसा ? तो मृत्तिकेंत होता ह्मणून त्या मृत्तिकेंतून, भूतकाळांतून, वर्तमानकाळांत आणिला एवढेंच मात्र; ह्मणजे त्याचें अस्तित्व भूतकाळांत गेलेलें होतें. धर्माच्या मार्गाचा निरानिराळा भेद असूं शकेल, परंतु वस्तु एकच. कार्य हें सत् आहे, कधीं दिसेल कधीं दिसणार नाहीं. उदाहरणार्थ—एक माणूस रस्त्यांतून चालत जात आहे. जातांना त्याला रस्त्याच्या बाजूचीं झाडें दिसतात. मागें टाकलेल्या रस्त्यावरील दिसत नाहींशीं होतात, व पुढें जसा चालतो तशीं नवीन नवीन झाडें दिसूं लागतात. ह्मणजे कांहीं झाडें मागें गेलेलीं दिसत नाहींशीं झालीं; कांहीं दिसत आहेत व कांहीं

दिसणार आहेत. ह्यावरून त्या एकाच काळीं तीं झाडें आपल्या चालण्याच्या स्थितीवरून दिसण्याच्या तीन्हीं काळांतलीं होतात इतकेंच. परंतु झाडें नष्ट झालेलीं नाहींत. आतां विमानांत बसून जर कोणी पाहील तर, त्यास सर्व झाडें तिन्हीं काळांतील दिसतील; त्याचप्रमाणें वस्तूंचे उपभोगाविषयीं समजावें. चालू काळांत होणारा वस्तूचा भोग, भूतकाळांत होता, व भविष्यत् काळांत होणार आहे. चित्त हा धर्मी ( ज्याच्यावर धर्म राहतात तो ) एकच असून, वासनारूप धर्म त्याचे अनेक आहेत. ज्या त्या काळांत ज्या त्या धर्मांचा भोग त्याला होत असतो. एकाच वेळीं सर्वांचा भोग होणें शक्य नाहीं. अज्ञान नष्ट केल्यानें, योगी ह्या तिन्ही काळांतील ज्ञान करून घेतो; व त्याला होतेंही. योगी श्रीकृष्ण म्हणतात—

**बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन ।**
**तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ।** [ गी. ४. ५ ]

**सूत्रार्थः**—भूत किंवा भविष्य काळांतील वस्तू स्वरूपानें आहेतच. वस्तूंचे धर्म बदलतात. त्यांमध्यें जरी भेद उत्पन्न झाला, तरी भूत भविष्य काळांत वस्तू ह्या आहेतच.

## ते व्यक्तसूक्ष्मा गुणात्मानः ॥ १३ ॥

ते व्यक्तसूक्ष्माः गुणात्मानः

ते=धर्म; समजुतीसाठीं पदार्थ घ्यावे. व्यक्त=वर्तमान काळांतील. सूक्ष्माः=भूत भविष्य काळांतील. सर्व पदार्थ व्यक्त असोत किंवा सूक्ष्म असोत, वर्तमान भूत भविष्य काळांतील असोत; गुणात्मानः=ते त्रिगुणात्मकच आहेत. त्रिगुणापासून उत्पन्न झालेले आहेत. हें विश्व त्रिगुणात्मकच आहे. तिन्हीं काळांतील वस्तूहि त्रिगुणात्मकच आहेत. गुणांच्या संयोगानें, वस्तू सर्व काळांत एकसारख्या स्वरूपानेंच असतात. ह्मणून त्यांचा नित्य व्यवहार होतो; परंतु संयोग नष्ट झाल्यानें, त्यांचें कार्यरूपत्व जाऊन, त्या गुणरूपत्वानेंच असतात. यासाठीं ( धर्म ह्मणजे येथें समजुतीसाठीं ) पदार्थ गुणस्वरूपच नित्य आहेत. कार्यरूप असतां गुणरूप स्पष्ट होतें; कार्यरूप नसतां गुणस्वरूप असतात. मृत्तिकेपासून घडा कार्यरूप झाला, तरी मृत्तिकेचाच; फुटल्यावर मृत्तिकाच, ह्मणजे मृत्तिका नित्य, घट वस्तु अनित्य, त्याप्रमाणें धर्म अनित्य, गुणस्वरूप नित्य आहे.

**सूत्रार्थः**—ते धर्म व्यक्त असोत या सूक्ष्म असोत ते त्रिगुणात्मक आहेत; त्रिगुणांपासून उत्पन्न झालेले आहेत.

## परिणामैकत्वाद्वस्तुतत्त्वम् ॥ १४ ॥

परिणाम एकत्वात् वस्तु तत्वम्

तिन्ही गुणांचा परिणाम एकच असल्यानें, निरनिराळ्या वस्तूंत एकत्व आहे. ह्यास उदाहरणः-तेल, वात, व ज्योत. ह्या तिन्ही पदार्थांचे गुण निरनिराळे, एकमेकांविरुद्ध; परंतु एकत्रे झाले ह्मणजे प्रकाश हें कार्य घडतें.

**सूत्रार्थः**—तिघांचे परिणाम एकच असल्यानें वस्तूंचें वस्तुत्व सत्वस्वरूपानें भासतें-वस्तूला वस्तुत्व त्रिगुणापासून येतें.

## वस्तुसाम्ये चित्तभेदात्तयोर्विभक्तः पन्थाः ॥ १५ ॥

वस्तु साम्ये चित्तभेदात् तयोः विभक्तः पन्थाः

वस्तुसाम्ये=वस्तु एकच असली, वस्तुचें साम्य असलें तरि, चित्तभेदात्=चित्तें भिन्न असल्यानें, विभक्तः पन्थाः=मार्ग निराळे आहेत.

पदार्थ क्षणोक्षणीं दिसतात, ते सर्व ज्ञानाचेच परिणाम आहेत, व क्षणोक्षणीं नष्ट होतात, असें विज्ञानमतवाद्यांचें मत आहे; विज्ञानमतवादी ह्मणजे बौद्धधर्मातील एक प्रकार, चित्त आणि ज्ञान या दोघांचा रस्ता निरनिराळाच आहे. असें योगशास्त्राचें मत आहे. विज्ञान (चित्त) वादी, चित्त व ज्ञान एकच मानतात; योगशास्त्रवेत्ते ह्मणतात, चित्त व ज्ञान यांमध्यें जन्यजनक भाव नाहीं; ज्ञानाचाच परिणाम चित्त, असें ह्मणतां येत नाहीं. वस्तु एकच परंतु, अनेक प्रकारचे भेदभाव दिसतात. उदाहरणार्थ—स्त्री. स्त्रीविषयक ज्ञान सर्वांचें एकच; स्त्रीला स्त्रीच समजतात. ढोर समजत नाहींत. पण भाव निरनिराळे; मुलगा आईरूपानें पाहतो. पति स्त्रीभावानें सुखबुद्धीनें पाहतो; सवत तिटकाऱ्यानें पाहते; कामुक पुरुष कामविकारानें खेदयुक्त पाहतो; संन्यासी एक प्राण्याची जात समजून, विकाररहित पाहतो, तिची उपेक्षा करितो. ह्मणजे स्त्री हें ज्ञान एकच, चित्त मात्र एकाच वस्तूबद्दल निरनिराळें; चित्ताचीं कार्यें निरनिराळीं, पण ज्ञान एकच. वस्तु एकच. वस्तु एकच असली, तथापि, त्या वस्तूबद्दल अनेक चित्तांच्या अनेक कल्पना होतात. ह्मणून पदार्थ व त्याचें ज्ञान ( स्वरूप ) जाणण्याचे मार्ग अगदीं निराळे.

## सांख्यपक्षे वस्तु त्रिगुणं चलं च गुणवृत्तमिति ।

सांख्यमतांत त्रिगुणात्मक वस्तु सुखदुःख मोहात्मक आहे; व चित्त चलस्वभाव असल्यानें, धर्मादि निमित्त वेशानें, वस्तूचा चित्ताशीं संबंध, सुखदुःख मोहाकरितांच होतो, ज्ञानाचा संबंध होत नाहीं. चित्ताहून पदार्थ निराळा नसता तर, एकाच वस्तूबद्दल निरनिराळें ज्ञान कां व्हावें म्हणून चित्त म्हणजे पदार्थांचें ज्ञान व पदार्थ चित्ताहून निराळे. म्हणजे चित्त हें ग्रहण ( पदार्थ ज्ञानाचें साधन ) व पदार्थ हें ग्राह्य.

**सूत्रार्थः**—वस्तु एक असली तथापि,' चित्तभेदात्' चित्तें अनेक असल्याकारणानें, त्या दोघांचे मार्ग निरनिराळे आहेत. वस्तु एक कशावरून, तर एकत्वानें त्या वस्तूचें ज्ञान होतें ह्मणून.

## नचैकचित्ततन्त्रं वस्तु तदप्रमाणकं तदा किं स्यात् ॥१६॥

न च एक तन्त्रं वस्तु तत् अप्रमाणकं तदा किं स्यात्; चित्त ह्मणजे येथें ज्ञान असा अर्थ घेणें. तन्त्र=स्वाधीन. अप्रमाणकं=अभासकं, ग्रहण करण्याला लायक; जर एक चित्ताधीन वस्तू मानल्या तर, घटांत चित्त जाईल तेव्हां, पटांत नष्ट असणार. कारण त्या वेळेस त्या वस्तूशीं कांहीं संबंध नसणार, व इतर चित्तांचा तो विषय नसल्यानें, अप्रमाण होणार; किंवा संबंध दुसऱ्या चित्ताचा मानला तर, पुन्हां उत्पत्ति कशी होणार ? कारण एका चित्तानें ग्रहण केलेली वस्तु, तें चित्त असे पर्यंत तेथेंच असणार. पाठीवांचून पोट नाहीं व पोटावांचून पाठ नाहीं. पाठ दिसत नाहीं ह्मणून नाहीं कसें ह्मणतां येईल. तिच्या वांचून तर पोटाचें अस्तित्व असणें अशक्य. वस्तूचें अस्तित्व हें चित्ताच्या ( ज्ञानाच्या ) आधीन आहे, असें विज्ञान वादी ह्मणतात. पुस्तकाचें ज्ञान आपणास केव्हां होतें तर, चक्षुरिंद्रियद्वारा चित्ताचा संयोग झाला कीं, पुस्तकाचें ज्ञान होतें. पातंजलमतवादी ह्मणतात—वस्तु ज्ञानाधीन नाहीं. वस्तु स्वतंत्र व तिचें ज्ञान स्वतंत्र आहे. ज्यावेळीं ज्या वस्तूचें ज्ञान होतें, त्यावेळीं ती वस्तु आहे, असें समजावें, असें विज्ञानवादी ह्मणतात. पातंजल मतवाद्यांचें ह्मणणें वस्तु निराळी व ज्ञान निराळें. वस्तु ही ज्ञानाच्या आधीन नाहीं. वस्तु ही नित्यच आहे. ज्यावेळीं वस्तूचें ज्ञान नसतें, त्यावेळीं वस्तू नष्ट झाली असें विज्ञानवादी ह्मणतात. जर वस्तु नष्ट झाली ह्मणावें ( उदाहरणार्थ कपाटांत ठेविलेलें पुस्तक ) तर, पुन्हां कपाट उघडतांच त्या वस्तूचें ह्मणजे पुस्तकाचें ज्ञान होतें.

विज्ञानवाद्यांच्या मताप्रमाणें वस्तु नष्ट झाली समजावें तर, नष्ट झालेल्या वस्तूचें ज्ञान आलें कोठून? ह्याला कारण विज्ञानवाद्यांना दाखवितां येत नाहीं. यावरून अर्थात् वस्तु नष्ट होत नाहीं. विज्ञानवादी ज्ञान व वस्तु एक मानतात एवढेंच, परंतु कारण त्यांस दाखवितां येत नाहीं. घरांत असलेल्या कपाटापासून दूर बाजारांत गेलें तर तेथें फक्त संस्कार मनावर असतात. ज्ञान नष्ट असतें. जर वस्तु नष्ट झाली म्हणावें तर पुन्हां उत्पन्न कशी होते. कारण कपाट उघडतांच पुस्तक दिसतें; त्या पुस्तकाच्या उत्पत्तीला कारण काय? जर कारण दाखवितां येत नाहीं तर ती वस्तु नष्ट झालेली नाहीं. चित्त व वस्तु या दोघांच्या संयोगानें जें ज्ञान, तोच पुरुषाला भोग होतो.

**सूत्रार्थः**--एका वस्तूचें ज्ञान झालें ह्मणजे दुसऱ्या वस्तूचे ज्ञानचा, त्याक्षणीं तत् ( ज्ञान ) अप्रमाणकं ( अभासकं ) आभास असतो; जर दुसऱ्या वस्तूच्या ज्ञानाचा अभाव असतो, तर ( तदार्किंस्यात् ) त्यावेळीं त्या वस्तूचें काय होतें?

## तदुपरागापेक्षित्वाच्चित्तस्य वस्तु ज्ञाताज्ञातम् ॥ १७ ॥

तत् उपराग अपेक्षित्वात् चित्तस्य वस्तु ज्ञात अज्ञातम्; उपराग=प्रतिबिंब; अपेक्षित्व=गरज, अपेक्षा; उपरागापेक्षित्वात्=प्रतिबिंबाच्या गरजेमुळें. प्रतिबिंबावरून बिंबाचें ज्ञान होतें. मनाला वस्तूच्या प्रतिबिंबाची गरज असल्यामुळें, कांहीं वस्तू ज्ञात व कांहीं अज्ञात असतात. चित्ताला वस्तूच्या प्रतिबिम्बाची जरूर आहे.

ज्या वस्तूचें प्रतिबिंब चित्तांत पडतें, त्या वस्तूचें चित्ताला ज्ञान होतें. व ज्याचें प्रतिबिंब पडत नाहीं, त्या वस्तूचें ज्ञान होत नाहीं. बाह्य वस्तूची आकृती जशी चित्तावर उमटेल, अथवा उमटणार नाहीं, तसें चित्ताला ज्ञान होईल, अगर होणार नाहीं. जेव्हां कोणतीच आकृती उमटणार नाहीं, तेव्हां कोणत्याच वस्तूचें ज्ञान होणार नाहीं.

" अयस्कान्तमणिकल्पा विषया अयःसधर्मकं चित्तमभिसंबद्ध्योपरञ्जयन्ति, येन च विषयेणोपरक्तं चित्तं स विषयो ज्ञातस्ततोऽन्यः पुनरज्ञातः। वस्तुनो ज्ञाताज्ञातस्वरूपत्वात् परिणामि चित्तम् " ॥ विषय लोहचुंबकाच्या ठिकाणीं, चित्त लोखंडाच्या ठिकाणीं; आकर्षणाच्या योगें तदाकार चित्त बनून, तो विषय चित्ताला ज्ञात होतो. जो विषय चित्ताला ओढीत नाहीं, तो अज्ञान असतो. ह्मणजे चित्त हें परिणामी आहे.

**सूत्रार्थः**--चित्ताला ज्ञान होण्याला वस्तुचे प्रतिबिंबाची जरूरी आहे. ज्या वस्तूचें प्रतिबिंब चित्तांत पडतें, त्या वस्तूचें ज्ञान, चित्ताला होतें. व ज्या वस्तुचें पडत नाहीं, त्यावस्तूचें ज्ञान चित्ताला होत नाहीं; म्ह. चित्त परिणामी आहे.

## सदा ज्ञाताश्चित्तवृत्तयस्तत्प्रभोः पुरुषस्यापरिणामित्वात् ॥ १८ ॥

सदा ज्ञाताः चित्तवृत्तयः तत् प्रभोः पुरुषस्य अपरिणामित्वात्; तत्=मन, प्रभोः= स्वामी; अपरिणामि=निर्विकार; तत्प्रभोः तासां वृत्तीनां प्रभोः तत्प्रभोः

चित्ताचे परिणाम बनतील, पण पुरुषाचे परिणाम बनत नसल्यानें, चित्तवृत्तींचें ज्ञान पुरुषाला सदोदित असतें. चित्ताच्या वृत्ति चित्ताचा स्वामी जो पुरुष त्याला नेहमीं ज्ञात असतात. कारण तो नित्य द्रष्टा व अपरिणामी असतो.

" यदि चित्तवत् प्रभुरपि पुरुषः परिणमेत् ततस्तद्विषयाश्चित्तवृत्तयः शब्दादिविषयवत् ज्ञाताज्ञाताः स्युः सदा ज्ञातत्वं तु मनसस्तत्प्रभोः पुरुषस्यापरिणामित्वमनुमापयति "

**सूत्रार्थः**—चित्ताच्या वृत्ति बदलणाऱ्या आहेत. पुरुष हा अपरिणामि निर्विकार आहे, त्यामुळें चित्तवृत्तींचें ज्ञान सदोदित पुरुषाला असतें.

सूत्रें १७।१८ हीं, चित्त परिणामि व आत्मा अपरिणामी आहे असें दाखवितात.

१९ चित्त—मन हें पुरुषाप्रमाणें स्वप्रकाशित नाहीं.

## न तत्स्वाभासं दृश्यत्वात् ॥ १९ ॥

स्वेन आभासः यस्य तत् स्वाभासं; चित्त स्वप्रकाशक नाहीं, कारण कीं तें दृश्य आहे. जें जें दृश्य तें तें स्वाभासक नसतें. जसें घटादि, पुरुष हा भोक्ता, मन हें भोग्य. मन द्रष्टा नाहीं दृश्य आहे

जें जें दृश्य, तें तें परप्रकाशित आहे. मन, आत्म्यामुळें प्रकाश्य आहे. आत्मा हा त्याचा प्रकाशक आहे, म्हणून, प्रकाश्याला प्रकाशक आत्माच मानला पाहिजे. सर्व वस्तूंत आत्म्याचा प्रकाश असून, सर्व गतींतही त्याचेंच सामर्थ्य आहे. जसा अग्नि स्वतः प्रकाशित होऊन, अप्रकाशित वस्तूंना प्रकाशित करितो, तसाच आत्मा स्वप्रकाशित असून, अप्रकाशिताला, चित्ताला प्रकाशित करितो. " नह्यग्नि-

रात्मस्वरूपमप्रकाशं प्रकाशयति प्रकाशश्चायं प्रकाश्यप्रकाशसंयोगे दृष्टो नच स्वरूपमात्रेऽस्ति संयोगः ''

**सूत्रार्थः**—दृश्यत्वाच्या दोषामुळें मन हें स्वप्रकाशित नाहीं.

## एकसमये चोभयानवधारणम् ॥ २० ॥

एक समये च उभय अनवधारणम् ।

अनवधारणम्=अनिश्चय. उभयोः अनवधारणं उभयानवधारणं=एकाच क्षणांत दोन वस्तूंचें ज्ञान होत नाहीं अर्थात् एकाच वेळीं चित्त विषयांना आणि आपल्या स्वतःला प्रकाशित करीत नाहीं, हा सिद्धांत आहे. बाह्य वस्तूंचें ज्ञान पुरुषाला मनच करून देतें, व स्वतःचेंही ज्ञान पुरुषाला तेंच करून देतें. मन हें स्वतः असल्याचें पुरुषाला दाखवितें. व मन, पुरुष असल्याचेंही दाखवितें; जसा दिवा आपल्याला प्रकाशित करून, इतर वस्तूंनाही प्रकाशित करितो. सूत्रकार ह्मणतात—स्वतःचा भास, व बाह्य पदार्थांचा भास, एकाच क्षणीं होत नाहीं, मन एकाच वेळीं दोन विषयांचें ग्रहण करीत नाहीं. कोणी याला अष्टावधान्याचें उदाहरण देतील परंतु अवधानाचा ग्रहणकाळ एकच नसतो, त्याची धारणाशक्ति जबर एवढेंच. याला दाखला—आपलें मन जर एखाद्या विषयाकडे वेधलें गेलें तर त्यावेळीं दुसऱ्या विषयाचें आपणास विस्मरण होतें. जी वस्तु स्वयंप्रकाशित असेल ती अनेक विषयांचें एकाच वेळीं ग्रहण करूं शकते; व जी वस्तु हजारों विषयांना ग्रहण करील ती एकाच वेळीं त्या ग्रहण केलेल्या विषयांना प्रकाशित करील. आत्मा स्वयं प्रकाशित असल्यानें एकाच वेळीं हजारों वस्तूंना प्रकाशित करूं शकतो.

**सूत्रार्थः**—क्षणिकवाद्यांच्या मताप्रमाणें चित्त, स्वयंप्रकाशित आहे असें मानलें तर, चित्ताला एकाच वेळीं दोन वस्तूंचें ज्ञान होणें शक्य नाहीं. ह्मणजे स्वतःचें ज्ञान व पदार्थांचें ज्ञान होणें संभवत नाहीं. यास्तव चित्ताचा प्रकाशक, आत्मा असला पाहिजे, व तें स्वयं प्रकाशित नसलें पाहिजे.

## चित्तान्तरदृश्ये बुद्धिबुद्धेरतिप्रसङ्गः स्मृतिसङ्करश्च ॥ २१ ॥

चित्तान्तरदृश्ये बुद्धि बुद्धेः अतिप्रसङ्गः स्मृतिसङ्करश्च; । अन्यत् चित्तं चित्तान्तरं=दुसरें चित्त, बुद्धि=१ ज्ञान. २ बुद्धि=बुद्धिच; संकर=भेसळ. अनिश्चितपणा.

दृश्ये ही सप्तमी, दृश्य ह्याचा अर्थ दृश्यत्व घ्यावा. चित्त एका ठिकाणाहून दुसरीकडे गेलें असतां पहिल्या चित्ताचा नाश होतो, असें विज्ञानवाद्यांचें मत आहे.

कोणत्याही पदार्थाचें अस्तित्व प्रथम क्षणांत उत्पन्न होतें, दुसऱ्या क्षणांत कायम राहतें, व तिसऱ्या क्षणांत नष्ट होतें. व चवथ्या क्षणांत तें रहात नाहीं. मन हें स्वतः स्वताचें ग्रहण कां करीत नाहीं, याचें कारण, तें तृतीय क्षणीं नष्ट होतें. आणि चतुर्थ क्षणीं पुन्हां दुसरें चित्त उत्पन्न करितें व नष्ट होतें. आणि चतुर्थ क्षणीं पुन्हां दुसरें चित्त उत्पन्न करितें व नष्ट झालेल्या चित्ताचें ग्रहण करूं शकतें. ह्मणजे चित्ताचें ज्ञान होत नाहीं, असें नाहीं, तर दुसऱ्या चित्तानें चित्ताचें ज्ञान होतें, असें विज्ञान वाद्यांचें मत आहे. ते आत्मा मानीत नाहींत. चित्तच सर्व सुखदुःखाचें साक्षी आहे असें मानतात. ह्मणजे द्रष्टा पुरुष न मानतां, द्रष्टृत्व चित्ताच्या ठिकाणीं मानतात. पण चित्त द्रष्टा नाहीं तें दृश्यच आहे, हें १९ व्या सूत्रांत सिद्ध करून, त्यांच्या मताचें खंडन केलेलें आहे. त्यावर ते ह्मणतात, पुरुष द्रष्टा मानण्यापेक्षां चित्ताला होणाऱ्या सुख-दुःखाचा साक्षी दुसरें चित्तच मानावें. ह्यावर पातञ्जलमतवादी ह्मणतात–चित्तान्तर मानलें ह्मणजे बुद्धीच्या ज्ञानाला जर अन्य चित्त मानलें ( घेतलें ) तर अतिप्रसङ्ग, ह्मणजे अनवस्था दोष येतो. व नष्ट झालेल्या चित्ताला पुन्हा दुसऱ्या चित्तानें स्मरण, याप्रमाणें नष्ट झालेल्या अनेक चित्ताचें रहाट-गाडगें चालून अनेक चित्तें मानावीं लागतील. एकामागून एक नष्ट चित्तांची स्मृति, हा अतिप्रसंग झाला; हा एक दोष व दुसरा स्मृतिसंकर हा दोष; कारण पुस्तक हें एका बुद्धीनें एका प्रकारचें तर, दुसऱ्या बुद्धीनें दुसऱ्या प्रकारचें दिसावें पण तसें होत नाहीं. एकदां पुस्तकाचें ज्ञान झालें, व तें नष्ट झाल्यानंतर, पुन्हा जेव्हां पुस्तकाचें ज्ञान होतें, तेव्हां पूर्ववत् तसेंच्या तसेंच ज्ञान होतें. ह्मणून चित्त एकच मानलें पाहिजे. एकचित्त प्रकाशित करण्याला दुसरें चित्त मानलें तर, दुसऱ्याला प्रकाशित करण्याला तिसरें मानिलें पाहिजे, अशाप्रकारें अनंत चित्तें मानलीं पाहिजेत, व चित्तांची समाप्ति होणार नाहीं. हा अनवस्था दोष. अशारीतीनें बुद्धिबुद्धीचा अति प्रसंग मानावा लागेल; व अनेक बुद्धींच्या कल्पनेनें हा अनवस्था दोष होणार व बुद्धीमध्यें तितक्या बुद्धी एकदम उपस्थित झाल्यानें, स्मृतीचा अनिश्चितपणा होऊन, स्मृतिवृत्तींत संकर यावयास लागेल. स्मृति चांगली होणार नाहीं ह्मणून, पुरुष हा द्रष्टा मानणेंच ठीक आहे.

**सूत्रार्थः**—बुद्धीच्या ज्ञानाला जर अन्यचित्त मानलें तर, अतिप्रसङ्ग ( अनवस्था ) व स्मृतिसंकर हा दोष उत्पन्न होतो.

## चितेरप्रतिसंक्रमायास्तदाकारापत्तौ स्वबुद्धि संवेदनम् ॥ २२ ॥

चितेः अप्रतिसंक्रमायाः तदाकारापत्तौ स्वबुद्धि संवेदनम्

चितीपासून चितेः=चेतनस्य; चिति=ज्ञानस्वरूप, द्रष्टा. अप्रतिसंक्रम-प्रति संक्रम=अन्यत्रगमन. अप्रतिसंक्रम=अन्यत्र गमन तें जिचें नाहीं तें अप्रतिसंक्रम. अन्यत्र गमनानें रहित असा जो आत्मा, त्या आत्म्याचें प्रतिबिंब चित्तांत पडतें. इन्द्रियाप्रमाणें, गमन नव्हे तर गमनरहित. इंद्रियें गमन कारितात पण चिती गमन करीत नाहीं. तदाकारापत्तौ=तद्रूपता. आपत्ति=प्राप्ति; स्वरूपानें, चैतन्य, प्रतिबिंबित झालेल्या चित्ताचा आकार प्राप्त झाल्यावर; स्वबुद्धि संवेदनं;—स्व=चित्त. संवेदनं= ज्ञान. चित्ताची जी बुद्धि ह्मणजे ज्ञान, त्याचें ज्ञान आत्म्याला होतें, गमनक्रियारहित चैतन्याला, आपल्यात प्रतिबिंबित झालेल्या चित्ताचा आकार प्राप्त झाल्यावर; स्वबुद्धीचें म्हणजे आपल्या चित्ताचें ज्ञान होतें. पुस्तकाचें ज्ञान जेव्हां पुस्तकावर मन होईल तेव्हांच होतें; तसेंच आत्मा जर असङ्ग व निर्विकार आहे तर, मनाचें ज्ञान कसें करूं शकेल. आत्मा तर मनाचें ज्ञान करूं शकतो. दुसरें मन मानावयाचें नाहीं तर मनाचें ज्ञान व्हावें कसें ? व कोणाला ? त्याबद्दल मनाचे अस्तित्वाचा धोका येतो. मनाचें ज्ञान आत्मा कसें करून घेणार, ह्याकरितां हें २२ सूत्र आहे. पुस्तकाचें ज्ञान करून घेण्याकरितां दृगिंद्रियद्वारा पुस्तकाचें सान्निध्य मिळवून, पुस्तकाकार मनाला व्हावें लागतें, तेव्हां त्या पुस्तकाचें ज्ञान होतें. तसेंच आत्म्याला मनाचें ज्ञान होण्यासाठीं मनाजवळ आलें पाहिजे. परंतु आत्मा जर अचल निर्विकार आहे तर, त्याला ज्ञान व्हावें कसें ? तर दोघांच्या सान्निध्यानें आत्म्याचें प्रतिबिंब मनावर पडतें, मग मनाकार होतें. त्या प्रतिबिंबाच्या मनाकारामुळें आत्म्याला मनाचें ज्ञान होतें, असें पातञ्जल मतवाद्यांचें मत. ह्मणजे दुसरें मन विज्ञानवाद्यांच्या मताप्रमाणें मानावयास नको. कारण प्रतिबिंब मनाकार बनलें, व बिंबाला प्रतिबिंबाचें ज्ञान झालें तर बिंब ज्यावेळीं प्रतिबिंबाचें ज्ञान करूं लागेल, त्यावेळीं प्रतिबिंब मनाकारच बनलेलें असलें पाहिजे. ह्यामुळें आत्म्याला मनाचें ज्ञान होतें असें ह्याचें मत. आत्मा चित्रूप असल्यानें त्याला चिति ह्मणतात. सान्निध्यानें

चितीला तदाकारापत्ती होते. तदाकारापत्ती झाली असतां पुरुषाला आपल्या भोग्य-रूप बुद्धीचें ज्ञान होतें व बुद्धीला चिच्छायापत्ती होते. बुद्धीला सतःचें ज्ञान होतें.

**सूत्रार्थः**—अन्यत्र गमनानें रहित असा जो पुरुष, त्याला प्रतिबिंबरूपानें, मनाच्या आकाराची प्राप्ती झाली असतां, मनाचें ज्ञान आत्म्याला होतें. प्रतिबिंब द्वारा मन आत्म्यापाशीं जातें, मग आत्म्याला मनाचें ज्ञान होतें. आत्म्याचें प्रतिबिंब मनावर पडतें. ह्मणजे आत्म्याच्या सान्निध्यानें आत्म्याचा प्रकाश मनावर पडतो व त्या वेळेपुरतें मन ज्ञानवान् व पुरुषरूप आत्मरूप भासतें.

२३ क्षणिकवाद्याचें चित्त, आत्मा मानण्याचें भ्रमाचें कारण.

## द्रष्टृदृश्योपरक्तं चित्तं सर्वार्थम् ॥ २३ ॥

द्रष्टृ दृश्य उपरक्तं चित्तं सर्वार्थम्

द्रष्टृ=आत्मा, दृश्य=बाह्यपदार्थ. उपरक्त=संबद्ध. Coloured; सर्वार्थ=सर्वस्मै इति सर्वार्थ. चित्त हें द्रष्ट्याशीं संबंध ठेवतें व दृश्याशींही संबंध ठेवतें, त्यामुळें सर्व विषय. ( चेतनाचेतन ) ग्रहणास समर्थ आहे.

द्रष्ट्याशीं किंवा दृश्याशीं संबद्ध झालेलें मन हें सर्वार्थ आहे. चेतन अचेतन ह्या सर्व वस्तु अर्थ ( विषय ) आहेत ज्याच्या, तें सर्वार्थ होय. सर्वाय चेतनाय वा अचेतनाय सर्वाः अर्थाः यस्य तत् सर्वार्थ ह्मणजे सर्व अर्थग्रहण, सर्व विषय ग्रहण करण्यालायक मन समर्थ आहे. ज्यावेळीं द्रष्ट्याशीं संबद्ध असेल तेव्हां द्रष्ट्याचें ( आत्म्याचें ) ज्ञान होईल; ज्यावेळीं द्रष्ट्याशीं, बाह्य वस्तूशीं संबद्ध असेल तेव्हां त्या बाह्य वस्तूचें मनाला ज्ञान होईल. मन सर्वाचें ग्राहक आहे. आत्मज्ञान करून घेण्याला मन हें साधन आहे. ह्मणून मनोद्वारा जसें बाह्य वस्तूचें तसेंच मनोद्वारा आत्म्याचें ज्ञान करून घेण्याला मन हेंच साधन आहे. आत्मा व मन यांच्या सान्निध्यानें, आत्म्याचें प्रतिबिंब मनाला जवळच आहे. व दृश्य ह्मणजे बाह्य वस्तूंचें प्रतिबिंब मनाला जवळ झालें ह्मणजे आत्मप्रकाशानें बुद्धीला सर्व कांहीं जाणण्याची शक्ति प्राप्त होते. समजा घट आपणाजवळ आणला आहे; आत्मा द्रष्टा बुद्धीजवळ आहेच, ह्मणून द्रष्टा, आत्मा, व दृश्य घट, या दोन्ही वस्तूंनीं बुद्धि ( मन, चित्त ) प्रतिबिंबित होऊन, ती घटाच्या आकाराची भासूं लागते. आत्म्याच्या प्रतिबिंबामुळें, चेतनासारखी भासते, ह्मणजे सर्व वस्तू ग्रहण करण्यास

ज्ञायक होऊन व ग्रहण करून व्यवहार करितें. ह्मणजे सर्वार्थ होतें. आत्मा नित्य प्रकाशित व चित्त कारणानें क्षणिक प्रकाशित होणारें आहे. चित्त हें विषयाकारही होतें व पुरुषाकारही होतें. चित्त हें भोग्य असल्यानें त्याचा, भोक्ता पुरुषच होय ह्मणजे पुरुष हा भोक्ता ( **विषयी** ) होय. चित्त त्याचा भोग्य **विषय** होय, ह्मणून तद्रूपानें भासतें ह्मणजे चेतनाकार होतें. अर्थात् भोग्य वस्तु असतांही विषयात्मक अचेतन असतांही चेतनासारखें भासतें. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे चेतनाचेतनाकार होतें. ह्यास प्रत्यक्ष दाखला—जास्वंदीचें फूल व कांचेच लोलक यांचें सान्निध्य.

**सूत्रार्थः**—चित्त हें द्रष्ट्याशीं किंवा दृश्याशीं ज्याच्याशीं संबद्ध असेल, त्याचें ज्ञान करून घेण्यालायक असल्यानें सर्वार्थ आहे. द्रष्ट्याचें ( आत्म्याचें ) व दृश्याचें प्रतिबिंब मनावर पडलें ह्मणजे मन सर्व जाणूं शकतें.

२४ आत्म्यालाच पुरुष भोक्ता कां मानावा चित्ताला कां मानूं नये ?

## तदसंख्येयवासनाभिश्चित्रमपि परार्थं संहत्यकारित्वात् ॥२४॥

तत् असंख्येय वासनाभिः चित्रं अपि परार्थं संहत्यकारित्वात् ।

तत्=तें चित्त. असंख्येयवासनाभिः=नानाजन्मांतील नाना तऱ्हेच्या वासनांनीं. चित्रं=चित्रविचित्र, चंचल बनलेलें. परार्थं=दुसऱ्याकरितां, पुरुषाकरितां भोग करून देण्याकरितांच आहे. संहत्यकारित्वात्-संहत्य=समूहयुक्त. कारित्व=काम करणेंपणा; संहत्यकारित्वात्=समुदायांत काम करणपेणा त्याच्यामध्यें, असल्यामुळें. तें चित्त, अनेक तऱ्हेच्या वासनांनीं चित्रविचित्र असलें तरी तें परार्थ आहे. म्ह० पर जो आपला स्वामी त्याला भोग किंवा मोक्ष देणारें आहे. कां ? तर संहत्यकारित्वामुळें म्ह० देह, इंद्रियें, वगैरेशीं, मिळून काम करणारें असल्यामुळें.

असंख्यात वासनानीं चित्र विचित्र असलेलें मन, पुरुषालाच भोग किंवा अपवर्ग ( मोक्ष ) देण्याकरितांच आहे. कारण ते समूहांत येऊन काम करीत असल्यामुळें तें मन दुसऱ्याकरितांच आहे. आत्म्याकरितां आहे. ह्मणून मन हें पुरुषालाच भोग किंवा मोक्ष देण्याकरितां आहे. एकटें काम करितें तर तें स्वतःकरितां, एकट्याकरितां असतें, समूहांत काम करणें तें समूहाकरितां जमावाकरितां असतें. जसें एकाद्या माणूस सार्वजनिक कामांत खपतो व घरीं स्वतःकरितां खपतो तसें. घरीं खपतो तो स्वतःकरितां, समूहांत खपतो तो दुसऱ्याकरितां—सर्वांकरितां.

जे लोक पुष्कळ जमून एकत्रे एक कार्य करितात, ते परार्थ असतात. दुसऱ्यां करितां असतात. स्वतःकरितां नव्हे. मन हें असंख्य वासनांनीं युक्त आहे. अनेक वस्तूंचें तें मिश्रण आहे, व तें कार्यरत आहे. जगांत जेथें अनेक वस्तू एकव्या जमलेल्या आढळतात तेथें तेथें त्यांचा कांहीं तरी एक विशिष्ट हेतु साधल्यावर त्या वस्तु विस्कळतात. त्याप्रमाणें अनेक मिश्रणाचें मन कांहीं विशिष्ट हेतु साधीत असतें. व तो हेतु स्वतःकरितां नव्हे, समुदायाकरितां, ह्मणून दुसऱ्याकरितांच आहे. तो हेतु साधल्यावर तो मनाचा समुदाय विस्कळीत होईल, जिकडचा तिकडे जाईल; परंतु हेतु साधेपर्यंत, दुसऱ्याकरितांच कार्यरत राहील. ह्मणून आत्म्यालाच भोक्ता ( पुरुष ) मानला पाहिजे, व चित्ताला मानणें अयोग्य होय. चित्त हें दुसऱ्याच्या मदतीनें अनेक वासनाद्वारें काम करितें. जे दुसऱ्यांची मदत घेऊन काम करितात तें काम दुसऱ्यांकरितांच असा जगाचा अनुभव आहे. ज्यांना दुसऱ्याच्या मदतीशिवाय काम करितांच येत नाहीं, ते स्वार्थाकरितां नसून परार्थी कारणें होत. जे परार्थाकरितां ठरतात ते भोग्य विषय होतात, भोक्ता निराळाच असतो, तोच भोक्ता आत्मा होय. ह्मणून चित्ताचें हेंच काम कीं आपण भोग्य विषय होऊन पुरुषाला भोग व मोक्ष देणें.

**सूत्रार्थः**—अनेक वासनांनीं तें चित्त जरी चित्रविचित्र झालेलें असलें तरी, समुदायांत काम करित असल्यानें, तें दुसऱ्याकरितांच आहे; तें दुसऱ्याचाच अर्थ ( विषय ) आहे.

## विशेषदर्शिन आत्मभावभावनाविनिवृत्तिः ॥ २५ ॥

विशेषदर्शी=चित्त आणि पुरुष ( आत्मा ) या दोहोंतला भेद जाणणारा. तो भेद ह्मणजे मीं ह्या चित्ताहून निराळा आहें असें ज्ञान ज्याला झालें त्याला आत्मभावभावना विनिवृत्ति होते.

आत्मभाव=आत्मत्व. आत्मभाव भावना, त्या आत्मत्वाची जी मनावर भावना म्ह० बुद्धि ती. विनिवृत्ति=नाहींशी होते. ह्मणजे, चित्ताच्या ठिकाणीं जें आत्मत्व उत्पन्न झालेलें असतें तें नाहींसें होतें. वि=विशेष प्रकारें साफ भावना नाहींशी होणें.

आत्मभावभावना होते ती–" कोहमासं । कथमहमासं । किंस्विदिदं । कथं स्विदिदं । के भविष्यामः । कथं भविष्यामः । इति. " मीं पूर्वी कोण होतों, कसा

होतों हा देह हें स्वरूप काय, हें कसें स्वरूप, पुढें कसें होणार, काय होणार इत्यादि विचार, आत्मभावभावनेनें म्ह० आत्मत्व बुद्धीनें होतात.–

**सूत्रार्थः**—विशेषदर्शी जे आहेत त्यांची आत्मत्वाची जी मनावर भावना म्ह० बुद्धि, किंवा, ( मनावर आत्मत्वाचा आरोप ) ती नाहींशी होते. ते मनाला ह्मणजे चित्ताला वा बुद्धीला आत्मा मानीत नाहींत.

२६. तर विशेषदर्शी आहेत त्यांचे चित्ताची स्थिती कशी ?

## तदा विवेकनिम्नं कैवल्यप्राग्भारं चित्तम् ॥ २६ ॥

तदा=असा भेदभाव ( आत्मा व चित्त निरनिराळे ) उत्पन्न झाल्यावर; विवेक निम्नं=विवेकानें नम्र, चित्त झालेलें असतें कैवल्यप्राग्भारं=कैवल्याकडे सन्मुख झालेलें. प्राग्भारं=सन्मुख अभिमुख.

भेदभाव कळल्यानंतर जें चित्त, विषयसुख हेंच मुख्य कार्य मानीत होतें, तें आतां न मानतां कैवल्यसुख हेंच कार्य मानूं लागतें. कारण योगबलानें विवेक जागृत होऊन बुद्धि शुद्ध होते. प्रत्येक वस्तूचें खरें स्वरूप कळूं लागतें. विश्व हें प्रकृतीचें कार्य आहे. अनेक वस्तूंचें समीकरण आहे. हें तेव्हांच ध्यानांत येतें व प्रकृतीचा ( मायेचा ) खेळ, हा खेळ, पुरुषाच्या करमणुकीकरितांच आहे. पुरुष केवळ साक्षीभूत आहे व मजा पाहात बसला आहे. असा अनुभव येतो. तात्पर्य—विषयाभिमुख असलेलें चित्त पालटून कैवल्याभिमुख होतें.

**सूत्रार्थः**—असा भेदभाव कळल्यानंतर चित्ताची स्थिति कशी, तर कैवल्याकडे, तें चित्त सन्मुख झालेलें असतें; त्याचा ओढा कैवल्याकडे असतो

## तच्छिद्रेषु प्रत्ययान्तराणि संस्कारेभ्यः ॥ २७ ॥

वरील सूत्रांत योग्याचें मन ताब्यांत आलेलें असतें, व त्याचा ओढा कैवल्याकडे होतो, असें सांगितलें; परंतु सतत २४ तास त्याचा ओढा कैवल्याकडे असतो का ? असा प्रश्न उद्भवतो. कोणी होय ह्मणेल तर तें तसें नव्हे; तर कसें ? तें ह्या सूत्रानें सांगतात. योगी ह्मणेल एकसारखें लक्ष कैवल्याकडे लावीन तर भिक्षाटनादि कृत्यें स्नान संध्यादिकृत्यें व्हावीं कशीं ? ह्मणजे सतत कैवल्याकडील कालांत, प्रवाहांत म्ह० ओघ्यांत हीं छिद्रें आहेत. तच्छिद्रेषु=त्या छिद्रांत. त्या विवेकनिष्ठ चित्ताच्या विवेकाभावरूप अवकाशांत, प्रत्ययान्तराणि—अन्ये प्रत्ययाः प्रत्ययान्तराणि. दुसरीं

ज्ञानें होतात. प्रत्यय=अनुभव. Knowledge. Means of action, a hole, understanding ( बुद्धि ).

त्या छिद्रामध्यें दुसरीं व्यावहारिक ज्ञानें उत्पन्न होतात; तीं कां होतात ! तर संस्कारेभ्यः पूर्वील व पूर्व जन्मांतील संस्कारामुळें हीं ज्ञानें होतात. व योगी व्यवहारांत पडतो, व्यवहार करूं लागतो. जरी विवेकी पुरुषाचें चित्त विवेकमार्गांतच रहावयाचें, तरी विवेकाचे अभ्यासरूप अग्नीनें जळून गेलेले पूर्वींच्या व्युत्थान काळचे (समाधि व्यातिरिक्त व्यवहार काळचे ) संस्कार मधून मधून उत्पन्न होऊन, विवेकज्ञान शिथिल होऊन, " हा मी आहें " " हें माझें आहे. " " हें मीं जाणतो " " हें मींच, लोकांना समजावतों " वगैरे वृत्ति उत्पन्न होतात. व त्याप्रमाणें तसें तसें ज्ञान होऊं लागतें. कारण अनादिकालापासूनचे व्युत्थानसंस्कार प्रबल आहेत व विवेक अझून दुर्बल आहे, ह्मणून अन्य जन्मांतील संस्कारांमुळें भिक्षाटनादि जीं सुखासाठीं ह्मणून कृत्यें करण्याची बुद्धी होते, हे अडथळेच आहेत. कारण पुरुष हा स्वभावतः सुखस्वरूप असतांही बाह्य पदार्थापासून सुख मिळवावयाची बुद्धी त्याला होते. पूर्व संस्कारामुळें आत्मा सुखस्वरूप आहे हें ज्ञान लुप्त झालें आहे ह्मणून ते संस्कार नष्ट करणें हेंच साध्य.

**सूत्रार्थः**—सतत कैवल्याकडील मनाचा जो ओढा, त्यामधील जीं छिद्रें, त्या छिद्रांमध्यें दुसरीं व्यावहारिक ज्ञानें पूर्व संस्कारामुळें उत्पन्न होऊन, त्याप्रमाणें तो योगी व्यवहारांत पडतो. व्यवहार करूं लागतो. एवढ्याकरितां संस्काराचा नाश झाला पाहिजे. तो कसा व्हावा—करावयाचा त्याबद्दल पुढील सूत्र देतात.

### हानमेषां क्लेशवदुक्तम् ॥ २८ ॥

हानं एषां क्लेशवत् उक्तम् ।

हानं=नाश. एषां=त्या संस्कारांचा. क्लेशवत्=क्लेशांचा नाश करण्याकरितां पाद २ सूत्रें १०।११ यांत सांगितलेल्या उपायाप्रमाणें. उक्तम्=सांगितलेले.

**सूत्रार्थः**—त्या संस्कारांचा नाश, क्लेशाच्या नाशाप्रमाणें सांगितला आहे.

२९ समाधींत उच्च समाधी, धर्ममेघसमाधी, त्याची व्याख्या.

### प्रसंख्यानेप्यकुसीदस्य सर्वथा विवेक- ख्यातेर्धर्ममेघः समाधिः ॥ २९ ॥

प्रसंख्याने अपि अकुसीदस्य सर्वथा विवेकख्यातेः धर्ममेघ समाधिः

प्रसंख्यान=विवेकख्याति, विवेकज्ञान. प्रसंख्यानेऽपि=विवेकज्ञानकालींही. अकुसीदस्य; कुसीद=राग, प्रेम तद्रहित झालेल्या वैराग्ययुक्त पुरुषाला; कुसीदः A money-lender, a surer कुसीदं=any loan or Thing lent to be repaid with interest, usury—अकुसीदस्य=प्रेमरहित. प्रसंख्याने अकुसीदस्य=प्रसंख्यानामध्यें सुद्धां जो प्रेमरहित असतो. सर्वथा=सर्व बाजूनें; सहज; सर्व बाजूंनीं विवेकज्ञान होत असल्यामुळें. प्रथम प्रेमानें विवेक ख्यातीकडे वळतो, तो प्रेमानें न वळतां सहज वळूं लागला, स्वभावच होऊन गेला कीं धर्ममेघ समाधी साधला ह्मणावा. प्रेम एकावर होणें ह्मणजे दुसऱ्याकडे प्रवृत्ती न होणें ह्मणजे त्याचा ओढा नसणें त्याविषयीं निदान दुर्लक्ष तरी होणें. परंतु हेंही प्रेम जेव्हां जाईल सहजीं नष्ट होईल तेव्हांच हा धर्ममेघसमाधी प्राप्त झाला समजावयाचें. ज्ञानाग्नीनें संस्कारांचा नाश झाल्यावर विवेकख्याती होते. त्या विवेकख्यातीनें सर्व जगाला ताब्यांत ठेवतां येण्याची सिद्धि मिळते परंतु जो खरा योगी आहे तो योगाभ्यासानें साध्य झालेल्या सिद्धींची पर्वा करीत नाहीं. सिद्धींच्या मागें लागणें हें योगाभ्यासाचें साध्य नव्हे. जो त्या सिद्धींची पर्वा करीत नाहीं त्याला आत्मप्रकाशाची प्राप्ती होते तोच धर्ममेघ समाधी. सतत धर्मांप्रत वर्षतो ह्मणून धर्ममेघ; सततं धर्ममेहते—वर्षते किंवा सिंचति इति धर्ममेघसमाधिः

**सूत्रार्थः**—विवेकज्ञान प्राप्त झाल्यानंतर त्या ज्ञानाची किंवा ज्ञानाच्या फलाची सुद्धां जो इच्छा करित नाहीं; त्याला धर्ममेघसमाधी प्राप्त होतो.

**ततः क्लेशकर्मनिवृत्तिः ॥ ३० ॥**

ततः त्या धर्ममेघसमाधीपासून क्लेशांची व कर्मांची निवृत्ती होते.

**सूत्रार्थः**—धर्ममेघ समाधीनें अविद्यादि पांच क्लेश समूल जातात. मग योगी जिवंत असला तरी क्लेशकर्मापासून मुक्त होतो. यासच जीवन्मुक्त ह्मणतात.

**तदा सर्वावरणमलापेतस्य ज्ञानस्यानंत्यात् ज्ञेयमल्पम् ॥ ३१ ॥**

तदा सर्व आवरण मल अपेतस्य ज्ञातस्य आनंत्यात् ज्ञेयं अल्पम्

तदा=क्लेशनिवृत्तीनंतर. आवरण=आच्छादन. आनंत्यात्-अनंतस्य भावः आनंत्यं तस्मात्. अपेतः=रहित सर्वावरणमलापेतस्य ज्ञानस्यानंत्यात्-सर्व जीं क्लेशादिक आवरणें तद्रूप मलानें रहित झालेलें जें शुद्ध ज्ञान, तें अनंत होत असल्यामुळें, ज्ञेयं अल्पं, अल्पं=फारच थोडें ज्ञेय राहतें.

हल्लींच्या स्थितींत आपणास सर्व कांहीं जाणावयाचें असतें, ज्ञान अल्प असतें व ज्ञान व्हावयाचें असें ज्ञेय पुष्कळ असतें. परंतु धर्ममेघसमाधी नंतर जाणावयाचें थोडें राहतें. जाणीव पुष्कळ येते. 'ज्ञेयं अल्पं' असें सूत्रांत म्हटलें आहे यावरून कांहीं तरी अल्प तरी जाणावयाचें राहतें अशी शंका येईल परंतु ज्ञेय हें कधींच नाहींसें होत नाहीं ईश्वर हा एकटाच सर्वज्ञ आहे. धर्ममेघ समाधी ज्याला साधला त्याजवर ज्ञेयाचें कार्य नाहीं, कांहीं कर्तव्य नाहीं, व ज्ञेयाचें त्याच्याशीं कांहीं राहत नाहीं. त्या ज्ञेयापासून तो योगी दूर राहतो त्यास त्या ज्ञेयापासून कांहींही त्रास नाहीं. कारण प्रकृति नित्य आहे व तिचें कार्यही नित्य आहे. संसार, जगत्, हें कधींच नष्ट होणारें नाहीं, मात्र असा हा योगी ह्या सर्वांपासून अलिप्त होतो. प्रकृतीचें कार्य त्याच्यावर राहत नाहीं. प्रकृती त्याच्या संबंधें कृतकृत्य होते. म्हणजे तो तिच्यापासून सुटतो. ती प्रकृति त्याच्यापासून अलग होते व दुसऱ्याकरितां ती तयारच आहे. त्याच्याशीं तिला कांहीं कर्तव्य आतां नाहीं इतकेंच. म्हणजे जगाचें रहाटगाडगें हें नित्य चालणारें आहे तें नाहींसें होणारें नाहीं. धर्ममेघसमाधीच्या योग्याला मात्र तें नष्ट आहे. "**न कदाचित् अनीदृशं जगत्**"

**सूत्रार्थः**—अज्ञानाच्या सर्व प्रकारच्या मलानें रहित असें जें ज्ञान तें अनंत असल्यामुळें, ज्ञेय हें फार थोडें राहतें, ज्ञानावरील आवरण निघून जातें. पुरुषाचे ज्ञानानें जगांतील सर्व पदार्थांचें ज्ञान त्या ज्ञानापुढें तुच्छवत्, आकाशांतील काजव्याप्रमाणें आहे.

## ततः कृतार्थानां परिणामक्रमसमाप्तिर्गुणानाम् ॥ ३२ ॥

ततः कृतार्थानां गुणानां परिणामक्रमसमाप्तिः

ततः=ज्ञेय थोडें राहिल्यानंतर; धर्ममेघसमाधि उत्पन्न झाल्यामुळें, कृतार्थानां गुणानां=सत्व रज तम हे तीन गुण ह्या योग्याला कृतार्थ होतात. कृतार्थ झालेले हे तीन गुण, त्या गुणांच्या परिणामाच्या क्रमाची समाप्ति होते. गुण हे भोग देण्याकरितां होते, त्यांनीं मोक्ष दिला व त्यांनीं शेवटला नमस्कार ठोकला व ते

कृतकृत्य झाले, म्हणजे क्रमाक्रमानें ( एकामागून एक ) त्या गुणांचा जो परिणाम ह्या योग्यावर होत होता तो समाप्त झाला.

**सूत्रार्थः**—ज्ञेय थोडें झाल्यानंतर कृतार्थ झालेले तिन्ही गुणांचे क्रमाची समाप्ति होते. ह्या योग्याशीं गुणांचें कार्य आटोपलें; कार्य आटोपल्यावर तेथें उगीच कोणी बसावयाचा नाहीं.

## क्षणप्रतियोगी परिणामापरान्तनिर्ग्राह्यः क्रमः ॥ ३३ ॥

क्षण=अत्यंत सूक्ष्म कालाचे सूक्ष्म अंश, प्रत्येक क्षण क्षण, क्रमाचें स्वरूप दाखवितात. स्वरूप दाखविणारे क्षण, कुंभारानें माती आणिली, तिचें चूर्ण केलें, त्यांत पाणी टाकलें, गोळा केला, तो गोळा चाकावर ठेविला, चाक फिरविलें कपाल तयार केलें वगैरे क्रमाक्रमानें बदल होतात. एकाच क्षणांत क्रम संभवत नाहीं म्हणून अनेक क्षणांचा आश्रय करणारा, क्षणाचा पूर्वापररूप जो परिणामप्रवाह, त्याला परिणामक्रम म्हणतात. हा परिणामक्रम, परिणामाच्या अवसान काळीं ज्ञात होतो. अपरान्त परिणाम–अपर=शेवटला, अन्त=भाग परिणामांतला सूक्ष्मांतला जो शेवटला भाग तेथपासून क्रम ग्राह्य, क्षणप्रतियोगी—कुंभाराच्या क्रमाचें स्वरूप कालाचे विभाग दाखवितात. कालाच्या सूक्ष्मतत्वानें, क्रमाचें स्वरूप दाखविलें आहे. सजातीय अव्यवहित एकसारखी क्रिया कालतत्वानें, दाखविली जाते तो क्रम. उदाहरणार्थ—वस्त्र बाजारांतून आणिलें, एक वर्षानें तें निरुपयोगी झालेलें आढळलें. तें जें निरुपयोगी झालें, तें एकदम झालेलें नव्हे तर, तें आणिल्यापासून कालाच्या, प्रत्येक सूक्ष्म कालाच्या विभागाच्या शेवटील परिणामानें, एक वर्षानें, त्याजवर परिणाम निरुपयोगीपणाचा झालासा दिसतो; परंतु जीर्णत्वाची क्रिया, वर्षभर, प्रत्येक क्षणीं चालू असतांही, काळाच्या प्रत्येक सूक्ष्म क्षणांत होणारा परिणाम, ध्यानांत येत नसतो. व त्या वस्त्राची होणारी निरनिराळी स्थिती, कळत नसते, शेवटला परिणाम मात्र कळतो, त्या परिणामास क्रम म्हणतात. ही क्रमावस्था सामान्य माणसांची झाली परंतु ज्या मनाला फक्त वर्तमान काळच होऊन गेला, सूत्र ३२ ह्यांत सांगितल्याप्रमाणें, क्रमसमाप्ती झाली, भूत भविष्य काळ उरलाच नाहीं त्या मनाला विजेप्रमाणें प्रकाश मिळून तो वर्तमान काळांतलाच होतो; त्यामुळें पुनरावर्तन नाहीं.

**सूत्रार्थः**—काळाच्या प्रत्येक सूक्ष्म क्षणाच्या शेवटील भागाला होणारा जो सूक्ष्म परिणाम, तो ग्राह्य क्रम होय.

## पुरुषार्थशून्यानां गुणानां प्रतिप्रसवः कैवल्यं । स्वरूपप्रतिष्ठा वा चितिशक्तिरिति ॥ ३४ ॥

चितिशक्ति=आत्मा.

भोग व मोक्ष मिळवावयाचे हा पुरुषार्थ. शून्यानां गुणानां म्ह. पुरुषार्थप्राप्तीनें, दुसरें कांहींच काम न उरल्यानें, शून्य झालेले गुणांचा प्रतिप्रसव=उलटें फिरणें, लय होणें, प्रधानांत, प्रकृतींत लय होणें. गुण हे ज्या कारणांपासून उत्पन्न झाले त्यांत स्वस्थ शून्य होणें.

कैवल्यं=हेंच कैवल्य ह्मणजे चित्ताचा संबंध बिनकूल न राहतां एकटा आत्म-स्वरूपानें राहणें, केवल स्वरूपानें राहणें, तेंच कैवल्य, तोच मोक्ष; कैवल्यं, एकला तो केवल; केवलस्य भावः कैवल्यं. सूक्ष्म अग्नि असला तर त्याचा वाटेल तेवढा मोठा होतो. जोंपर्यंत चित्त आहे, तोंपर्यंत जन्म आहे. परंतु चित्ताचा चित्तपणा गुप्त अग्निप्रमाणें, गुप्त अग्निसुद्धां मोडला, कीं, तो जसा अग्नि पेटणार नाहीं, तसें चित्त मोडल्यानें, व पुन्हा न उठल्यानें जन्म नाहीं. वा=किंवा. स्वरूपप्रतिष्ठा तीच चितिशक्ति ( पुरुष ) त्या पुरुषाचे स्वरूपामध्यें स्थित होणें, स्वरूपापासून च्युत न होणें, तें कैवल्य होय.

प्रतिष्ठा=यत्र यत्र प्रतितिष्ठति सा तस्य प्रतिष्ठा, प्रति तिष्ठति अस्याम् इति, स हि भवति देवानां एकं अङ्कं अरक्षिता गुहे रुद्धा.

**सूत्रार्थः**—त्रिगुणाचें कांहीं एक काम न उरल्यामुळें ते आपल्या कारणांत लय पावतात. ह्मणजे उलटे फिरून, स्वस्वरूपीं स्थित होतात, हें जें त्यांचें स्थित होणें, त्यासच कैवल्य ह्मणतात, किंवा ज्ञान आपल्या मूळभावांत प्रविष्ट झालें ह्मणतात.

## कैवल्यपादः समाप्तः

---

केवल्यप्राप्तीनंतर ब्रह्मानंदाचें प्रत्यक्षस्वरूप —

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् ।
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्वमस्यादि लक्ष्यम् । •
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतम् ।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥

देह जाणारा, सर्वेही जाणार, पण सुकृति दुष्कृती न जाणारी, संस्कारानें बरोबरच असणार.

धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे । भार्या गृहद्वारि जनः श्मशाने ।
देहश्चितायां परलोकमार्गे । कर्मानुगो गच्छति जीव एकः ॥

जीव जातानां वासनांत गुरफटल्यानें, प्राणी फार कष्टी होतो. तेव्हां,

सहस्र विंचवाच्या वेदना । मरणसमयीं एकल्याचि होती जाणा । ह्मणोनी चुकवावया यमयातना । योग हेची साधन मनिं आणा ॥

न वेषधारणं सिद्धिसाधनं न च तत्कथा ।
क्रियैव साधनं सिद्धेः सत्यमेव न संशयः ॥

## १ कैवल्य ( एकलेपणा )

मानवी प्राण्याला, एकंदर तीन देह मानलेले आहेत. ( १ ) दिसणारा हा स्थूल देह. (२) जो मरणानंतर वासनांच्या संस्कारांनीं परिपूर्ण, सूक्ष्मइंद्रियें मनासह असतो ज्याला लिंगदेह किंवा सूक्ष्मदेह म्हणतात. गी. १५-७।८; (३) कारणदेह—गाढनिद्रेंत ज्या देहामध्यें, आपण असतों, व जागे आल्यावर आपण म्हणतों ' मला गाढ झोंप लागली होती ' हा अनुभव ज्या देहानें घेतला तोच तो कारणदेह—अज्ञानदेह होय.

मनुष्यप्राणी मेल्यानंतर, त्याचा स्थूलदेह, गाडून टाकतात, किंवा भाजून टाकतात; तरी पण सूक्ष्मदेह तो शिल्लकच असतो. हा सूक्ष्म देह आपल्या बरोबर आपल्या जन्मांतील वासनांचे संस्कारांचें गाठोडें घेऊन जातो. तें त्याचें गाठोडें, शिक्या मोर्तबासह वासनांचें पार्सलच होय. जसें पोष्टांत टाकलेलें, शिक्का मोर्तब केलेलें पार्सल, ज्याचें त्याचेकडे जातें, तसें. व हेंच वासनांचें गाठोडें, पुनर्जन्माला कारण होतें; व प्राणी जन्मास येतांना, तो आपल्या गाठोड्यासह, या जगांत हजर—व्यक्त होतो. गाठोड्यांतील गुप्त असलेले वासनांचे संस्कार, त्याला पुन्हा नाचवूं लागतात. व सुखें दुःखें कर्मानुसार भोगवितात. सबब दुःखें टाळण्यासाठीं, त्या गाठोड्यांतील वासना काढून टाकून, गाठोडें रिकामें केलें पाहिजे. तें गाठोडें रिकामें करणें ह्मणजे अज्ञाननाश झाला पाहिजे. ह्मणजे मी कोण, आलों कोठून, जाणार कोठें, जगाशीं माझा संबंध काय व कर्तव्य काय, ह्याचीं बरोबर ओळख करून घेणें, त्याचेंच नांव अज्ञाननाश. अज्ञाननाशाकरितां निष्कामता अंगीं बाणली पाहिजे. ती निष्कामता बाणण्यासाठींच योगशास्त्राची म्ह. कैवल्याची ओळख करून घेणें आहे. मोक्ष, मोक्ष, म्हणून जें काय म्हणतात, त्याचा अर्थ प्राण्याची कोठें तरी बद्धकता असली पाहिजे, असा होतो. त्या बंधापासून सुटका करून घेणें म्ह. मोक्ष होय. म्हणजेच वासनांचा क्षय करणें, असें शास्त्र सांगतें.

जेथें विचार चालतात ती मनुष्यावस्था, व जेथें विचार चालत नाहींत, ती शून्यावस्था—फत्तरावस्था, तीच मोक्षाची कल्पना, तीच केवलावस्था, असें सामान्य जनसमूहाचें मत दिसतें. स्वामी विवेकानंद आपल्या ग्रंथांत ( व्याख्यानांत ) ह्मणतात, सामान्य जन जरी, वर दर्शविल्याप्रमाणें, दोनच अवस्था मानतात, तरी केवलावस्था ही तिसरी अवस्था आहे. अस्तित्व हें या दोनच अवस्थेंत असावें,

तिसऱ्या कोणत्याही अवस्थेंत असूं नये, असें ह्मणण्याचा या लोकांना आधिकार काय ? हे लोक वरवर विचार करणारे असतात, खोल विचार करणारे नाहींत. विवेकानंद ह्मणतात, एकाद्या जागेंत प्रकाश किरणाचे स्पंद अत्यंत मंद असले, ह्मणजे त्याचें अस्तित्व आपणांस भासत नाहीं, आणि त्यामुळें आपण अंधार आहे ह्मणतों. त्या स्पंदाचा वेग थोडा वाढवला तर, ते किरण आपणास स्पष्ट दिसूं लागतात. व त्यास आपण उजेड ह्मणतों.

तेच स्पंद अत्यंत झपाट्यानें होऊं लागले ह्मणजे आपल्या नेत्रांस ते दिसे-नासे होतात. त्यावेळीं डोळ्यांस अंधारी आली, असें आपण ह्मणतों, ह्मणजे तोही एक प्रकारचा अंधार ह्मणण्यास हरकत नाहीं. आतां आरंभींचा अंधार, व हा मागूनचा अंधार, याचें स्वरूप एकच आहे का ? आरंभींचा अंधार, व मागूनचा अंधार या दोहोंमध्यें जमीन अस्मानाचें अन्तर आहे. तसेच दगडांतील विचाराभाव, आणि परमेश्वराचा विचाराभाव, हे एकच ह्मणणें मूर्खपणाचेंच नव्हे का ? परमेश्वराच्या ठिकाणीं, बरें वाईट ह्याचें, अस्तित्वच नाहीं. त्याला अज्ञात असें कांहींच नाहीं. विचारोत्पत्ती अज्ञानामुळें; त्या अज्ञानालाच माया ह्मणतात. माया ह्म. जसें असेल, तसें न दिसणें; व दिसेल, तसें नसणें. उ. शींप पडलेली असतां, रुप्याचें नाणें भासणें. जगांतील यच्चयावत् पदार्थ, मायामोहित ईश्वराचे दागिने होत. सोन्याचे नाना तऱ्हेचे दागिने, जगांत निर्माण करितां येतात. नाना रूपें एकच सोन्याला देतां येतात, तसेंच ईश्वरत्वानें, निरनिराळीं रूपें धारण करणें ह्मणजे ईश्वरी अंशाचे निरनिराळे दागिनेच होत. ह्मणून हें चराचर विश्व ईश्वरी अंशानें, ( जसे सोन्याचे दागिने सोन्यानें तसें ) भरलेलें आहे. ईश्वर हा प्रत्येक वस्तूंत आहेच. ह्मणूनच गीतेंत ह्मटलें आहे, **वासुदेवः सर्वमिदं स महात्मा सुदुर्लभः** गी. ७.१९; हें सर्व वासुदेवमय आहे. मात्र असें जाणणारा विरळाच. हेंच जाणावयाचें आहे. हें केवल तत्व जाणणें, तीच केवलावस्था. तात्पर्य माया ओळखून, मायारहित जें ईशित्व तोच परमेश्वर तीच केवलावस्था व मायामोहित ईशित्व तो जीव–तीच सृष्टी. व हीच स्थिति मानवाची. अशी स्थिति असतां, व तीच स्थिति ओळख-ण्याला समाधि हें साधन असतां, समाधि ह्मटलें कीं, विचारशून्यता, अशी कल्पना सामान्य जनांच्या मनांत येऊन ते थरारून जातात.

कोणत्याही गोष्टीचा पक्का शोध केल्यावांचून, तिच्याकडे पाहून, नाकें मुरडणें,

हें सत्य शोधणाऱ्यांना शोभणार नाहीं. प्रत्येक गोष्ट सदसद्विवेकबुद्धीच्या कसोटीवर घासून पाहिल्याशिवाय, त्या वस्तूबद्दल मत देणें, धोक्याचें, व अविचाराचें आहे. हजारों वर्षांपासून अनुभव घेऊन ज्या शास्त्राची उभारणी केलेली आहे, त्या शास्त्रास अननुभविकांनीं नांवें ठेवणें, अविचारानें, व अदूरदर्शीपणाचें नव्हे तर काय ? अध्यात्मविद्या, व परमेश्वराचा शोध, हें आधुनिक लोकांच्या मतें निव्वळ थोतांड आहे. मृगजळाच्या शोधासारखेंच ईश्वराच्या शोधाला ते मानतात. हजारों वर्षांपासून अनुभव घेऊन ज्या शास्त्राची उभारणी झाली आहे, तें शास्त्र, इंद्रियातीत कांहीं असल्याचें सांगत आहे. तें इंद्रियातीत जें काय आहे, त्याचा अनुभव घेतल्याविना, तें सर्व खोटेंच आहे, असें ह्मणण्याचा कोणालाही अधिकार नाहीं.

ज्याप्रमाणें स्थूल देहापलीकडे सूक्ष्मदेह आहे, तसेंच स्थूल जगापलीकडे, सूक्ष्म जग आहे. जसें सूक्ष्मदेह हा, कारणदेह असून, स्थूलदेह हें त्याचें कार्य आहे. तसेंच, सूक्ष्म जग हें कारणजग असून स्थूल जग हें त्याचें कार्य आहे. त्याच प्रमाणें यांत्रिक जड शक्तीच्या पलीकडे, ईश्वरी सूक्ष्म शक्ती, कार्यकारणभावानें आहे. त्या सूक्ष्म शक्तीला ओळखून, आपल्या ताब्यांत आणिली तर तिचें कार्य जें स्थूल, तें आपल्या ताब्यांत नाहीं का येणार ? जगाकडे बारकाईनें लक्ष दिलें तर आढळून येईल कीं, प्रत्येक प्राणिमात्राची धडपड ह्या स्थूलावर ताबा मिळविण्याकरितांच आहे. व जगांतील मारामाऱ्या व लढाया ह्याही स्थूलावर ताबा मिळविण्याच्याच हेतूनें आहेत; तें साध्य, जर अन्य उपायांनीं साधत असेल, तर कां साधूं नये. याचें योग्य उत्तर कोणी देईल का ? ऋषी मुनी तेंच सांगत आहेत. 'जगाला जें काय पाहिजे आहे, तें मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न आहे.' परंतु जगाला 'पी हळद व हो गोरी,' व्हावयास पाहिजे. इतकेंच नव्हे तर, हळद न पितांच गोरें व्हावयास पाहिजे आहे. तसें झाल्यावर, मग हे भरवंसा ठेवणार !

स्वामी म्हणतात आपल्या बुद्धीच्या पलिकडे ( विचारशक्ती पलिकडे ) अत्यंत रमणीय असे कित्येक प्रदेश आहेत. बुद्धीच्या प्रदेशाची सरहद्द ओलांडली ह्मणजे, आपल्या खऱ्या जीवनास आरंभ होतो. सध्याचें आपलें जीवित हें, वास्तविक जीवित नसून, खऱ्या जीविताचा तो एक अंकूर आहे. आतां बुद्धीच्या पलिकडील गोष्ट ही खरी कशी मानावी ? या लोकांच्या प्रश्नास ते उत्तर देतात, महात्मे

जे होऊन गेले ते, सुकी बडबड करणारे नव्हते, त्यांची योग्यता, ह्या बोलक्या लोकांहून खास अधिक आहे. त्यांनीं तुह्मा आह्मांपासून कांहीं मिळवावयाचें आहे ह्मणून उगाच खोटें लिहून ठेविलें नाहीं. ज्यांच्या अंगांत विचारक्रांती घडवून आणण्याचें सामर्थ्य आहे, ते ह्मणतात प्रत्येक प्राणिमात्राचा कल, आपल्या मायघरीं जाण्याचाच आहे. वस्तु जेथून उत्पन्न झाली, तेथेंच तिचा लय व्हावयाचा. त्याप्रमाणें प्रत्येक प्राणिमात्राचा आपल्या उत्पत्तिस्थानीं, मायघरीं जाण्याचा कल-ओढा आहे. व चालू अवस्था हा एक मुक्काम असून, आपलें अनंत अस्तित्व त्या पलिकडे आहे. व ह्याचा अनुभव त्यांनीं घेऊन इतरांकरितां मार्ग आंखून देऊन, त्या मार्गाचा अवलंब करून, अनुभव घेण्यास, ते बजावून सांगत आहेत. चालू जीवित अत्युच्च कां ह्मणावें. याचे कारण कोणी सांगेल का ? असें स्वामी विचारतात. जगाचें जें स्वरूप आज आपणांस दिसतें, त्याच्या पलिकडे आपली बुद्धि जात नाहीं जगाचें जें स्वरूप आज दिसतें, त्याला पुरावा आपल्या इंद्रियावांचून दुसरा नाहीं. परंतु इद्रियांचा पुरावा नेहमीं विश्वसनीय नसतो; कारण इंद्रियें, तृषिताला, मृगजळ, पाणी, भासवून, फसवितात हा अनुभव आहेच. मुनींनीं म्हणूनच इद्रियां पलिकडील प्रदेशांत प्रवेश करून घेतला आहे. व तेथें, जें, जें, त्यांनीं पाहिलें, तें, तेंच, निरपेक्ष बुद्धीनें, लोककल्याणार्थ सांगितलें आहे. म्हणूनच कैवल्याकडे जाण्याच्या मार्गाची महती ते गात आहेत.

---

## २ शुष्क शास्त्र कशाला ?

अलीकडील लोकांचें मत, आह्मांला आतां हें घटपटाचें शुष्क ज्ञान नको आहे. काळाला अनुसरून कांहीं भरींव ज्ञान नवीन शोध असेल तर तो पाहिजे, हें ह्मणणें खरें आहे. व कोणासही पसंत आहे. परंतु त्यांस एवढाच प्रश्न कीं हें जें घटपटाचें पोकळ ज्ञान, ह्मणून मानणारे आहेत, त्यांस त्याचें रहस्य कळलेलें आहे कोठें ? हें घटपटाच्या रूपानें असणारें ज्ञान, चित्तशुद्धीसाठीं आहे. ज्यांची चित्तशुद्धी झाली आहे,त्यांस ह्या ज्ञानाची जरुरी नाहीं, ही गोष्ट खरी; परंतु कोणाची चित्तशुद्धी झाली आहे ? माझी चित्तशुद्धी झाली आहे, असें सांगणारा एखादा तरी आहे का ? कोणता तत्ववेत्ता चित्तशुद्धीशिवाय, एकान्ताशिवाय, नवीन शोध नवीन शास्त्र काढूं शकला आहे ! जे जे तत्ववेत्ते होऊन गेले, व ज्यांनीं ज्यांनीं नवीन

शास्त्रें व शोध केले, ते समाधान वृत्तीचेच होते. म्हणून त्यांच्याकडून उपयुक्त असे शोध निघाले. आमचे कडीलही भगवान् व्यासांसारखे मनूसारखे, योगेश्वर श्रीकृष्णासारखे, आचार्यांसारखे, पातंजल ऋषींसारखे, एकनाथासारखे शिवाजी महाराजांसारखें, शुद्ध निर्मळ अंतःकरणाचे झाले, तेव्हांच जगांत कार्यकर्ते होऊन गेले. व जगाचें कल्याण केलें आहे.

ज्यांचें मन सुसंस्कृत झालें आहे, त्यांच्याकरितां, शास्त्र नव्हे तर असंस्कृत जे आहेत, त्यांच्याकरितां तें होय. ज्यांचें मन उन्नत झालें आहे, त्यांना शास्त्रापासून, परोपकाराशिवाय, स्वतःकरितां कांहींएक करावयाचें नसतें.

**नैव तस्य कृतेनार्थो नाकृते नेह कश्चन ।**
**न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः ॥** गी. ३. १८.

एकनाथ महाराजांची अशी गोष्ट सांगतात कीं, ते फार देवभक्त होते. ज्ञान व्हावें अशी इच्छा फार होती. एक दिवस स्वप्नांत त्यांना दृष्टांत झाला कीं, जनार्दनपंत म्हणून सज्जन माणूस आहे, त्यांस तूं गुरु कर. ते तुला ज्ञान देतील.

जनार्दनपंत हे एका सावकाराकडे कारकून होते. त्यांच्याकडे जाऊन, एकनाथ राहिले. बरेच दिवस त्यांची सेवा एकनाथांनीं केली. एक दिवस जनार्दनपंतांच्या मतांत आलें, ह्याला गुरूची भेट करून द्यावी. म्हणून एकनाथांला बरोबर घेऊन रानांत निघाले. वाटेंत एक दाढीवाला मुसलमान फकीर भेटला. त्याच्याबरोबर कुत्रे कुत्र्या बऱ्याच होत्या. भिक्षेचें पात्रही होतें. बोलतां बोलतां अन्नाच्या गोष्टी निघाल्या. तेव्हां त्या फकीरानें, झोळींतून शिळे पाके भाकरीचे तुकडे काढले. व कुतरीच्या अंगावर हात फिरवून, त्या कुत्रीचें दूध काढलें. भिक्षापात्रांत कुत्रीचें दुध काढून, त्यांतच भाकरीचे तुकडे कुसकरले; व खाण्यास सुरवात केली. कुत्रेही त्यांतच खाऊं लागले. जनार्दनपंताला त्यांतून प्रसाद म्हणून दिला. तो त्यांनींही खाल्ला. जनार्दनपंतांनीं एकनाथाला प्रसाद मिळावा, म्हणून त्या फकिराची प्रार्थना केली. त्याप्रमाणें त्यांसही त्या फकीरानें थोडा प्रसाद दिला, तो त्यांनीं खाल्यावर पुढें एकनाथांना ज्ञानप्राप्ती होऊन ते प्रसिद्धीस आले. तात्पर्य ज्यांना ज्ञान झालें आहे, त्यांना शास्त्राची वगैरे कशाचीही जरूरी नाहीं. ज्याच्या मनांत मुसलमानाची भाकरी, व कुत्र्याबरोबर कशी खावी असें द्वैत येतें, व समबुद्धि

नसते, त्यांच्याच करितां शास्त्र आहे. ती समबुद्धि मिळून जगाचें कल्याण व्हावें, एवढ्याच करितां शास्त्राची योजना आहे.

जगांतील कोणताही सृष्ट पदार्थ, असंस्कृत स्थितींत, निरुपयोगी असून व्यवहारोपयोगी येत नसतो. प्राणी व त्याचें मन हे सृष्ट पदार्थांपैकींच असल्यामुळें तेही संस्काराशिवाय व्यर्थच होत. बैल, घोडा, ह्यांना शिक्षण दिल्यानेंच कामीं येतात. हिरा खाणींतून जशाच्या तसाच उपयोगी पडत नाहीं; घांसून पुसून झगझगीत करावा लागतो, तेव्हांच किंमतीला चढतो. ज्या मानानें पदार्थ संस्कृत, त्या मानानें त्याची उपयुक्तता, व किंमत. लोखंडाला शुद्ध करून, संस्कृत करून, पोलाद बनविलें तर, तें फार उपयुक्त होतें. व लोखंडापेक्षां त्याला किंमत अधिक येते.

सुताराला हत्यारांशिवाय लांकडावर संस्कार करितां येत नाहीं. सुताराला लाकडावर संस्कार करण्याकरितां जशीं हत्त्यारें, हीं साधनें उपयोगी पडतात, त्याचप्रमाणें प्राण्याचें मन संस्कृत करण्याकरितां, घटपटाचें ज्ञान, हें साधन उपयोगीं पडतें. सूक्ष्म विचाराला मन लायक करणें, हें साध्य मिळाल्यानंतर मग त्या साधनांची जरूरच राहत नाहीं. जसें एरंडेल तेल पोटांतील खळमळ काढून टाकण्याकरितां, घ्यावयाचें, व खळमळ काढून टाकण्याचें काम झाल्यावर मग त्याचाही त्याग करावयाचा, त्याच प्रमाणें मन सुसंस्कृत होऊन, विचारांला लायक झालें कीं, घटपटादि साधनें हीं टाकून द्यावयाचीं.

अलीकडील लोकांचें ह्मणणें, तत्वज्ञान हें जबरदस्तांचा दुर्बलांवर जूलम होय It is an imposition by the stronger on the weaker. परंतु हा जुलूम वाटणार कोणाला? खळबळ अंतःकरणाच्या माणसांना, त्यांच्या भाषेंत दुर्बलांना. आमच्या भाषेंत, आस्तिकांना तो जुलूम वाटत नाहीं. त्यांना तसें वाटूं लागलें, ह्मणजे, मग त्यांनांही ह्या तत्वज्ञानाची जरूरी राहणार नाहीं. अज्ञान्यांनीं सज्ञान व्हावें व स्वैरवर्तनाला आळा पडावा, एवढ्याचकरितां तत्त्वज्ञान आहे. तात्विक ज्ञानानें सूक्ष्म विचाराला लायकात येते. व एक प्रकारची श्रद्धा उत्पन्न होते. त्या श्रद्धेनें आत्मविश्वास उत्पन्न होतो. त्या आत्मविश्वासानें अघटित कामें घडून येतात. उ. नेपोलियनला आत्मविश्वास किती होता, व त्यानें किती अघटित कामें केलीं! तात्विक ज्ञान निरर्थक व कुच कामाचें ह्मणणाऱ्या पुढें, आपले

इकडील शिवाजी महाराजांचें उदाहरण ठेविल्यानें, खात्री पडेल. महाराजांनीं, चित्त शुद्धि झाल्यानेंच जगदंबेवर ह्म० सूक्ष्म तत्वशक्तीवर विश्वास ठेविला. व राज्य कमाविलें. व हें कमाविलेलें राज्य, निर्मळ अन्तःकरणाच्या माणसाच्या झोळींत, तोंडी नव्हे, तर लेखानें, टाकलें असतांही, त्या शुद्ध अन्तःकरणाच्या ब्राह्मणानें रामदासस्वामींनीं स्वीकारलें नाहीं. केवढी ही दोघांची उदार बुद्धि ! शुद्ध अन्तःकरण ! ह्या निर्मळ वृत्तींच्या योगें, त्या दोघांस कशाची ही दिक्कत वाटत नव्हती. ते पाहिजे तें मिळवूं शकत होते. व जगाचें कल्याण करीत होते. हें कशाचें द्योतक आहे. तर चित्तशुद्धीचेंच.

ह्या लोकांना आत्मविश्वास नाहीं. स्वतःचें मन शुद्ध स्वच्छ नाहीं. एक सारखी धडपड, बडबड, चाललेली; त्यामुळे एकान्त करण्याची संवय नाहीं. ह्यांच्या हातून सुकृती कांहींच घडावयाची नाहीं; जशी मनाची धडपड, तशींच त्यांचीं कृत्यें. त्यामुळें त्यांना स्वास्थ्य नाहीं. दुसऱ्यांना त्याच्यापासून उपयोग नाहीं. दाराशीं भिकारी आला तर त्यास मुठभर दाणे देण्याइतकी सुद्धां उदार वृत्ती नाहीं. मग कृती उदार कशी असणार ? ह्यांचा स्वतःवर विश्वास नाहीं मग देवावर, ईश-शक्तीवर कोठून असणार ? हें कशाचें द्योतक ? तर अशुद्ध चित्ताचें. विशेष प्रकारच्या भावनेनें, चित्त प्रसन्न होतें. व त्या भावनेसाठीं मन संस्कृत करावें लागतें. चक्रवत् वृत्तीनें, चित्त प्रसन्न होत नाहीं. असूयादि दोष जोंपर्यंत अन्तःकरणांत आहेत, तोंपर्यंत चित्त, शुद्ध होणार नाहीं. व एकान्त साधणार नाहीं. चित्त शुद्ध नसल्यानें, स्वास्थ्य नाहीं; चित्ताला स्वास्थ्य नसल्यानें, त्यांच्या हातून इतरांना स्वास्थ्य मिळेल अशी कृती घडत नाहीं. मग दुसऱ्यांच्या कृतीवर टीका, आणि निंदा, या पलिकडे या लोकांना दुसरें कर्तव्यच नाहीं. एवढ्याचकरितां तत्वज्ञान पाहिजे. तत्वज्ञानानें मन सुसंस्कृत होतें. तत्वज्ञानानें एकान्त साधतो. तत्वज्ञानानें उपयुक्त शोध निपजतात.

आमच्या तत्ववेत्त्यांना, उगाच बडबड नको आहे. चित्तशुद्धीनें जें जें प्राणिमात्राला पाहिजे आहे, तें तें मिळण्यासारखें आहे, हेंच ते सांगत आहेत. त्यांच्या अनुभवांचा अनुभव घेण्याइतकीही लायकी आह्मांत नाहीं. तो अनुभव घेणाऱ्यांचीच उणीव आहे. तो अनुभव घेण्याला मात्र कोणी आपली बडबड, अस्वस्थता, टाकून तयार होत नाही. स्वतः शास्त्र लिहवत नाहीं; ज्यांनीं अनु-

भव घेऊन लिहिलें आहे, तें ह्यांच्या कल्पनेंत येत नाहीं. मग टवाळक्यां शिवाय उद्योग नाहीं.

**न करितां भगवद्भक्ती कदा नुपजे विरक्ती,। विरक्तीविणें भगवत् ( ऐश्वर्य ) प्राप्ती । नव्हे कल्पान्तिंही सर्वदा** ॥ एकनाथ.

विरक्ती शिवाय, ऐश्वर्याची प्राप्ति केव्हांही होणार नाहीं.

गीताशास्त्र ज्याची उत्पत्ती, पांच हजार वर्षांहूनही कमी नाहीं, त्या शास्त्रांत सांगितलें आहे. **मनुष्याणां सहस्रेषु** ( लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट सहस्र नव्हे, तर सहस्रेषु, कोट्यवधींत ) **कश्चिद्यतति सिद्धये । यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्वतः** ॥ गीताशास्त्राची जी इतक्या जुन्या-काळांत रचना झाली, त्या काळच्या लोकांची स्थिती जर अशा तऱ्हेची, तर आतांच्या काळीं, जेव्हां भौतिक शास्त्रांतच लोक गढलेले आहेत, त्या लोकांबद्दल काय विचारावें ? एवढ्याच करितां, लोकस्वभाव ओळखून, सांगितलें आहे. लोकांना जर सन्मार्गी लावावयाचें आहेत तर—

**न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् ।**
**जोषयेत् सर्व कर्माणि विद्वान् युक्तः समाचरन् ॥**
**सक्ताःकर्मण्यविद्वांसो यथा कुर्वंति भारत ।**
**कुर्याद्विद्वांस्तथासक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम्** ॥ गी. ३-२५.

जे त्रिकाळज्ञानी पातंजल ऋषी त्यांनीं लोकांना ओळखूनच, सर्व चित्तवृत्ति निरोध सांगितला नाहीं. व ती दगडाची स्थिती* त्यांना सुद्धां असंमत, लोकांकडे

---

*ही जी दगडाची स्थिती म्हटले आहे, ही भाषा जनसमूहाच्या दृष्टीनें वापरलेली आहे. जग हें दारूबाजासारखें आहे. दारूबाजाच्या विरुद्ध बोलूं लागलें तर, तो मुळींच ऐकणार नाहीं. म्हणून त्याची पाठ थोपटून गोंजारून, त्यांच्यासारखें होऊन एक गोष्ट त्यांला पटल्यावर दुसऱ्या गोष्टीचा, चटका आपोआपच त्याला लागेल. सर्व चित्तवृत्तीचा निरोध सांगितला तर, लोक भिऊन जातील. व त्या दगडासारख्या मानलेल्या स्थितीकडे, कोणीच वळणार नाहीं. म्हणून जे चित्तवृत्तिनिरोधाला अधिकारी झाले, त्यांला प्रथम सत्ववृत्तींत फिरावयास ऋषी मुनी लावतात. सत्ववृत्तींत फिरतां फिरतां त्यांच्यावृत्तीला जर चटका लागला तर, पुढें जाण्याची त्याची प्रवृत्ति होईल. आणि जर अशी प्रवृत्ती झाली तर पुढील मार्ग साफ करून दाखवून ठेविलाच आहे.

लक्ष दिल्यानेंच असली पाहिजे. लोकांची पाठ थोपटून, प्रथम सत्ववृत्तींतच लोकांना वळविण्याचा त्यांचा यत्न दिसतो. सत्ववृत्तींत तरी लोकांनीं वळावें. ती वृत्ती प्राप्त झाल्यावर, ती वृत्ती आपोआपच त्यांना सत्कृतींत पुढें ढकलील. सत्वशुद्धवृत्तीनें, जो फायदा व जें कल्याण आहे, तें खळबळ अन्तःकरणानें होणार नाहीं. ह्मणून समाधान चित्ताचीच ते अपेक्षा करितात. व घटपटादि वगैरे साधनें, ह्या चित्तशुद्धीसाठीं ते उपदेशितात. ह्या सूक्ष्म विचार ते सुचवितात योगेश्वर श्रीकृष्णही निष्काम कर्मच अर्जुनाला सांगतात. चित्तशुद्धि शिवाय, निष्काम कर्मच घडणें शक्य नाहीं. स्वच्छ आरशाशिवाय, जसें रूप, स्पष्ट, दिसत नाहीं, तसेंच स्वच्छ स्थीर चित्ताशिवाय, उपयुक्त शोध, त्या चित्तांत दिसून, बाहेर येणार नाहींत.

जगामध्यें अदृश्य तत्व-ईशशक्ती—न मानणारे लोकांची संख्या वाढत चालल्यानें, नास्तिकपणा वाढत चालला आहे. त्यामुळें ज्याच्या त्याच्या दृष्टीनें, जे ते स्वतःचें, स्वतः कुटुंबाचें, स्वजातीचें कल्याण साधावें म्हणून सदोदित झगडा झगडी, मारामारी व लढायाही जगावर चालवितात; त्यामुळें सार्वत्रिक हित, समबुद्धीनें साधण्याकडे कोणाचेंच लक्ष पाहिजे तसें जात नाहीं. जो तो आपल्या पोळीवर तूप ओढण्याच्या खटपटींत असतो, परंतु हें त्याला कितपत, व किती काळ, साध्य होत असेल, हें कळण्याला इतिहासाशिवाय साधन नाहीं. हें साध्य आपलपोट्या बुद्धीनें अक्षय्य मिळविल्याचें कोणताही इतिहास सांगत नाहीं. त्रिगुणात्मक, चक्रगतींत, सर्व दुनिया असल्यानें, सत्ववृत्ति सुटतांच हालांत दुनिया येते. हा अनुभव आहे. म्हणून सत्ववृत्तीचा उपदेश ऋषी मुनींचा आहे. सत्ववृत्तीनें सुकृती घडत असते. व त्यायोगें समदृष्टी होऊन जगाचें कल्याण साधत असतें.

ऋषीमुनी ह्मणतात, कार्यकर्त्या लोकांवर जर आपल्या कृतीचा परिणाम, आपणाबरोबरच आहे, असा प्रकाश पडला तर समबुद्धि ठेऊन, ते स्वतःच्या कृतीला जपतील. व दुष्कृतीपासून अलग राहूं लागतील. व सुकृती फैलावण्यास उद्युक्त होतील, व जगाचें कल्याण करतील. एवढ्याच करितां ते सांगत आहेत, तुमची कृती तुह्माबरोबरच आहे. सुकृतीचीं सुखदायक फळें, व दुष्कृतीचीं दुःखदायक फळें, हीं तुह्मी जरी जगांतून अदृश्य झालांत, तरी, तुह्मांला तुमच्या समाजाला, इतकेंच नव्हे तर तुमच्या राष्ट्राला ही तीं सुटणार नाहींत. त्याचा भोग

तुह्मांला मिळाल्यावांचून सुटकाच नाहीं. त्याकरितां ह्या चक्रगतींत उदयास येणें, लय पावणें भरभराटीस येणें, निकृष्टावस्था प्राप्त होणें, हें चालणारच. व ह्या रहाट-गाडग्यांत भोग हे कृतीवर अवलंबून असणार. व हें सर्व ज्याच्या त्याच्या कृतीचेंच फळ. ह्मणजे पुनर्जन्म तें फळ भोगासाठीं असणार.

नास्तिक लोकांचें ह्मणणें, भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः । तस्मात् यावज्जीवं सुखं जीवेत् ऋणं कृत्वा घृतं पिबेत्. ह्या त्यांच्या मतानें त्यांना कशाचीही डर राहत नाहीं. दृश्यदंडाशिवाय अदृश्यदंड, ते मानीत नाहींत. बळी तो कान-पिळी हीच त्यांची ह्मण. परंतु सुकृतीचे फळाचें अदृश्य बळ सरल्यानें, अंगांत दुसऱ्यांचे कान पिळण्याची ताकत व अक्कल, नाहींशी झाल्यानें, तोंडाची वल्गना मात्र शिल्लक राहते. ह्या त्यांच्या मतानें स्वताची मजा चालेल कशी, अशी त्यांची बुद्धि, सदोदित असते. व त्याप्रमाणेंच कृती चाललेली असते. जगाचें कांहींही होवो. स्वतःची चैन, व बडेजाव झाली कीं, तीच जगाची चैन व सुखसंपत्ति असें वाटूं लागतें. ते आंधळे बनून जगाचें हित त्यांना दिसतच नाहीसें होतें. पण त्यांना फळही तसेंच मिळतें.

हे सर्व अनर्थ टळावे, व जग सदा सुखी असावें, अशी इच्छा करणारे ऋषी मुनी, पुनर्जन्म आहे ह्मणून बजावून सांगत आहेत. व पुनर्जन्म आहे, अशी जर जगाची कल्पना झाली, तर दुष्कृतीला आळा बसून सुकृती उपजूं लागेल. ह्मणून ह्या सूक्ष्म शास्त्राच्या विचारानें, जगाचें हित साधावें हाच त्यांचा हेतू आहे. पुन-र्जन्माचा विषय स्पष्ट असतां, ह्या लोकांच्या डोक्यांत येऊं नये ह्याचेंच त्यांना आश्चर्य वाटतें.

पुनर्जन्माच्या बाबतींत सांगितलें आहे तें:—

**देहिनोऽस्मिन् यथा देहे कौमारं यौवनं जरा ॥**
**तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति** ॥ गी. २-१३.
**वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि।**
**तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही** ॥ गी. २. २२.

जी दृश्य वस्तु नव्हे ती खोटी, असें नास्तिकांचें म्हणणें, तर असा प्रश्न कीं, आज आपलें वय ५० वर्षांचें आहे, असें मानलें, ह्मणजे जर

५० वर्षांचें वय आहे, तर ४० वर्षांचें असलेंच पाहिजे; ४० चें आहे तर तीस, वीस, दहा वर्षांचेही असलेंच पाहिजे; येथपर्यंत आह्मांला स्मृति चांगली आहे; स्मृति आहे ह्मणून दहा पांच वर्षांचे आह्मीं होतों ह्मणतों; आतां याच्याही मागें जाऊं; जर पांच वर्षांचे आह्मीं होतों तर एक वर्षांचे असल्याशिवाय, पांच वर्षांचे खचीत आह्मी झालों नसलों पाहिजे. एक वर्ष वयाची आठवण मात्र नाहीं इतकेंच; जर एक वर्षांचे होतों तर शून्य वर्षांचे असल्याशिवाय एक वर्षांचे झालों कसे ? आठवण नाहीं एवढेंच. ह्मणजे मातेच्या उदरांत आह्मी होतों, ह्मणून पुढें येऊन वयाची गणना करूं लागलों; मातेच्या उदरांत होतों, ह्मणून बाहेर आलों, उदरांत नसतों तर बाहेर येणें शक्य कसें ? आतां मातेच्या उदरांत आलों कोठून ? कोठें तरी बाहेर असल्याशिवाय मातेच्या उदरांत आमचा शिरकाव झाला कसा ? ह्याचें उत्तर काय द्याल. आह्माला आठवण नाहीं, स्मरण नाहीं, हा पुरावा उपयोगाचा नाहीं; एक वर्षांचे वयाचें स्मरण नाहीं, हा जसा आह्मीं नव्हतों असें ह्मणण्याला आह्माला पुरावा सबळ मानितां येत नाहीं, तसेंच आह्मीं बाहेर कोठें तरी असल्याशिवाय, मातेच्या उदरांत गेलों कसे ? हा पुराव, असंभाव्य नाहीं; ह्मणजे आह्मी बाहेर होतों, ह्मणून आंत मातेच्या उदरांत गेलों व उदरांत गेलों, ह्मणून बाहेर आलों, स्मरण नसणें हा नास्तित्वाचा पुरावा नव्हे. आह्मी सतत आहोंत. व आमच्या कृतीचे संस्कारही आह्मांबरोबरच आहेत. व त्याचें फळही भोगावयाचें आहे.

**नत्वेवाहं जातु नासं नत्वं नेमे जनाधिपाः ।**
**न चैव न भविष्यामः सर्वे वयमतःपरम् ॥** गी. २. १२.

नास्तिकांचें ह्मणणें–

**असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम् ।**
**अपरस्परसंभूतं किमन्यत्कामहैतुकम् ॥** गी० १६. ८.

हें ह्मणणें खरें धरून चाललें तर, सृष्टीच्या उत्पत्तीकरितां, जी जी सामग्री पाहिजे, ती ती ह्याच जगांत ह्या नास्तिकांना जवळच आहे, मग तशीच सृष्टीची उत्पत्ती करून ह्यांनीं कां दाखवूं नये. येथेंच मती गुंग होते; इतकेंच नव्हे तर हायड्रोजन ऑक्सीजननें, पाणी निर्माण होतें असें ह्यांचें मत. व हायड्रोजन आक्सीजन येथेंच पाहिजे तितका आहे, मग पृथ्वीवर ज्या अदृश्य शक्तीनें अचाट खारें गोडें

पाणी निर्माण केलें आहे, तसें हे लोक करतील का ? व जर करीत असतील तर मग बसीतीच्या अभावीं दुष्काळ दुष्काळ ह्मणून ह्मांनीं कां ओरडावें ?

आपला जन्म झाल्यानंतर आपल्या शरीराचे फेरबदल किती होतात. प्रत्येक घटके घटकेस शरीराचे परमाणू नवे जुने होत असतात. जुने परमाणू जातात नवे येतात, असा बदल होतां होतां आपलें उपजत शरीर असतें तें अगदीं नवीन निराळ्या प्रकारचेंच, जसें जसें वय होत जातें तसतसें बदलत जातें, लहानपणचें शरीर मोठेपणीं अगदीं निराळें होतें, परंतु तें आपल्या ध्यानांत सहज येत नाहीं सर्व जगाची अशीच उलाढाल आहे.

सर्प मेंग टाकतो त्याप्रमाणें आपले शरीराचे चामडें बदलत असतें, ही आपल्या नखांवरून स्पष्ट कल्पना होईल. मात्र जे अदृश्य परिणाम होत असतात, ते बारकाईनें लक्ष्य देणारास दिसतील. साधारण वरवर पाहणाराला दिसणार नाहींत. यावरून अदृश्य व स्मरणांत नसणारी वस्तु, नाहीं, असें म्हणतां येणार नाहीं. हेंच ऋषि मुनी सांगत आहेत. जें लहानपणीं शरीर असतें, तें तारुण्यांत बदलतें. तारुण्यांत असतें तें म्हातारपणीं बदलतें. व म्हातारपणीं टिकाव धरीनासें झालें म्हणजे जसें मोडकळीस आलेलें घर, दुरुस्त करूनही टिकाव धरीनासें होतें, व मग नवीन बांधावें लागतें, तसेंच नादुरुस्त झालेलें शरीर टाकून दुसरें नवीन धारण करावें लागतें. जुनें शरीर टाकून नवें धारण करणें, ह्यालाच पुनर्जन्म म्हणतात. त्या पुनर्जन्मामुळें, आपली कृती सत्कृति किंवा दुष्कृति आपल्याबरोबरच असते.

**मनःषष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥ १५.७ ॥**
**गृहीत्वैतानि संयाति वायुर्गंधानिवाशयात् ॥** गी. १५. ८

व त्या कृत्याचे परिणामही भोगावे लागतात. ह्याच न्यायानें, जगांतील उलाढाली चालून, त्यामुळें सुखदुःखें पाठीस लागतात. मनुष्यें ह्याचाच विचार करीत नाहींत. वामन पंडित ह्मणतात—"मी मी हेंचि कळे परंतु नकळे कोठील मी कोण मी ॥" ह्यामुळें सर्व घोटाळा झाला आहे. व दुनिया नास्तिक बनत चालली आहे. व त्याचा परिणाम, मारामाऱ्या, झगडाझगडी हा होय. पुनर्जन्म आहे अशी खातरी पटली कीं, मनुष्य आपल्या वाईट कृत्याला जपेल. कारण त्याच्या ध्यानांत येईल कीं, अंधारांतील दुष्कृत्यांचा सुद्धां परिणाम आपणांबरोबरच आहे.

सबब दुष्कृत्यें टाकलीं पाहिजेत. व सुकृती केल्यानें, त्यांचीं गोड फळें ह्या जन्मांत मिळालीं नाहींत, तर पुनर्जन्मांत तरी मिळतील. या न्यायानें, शास्त्र, सूक्ष्म विचार सुचवून जगाचें कल्याण साधण्याकरितां, मनें तयार व्हावीं ह्मणून, प्रतिपादिलेलें आहे. शास्त्र प्रमाण मानल्यावर कार्य अकार्य कोणतें ह्याची ओळख पटते.

**तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।**
**ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥** गी. १६. २४.

---

## ३ सृष्टोत्पत्ति व हेतू.

सत्वरजस्तमसां साम्यावस्था प्रकृतिः प्रकृतेर्महान्, महतोऽहंकारो, अहंकारात् पञ्चतन्मात्राणि, उभयमिंद्रियं, तन्मात्रेभ्यः स्थूलभूतानि पुरुष इति पञ्चविंशतिर्गणः ॥

महान् महत्तत्व बुद्धि; तन्मात्रा, गंध रस रूप स्पर्श शब्द; स्थूलभूतें, पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश; उभयं इन्द्रियं ह्मणजे ज्ञानेन्द्रियें पांच, व कर्मेन्द्रियें पांच; या उभय इन्द्रियांचें अधिष्ठान मन, तेंही घ्यावयाचें; गण=समुदाय Collection.

बुद्धितत्व हें प्रकृतीपासून उत्पन्न झालें; बुद्धीपासून अहंकार, अहंकारापासून मन, पांच कर्मेन्द्रियें, पांच ज्ञानेंन्द्रियें व तन्मात्रा ह्मणजे शब्दतन्मात्र, स्पर्शतन्मात्र, रूपतन्मात्र, रसतन्मात्र व गंधतन्मात्र; ह्या पंच तन्मात्रा होत, बाप जसें लेंकाचें नियमन करितो, तद्वत्च ज्या सूक्ष्मांतून स्थूल पुढें सरकलें तें सूक्ष्म, स्थूलाहून जास्त व्यापक असून, त्या स्थूलाचें नियमन करणारें असतें. ह्मणून आत्मतत्व, जें अति सूक्ष्म, तें सर्वव्यापक असून, स्थूल सूक्ष्माचें नियमन करणारें आहे. तन्मात्रांपासून स्थूल भूतें–पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश; पुरुष ह्मणजे परमात्मा, त्यापासून उत्पत्ती ह्मणून ह्यास पुरुष ह्मटलें आहे. पुरि शेते इति पुरुषः शरीररूपी बंगल्यांत, किंवा मंदिरांत स्वस्थपणें बसून राहिलेला जो, तो पुरुष. दिसणारा पुरुषवाचक देह, हा पुरुष नव्हे, तो स्त्रीजातींतही आहे, व पुरुषजातींतही आहे. देह हा त्या पुरुषाचा राहण्याचा बंगला आहे मग तो बंगला, स्त्रीवाचक बंगली असो, अथवा पुरुषवाचक बंगला असो.

प्रकृति—माया-स्वभाव.

|

महत्तत्व ( बुद्धि ), चित्त, प्रकृतीची विकृति.

|

अहंकार.

|

मन, पांच ज्ञानेन्द्रियें, व कर्मेन्द्रियें, व तन्मात्रा ( सूक्ष्म इन्द्रियें )

|

स्थूलभूतें—पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश.

|

पुरुष.

प्रकृतीची विकृति तें चित्त; जसा लोहचुंबक, लोखंडाला सान्निध्यानें नाचवितो, तसा चित्ताला चेतविणारा तो पुरुष ( आत्मा. ) अव्यक्तांतून, साम्यावस्थेंतून व्यक्तत्व प्राप्त होऊं लागल्यावर, त्या अव्यक्तास व्यक्त होण्यास साधन, शरीर पाहिजे. **षडाश्रयणाच्छरीरम्**; सहा तत्वांचा आश्रय करणारें, ह्मणून शरीर; शरीर, हें साधन जागृत जीवंत ठेवण्यास, जीवाची योजना, त्यांत पाहिजे.

**ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ।**
**मनः षष्ठानींद्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥** गी. १५. ७.

जीव देहधारी बनला, शरीर तयार झालें कीं त्याला पोषण पाहिजे, ह्मणून अन्नपाणी वगैरेंची उत्पत्ती पुढें दिल्याप्रमाणें.

**सदेव सोम्येदमग्र आसीदेकमेवाद्वितीयम् ।**

सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वी अद्वितीय ( न द्वितीय ) असें सत् होतें. त्याला अहम्भाव उत्पन्न झाल्यानें, च्युत होऊन, स्थानभ्रष्ट होऊन, स्पंदरूपानें हिरण्यगर्भ तयार झाला. स तत्र एकाकी न रमते, तदैक्षत, एकोहं बहुस्यां प्रजायेयेति । तत्तेजोऽसृजत । तत्तेज ऐक्षत, बहुस्यां प्रजायेयेति । तदपोऽसृजत । तस्माद्यत्र क्वच शोचति स्वेदते, वा पुरुषस्तेजस एव तदध्यापो जायन्ते । ता आप ऐक्षन्त, बह्वयः स्याम प्रजायेम हीति ता अन्नमसृजन्त । तस्माद्यत्र क्वच वर्षति तदेव भूयिष्ठमन्नं भवत्यद्भ्य एव तदध्यन्नाद्यं जायते ।

पूर्वी ज्याच्या बरोबरीचें दुसरें कोणी नाहीं, असें एकच फक्त सत्तत्व होतें; त्याला अहंभाव उत्पन्न झाल्यानें, त्यापासून च्युत झालें. व हिरण्यगर्भ तयार झाला. ह्मणजे वासना अहंकार हेंच दुनियेच्या उत्पत्तीला कारण झालें. त्या हिरण्य-गर्भाला वाटूं लागलें, आपण बहुत व्हावें; तेव्हां त्यानें तेज उत्पन्न केलें. तेजाला वाटलें आपण बहुत व्हावें, तेव्हां त्या तेजानें उदक उत्पन्न केलें; ह्मणूनच कोणाला शोक होतो, किंवा उष्मा होतो तेव्हां घाम येतो, व तेव्हां पाणी फुटतें; उद-काला वाटलें आपण बहुत व्हावें, तेव्हां त्या उदकांनीं अन्न उत्पन्न केलें. जेव्हां वृष्टि पुष्कळ होते, ह्याचा अर्थ अन्न पुष्कळ उत्पन्न होतें; ह्मणून उदकापासून आद्य अन्नाची उत्पत्ती होय.

अग्नौ प्रास्ताहुतिः सम्यगादित्यमुपतिष्ठते आदित्याज्जायते वृष्टिः वृष्टेरन्नं ततः प्रजा । अग्नीमध्यें आहुती टाकल्यानें सूर्यकिरणाच्या आकर्षणानें ती सूर्याला पोंचते, सूर्यापासून रसवृष्टि होते वृष्टीपासून अन्न व अन्नापासून प्रजोत्पत्ती होते.

**तैत्तिरीयोपनिषत्**–आकाशाद्वायुः, वायोरग्निः, अग्नेरापः, अद्भ्यः पृथिवी, पृथिव्या, ओषधयः, ओषधिभ्योऽन्नम् अन्नात् रेतः, रेतसः पुरुषः, सवा एष पुरुषोऽन्नर-समयः। वर दर्शविल्याप्रमाणें आन्नापासून पुरुषाची उत्पत्ती होते. स्थूल अन्न पोटांत घातलें तरी त्याचें रूपांतर सूक्ष्म होतें. पण तो करणारा निराळाच वैश्वानर होय. जगाची घडामोड करणारा तोच, हा वैश्वानर होय; ह्याच्याशिवाय जग शून्यवत् आहे.

प्राण्यांनीं खाल्लेल्या अन्नाचे, तीन प्रकार होतात. अन्नाचा अत्यंत स्थूल भाग, त्याचें पुरीष ( विष्ठा ) बनतें. मध्यम भागाचें मांस बनतें व जो अत्यंत लहान त्याचें मन बनतें.

प्राशन केलेल्या पाण्याचेही तीन भाग विभागले जातात. अत्यंत स्थूल भागाचें मूत्र बनतें; मध्यमाचें रक्त, व जो अत्यंत लहान त्याचा प्राण बनतो. भक्षण केलेलें तेज, तेज ह्मणजे घृत इत्यादि स्निग्ध पदार्थ; त्या तेजाचेही तीन विभाग होतात; अत्यंत स्थूल भागाचे अस्थि बनतात; मध्यम भागानें मज्जा बनत्ये; व अत्यंत लहान भागानें वाणी होते. ह्मणून–**अन्नमयं मनः, आपोमयः प्राणः, तेजोमयी वागिति ।**

---

१ आकाशाचें कर्म अवकाश देणें, वायूचें कर्म रक्त मांसादिकांचें यथास्थित स्थापन करणें; तेजाचें कर्म पाक करणें, जलाचें कर्म पिंडीभूत गोळा बनविणें, पृथ्वीचें कर्म धारण करणें, मनाचें, अवयव शुभ अशुभ संकल्प सुख दुःख इत्यादिक जाणावें.

अन्नापासून मन तयार होतें, ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे, अन्नापासून जर मन बनतें, तर ज्या प्रकारचें, व ज्या तऱ्हेनें, अन्न खाण्यांत येईल, त्या तऱ्हेनें, व त्याप्रकारचें मन बनेल. क्रोधावेशांत जर अन्न खाण्यांत येईल तर, क्रोधावेशांत खाल्लेल्या अन्नाचा परिणाम मनावर तसाच होईल, म्हणून अन्न खातांना मन पवित्र व शान्त पाहिजे.

**उद्बवर्हात्मनश्चैव मनःसदसदात्मकम् ।**
**मनसश्चाप्यहंकारमभिमंतारमीश्वरम् ॥ १४ ॥** मनुस्मृ. अ. १.

ब्रह्मदेवानें, परमात्म्यापासून सदसत्स्वरूपी मन उत्पन्न केलें. मनावांचून आत्म्याला ज्ञान होत नाहीं; ह्मणून मनाचें अस्तित्व, वेदानींही, सिद्ध केलें आहे. ह्मणून मन, सत् होय. परंतु अप्रत्यक्ष असल्यामुळें असत् होय. नाहीं ह्मणावें तर भासतें, आहे ह्मणावें तर दिसत नाहीं ह्मणजे सत् असत्. मनाच्या पूर्वी सर्व कार्य करण्याविषयीं समर्थ, व अभिमान धारण करणारा, असा अहंकार उत्पन्न केला.

याप्रमाणें, अन्न, पाणी, मन, प्रकृती, पुरुषांचा इतिहास आहे. प्रकृतीपासून सर्व चराचराची उत्पत्ती आहे. व त्यांत मानव श्रेष्ठ असल्यानें, बाकीच्यांवर ताबा चालवूं पाहातो. व आपल्या सुखाकरितांच, सर्व सृष्टपदार्थ समजतो. प्राणी उत्पत्तीनें, तो अव्यक्तांतून व्यक्त जगांत येतो. विस्तीर्ण जग पाहून, प्राणी भांबावून जाईल, बेफाम होईल, व स्वैर वागूं लागेल, सबब त्याच्या स्वैरवर्तनाला, ह्मणजे त्याला आंवरण्याला बंद घातल्याशिवाय तो आहारीं राहणार नाहीं, करितां तत्वज्ञान हा बंद ईश्वरानें मानवी प्राण्यांना लावून दिला आहे.

हा जो बंद तेंच तत्वज्ञान, तोच धर्म होय. मानवी प्राणी, अहंकारानें ह्मणतो, प्रत्येक सृष्ट पदार्थ, इश्वरानें मानवांच्या सुखाकरितां, उत्पन्न केला आहे. हें जरी खरें मानलें, तरी एक प्रश्न शिल्लक राहतोच; तो हा कीं ' जर प्रत्येक सृष्ट पदार्थ, मानवांकरितां, व मानवही सृष्ट पदार्थच, तर मानवी प्राणी कोणाकरितां ?' ह्या. मनुष्यप्राण्यावर, एक प्रकारची महत्त्वाची जबाबदारी येते. यास्तव मानवी प्राण्यावर, हा जो ईश्वरी संकल्पाचा जबाबदारीचा हेतु, तोच तें आत्मतत्व ओळखणें, व त्या योगें, जगाचें हित साधणें; ह्मणून अशा तत्वज्ञानाची ओळख करून घेणें, ह्म. स्वतःची उन्नती करून घेणें, व जग सुधारणें, हेंच मानवी प्राण्यांना उचित असून, मानवी धर्म काय व कर्तव्य काय ह्या बाबतींत प्रजापतीचेंच काय ह्मणणें आहे तें पाहूं.

## ४ प्राण्यांचीं कर्तव्यें.

### प्रजोत्पत्तीनंतर प्रजापतिसंदेश किंवा उपदेश.

गी. अ. ३.


सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः ।
अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक् ॥ १० ॥
देवान् भावयतानेन ते देवा भावयंतु वः ।
परस्परं भावयंतः श्रेयः परमवाप्स्यथ ॥ ११ ॥
इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यंते यज्ञभाविताः ।
तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुंक्ते स्तेन एव सः ॥ १२ ॥
यज्ञशिष्टाशिनः संतो मुच्यंते सर्वकिल्बिषैः ।
भुंजते ते त्वघं पापा ये पचंत्यात्मकारणात् ॥ १३ ॥
अन्नाद्भवंति भूतानि पर्जन्यादन्नसंभवः ॥
यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ॥ १४ ॥
कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ॥
तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥ १५ ॥
एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः ॥
अघायुरिंद्रियारामो मोघं पार्थ स जीवति ॥ १६ ॥

आतां हा वाद प्रथम राहील कीं, आधीं जन्म का आधीं कर्म ?

जन्मकर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः ॥ गी. ४. ९

हा वाद केव्हांच संपणार नाहीं ह्मणून जन्म कर्म अनादि व सान्त आहे. असें मानलें, ह्मणजे उलगडा पडतो; किंवा मूळ सत्पासून उत्पत्तीच जर अहंकारानें, कर्मानें, तर जन्माबरोबरच कर्म मानल्यानें उलगडा पडतो. कारण सान्त न मानला, तर मोक्ष कसा ? हा प्रश्न राहतोच; जर मोक्ष आहे, तर जन्मकर्माचा अन्त हा असलाच पाहिजे; ह्मणून सान्त आहे. सुतार निजून उठला कीं, आपल्या अपुऱ्या राहिलेल्या कामाला लागतो. गाय जनली कीं, तिचा बच्चा तिला पिऊं लागतो. हाच अन्यजन्मकर्मसंस्कार उपजत जागृत होतो. ह्मणजे जन्माबरोबर कर्म सुरू होतें. व कर्मामुळें पुढें जन्म येतो.

प्रजापतीचा आदेश असा कीं कर्मासह सृष्टीची उत्पत्ती. त्या कर्माच्या योगें, मानवांनीं आपले इष्ट हेतु साधावे; मानवांनीं देवांना राजी करून घ्यावें, ह्मणजे देव मानवांना राजी करितील, परस्परांचें कल्याण परस्परांकडून करून घ्यावें. मानवांच्या सत्कृतीनें खुष झाल्यानें, देव मानवांना इष्ट भोग देतील, त्यांचा परत मोबदला मानवांकडून पोंचला नाहीं, तर मानव चोर गणले जातील. चोरांची जी अवस्था, तीच मानवांची होईल; कुत्रा जसा, हाडुक मिळालें कीं. कोणीं पाहूं नये, व भागीदार होऊं नये, ह्मणून एकीकडे जाऊन चोरासारखा, तें खाऊं लागतो, तद्वतच, मानवी प्राणी, जे अन्नाचा भाग, अन्न देणाराला, न जुमानतां—न स्मरतां-खातील ते कुत्र्याप्रमाणें, पशुवत् गणले जातील. जे बदला देतील ह्मणजे अन्नदात्याला विसरणार नाहींत, ते सुख पावतील. मुक्त होतील. व जे बदला न देतां, अन्नग्रहण करितील ते पापी गणले जाऊन, चोरांची जी व्यवस्था सरकार करितें, तीच व्यवस्था ईश्वराचे घरीं, प्राण्यांची होईल व ते जें अन्न खातील, तें अन्न नसून पापच खातील. ( ह्मणूनच हिंदुलोकांत जेवणापूर्वी, अग्नींत आहुती देण्याची चाल पडलेली आहे. )




गी. ३. १६ एवं चक्रं प्रवर्तितं.

गी. १५. ७ **ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ।**

यज्ञ ह्मणजे स्वधर्माचरण. सत्कृत्य; स्वैरकृत्य नव्हे. ब्रह्म ह्मणजे वेद; परब्रह्मापासून वेदाची उत्पत्ती. वेद सर्वगत नसून, प्रकृती सर्वगत असल्यानें, गीतारहस्यांत ब्रह्म या शब्दाचा अर्थ, प्रकृती केलेला आहे. अक्षर ह्मणजे परमात्मा, त्यापासून वेदाची उत्पत्ती. परब्रह्मापासूनच मानवांची उत्पत्ती.

पाऊस कोठून येतो, कोण पाठवितो, ह्याविषयीं मोठें गूढ आहे. आपण सर्व प्राणी, आपल्या आईबापांच्या रेतरूपी अन्नाचा परिणाम आहोंत. अन्न पर्जन्यापासून; पर्जन्य यज्ञापासून, ह्म. स्वधर्माचरणानें; यज्ञ ह्म. स्वधर्म ह्मटलें, ह्याचा अर्थ कर्मापासून धर्म उत्पन्न होतो. वेदांपासून कर्म, व परब्रह्मापासून वेद; वेदाज्ञा तो धर्म; वेदानें किंवा धर्मशास्त्रानें, सांगितलें, अमूक कर; अमूक करूं नको; हीं वाक्यें धर्म नव्हे. तर अमूकच कर, अमूक करूं नको हीं वाक्यें मानून त्यांच्या

आचरणापासून, **अदृष्ट व अपूर्व**, एकप्रकारें, उत्पन्न होण्याचा सृष्टीचा नियम आहे. तें, जें, अदृष्ट तोच धर्म होय, ह्म. धर्मशास्त्राज्ञा मानून, त्याद्वारें कर्म करून, अदृष्ट व अपूर्व मिळविणें, तो धर्म. कर्तव्यांत व्यंग होईल तर अदृष्टांतही व्यंगच राहील. अपूर्व तयार होणार नाहीं, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. ह्मणून कर्म मोठ्या काळजीपूर्वकच झालें पाहिजे. कारण धर्माचरणानेंच चित्त, शुद्ध, निर्मळ, होत असतें. एकाच्या अदृष्टावर लाखांची उपजीविका चालते. कुळांत एक जरी धर्माचरण करणारा माणूस निपजला, तरी तो पुष्कळांचें कल्याण करूं शकतो. उलट, वाईट निघाला तर कुळांतील माणसांना काळें फासतो. बऱ्या वाईट कर्मांनीं चवदा कुळांची उलथापालथ होते ह्मणतात. याच न्यायानें राजाच्या कृतीवर प्रजेचें कल्याण अकल्याण अवलंबून असतें.

अग्निहोत्री विस्तव पाडण्याकरितां, अरणीवर अरणी घासून, विस्तव तयार करितांना मंत्र ह्मणत असतात. तसेंच अग्नीवर भात शिजतांना, " भृगुणा तपसातप्यध्वं " " अंगिरसा तपसातप्यध्वं " वगैरे मंत्र ह्मणतात. यावर नास्तिकांची कोटी, आगकाडी असतां अशा प्रयत्नानें, व भटांच्या बडबडण्यानें, विस्तव पाहिजे कशाला ? त्यापासून फायदा काय ? उगाच त्रास मात्र. काडीनें विस्तव मिळतो, मंत्र ह्मटल्याशिवाय भात शिजत नाहीं का ? तर, " अगम्यायाः स्त्रियाः गम्यत्वे सत्यपि कामशांतिर्भवत्येव, तर्हि एकपत्न्या एव पाणिग्रहस्य किं प्रयोजनं ? कामशान्ती करणें हाच विवाहाचा हेतु आहेना ? मग पाणिग्रहण करून एकच स्त्रीला बांधलें राहण्याचें कारण काय ? शास्त्रकार सांगतात, कामशान्ती होऊनही अदृष्ट फळ मिळवावयाचा हेतू त्यांत असतो. तसाच हेतू या कृतीचा, व मंत्रांचे प्रयोजनाचा अदृष्ट, व अपूर्व, तयार करण्याकरितांच असतो. दृष्टादृष्ट फळ धर्माचरणानेंच मिळत असतें. हें नास्तिकांना त्यांच्यावर तशीच घोरपड आल्यावांचून कळणें शक्य नाहीं. अशा वेळीं, ह्या नास्तिकांची मती, बदलून धर्माचरणाकडे वळत असते. हें बारकाईनें लक्ष देणाराच्या लक्षांत तेव्हांच येईल. दैविक आपत्तीनेंही मत न बदलणारा विरळाच.

सर्वगतब्रह्म—ज्याप्रमाणें लोक राजाला मानतात ह्मटल्यानें, राजाज्ञा मानतात समजलें जातें, ह्मणजे राजा व राजाज्ञा एकच. तसेंच, ब्रह्म व ब्रह्मापासून निघालेले वेद एकच. कार्यावरून कारणाची संगती; कार्य, कारणावांचून असूं शकत नाहीं. कार्या-

मध्यें कारण अनुस्यूत असतेंच; त्याच प्रमाणें, परब्रह्मापासून, जगाचीं जीं जीं कार्यें, त्यांमध्यें कारण ब्रह्म, प्रधानच मानलें पाहिजे.

वर दर्शविल्याप्रमाणें, स्वधर्मानुसार आचार, हें इष्ट फलप्राप्तीचें साधन होय· स्वैरगती, अनिष्टाप्रतच नेणार. ही सृष्टीची चक्रगति ईश्वरनिर्मित आहे. या चक्र गतीप्रमाणें, जो वागत नाहीं, प्रजापति व प्रजापतिसंदेश मानीत नाहीं, तो फुकट जातो, सुरळीत चक्रगतीला अडथळा झाल्यानें, प्राणी दुःखांत पडतो. हा असा प्रजापति-संदेश आहे.

मुनिसिपालिटी, आपल्याला उजेड, पाणी, पुरविते; ह्मणून आह्मीं तिला कर देतों· राजाच्या पदरीं पुष्कळ नोकर, चाकर असतात. त्यांस, राजा खूष झाला असतां बक्षिसें देऊन किंवा पदव्या देऊन, मान करीत असतो. त्या योगें, घेणारा देणा-रावर खूष होतो.

व त्याचा बदला म्हणून, त्याच्याजवळ जें काय असेल फुल नाहीं फुलाची पाकळी, ती तो परत, भेटीच्या वेळीं देत असतो. ज्याच्याजवळ, राजाची योग्यता मोठी समजून द्यावयास काहींच नसेल, तो निदान त्याची स्तुती तरी करीत असतो, म्हणजे मोबदला देतोच. सूर्य आपल्याला प्रकाश देतो त्यापासून पाऊस अन्न प्राण आपल्याला मिळतो; तो जर प्रकाश देणार नाहीं, तर अन्न, पाणी, प्राण, आपणांस मिळणार नाहींत; ते मिळावे म्हणून त्याचे उपकार जाणून, त्याचा मोबदला, कांहींतरी आपणांकडून पोंचला पाहिजे, याकरितां त्याला स्मरून, आपल्या जवळ त्याच्या योग्यतेप्रमाणें देण्याला नसलें तर त्याची रोज स्तुती तरी, त्याचा प्रकाश घेण्यापूर्वी केली पाहिजे. एवढ्याच करितां प्रातःस्मरणाची योजना केलेली आहे; परंतु कोणी मानीत नाहींत.

आपलें शरीर हें क्षेत्र होय व क्षेत्रपति ईश्वर आत्मा होय; डोळ्यांचें काम, रूप तयार करण्याचें, तें तयार करून, आंतील देवतेला राजी केलें, ह्मणजे डोळा ज्यानें दिला, त्याला ती देवता राजी करील; त्या देवतेला असणारी वरिष्ठ देवता पुढील देवतेला राजी करील; ह्याप्रमाणें परमेश्वरापर्यंत–आत्म्यापर्यंत राजीपणा पोंचून आपल्यावर संतोषाचा प्रसाद होईल.

एकदां असें झालें कीं, खेड्यांतील लोकांनीं सरकारचा कर न देण्याचें ठरविलें. व कर वसूल करणाऱ्याला बांधून ठेविलें. व त्याची दाद कोणालाही कळूं दिली

नाहीं. परंतु ही बातमी पसरत पसरत थेट वरिष्ठापर्यंत, राजाच्या कानावर गेली; राजानें प्युनिटिव्ह पोलीस नेमून, त्या खेड्यांतलि लोकांना असें जेरबेस आणिलें, कीं, त्यांना सळो का पळोसें झालें. राजदंडानें ते अगदीं भिकारी बनले. त्यामुळें दुःख, व संकट, यावांचून, त्यांच्या वांट्यास कांहीं राहिलें नाहीं; आप्त इष्ट, सोयरे धायरे, आजूबाजूच्या गांवचे लोकही, कांहीं राजभीतीनें, व कांहीं कृतघ्नपणाच्या त्यांच्या कृतीनें, त्यांस धिक्कारूं लागले; त्यामुळें ते अन्नास मोताद झाले. व पुढें पडला दुष्काळ; मृग नक्षत्राचा पाऊस नाहीं; आर्द्रेचा आर्द्रपणा जाऊन सुक्या गेल्या; त्यामुळें सर्व लोक नास्तिक, आस्तिक, एक ठिकाणीं जमले. नास्तिकांचा नास्तिकपणा गेला, व सर्व देवाकडे डोळे लावून ह्मणूं लागले देवा आह्मांवर करुणा कर, व जे नास्तिक होते तेही आपआपसांत ह्मणूं लागले ऊन, पाऊस, वारा, सर्व तूं वरून खालीं पाठवितोस, व सर्व जगांतील सर्व जातींचें लोक, तूं वर आहेस असें समजून, आपत्काळीं, तुझ्या करुणेसाठीं, वर डोळे लावतात, यावरून तूं वरच कोठें तरी असला पाहिजेस, आह्मी तुला विसरलों, त्याची क्षमा कर, आह्माला पाऊस दे, आतां पाऊस दिलास कीं आह्मी तुला विसरणार नाहीं. अन्न खातांना गोड गोड पक्वान्नें खाऊन, आह्माला मजा वाटते, तरीपण ही आमची मजा तुझ्या कृपेनें, पाऊस पडल्यानेंच आहे. पाऊस जर आपण दिला नाहीं, तर आह्मी अन्न नसल्यानें ह्या विपन्न स्थितींतून बाहेर कसे पडूं !

तर आतां तुझे उपकार जाणण्याची एकच वाट आह्मांला दिसते; कोणती तर त्या उत्कृष्ट अन्नाच्या जर आहुती अग्नींत आपलें स्मरण करून दिल्या, तर त्याच्या ज्वाला वर जातील; आपण वर आहांत अशी आमची समजूत असल्यानें, त्या अन्नाचा कांहीं भाग आपणांस पोंचेल; आम्हीं आहुतीरूपानें, श्रद्धापूर्वक दिलेल्या अन्नानें, अल्पांशानें तरी उतराई होऊं; व त्यामुळें आपण खुष व्हाल, व आह्मावर राजीपणानें सुवृष्टि कराल.

ह्या अशा समजुतीनें, यज्ञाची कल्पना निघाली असली पाहिजे; अग्नितेज वर जातें. त्याबरोबर आपण भक्तीनें दिलेलें, वर आहे असें मानलेल्या ईश्वरास पोंचावें हा हेतु. हल्लींचा काळ, जरी याज्ञिक काळ नसला तरी सत्कृतीचा—स्वधर्माचरणाचा काळ आहे. तें कर्तव्य, मानवी प्राण्यांनीं बजावलेंच पाहिजे.

गरीबांनीं जर संप केला तर मोठ्यांचें ह्म. देवांचेंही अडतें. नाहीं असें नाहीं. पण शिक्षा करण्याचें काम राहतें मोठ्याच्या हातांत. ते आमच्या चांगल्या आच-

रणाची ह्म. स्वधर्माचरणाची वाट पाहात असतात, असेंच केवळ नाहीं. पण न केलें असतां, डोळा मात्र ते ठेवतात.

आपण नास्तिक बनून, संप करून ईश्वरी आज्ञा पाळल्या नाहींत तर, ईश्वरी चक्रगतींत खंड पडेल, अडथळा होईल, ह्यांत संशय नाहीं, परंतु हाल होतील कोणाचे ? गरीब बिचाऱ्या लाचार पण मस्त मानवांचेच. तेथें ईश्वराचें कांहीं जात नाहीं.

आपण प्रत्यक्ष पाहतों कीं, गरीब नोकारांनीं संप केला, तर मोठ्याचें अडतें, ह्यांत संशय नाहीं; परंतु ते वरिष्ठ नाराज होतात. दादा बाबा करून संप मोडतात. परंतु अन्य तऱ्हेनें हाल होतात गरीबांचे; ह्म. संप करणारांचे. मोठे ते चैनींतच असतात; संप मोडल्यावर ते मोठे लक्ष्यांत ठेवितात कीं, हे बदमाष लोक आहेत, साधेल तिकडून ह्यांना चुरडले पाहिजेत. हीच अवस्था गरिबांची होते. देव आमच्या आहुतींची अपेक्षा करीत नाहीत. परंतु न दिल्या तर, मग मात्र लक्षांत ठेऊन शासन करितात. व तें शासन अपुऱ्या पावसानें व रोगजंतूंच्या रूपानें केलें जातें.

तो याज्ञिक काळ जरी आतां गेला आहे, तरी आपणावर देवानें केलेल्या उपकाराचे फेडीकरितां, सत्कृतीचा तरी काळ आहेच. एवढ्याच करितां अन्नग्रहण करितांना, व सूर्योदय होण्यापूर्वी, आपण त्या अन्नदात्याची निदान स्तुती तरी केली पाहिजे आहे. त्यास आपण विसरतां कामा नये; विसरलों तर, जसा राजाचा कर न दिला कीं, राजा दंड करितो, तद्वतच त्याला विसरलों कीं, तो ईश्वर दंड पाऊसरूपानें अवर्षणरूपानें करितो. किंवा अपुऱ्या पावसानें, हालांत ठेवितो.

यज्ञ केल्यानें तेज सूर्यांत जातें तो राजी होऊन त्याचें तेज चंद्राला मिळतें; चंद्र राजी होऊन ओषधींना सोमरस देतो, त्या ओषधी राजी होऊन फळें पुष्पें धान्यें देतात; त्या धान्यामुळें प्राणी राजी राहतात. प्राणी राजी झाले कीं, ते ईश्वराचे राजीखुषीसाठीं आहुती देतात यज्ञ, सुकृति, धर्माचरण, वगैरे आचरितात. ह्मणजे हें असें रहाटगाडगें चालतें. जर माणसांनीं यज्ञ केला नाहीं, ( सुकृती स्वधर्माचरण केलें नाहीं, ) तर ह्या सृष्टचक्रामध्यें खंड पडून आपत्ति येते.

मनुष्यप्राणी नेहमीं बोलतांना अढळतो कीं प्रत्येक वस्तु, प्रत्येक सामग्री, जगांतील सर्व सुंदर वस्तु ह्या, मानवांकरितांच निर्माण केलेल्या आहेत. तर प्रश्न

असा कीं, प्रत्येक वस्तु, मानवांकरितां, आहे तर मानवांची उत्पत्ती कशाकरितां आहे ? ह्या मानवांच्या उत्पत्तीचा हेतु काय ? सर्वांचे शिरोमणी जर मानवी प्राणी आहेत, तर त्यांना उत्पन्न करणाऱ्याचा कांहीं तरी उच्च हेतु असला पाहिजे. तो उच्च हेतु आह्मीं मानवांनीं झुगारून दिला आहे. सत्कृती टाकून स्वैरकृति चालू केली आहे. ह्मणूनच आह्मीं आपल्यावर प्लेगसारख्या आपत्ती ओढवून घेतल्या आहेत. त्या आपत्ती नको असतील तर प्रजापतिसंदेशाप्रमाणें, प्रत्येक जातींतील, प्रत्येक धर्मांतील माणसांनीं स्वधर्माचरणानें वागलें पाहिजे. व ईश्वरी चक्र सुरळीत चालू ठेविलें पाहिजे.

जशी राजसत्ता थेट राजापासून तों खालच्या दर्जाच्या शिपायापर्यंत चालते. राजाची नाराजी झाली कीं, राजा आपल्या नोकरामार्फत ती आपली नाराजी, व्यक्त करितो, दुःखें प्राणीमात्रास भोगावयास लावतो. त्याचप्रमाणें ब्रह्म हें, मूळ सांख्यापासून उतरत उतरत, थेट प्राण्यापर्यंत येऊन पोंचून, त्याच्या कर्तबगारीचा अंमल प्राण्यावर होतो. तिळांत तेल आहे, दह्यांत तूप आहे परंतु तें योग्य मार्गानें योग्य कृतीनेंच काढिल्यानें त्याचें अस्तित्व कळतें. तसेंच ब्रह्माचें आहे. ब्रह्मचर्यसाधनानें तें कळण्यासारखें आहे. त्याच्या परिणामामुळें तें राजसत्तेप्रमाणें सजीवच आहे.

ब्रह्मचर्य पाळणाऱ्यामध्यें शुक्र, गाईमध्यें दूध, तसेंच धोतराच्या पिळ्यामध्यें पाणी, व आगकाडींत अग्नि, सर्वगत आहे, परंतु तें दृष्टोत्पत्तीस केव्हां येतें ? प्राणी कामविकारानें विळला जातो, शुक्र बाहेर पडण्याच्या मार्गानें बाहेर पडतें, तेव्हां त्या शुक्राची प्रतिष्ठा उपस्थइन्द्रियांत असल्याचें कळतें; तसेंच गाईचें दूध गाईच्या प्रत्येक भागांत शिंगांत सुद्धां दूध आहे. परंतु तिचाच बच्चा जेव्हां लुचूं लागतो, व ती प्रेमानें भरून येते, तेव्हांच त्या दुधाची प्रतिष्ठा तिच्या ओटींत असल्याबद्दल माहित पडते; तसाच अग्नि; त्याचप्रमाणें ब्रह्म, सुखदुःख कर्माप्रमाणें उत्पन्न करतें.

जसा गाईचा बच्चा, प्रेमानें गाईला खूष करून, तिच्यापासून दूध मिळवून संतोषित होतो, तसेंच सुकृति करून चित्तशुद्धि करून त्या ब्रह्माला खुष केलें पाहिजे. ह्मणजेच त्याच्या खुषीनें गाईच्या बच्चाप्रमाणें आपणास इष्टभोग मिळतील.

म्हणून सुकृति केली पाहिजे. जर ह्या भवरोगांतून सुलभरीत्या सुटावयास पाहिजे तर त्या रोगाला अनुचित असें औषध खाल्लें पाहिजे, व औषध जर घ्यावयाचें तर औषध

देणाऱ्या वैद्याचें पथ्यही पाहिजे. ज्या धर्मांत जन्म घेतला, व ज्या धर्माबद्दल अभिमान आपण बाळगतों, त्या धर्मानें आंखून दिलेले मार्ग पाळावयास नकोत का ? मी अमूक धर्मांतील, अमूक धर्म माझा असें म्हणतों; परंतु वर्तन मात्र विरुद्ध, हा न्याय कोठला ? त्यापेक्षां मी धर्महीन आहें, शिंगें व पुच्छाशिवाय मनुष्य प्राणी आहें. असें म्हणण्यांत लाज कोणती ? ज्या धर्माचा अभिमान, त्या धर्माचें आचरण पाहिजेच पाहिजे, तरच तो धर्म, व धर्माचा अभिमानी शोभतो. सोंग घ्यावयाचें राजाचें, व काम करावयाचें भांडीं घासणाऱ्याचें, हें शोभेल का ? जर ह्या भवरोगांतून मुक्तता पाहिजे सुख पाहिजे, तर स्वधर्मानुचरण, हें औषध घे, व औषध घेशील तर, पथ्य, त्या धर्मांत सांगितल्याप्रमाणें आचरण कर, म्हणजे रोगापासून सुटशील, व सुख पावशील असें ऋषींचें सांगणें आहे.

नास्तिकांची शंका व प्रश्न, यज्ञावांचून जर पाऊस नाहीं तर, हल्लीं, यज्ञाशिवाय पाऊस पडतो कसा ?

उत्तर—सरकार कैद्यांना अन्न देऊन त्यांस दुःखें भोगवतें, कैद्यांना उपाशीं मारूं देत नाहींत. त्यांनीं मरूं नये, व केलेला गुन्हा चांगला जाणवावा, ह्मणूनच सरकार अन्न देतें व अन्न देऊन जगवून गुन्हे भोगवितें त्याचप्रमाणें, ईश्वराचे गुन्हे करणाऱ्यांकरितां त्यांच्याकडून केलेल्या दुष्ट कृत्यांचे भोग भोगविण्याकरितां, पापें भोगविण्याकरितां, ईश्वर जो पाऊस पाडतो, तो अपुरा रोगट प्लेगजंतूंनीं युक्त असाच असतो; त्यामुळें बुद्धींत अव्यक्तपणें, रोगटपणा उत्पन्न होतो. व त्या योगें आंतून स्फूर्तिही वाईटच होत असते. व पुढें रोगरूपानें व भलत्याच विचारानें व्यक्त त्वास येते. स्वधर्माचरण करून, ह्मणजे सुकृति आचरून, सर्वगत ब्रह्माला ओळखलें पाहिजे. त्याला खुष केलें पाहिजे. कारण ब्रह्माचा विषयच यज्ञ आहे, ह्मणजे यज्ञापासून—स्वधर्माचरणापासून अमृतवृष्टि होईल. सर्वत्र आबाद होईल निरोगीपणा होईल. व मानवी प्राण्याचें साध्य त्यांस प्राप्त होईल.

ह्मणून परब्रह्म यज्ञामध्यें मिळेल, हा प्रजापति संदेश, जर पाळला जाईल, तर मानवी प्राण्यांना सुखप्राप्ती होईल.

प्रभूनें हें जें सर्व केलें, तें सुकृतीसाठीं केलें. व्यासासारखे पतंजलीसारखे ऋषि मुनी ह्मणतात, शेतांत जर धान्य पेरलें नाहीं, तर शेत ओसाड जात नाहीं, गवत उगवून शेत भरून जातें. लोकांना जर सरळमार्गाला लावलें नाहींत, तर, ते

त्या गवताप्रमाणें आडमार्गाला–उन्मार्गाकडे जांण्याची त्यांची प्रवृत्ति, सन्मार्गाकडे जाण्याची नाहीं.

रस्त्यांत एक आंधळा माणूस जात होता, पुढें खाडा पाहून एका वाटसरूनें, त्याचा हात धरून त्याला बाजूला केलें; तेव्हां तो आंधळा ह्मणतो, कांरे तूं कां मला ढकलतोस ? तेव्हां तो ह्मणतो, जा लेंका मर, खाड्यांत पड, माझें काय गेलें. पण ऋषि मुनी सज्जन तसें ह्मणत नाहींत. " नच कश्चित् शृणोति मे " जरी त्या आंधळ्याप्रमाणें, लोक माझें ऐकत नाहींत, तरी लोकांना चांगले मार्गाकडे, सन्मार्गाकडे लावणें हें आपलें काम आहे. असें ते समजतात. जे उन्नतमार्गी लोक आहेत, त्यांना सन्मार्गाकडे लावलेंच पाहिजेत. व हें लोककल्याणदृष्ट्या आपलें काम आहे. ज्याला स्वकार्य आहे, तो लोकांना खाड्यांत टाकील, परंतु ज्याला स्वकार्य नाहीं, असे ऋषि मुनी सुहृदय होऊन, लोकांना खाड्यांत न पडण्याचे मार्ग दाखवून, ऋणी करून ठेवितात; ऋषिमुनींनीं आपलें कल्याण साधून, ज्या मार्गांनीं लोककल्याण साधेल, ते मार्ग अखेर लोककल्याण साधविण्यासाठीं लिहून ठेवून, लोकांना ऋणी करून ठेविलें आहे. तें त्यांचें ऋण फेडणें, ह्मणजे त्यांनीं घालून दिलेल्या मार्गानें जाणें, हेंच आपलें कर्तव्य होय. त्यांचे ग्रंथ वाचून ऋषींनीं आंखून दिलेल्या मार्गाचा धडा गिरवून तो पुढल्यांकरितां जिवंत ठेवणें हेंच आपलें कर्तव्य आहे.

८५ वर्षांचा ह्मातारा अक्रोडाचें झाड लावीत होता. एक उमेदवार नास्तिक थट्टेखोर त्यास विचारितो, हें कशासाठीं ? अजून आशा सुटत नाहीं का ? त्यानें उत्तर दिलें, आजपर्यंत जीं अक्रोडें मीं खाल्लीं, त्यांचीं झाडें मीं कोठें लाविलीं होतीं; तसेंच मी लाविल्या झाडांचीं फळें पुढल्यांनीं खावीं ह्मणून झाडें लावणें हें माझें कर्तव्यच आहे.

तात्पर्यांश, थोरांनीं जे मार्ग अनुसरून अनुभव घेतले, त्या मार्गांनीं आपण जावें, व जगाचें कल्याण साधावें हाच त्यांच्या लेखांचा हेतू दिसतो. ह्याच हेतूनें पतंजली भगवानांनीं, मनाचें शास्त्र, स्वतः अनुभव घेऊन लिहून ठेविलें आहे. परंतु टवाळ लोक, ह्यांनीं काय लिहिलें आहे, त्याचा अनुभव न घेतां, त्यांनीं लिहून ठेविलेले सिद्धांत, अशक्य आहेत, अशी समजूत करून घेऊन, त्यांचे व त्याच्यावर भरंवसा ठेवणाऱ्यांचा उपहास मात्र करितात, ऋषिमुनींच्या ह्मणण्याचा

अनुभव, घेतल्यानंतर, जर तें शास्त्र त्यांना पटलें नाहीं, तर मग मात्र, हे लोक टिका विरुद्ध करण्यास योग्य होत. अनुभव घेतला नाहीं तोंपर्यंत, ह्या त्यांच्या टीका नसून उर्ध्ववायू अपानवायूप्रमाणें, समजून त्याज्यच होय.

## ५ मानवांकरितांच धर्मशास्त्र ( धर्मबंध: ).

जीव परमात्म्यापासून च्युत होऊन जीवदशेला आला; लहान झाला, परिच्छिन्न झाला ह्मणजे राजा स्वप्नामध्यें जसा भिकारी होतो, तसा अज्ञानानें, हा कष्टी होतो, अस्वस्थ होतो, व जगांतील धडपड सुरू करितो, परंतु अज्ञान नाशानें सर्व कांहीं आपणाजवळच आहे अशी जाणीव होण्यास्तव व मनाला स्वास्थ्य जेणेंकरून उत्पन्न होईल अशी कृति घडून किंवा घडवून आणविण्यास्तव जें साधन तेंच तत्वज्ञान होय तेंच तो धर्म होय.

मनुष्यप्राणी उत्पन्न झाला तेव्हां तो ईश्वरी सृष्ट पदार्थांपैकींच एक होय. इतर जसे सृष्ट पदार्थ—घोंडा, पशु, त्याप्रमाणेंच तो मानवी प्राणी उपजतांच होय; ह्मणजे त्याची किंमत इतर सृष्ट पदार्थांइतकीच आहे. परंतु ईश्वरानें ज्या अनंत वस्तु निर्माण केल्या आहेत त्या सर्वांमध्यें सदसद्विवेक शक्ति फक्त मानवांतच ठेविली आहे ह्मणून मानवाचें महत्व इतर सृष्ट पदार्थांहून जास्त आहे. त्या ईश्वरदत्त शक्तीचा प्राणी उपयोग करील तर तो प्रतिईश्वरच आहे. न करील तर मनुष्य असून पशुहूनही नीच होय.

मनुष्यप्राणी उपजल्याबरोबर त्याला कोणतीही जातपात, धर्म नसतो. नालच्छेदनापूर्वी, पारावर टाकलेलें कोणत्याही जातीचें मूल, कोणीही पाळलें असतां शास्त्र आड येत नाहीं. त्याला कांहीं काळ लोटल्यानंतर समजूं लागतें कीं मीं हिंदु आहें, मी मुसलमान आहें, मी ख्रिश्चन किंवा पारशी आहे, अशी जाणीव होऊं लागल्यावर, मग तो त्या त्या धर्मानें आंखलेले मार्ग आक्रमूं लागतो. ह्मणजे धर्म हा समजूतीनंतर उत्पन्न होतो.

उपजतप्राणी ह्या विस्तीर्ण विश्वांत येतो. व त्याचे हक्कही ह्या विस्तीर्ण जगाइतकेच विस्तीर्ण असतात. ते त्याचे हक्क बंधनानें आकुंचित करावयाचे असतात, व त्यांला ( प्राण्यांना ) बंध घालून आकुंचित करण्याचें साधन तो धर्म ( शास्त्र ) होय. ह्या वंधनांत आल्यावर मग प्राणी ह्मणतो मी हिंदु किंवा ख्रिश्चन आहें;

पारशी किंवा मुसलमान आहे, ह्मणजे असें ह्मणूं लागल्यावर मग त्याला त्या त्या धर्मानें, ( धर्मशास्त्रानें ) घातलेल्या नियमानें वागावें लागतें. ह्मणजे जगांतील इतर धर्मांपासून वेगळा पडून विशिष्ट धर्माच्या बंधनांत तो येतो. म्ह. विस्तीर्ण जगापासून वेगळा पडून, विशिष्ट धर्माच्या बंधनांत तो आला.

विशिष्ट धर्मात आल्यानंतर, तो जगांतील त्या त्या धर्मांतील सर्व अविवाहित पुरुष असल्यास स्त्री जातीवर व स्त्री असल्यास पुरुष जातीवर हक्क सांगूं लागतो. तो त्याचा हक्क लग्नानें नष्ट करून आकुंचित केला जातो. ह्मणजे लग्नानें, इतर अविवाहित स्त्रियांवरचा व स्त्री असल्यास पुरुषांवरचा हक्क नष्ट म्हणजे आकुंचित होऊन, एकाच स्त्रीवर, किंवा पुरुषावर, त्याचा हक्क स्थापित होतो. ह्मणजे विवाहानें बंध पडून गृहस्थाश्रमांत येतो व त्यामुळें ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणें, दुसरे वानप्रस्थ, संन्यास वगैरे आश्रमांपासून तो अलग होतो. आतां आश्रम निश्चित होण्यापूर्वी निर्वाहाचे साधनास्तव, त्याच्या लायकीप्रमाणें, धंदा पत्करावा लागतो.

ह्मणून, '**चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः** ॥ गी. ४·१३ वर्णाश्रमांत आल्यामुळें त्या त्या वर्णाला उचित कर्म करावें लागतें. त्या त्या वर्णाश्रमाला विहित कर्म सुरू झालें ह्मणजे मर्जीनुरूप स्वैर कर्माला बंध पडला. व त्याप्रमाणें वर्तन पाहिजे हीच धर्माची, किंवा तत्वज्ञानाची वेसण. समजा आपणालां वर्णाश्रमाप्रमाणें तळें राखण्याची नोकरी मिळाली आहे. ती न बजावितां जर त्यांतील मासे आपण खाऊं लागलों तर नोकरीवर नेमणारे वरिष्ठ काय करतील? कामावरून काढून तरी टाकतील किंवा शिक्षा भोगावयास लावतील. ह्मणजे कर्तव्यापासून च्युत झाल्यानें, दुःखें पाठीस लागतील. त्याच प्रमाणें, चातुर्वर्ण्यांपैकीं ज्या कामावर आपली नेमणूक आहे, त्याप्रमाणें शास्त्रानें, घालून दिलेल्या नियमानें आचरण न करितां स्वैरगतीनें, भलतेच वर्णाचें आचरण जर आपण पत्करलें तर त्या वर्णांतून आपली हकालपट्टी होईल किंवा शिक्षा भोगावी लागेल. ही शिक्षा अदृश्यतत्वापासून असल्यानें, क्लेश संकटें व भोग पाठीस लागतील. याकरितां, वर्णाश्रमाप्रमाणें, धर्मानें आंखलेल्या मार्गानें चालावें लागतें. ह्मणून कोणत्याही धर्मातील कोणत्याही जातींतील प्राणिमात्राचें कर्तव्य ह्मणून शास्त्र सांगतें तें:-शास्त्रविहित कर्म आचरशील तर सुख पावशील. शास्त्रविरुद्ध कर्म आचरशील तर दुःख पावशील.

तसेंच कर्म ( Duty ) ह्मणूनच कर्म करशील तर, ह्मणजे निष्काम कर्म करशील, तर उच्चपद प्राप्त होईल. परंतु कामना धरून जर कर्म असेल, तर जेव्हां ती कामना पूर्ण होणार नाहीं, तेव्हां दुःखाला कारण होईल, सबब सकाम कर्म करूं नको. असें शास्त्र सांगतें. कर्तव्य ह्मणून शास्त्राज्ञेनें, कर्माची सफलता झाली, तर संतोषच उत्पन्न होईल. न झाली तर वाईट वाटणार नाहीं. कर्तव्य बजावलें, असें मनाचें समाधान राहील. ह्मणून निष्काम कर्म कर ह्मणजे सुख पावशील.

तात्पर्यांश धर्म हा प्राण्याच्या हितासाठीं मर्यादा घालीत घालीत, प्राण्याला आंखून दिलेल्या मर्यादेंत वावरावयास लावतो. व त्याचे विस्तीर्ण हक्क नष्ट करून स्वैरगतीला आळा घालितो. स्वैर गतीनें मनुष्यप्राणी भडकून जाऊन, त्याला कोणताच मार्ग व दिशा न मिळाल्यानें, तो फुकट जाईल. ह्मणून धर्म हा प्राणिमात्रांचा बंध किंवा प्राणिमात्राची लगाम होय. घोड्याला जर लगाम नसेल तर, तो बेफामपणें उधळतो. व त्यामुळें त्या घोड्याला स्वतः त्रास सोसावा लागून, त्यापासून इतरांनाही त्रास होतो. तशीच धर्महीन माणसाची अवस्था आहे ह्मणून प्रत्येक माणसाला कोणता ना कोणता तरी धर्म हा पाहिजेच. (कठोपनिषत्) यस्त्वविज्ञानवान्भवत्ययुक्तेन मनसा सदा तस्येन्द्रियाण्यवश्यानि दुष्टाश्वा इव सारथेः। यस्तु विज्ञानवान्भवति युक्तेन मनसा सदा तस्येंद्रियाणि वश्यानि सदाश्वा इव सारथेः। यस्त्वविज्ञानवान्भवत्यमनस्कः सदाऽशुचिः। यस्तु विज्ञानवान्भवति समनस्कः सदा शुचिः। विज्ञानसारथिर्यस्तु मनः प्रग्रहवान्नरः। सोऽध्वनः पारमाप्नोति। तात्पर्य, ज्याचे मनाला घोड्याप्रमाणें बंधन आहे, विवेक हा ज्याचा सारथी आहे, तोच निर्विघ्नपणें पार जातो.

यास्तव जेणेंकरून जीव उद्धरेल, मानवी देहाचें कल्याण होईल अशीं कृत्यें आचरलीं जातील, जेणेंकरून मनाला स्वास्थ्य उत्पन्न होईल, मनाचे स्वैरगतीला बंध पडेल असें कर्म आचरणें तोच धर्मबंध होय.

**धर्म**—ध्रियते इति धर्मः। ज्या कृत्यांनीं जीव अधोगतीला जाणार नाहीं, व जगाच्या क्रिया सुरळीत धारण केल्या जातील, निर्विघ्नपणें चालतील, जगाच्या मर्यादा राखल्या जातील तो धर्म; अर्थात जगाच्या क्रियांना अडथळे येतील, जगाच्या मर्यादा राखल्या जाणार नाहींत; अशी कृती तो अधर्म होय.

**यतोऽभ्युदयानिःश्रेयः सिद्धिः स धर्मः ।**

अभ्युदय=Good fortune, elevation श्रेयस्=absolution Good fortune=ऐहिक लौकिक सुख.

निःश्रेयस्=पारमार्थिक अलौलिक सुख.

जेथून ऐहिक व पारमार्थिक ( अलौकिक ) सुखाची सिद्धि मिळेल, तो धर्म. अन्यच्छ्रेयोऽन्यदुतैव प्रेयस्ते उभे नानार्थे पुरुष: सिनीतः तयोः श्रेय आददानस्य साधुर्भवति हीयते अर्थाद्यउ प्रेयो वृणीते. अर्थ–श्रेय व प्रेय असे दोन मार्ग आहेत. क्षणिक सुख देणारें तें प्रेय, व चिरकाल सुख देणारें तें श्रेय. धर्म हा श्रेय मार्ग दाखविण्याचें साधन होय.

सर्व जीवकोटींत अहंकार ( मीपणा ) काम, क्रोध, मोह, मन, इत्यादि अन्तःकरणें भासतात. परंतु सद्बुद्धीचा विशेष स्पष्टपणें उदय मानवकोटींतच दिसतो. बुद्धीचीं कार्यें व्यक्त करण्याचें साधन जी वाचा तें साधन पशुकोटींत नाहीं. ह्मणून धर्म ( धर्मशास्त्र ) ह्मटलें कीं तो मानवजातीकरितांच होय. व त्याची अवश्यकता मानवजातीच्या हिताकरितांच आहे.

पशूमध्येंही, काम, क्रोध, लोभ, माणसांप्रमाणेंच, असल्याबद्दल स्पष्ट उदाहरणें आहेत. मात्र वाचा नसल्यानें, पशूंनां सदसद्विचार मात्र नाहीं तो मानवजातींतच आढळतो. काम क्रोधादि विवेकानें धर्मबंधनाच्या साहाय्यानें, मानवजातीनांच आवरतां येऊन, स्वकल्याण करून घेतां येण्याजोगें आहे.

वेदान्ततीर्थ रा. चवंडे बुवा, हे गंगेवर स्नान करून, घरीं जात असतां, एक खाटीक एका गाईला बेदम मारीत होता. तरी ती उठेना, असें त्यांच्या दृष्टीस पडलें. त्या गाईला मृत्युच दिसूं लागला. मृत्यूच्या भीतीपुढें, मारा्चे भितीला ती भीक घालीत नव्हती. त्या खाटिकानें आपली मारण्याची शिकस्त केली; तरी ती गाय उठेना. ह्मणजे वाचा जरी नाहीं तरी यमसदनीं जाण्याचें ज्ञान तिला झालें. तें तिनें कृतीनें व्यक्त केलें. हें कृत्य बुवांनीं पाहिलें. व त्याच्या मनांत कळवळा आला. व बुवांनीं त्या गाईला सोडविण्याची शिकस्त केली, परंतु तो खाटीक ऐकेना. शेवटीं, बुवा स्नान केलेले होते तरी, त्या खाटिकाच्या पायांवर त्या बुवांनीं डोकी ठेविली. व त्या गाईला सोडविली; त्या गाईला बुवांनीं यशवंती हें नांव देऊन, हल्लीं ते बुवा गोरक्षणाचेंच स्तुत्य कृत्य करीत आहेत.

गाईला खावयास वाघ आला, तर तिला भीति उत्पन्न होते. हा वाघ आहे हा मला खाईल ही बुद्धि उत्पन्न होऊन, ती पळूं लागते; तसेंच बोकडाला खाटिक नेतांना, त्या बोकडास ही आपली यमसदनाची वाट आहे, असें ज्ञान होतें. त्यावेळीं तो ज्या आरोळ्या मारीत असतो, त्यावरून बारकाईनें लक्ष्य देणारास त्याच्या ओरडण्याच्या आवाजावरूनच, अनुमान करितां येईल, कीं ह्याला खाटीक नेत असावा.

वानरांचा उपद्रव झाला कीं, त्या वानरांचा उपद्रव कमी करण्याकरितां, कातकरी लोकांना, लोक आणतात. गाई बोकडांना जसा खाटीक, त्याचप्रमाणें कातकरी ही जरी मनुष्यजात तरी, ते वानरांचे शत्रु होत, असें वानर जाणतात; इतर माणसांना ते मुळींच डरत नाहींत, उलट माणसांना ते डर उत्पन्न करितात; परंतु कातकरी लोक गावांत आले, कीं त्यांच्या थाऱ्यास ते उभे राहत नाहींत. इतकेंच नव्हे तर कातकरी लोक ज्या गावांत वस्ती करितात, त्या गावांत, वानर वस्तीसुद्धां करीत नाहींत. गाईच्या बच्चाला किंवा पशुकोटींतील प्राण्याचे बच्चाला कोणी इजा करितांना आढळेल, तर त्या पशूंना अनिवार क्रोध येतो; तो इतका कीं त्यांच्या शक्तीबाहेरचा दुसरा प्राणी असला तरी आपल्या शक्तीचा विचार न करितां त्या इजा करणाऱ्या प्राण्यांच्या अंगावर धांवून जातात.

गाईला जर ह्मशीचा, किंवा अन्य गाईचा बच्चा, पिण्यास लाविला तर, ती गाय त्या बच्चाला पाजीत नाहीं. खबूतरें पत्रें नेमकीं पोंचवितात. पोपट तोफेला बत्ती नेमकी देतो. कुत्रा चोराला पकडून देतो. इतकेंच नव्हे तर एखाद्या जनावरांनीं एकदां जर का एखाद्यावर द्वेष धरिला तर, जन्मभर तीं तो विसरत नाहींत. आमच्या जवळील जनावरांत एक हल्या ( टोणगा ), फार गरीब होता. एक दिवस एक परका इसम, त्याच्या जवळून जातांना तो मारील या समजुतीनें, त्याच्यावर त्यानें काठी उगारली, त्यायोगें तो कोपास चढला व त्या इसमास त्यानें पिटाळून लावलें. व पुढें जेव्हां जेव्हां, त्या इसमाचा शब्द ऐकावयास त्याला येई, तेव्हां तो इतका चवताळे कीं त्या इसमास त्याच्या जवळून जाण्याची तर सोयच नव्हती. याप्रमाणें मरेपर्यंत त्यानें द्वेष सोडला नाहीं. राजपूतान्यांत झाबुआ संस्थान आहे. तेथील राजवाड्यांतील एक हत्ती, आपल्या माहुतावर अति प्रेम करी. आपल्या खाण्यांतील अन्नाचा गोळा काढून ठेविल्याशिवाय, तो कधींच गव्हांचे रोट खात

नसे. परंतु कांहीं दिवसांनीं त्याचें व माहुताचें वांकडें पडलें, तें इतकें कीं, त्या माहुताला तो गांव सोडणें भाग झालें. कांहीं काळानंतर तो माहुत शहरांत आला. हत्तीला त्याचा सुगावा लागतांच, साखळदंड तोडून जो उधळला, तो त्या माहुताच्या पाठीस लागला. माहुतानें हें पाहतांच पळून, एका देवळाचा आश्रय करून दडून राहिला. हत्तीनें देवळाच्या दगडी खांबाला सोंडेनें विळखा गालून, एक खांब पाडला. देवळाचा नाश होईल असें जाणून दुसऱ्या बाजूनें त्या माहुताला तेथून काढला, असें हत्तीला दाखवून पळवावा लागला. तेव्हां तो हत्ती तेथून निसटला. तेथील देवळाचा एक खांब पडलेला अद्याप तसाच आहे. इतका द्वेष स्मरणशक्तींत धरण्याची बुद्धि जनावरांतही आढळते. कावळे जातीचा गुन्हा करणाऱ्यांस फांशीची शिक्षा देऊन अंमलांत आणतांना पुष्कळांनीं पाहिलेंच असेल. बराच जमाव कावळ्यांचा जमून गुन्हेगाराला रक्तबंबाळ करून, मरेपर्यंत त्याला सोडीत नाहींत.

कुत्रीं, माजरें, बैल, इत्यादिकांस संभोगकाळीं, त्यांच्या इच्छेविरुद्ध, कोणी अडथळा करील तर त्या अडथळा करणाऱ्याच्या उरावर बसण्यास ते प्राणी कमी करीत नाहींत.

**इन्द्रियाणि मनोबुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते ।**
**एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम् ॥** [ गी. ३. ४० ]

मानवजातीशिवाय इतरांनाहि राग, द्वेष, लोभ, मोह, इन्द्रिय द्वारा उत्पन्न होतो. परंतु वाचा नसल्यानें मनुष्यजातीप्रमाणें इतरांना बरें वाईटाची निवड शब्दांनीं ह्मणजे वाचेनें करून त्यांचा त्याग करितां येण्याजोगा नाहीं.

ह्या वरील उदाहरणांवरून, पशुकोटींत काम, क्रोध, लोभ, बुद्धि, मन, हीं दिसून येतात. मात्र बुद्धीचें कार्य शब्दांनीं व्यक्त करण्याचें साधन जी वाचा तें ह्या कोटींत दिसून येत नाहीं. त्यामुळें चांगलें वाईट कळणें त्यांस शक्य नाहीं. व मानवजातीप्रमाणें विचार करून ह्या राग, लोभ, मोह-क्रोध, यांच्या तडाक्यांतून वाचा नसल्यानें एकहे जमून बरें वाईटाची निवड करून सुटका करून घेतां येत नाहीं. ह्मणून ज्या प्राण्यांना जन्मतः ईश्वरदत्त वाचा आहे, त्या प्राण्यांकरितांच धर्मशास्त्र आहे, पशूंकरितां नव्हे.

तेव्हां धर्म शास्त्र हें फक्त मानवकोटी करितांच होय. ह्मणूनच ह्मटलें आहे पशुदेहीं नाहीं गती। ऐसें सर्वत्र बोलती । परलोकींची प्राप्ति । एथेंचि (मनुष्यदेहीं)॥ ८४ लक्षयोनी फिरतां फिरतां मनुष्यदेह जो प्राप्त झाला, त्याचा उपयोग सन्मार्गाकडे जर मनुष्यप्राणी करणार नाहीं, तर तो हतभागी नव्हे तर काय !

मनुष्य जन्म बारकाईनें जर तपासला, तर आढळून येतें कीं हा क्षणभंगुर पाण्याच्या बुडबुड्यासारखा आहे. मडक्याप्रमाणें केव्हां फुटून नाश होईल, याचा भरंवसा नाहीं. परंतु शास्त्रकारांच्या मताप्रमाणें 'शतायुर्वै पुरुषः' असें धरून चाललें, तरी हल्लींच्या काळांत पन्नाशीच्या माणसास सरासरीनें 'शतायुः' ह्मणण्याची पाळी आलेली आहे. त्या ५० वर्षांपैकीं १८।१९ वर्षें अज्ञानांत जातात. सज्ञान झाल्यावर पुढें वीस वर्षें उमेदींत, घमेंडींत जात असल्यामुळें, सर्व तुच्छ वाटून ईश्वरासमुद्धां धाब्यावर बसविण्यापर्यंत पाळी येते; पुढें चाळिशी उलटल्यावर इंद्रियें शिथिल झाल्यानें कोणत्याच कामाची उत्सुकता रहात नाहीं, त्यामुळें प्राणी हताश होतो. व नाताकतीनें धक्के बसूं लागले ह्मणजे ईश्वर ईश्वर करूं लागतो; परंतु प्रथमपासून संवय विरुद्धदिशेची, अल्लडपणाची असल्यानें मन आंवरणें कठीण पडतें. व मन डोलायमान होऊन, कांहींच इलाज चालत नाहीं. याकरितां प्रत्येक प्राणीमात्रानें समजूतीच्या वयांत आल्यावर 'आपण कोण' आलों, कोठून, जाणार कोठें, आयुष्याची इतिकर्तव्यता काय, व जगाशीं संबंध काय व आपलें कर्तव्य काय ? ह्या विचारास लागलें पाहिजे. असा जो विचार तोच धर्म नव्हे तर काय? ह्या विचारानें मनाला कांहीं बोध होऊन, जगाच्या कल्याणाकडे मानवीप्राण्याची प्रवृत्ती होऊं लागेल. यास्तव **यावत्स्वस्थो ह्ययं देहो यावन्मृत्युश्च दूरतः।तावदात्महितं कुर्यात् प्राणान्ते किं करिष्यसि ॥**

## ६ तो धर्म ( तत्व ज्ञान ) आहे कोठें ?

कोणत्याही धर्मांतील शास्त्राचें ध्येय तपासून पाहिलें तर, आत्मतत्व ओळखणें व सुखप्राप्ती करून घेणें, हेंच होय. सुखप्राप्तीकरितां तत्वज्ञानाचा शोध हेंच धर्म शिकवितो. आत्मतत्वाचा शोध, चित्ताच्या वृत्ति, सत्ववृत्तीशिवाय करून, बाकीच्या चित्ताच्या वृत्तींचा निरोध केल्यानें तत्वज्ञान शोधलें जातें. चित्तवृत्ति निरोधाकारणें, सात्विक मन बनवावें लागतें. सात्विक मन बनविण्याकरितां ( वेद हा ग्रंथ ज्या

लोकांकरितां त्यांनीं वेदविहित कर्में आचरलीं पाहिजे. ) ज्या त्या धर्मांतील प्राण्यांनीं शास्त्रविहित कर्में आचरून मन शुद्ध केलें पाहिजे.

तत्वज्ञान शोधिलें पाहिजे, ह्मणून जें वर ह्मटलें, तें तत्वज्ञान आहे कोठें ? "धर्मस्य तत्वं निहितं गुहायां," निहितं=Treasured up, lodged, deposited गुहा=hiding place, cave, cavern. असें जें तत्व, त्यासच आत्मा अशी संज्ञा दिलेली आहे. "अङ्गुष्ठमात्रः पुरुषोऽन्तरात्मा सदा जनानां हृदये संनिविष्टः ।" असा तो आत्मा प्रत्येक माणसाच्या हृदयांत अंगुष्ठमात्र आहे. त्याच्या भोंवतालीं अनेक किल्ले कोट आहेत, ते ओलांडून आंतील, अंगुष्ठमात्र ज्योति मिळविणें फार कठीण आहे. तो नित्य शुद्ध बुद्ध अविनाशी आहे.

वटवृक्षाचें मूळ ( कारण ) जसें त्याच्या लहानशा बीजांत आहे, तसेंच ह्या नश्वर शरीराचें कारण अन्न, अन्नाचें कारण पाणी, पाण्याचें कारण तेज, तेजाचें कारण सत्; ह्मणून सत् हेंच ह्या सर्व प्रजाजनांचें कारण आहे.

प्राणी जेव्हां मरूं लागतो, तेव्हां प्रथम वाचा जाते ह्मणजे वाणी मनामध्यें लीन होतें, मन प्राणामध्यें; प्राण तेजामध्यें; व तेज सत् परब्रह्मामध्यें लीन होतें. सत् परब्रह्म ही जी देवता ती अणुप्रमाण आहे. तें सत् तोच सर्वांचा आत्मा होय. " अस्य मृतस्य अग्निं वागप्येति, वातं प्राणः, चक्षुरादित्यं, मनश्चंद्रमसं. "

आत्मा हा सूर्याशिवाय प्रकाश देणारा आहे; ह्याचा अनुभव स्वप्नांत येतो; स्वप्न पडलें, मग जागें झाल्यावर आपण ह्मणतों स्वप्न पडलें. स्वप्न ह्मणून स्वप्नांत पाहिलेलें खोटें; पण स्वप्नांतील खोटें असें मानिलें, तरी स्वप्नांतील तें खोटें असें सांगणारा, स्वप्नांमधील कोणीतरी असला पाहिजे; स्वप्न पाहिलें असें आपण ह्मणतों; ऐकिलें असें ह्मणत नाहीं व पाहणें ही क्रिया प्रकाशाशिवाय घडत नाहीं, ह्मणून प्रकाशक, प्रकाश देणारा, प्रकाश दाखविणारा, प्रकाश पाहणारा, कोणीतरी मानल्याशिवाय स्वप्न पाहिलें, असें ह्मटल्याचा उलगडा होत नाहीं. सूर्यप्रकाश तर जागेपणीं, स्वप्नांत नाहीं; ह्मणून असा जो प्रकाशक तोच आत्मा. तो आत्मा ओळखण्याला धर्म ह्मणजे सत्यवृत्तीचें आचरण हेंच साधन आहे. त्या आत्म्याजवळ प्रवेश करण्याला; अडथळे ह्मणजे किल्ले जे त्याच्या भोंवताली आहेत ते.

१ अन्नमय कोश; २ प्राणमय कोश; ३ मनोमय कोश; ४ विज्ञानमय कोश; आणि ५ आनंदमय कोश; येणेंप्रमाणें पांच किल्यांत तो आहे.

१ अन्ननय कोश–याचा शोध करणारा अन्नमय कोशाचा तपास करूं लागला, तों त्यास आढळून आलें, कीं हा स्थूल देह विनाशी आहे नित्य नाहीं; हा जाणारा सबब हा आत्मा नव्हे.

२ प्राणमय कोश–शोधा अन्तीं आढळतें कीं, प्राण हा हवेंतून पाहिजे तितका घेतां येतो. हा घेतलेला प्राण शरिराला सोडतो. व तें शरीर मृत होतें; ह्मणजे हा प्राण कायम टिकणारा नाहीं, ह्मणून विनाशी, अनित्य त्या प्राणाचीं वस्ती अनित्यवत् सबब तो आत्मा नव्हे.

३ आतां मन तपासतां, मन हा सृष्ट पदार्थ, हें अकरावें इंद्रियच आहे, प्राण नष्ट झाले कीं तेंही नष्ट होतें ह्मणून मनोमय कोश हा आत्मा नव्हे. " कामाद्यवस्थया भ्रान्तः नासौ आत्मा मनोमयः। चिच्छायोपेतधीर्नात्मा विज्ञानमयशब्दभाक् ॥ "

४ विज्ञानमय कोश—चित्त, बुद्धि; प्रतिबिंबासहित जी बुद्धि तो विज्ञानमय कोश. चित्त हें पाण्याप्रमाणें, त्यांत परमात्म्याचें जें प्रतिबिंब ( जसें डबक्यांतील पाण्यांत सूर्याचें प्रतिबिंब ) जो जीव त्याची ओळख तत्वज्ञान होईपर्यंत जरी नसली तरी तत्वज्ञान झाल्यावर ह्या चित्तरूपी पाण्याचा, ( ज्यांत प्रतिबिंब पडलें त्याचा ) नाश होतो; जसें ताह्मनांतील पाणी सुकल्यानें, त्या पाण्यांत सूर्याचें पडलेलें प्रतिबिंब, सूर्याचे बिंबांत जातें, तसेंच बुद्धीचा नाश झाला कीं, प्रतिबिंबाचा–जीवाचा नाश आहेच; ह्मणून विज्ञानमयकोश आत्मा नव्हे.

५ आनंदमय कोश—प्राणी कर्मफळांचा उपभोग घेऊं लागला, ह्मणजे बुद्धींतून उद्गार ' ओहो, वाहवा, ' वगैरे आनंदसूचक निघतात; परंतु हा आनंद चिरकाल टिकणारा नव्हे. ह्मणून तो आनंदमय कोश आत्मा नव्हे.

तर आतां आत्मा कोणता ? तर आनदंमयकोशाच्या आंत, नित्य, शुद्ध, बुद्ध, निरंजन ( लेपरहित ) मुक्त असा आत्मा आहे. आत्मा ही एक ज्योती आहे, चित्त ( बुद्धि ) हेंच त्याचें अस्तित्व दाखविण्यास साधन आहे. लंगड्या आंधळ्याप्रमाणें ह्या दोघांचें सान्निध्य आहे. जसे आंधळ्याचे ( बुद्धिचे ) पाय, चालण्याला, व पांगळ्याचे डोळे रस्ता दाखविण्याला, तसाच हा दोघांचा जोड आहे. " अङ्गुष्ठमात्रः पुरुषो ज्योतिरिवाधूमकः। ईशानो भूतभव्यस्य स एवाद्य स उ श्व एतद्वैतत् ( कठोपनिषत् )

**इन्द्रियाणि पराण्याहुः इन्द्रियेभ्यः परं मनः ।**
**मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः** ( आत्मा ) गी. ३. ४२

वर लिहिल्याप्रमाणें इतके कोट ओलांडल्या नंतर पुढें आत्म्यांत प्रवेश करावयाचा आहे. परंतु हा प्रवेश फार बिकट आहे. हा फक्त शाब्दिक प्रवेश आहे, बुद्धीच्या सरहद्दीला लागून पण पलिकडे आहे. हा ज्याचा त्यानेंच अनुभवावयाचा आहे. ज्याप्रमाणें मनुष्य पोहावयास निघाला कीं आंगांतील एक एक कपडा काढण्यास सुरुवात करितो, नंतर सर्व कपडे काढून टाकतो, व पाण्यांत प्रवेश करण्याची तयारी करितो. त्याप्रमाणें आपणामधील एक एक विकार प्रथम काढण्यास सुरवात करून, सर्व विकार कामक्रोधादि काढल्यानंतर, अगदीं नंगा झाल्यावर, पाण्याप्रमाणेंच आत्म्यांत प्रवेशाची तयारी केली पाहिजे. ही तयारी जाहल्यावर पाण्यांत जातांना एकदम हवेंतून पाण्यांत जाण्याचें स्थित्यंतर होत असल्यानें, जसें शरीर कांपूं लागतें, व शिसारी बसते. नको नको असें वाटतें मन घाबरतें, परंतु धीर करून जो पाण्यांत उडी टाकतो, तोच पोहूं लागतो व सुख मिळवितो. तसेंच आत्म्यांत प्रवेश करितांना होतें. मात्र एकदां प्रवेश झाला कीं मग जसा माणूस पाण्यांत पोहतो व आनंद पावतो, तसाच आत्म्यांत प्रवेश झाल्यावर मग तो आनंदाच्या गटंकळ्या खात राहातो.

आत्मज्योती अंगुष्ठ मात्र असल्याबद्दल उपनिषदांत वर्णन आहे. प्रत्येक प्राणीमात्राभोंवती एक प्रकारचें तेजोवलय असतें म्हणतात. व तें आत्मप्रकाशाचें द्योतक समजलें जातें. कांहीं शोधकांनीं, मनुष्यप्राणी मरण्यापूर्वी मरण्याच्या स्थितींत असतां, म्हणजे तेजोवलय असतां प्राणी तोलून पाहिला व प्राण जातांच म्हणजे तेजोवलय जातांच, त्याचवेळीं तोलून पाहिला, तेव्हां त्यांस आढळून आलें कीं या दोन स्थितींत एक औंस वजनाचा फरक पडतो. त्यावरून, त्या ज्योतीवलयाचें वजन एक औंस असावें असें होतें परंतु लोखंड तापवण्यापूर्वी व नंतर, तोललें, तर फरक पडत नाहीं म्हणतात. मग हें व्हावें कसें ही शंकाच आहे.

भयभीत होण्यापूर्वी व भयभीत झाल्यानंतर माणसाचें जर वजन केलें, तरिही वजनांत फरक पडतो म्हणतात. प्राणी मरतांना जरी शुद्धींत असलेला दिसला नाहीं, तरी अन्तर्यामीं, तो शुद्धींत असतो म्हणतात. ज्यांनीं तिळांचे तेलाचा दिवा, किंवा स्टोव्ह जातांना पाहिलें असेल, त्यांच्या ध्यानांत येईल कीं दिवा,

तेल संपत आल्याकारणानें, भक, भक, भक, करीत असतो. व उजेड काळोख, उजेड काळोख होत असतो. व शेवटीं एकदम भक्क करून उजेड होऊन दिवा जातो. त्याचप्रमाणें प्राणी मरतांना शुद्धींत गैरशुद्धींत होतां होतां शेवटीं दिव्याच्या ज्योतीप्रमाणें भक्क करून शुद्धिसह त्याचा प्राण जातो. ह्म० मरतांना तेजोवलय शरीरांतून निघतांना तो शुद्धींत असावा. ह्मणजे प्राण जातांना प्राणी शुद्धींत असतो ह्मणतात. मन चंचल असल्यानें व मनाचा निश्चय अगोदर झालेला नसल्यानें कोणत्यातरी विचारांत प्राणी असतोच. तेव्हां त्यावेळीं ह्म० प्राण जातांना जो विचार तोच पुढील भोगांला कारण होतो. तेंच पुढील जन्माला प्राक्तन. एवढ्याचकरितां, प्रथमपासूनच मनाला संवय ठेविली तर, त्या संवईकडे मरतांना प्राण्याचा ओढा होईल. व जी संवय मनाला लावलेली असेल तिकडे मन वळेल. यामुळें शास्त्रकार " अन्ते मतिः सा गतिः " असें सांगत असावेत. प्राणी मरतांना जर शुद्धींत असतो, तर मरणाच्या भीतींत तो असतोच. त्या भीतीमुळें, प्राण्याचें वजन कमी होत नसेल कशावरून ? हा प्रश्नच आहे. ज्यांना सवड असेल त्यांणीं ह्याचा पडताळा पहावा. हें साधावें कसें अशी शंका येईल तर, त्यास खालील उपाय योजावा. गाडी बैलांसह गाडीचें वजन दस्तुरी नाक्यावर करतात हें आपण पहातों. त्याचप्रमाणें प्राण्याला मरतांना कांट्यावर निजवून ठेवावा. ह्मणजे प्राण जाण्यापूर्वीच्या व प्राण गेल्यानंतरच्या वजनांत फरक पडतो कीं काय तें कळेल.

तसेंच टणक्या माणसाचें वजन करितांना त्यास न कळतां तो अडकून राहील म्ह० त्याचे हात लवकर सुटणार नाहींत अशी तजवीज अगोदरच करून ठेवावी व त्याचें वजन होतांच त्याला भीती उत्पन्न होईल अशी वस्तु-उ० दांत पडलेला निरुपद्रवी सर्प अंगावर टाकावा. किंवा मोटारगाडीसारखा एकदम भयंकर आवाज करावा म्हणजे तो भयभीत होऊन जाईल. मग त्याच्या पूर्वीच्या वजनांत व आतांच्या वजनांत फरक पडतो कीं काय तें कळेल.

## ७ सहज न समजणाऱ्या, व पारिभाषिक शब्दांचा खुलासा.

**अव्यक्त**—ज्या स्थितींत नाम नाहीं, व्यक्तित्व नाहीं, ती स्थिती. सर्व अन्तरिंद्रियें, सर्व इंद्रियांचें समवायीरूप, प्राण, मन, बुद्धि, अहंकार, चित्त, व सत्वरज, तमाची साम्यावस्था, यांस अव्यक्त, अशी संज्ञा आहे.

**द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च।**
**क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते** ॥ [ गी. १५. १६]

यांतील, अक्षर ह्म० अव्यक्त प्रकृती होय.

जगदुत्पत्तीकाळीं मूलशक्तीचा आघात आकाशावर होतो, व तें आकाश स्पंद-रूप होतें, त्या स्थितीस अव्यक्त असें नांव देतात, हिरण्यगर्भही ह्मणतात. हिरण्य-गर्भापासून प्रत्येक तत्त्व सूक्ष्मापासून स्थूलापर्यंत पृथ्वी आप् तेज वायु इत्यादि वाढत वाढत ही सर्व चराचर सृष्टी निर्माण होते. व प्रलयकालीं विश्वाची व्यक्त दशा पुरी होऊन आपल्या मूळ स्थितींत त्या विश्वांतील सृष्ट पदार्थ लीन होतात, लीन झाले ह्मणजे त्या स्थितीसही अव्यक्त हें नांव देतात. ह्या अव्यक्ताच्या पंलीकडीलही जी स्थिती ह्म० अव्यक्तावस्था तोच आत्मा होय व ह्यासच पुरुष असें ह्मणतात; व तोच ईश्वर होय. **परस्तस्मात्तुभावोऽन्योऽव्यक्तो ऽव्यक्ता-त्सनातनः। यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति** ॥ २० ॥ अ. ८; **अव्यक्तोक्षर इत्युक्त स्तमाहुः परमांगतिम्** अव्यक्त ह्मणजे सर्व व्यापक तोच आत्मा, तोच जीव, तीच ईशशक्ति, ह्या व्यापक तत्वाची कल्पना समुद्राप्रमाणें किंवा आकाशाप्रमाणें समजावी. कारण जितकें जितकें सूक्ष्मत्व तितकें तितकें व्यापकत्व. जितकें स्थूल जास्त तितकें व्यापक कमी. उदाहरणार्थ—दृश्य पाण्यापेक्षां अदृश्य वाफ हवेंत संचरणारी जास्त व्यापक; ह्यावरून आत्मतत्व, चेतनतत्व, अति सूक्ष्म ह्मणूनच व्यापक असलें पाहिजे. त्याची कल्पना बुद्धीच्या सरहद्दीच्या पलिकडील आहे. " यो बुद्धेः परतस्तु सः " ह्यावरून ईशशक्ति आत्मा अव्यक्त होय.

वृत्ति=Action, movement, from वृत् =वर्तणें to act, to re-volve, ह्मणजे, वृत्ति ह्याचा अर्थ भोंवरा. चित्तावर उमटणारे ( चित्त हा समुद्र कल्पिला तर ) निरनिराळे तरंग ऊर्फ लाटा होत. ह्मणजे चित्तरूपी समुद्राची खळबळ होऊन त्या खळबळीमुळें, चित्तावरील तरंग, त्या चित्ताच्या वृत्ति होत. त्या वृत्ति त्रिगुणात्मक मानलेल्या आहेत; सत्व रज आणि तम हे ते गुण होत.

रजोगुणी वृत्तीनें, प्राणी कल्पनांच्या पाठीस लागून कार्यरत असतो; तमोगुणी वृत्तीनें आळशी बनतो. आतां रजोगुण व तमोगुण या दोहोंनीं होणारी चित्ताची

स्थिती बदलून, स्थिर गंभीर अशी वृत्ति प्राप्त करून घेणें, हें काम सत्वगुणाचें आहे. तमोगुण आळस उत्पन्न करणारा, सत्वगुण स्थिरता आणणारा. तमोगुणी पदार्थ उदाहरणार्थ धोंडा घेतला ह्मणजे त्याची वृत्ति स्थीरच; व सत्वगुणापासूनही स्थिरताच मिळवावयाची, मग ह्या दोहोंत फरक तो काय ? असा कोणास संशय येईल तर, आळस हा सत्वगुणाचा द्योतक नसून तो तमोगुणाचा द्योतक आहे. माथेफिरूचीं दुसऱ्यास पीडा देणारीं कृत्यें हें तमोगुणाचें कार्य आहे. ह्म० अंधकाराचें आच्छादन तमोगुणामुळें. हें मिळवीन तें मिळवीन, हें करीन तें करीन इत्यादि वृत्ति उत्पन्न होणें हें रजोगुणाचें कार्य, ह्म० चित्ताला खळबळून सोडणें, हें त्याचें कार्य, खळबळल्या चित्तावरील वृत्ति नाहींशा करून शान्ति निर्माण करणें हें सत्वगुणाचें कार्य होय. ह्म० निर्मल आत्म्याचें प्रतिबिंब घेण्यालायक निर्मल चित्त बनविणें.

वृत्ति ह्या शब्दाचा अर्थ फिरणें असा असल्यामुळें वृत्तीच्या मागें जरी सत्वशब्द, असला तरी तें फिरणेंच होय;मात्र तें फिरणें रजोगुण व तमोगुण ह्या वृत्तींच्या फिरण्याहून निराळें असतें; जसें ध्रुवशब्द उच्चारल्यानें स्थिर स्थिती अशी कल्पना मनांत येते. परंतु उत्तरध्रुव दक्षिणध्रुव तारे ह्मटल्यानें, त्या नक्षत्रांची गती जागच्या जागींच, ह्मणजे न समजण्या जोगी, इतक्या अवस्थेंतील त्यांची गती, तद्वत्च सत्व वृत्तीची गती समजावी. ज्याप्रमाणें गाडीच्या मोठ्या चाकाची गती दृश्य असते, परंतु आंसा जवळची गती अदृश्य, त्याचप्रमाणें ह्या सत्वगुणाची गती होय. सत्वगती इष्ट गती मानलेली आहे.

**चित्तचैतन्ययोग** चित्त ह्म० चिंतनाची क्रिया करणारी मनाची अवस्था, चेतन ह्म० ज्ञान किंवा प्रकाश. चेतनस्य भावः चैतन्यं ह्म० आत्म्याचा गुण. **चित्तं चिदिति जानीयात् तकाररहितं यदा । तकारो विषयाध्यासो जपारागो यथा मणौ ॥**

तकार चित्ताला लागल्यानें तें जड, विषयाकार झालें आहे. जड हें जडाकरितां नसतें. गाडी गाडीकरितां नसते. तिच्यांत कोणीतरी बसणारा, तिला गती देणारा चेतन पाहिजे. तिला हालविलें तरच ती चालेल. तसाच चित्ताला चाळविणारा असला पाहिजे. चित्त हें पाण्यासारखें बुद्धितत्व समजावें. पाण्यांत जसें सूर्याचें प्रतिबिंब, तसेंच बुद्धींत परमात्म्याचें प्रतिबिंब. बुद्धींत जेव्हां, परत्म्याचें प्रति-

बिंब पडतें, तेव्हां त्यास जीव ही संज्ञा येते. सत्वगुण जेव्हां चित्तांत उत्पन्न होतो, तेव्हांच चैतन्य व्यक्त झालें ह्मणून समजावें. त्याचवेळीं निर्गुण ( अव्यक्त ) ब्रह्मानें सगुण रूपधारण केलें ह्मणून समजावें. सांख्यांचीं जड २४ तत्वें, ज्यांना चेतनाची २५ वे तत्वाची जोड मिळाली कीं, तीं कार्यकर्त्तीं होतात. कार्यकर्त्तीं झाल्यानंतर अनेक वासना घड्यांतील तादूळांप्रमाणें, देहरूपी घड्यांत भरतात.

अशा ज्या वासनांनीं भरलेला हा शरीररूपी घडा रिकामा करणें ह्म० वासना काढून टाकणें, तोच चित्तचैतन्ययोग होय.

योग ह्मणजे चित्त बाह्य विषयांतून काढून, अंतर्मुख करणें तो योग होय.

योग ह्मणजे वियोग; जसें अंधकाराचा वियोग, तो उजेडाचा योग; व उजेडाचा वियोग तो, अंधकाराचा योग; त्याच प्रमाणें योग ह्मटलें कीं, कोठें तरी वियोग हा असलाच पाहिजे; चित्ताचा बाह्य पदार्थांशीं जो वियोग तो आत्म्याशीं योग होय; चित्ताला बाह्य पदार्थांशीं स्फुरूं दिलें नाहीं, ह्मणजे अर्थातच तें आंतील राहिलेलें जें चैतन्य त्याच्याशींच त्याचा योग हा परिणाम होणार. घटांतील तांदूळ काढून टाकले तसेंच चित्तांतील बाह्य विषयांच्या भरलेल्या वासना काढून टाकल्या, आंतील मनोराज्य नाहींसें झालें कीं, जसें घटांतील आकाशाचा व्यापक आकाशाशीं योग, तसेंच चित्तांतील वासना निघाल्यानें चैतन्य जें व्यापक तत्व, त्याच्याशींच योग होतो व वासनांचा वियोग होतो; ह्यावरून सिद्धांत निघतो कीं घटाकाश आंतील तांदूळ नाहींसे केल्यानें व्यापक आकाशाशीं संलग्न करितां येतें, एकरूप करितां येतें; तसेंच चित्तांतील चैतन्य चित्ताचा चित्तपणा मोडल्यानें, त्यांतील वासना नष्ट केल्यानें चित्तांतील चैतन्य व्यापक चैतन्याशीं मिळवितां येतें. व असें मिळविणें तोच योग होय.

**मन**—मन व बुद्धि हीं चित्ताचीं दोन रूपें आहेत. जेव्हां चित्त अस्थिर होतें ह्मणजे संशयात्मक असतें, तेव्हां त्यास मन ह्मणतात; जेव्हां त्याच चित्तांत निश्चय होतो, तेव्हां त्याच चित्तास बुद्धि ही संज्ञा प्राप्त होते. जशीं पांच कर्मेन्द्रियें—वाक् हस्त पाद पायु उपस्थ; व पांच ज्ञानेंद्रियें-श्रोत्र त्वक् चक्षु रसना घ्राण; तसेंच मन हें अकरावें इन्द्रिय मानलेलें आहे. मनाला निश्चित चित्ताचा ( बुद्धीचा ) जोर असतो, तेव्हां बुद्धीचा प्रकाश मनाला मिळून, मन चैतन्यरूप भासतें. परंतु मन चैतन्यरूप नसून चैतन्य व्यक्त करण्याचें तें एक साधन आहे.

मनामुळें विचार उत्पन्न होत नसून प्रत्यक्ष भासण्याच्या स्थितींत ते येतात. अशी वस्तुस्थिती असतां मन चैतन्यरूप भासतें याचें कारण, पूर्व चैतन्यरूप आत्मा हा त्याचें अधिष्ठान असल्यामुळें ह्मणजे आत्मा हा चैतन्यरूप असून मनोद्वारें विश्वावलोकन करितो; मनोद्वारें वस्तूचें ज्ञान आत्म्याला होतें. मन Interloper Interpreter, ( दुभाष्या ) ह्मटलें तरी चालेल. कारण आंतील उत्पन्न झालेले विचार याच्या मार्फत वाणीरूपानें येत असतात. व बाह्य विषय बाह्य इन्द्रियांनीं, मनाला दाखविलेले, मनरूपी सांध्यानें, मेंदूतील त्या इन्द्रियाच्या गोलकांशीं जोडले जाऊन क्रिया प्रतिक्रिया घडून वस्तूचें ज्ञान आपणास होतें. मन दोन कामें करीत असतें एक बातमी देण्याचें. व दुसरें बुद्धि ठरवील तो हुकूम अमलांत आणण्याचें. डोळे पाहण्याचें काम करितात; परंतु बाह्य इन्द्रिय जो डोळा, त्या एकट्याचें काम पाहण्याचें नव्हे; दृगिंद्रिय मनाशीं जोडून मेंदूंतील दृग्गोलाशीं जेव्हां जोडला जातो, तेव्हां बाह्य विषय दिसण्याचें कार्य घडतें. धडसा डोळा असून मन बुद्धि यांच्यांशीं मिलाफ असेल तर दिसण्याची क्रिया घडेल. **जे न देखति नेत्र, तेंही देखति उपनेत्र, ब्रह्म अवघें सत्ता मात्र, चैतन्य अवघें मायेचें**. शकुन्तलेच्या संनिध दुर्वास ऋषि आले असतांही, तिचें मन दुष्यंतराजाकडे वेधलें असल्यानें जवळ डोळ्यांसमोर ऋषि, शकुंतलेचे डोळे उघडे जागृत असतांहि, त्या ऋषीची खबर तिला पडली नाहीं. याचप्रमाणें आपलें मन एकाद्या विषयांत गुंग होऊन गेलें असतां, बाजूला तमाशा सारखा गोंगाट असतां ऐकूं येत नाहीं.

**अन्तःकरण**—अन्तः, करण, अन्तः=Inside, Interior; करण=An instrument or means of action; करण ह्मणजे साधन. ( साधक तमं करणं–पाणिनिसूत्र ) क्रियेला उपयोगी पडणारें तें करण, पंचज्ञानेंद्रियें हीं ज्ञानाचीं करणें ( साधनें ) आहेत. ज्ञानाला आंतील साधनांची व बाहेरील साधनांची गरज लागते; त्या साधनद्वारा आत्म्याला ज्ञान होतें. ज्या आंतल्या साधनांची ज्ञानाला गरज लागते तें अन्तःकरण. तीं आंतलीं साधनें ह्मणजे इन्द्रियांचे अन्तरिंद्रियांचे गोलक, मन बुद्धि आणि अहंकार व चित्त ह्या चोहोंच्या समवायी ( समुदाय ) रूपास अन्तःकरण अशी संज्ञा देतात. ज्ञान हें केवळ आंतील इन्द्रियांनीं होत नाहीं; व केवळ बाहेरील इन्द्रियांनीं होत नाहीं, तर

आंतील बाहेरील दोन्हीं साधनांच्या संयोगानें ज्ञान होतें. ह्मणून हीं जीं ज्ञानाचीं आंतील साधनें त्यांस अन्तःकरण ह्मणतात ह्म० आत्मा जाणण्याचें साधन अन्तःकरण किंवा मन होय.

## ८ सुखदुःख हे भोग कोणाला ?

परब्रह्म हें मूळचें आहे. त्याचें प्रतिबिंब जीव आहे तें प्रतिबिंब बुद्धींत पडतें, जसें सूर्याचें प्रतिबिंब पाण्यांत पडतें त्याच प्रमाणें. निश्चय करणें हा बुद्धीचा धर्म आहे. त्या निश्चयापासून सुख किंवा दुःख होतें तें बुद्धीलाच. परंतु प्रतिबिंब स्वरूपी जीव हा बुद्धीशीं संयुक्त नेहमीं असल्यानें बुद्धीच्या सुखदुःखानें तो सुखी अथवा दुःखी दिसतो. परंतु तें सुख दुःख त्याचें खरें नव्हे; तें बुद्धीचेंच खरें सुख-दुःख होय. बाह्य इंद्रियांच्या मदतीनें मन सर्व पदार्थ बुद्धीपाशीं नेऊन देतें. नंतर बुद्धि निश्चय करिते कीं, हा पदार्थ सुखदायक, व हा दुःखदायक; त्या योगें सुख, दुःख हे भोग खरे बुद्धीचे आहेत आत्म्याचे वाटणें हें खरें नव्हे.

**बुद्धि**—परमात्म्याचें प्रतिबिंब घेण्यालायक जी चित्ताची स्थिति तिला बुद्धि संज्ञा देतां येईल; ह्मणजे बुद्धि चित्ताचेंच एक रूप आहे. चित्तावर कोणत्या तरी विचारांचा स्पंद ( गती ) उमटला कीं, त्यावेळीं त्या चित्तास मन ह्मणतात. परंतु हा पदार्थ अमूकच आहे, असा निश्चय तेथें झाला कीं, त्याच चित्तास बुद्धि अशी संज्ञा देतात. अध्यवसायो बुद्धिः; अध्यवसायः= decision, determination resolution ( गी. २. ४१।४४ व्यवसायात्मिका बुद्धिः ) ज्या वेळेस इन्द्रियांनीं मनामार्फत चित्तांत पाठविलेल्या विषयांचा निर्णय, चित्त करून, तो विषय अमूकच असा निकाल देतें, त्या चित्ताच्या अवस्थेस बुद्धि ह्मणावें. व ज्या वेळेस नाना तऱ्हेचे विषय चित्तांत घुसतात व ज्या वेळीं बुद्धिरूपी आरसा मलीन असल्यानें चित्ताचें स्वरूप किंवा माप कळत नाहीं, तेव्हां त्याच चित्तास मन ह्मणावें; आत्म्याचा सारथी बुद्धि आहे. ह्या बुद्धिरूप आरशावर जसजसे रंग आलेले असतील, त्याप्रमाणें आत्मा हा न बोलणारा ( परमतमप्रतिषिद्धं अनुमतं भवति ) silence is consent. जसें असेल तसेंच मत देणारा, अनुमोदन देणारा, आत्मा, त्यांतील वस्तूचें ज्ञान आरशांतील रंगाप्रमाणें रंगी बेरंगी देईल. राजा व प्रधान याप्रमाणें आत्मा व बुद्धि, स्फटिक मणी व जपाकुसुम याप्रमाणें आहे. ज्ञान हें

वस्तुगत नाहीं आत्मगत आहे. मनुष्यामध्यें बुद्धि ह्मणून जें तत्व आहे, तें आपलें ज्ञानार्जनाचें साधन आहे. बाह्येंद्रियें पदार्थांचें रूप बुद्धीकडे मनामार्फत पाठवितात; बुद्धि वस्तु अमूकच आहे अशा निर्णयानें आत्म्याकडे पाठविते, प्रतिक्रियेनें वस्तु अमूक असें ज्ञान मनाला होतें; मन वाणीरूपानें आंतील विचार व्यक्त करितें तेव्हांच वस्तूंचें ज्ञान आपणास होतें.

उपनिषदांत सुंदररूपक करून वर्णन दिलें आहे तें **आत्मानं रथिनं विद्धि शरीरं रथमेव तु। बुद्धिं तु सारथिं विद्धि मनःप्रग्रहमेव च॥** प्रग्रह=लगाम.

## ९ मन आंवरण्याचा प्रयत्न कसा करावा?

**चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद् दृढम्॥**
**तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम्॥** ( गी. ६. ३४ )

**असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम्॥**
**अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते॥** गी. ६. ३५

अर्जुन ह्मणतो वायूची मोट बांधणें जसें कठीण आहे, तसेंच मनाला आंवरणें कठीण आहे. श्रीकृष्ण भगवान् ह्मणतात, मनाला बांधणें कठीण तर खरेंच, परंतु तें अभ्यास आणि वैराग्य यांनीं बांधतां येतें.

एक मनुष्य एक पेटी बाजारांत विकावयास घेऊन बसला, त्या पेटीची किंमत तो एक लक्ष रुपये असें सांगे; त्यामुळें साधारण मनुष्यास ती विकत घेणें अशक्य झालें; ही बातमी राजाच्या कानावर गेली, तेव्हां राजानें त्या पेटीची इतकी किंमत असल्यामुळें तिचे गुण तरी काय आहेत, अशी चौकशी करविली. तेव्हां त्यानें सांगितलें, त्यांत जादू किंवा भूत आहे; तें भूत जे जे पदार्थ सांगावे ते ते आणून देतें; किंवा सांगितल्याप्रमाणें तयारहि करून देतें; मात्र त्याला एकसारखें काम पाहिजे. एक काम संपलें कीं, दुसरें काम करण्याला सांगण्याची तयारी पाहिजे. तें रिकामें म्हणून बसावयाचें नाहीं; त्याला रिकामें बसण्याची पाळी आली तर खावयास उठतें. राजाला वाटलें, आपल्या येथें कामांना काय तोटा आहे; घ्यावें विकत. असा विचार करून एक लक्ष रुपये देऊन ती पेटी त्यानें विकत घेतली.

राजानें त्या भुताला नानाप्रकारचे नानातऱ्हेचे राजवाडे बांधण्यास सांगितलें; नानाप्रकारच्या उत्तम उत्तम चिजा बनवून घेतल्या व आणविल्याहि. काम संपलें कीं काम द्या, ह्मणून त्याचा तगादा पाठीशीं आहेच. असें होतां होतां राजाला तें भूत जेऊं का निजूं देइना. भूत ह्मणे काम सांगा, नाहीं तर तुला खाऊन टाकीन; राजा कंटाळला व त्यास सुचेनासें झालें. ही पीडा ( ब्याद ) जाते कशी, अशी काळजी राजाला पडली. पुष्कळ धन्वन्तरी आले, तरी पण ह्या भुताचा बंदोबस्त कोणाच्यानेंही होईना व राजाचे पाठीमागची पीडा सुटेना. शेवटीं एक धन्वंतरी भेटला, त्यानें सांगितलें तीन लक्ष रुपये द्याल तर ही पीडा मीं नाहींशी करीन. राजा कंटाळला असल्यानें तें त्यानें कबूल केलें; व त्याला तीन लक्ष रुपये दिले.

त्या धन्वंतऱ्यानें त्या भुतास सांगितलें, कीं शें दोनशें हात लांब लोखंडाची कांब आण. त्याप्रमाणें त्या भुतानें आणिली. आतां ही जमिनींत दहा हात गाडून बाकीची वर उभी करून, गच्च जमिनींत पुरून मजबूत उभी राहिल अशी कर. त्याप्रमाणें त्या भुतानें केलें. ह्या कांबीवर आतां तूं वरून खालीं व खालून वर, याप्रमाणें फिरत रहा. ही कामगिरी त्या भुताला सांगितली. त्याप्रमाणें तें भूत करूं लागलें परंतु ह्या कामगिरीमुळें कंटाळलें, व धन्वंतऱ्यास ह्मणूं लागलें मला सोडीव. याप्रमाणें मनाला कंटाळविलें ह्मणजे तें विषय सोडून आपला हुकूम मानण्यास तयार होतें; मन स्वाधीन झालें ह्मणजे सर्व जग स्वाधीन झालेंच ह्मणून समजावें.

वर जो लक्षशब्द वापरलेला आहे, तो ध्यान ह्या स्वरूपानें घ्यावा–एक ध्यान व त्रिकाळ ध्यान.

मन कसें आंवरावें ? अभ्यास, वैराग्यानें. परंतु प्रथम वैराग्यप्राप्ति पूर्वी, मन आवरण्याकरितां अनभ्यस्त व साधारण मनुष्यानें मूर्ती कोणतीही आपलें कुलदैवत किंवा इष्टदेवतेची घ्यावी. ह्मणजे प्रथम स्थूल ध्येय, ध्यानाचा विषय घ्यावा. त्यावर मन स्थिर जाहाल्यावर मग ध्यानाचा विषय कमी कमी स्थूल करितां करितां शेवटीं सूक्ष्मावर आणावयाचें आहे. नंतर ध्यानाचा विषयच सोडून द्यावयाचा. वर कांब सांगितली आहे, येथें ध्यानाचा विषय घेतलेल्या मूर्तीच्या पायांवर डोकी ठेवून, आपल्या मनाला मूर्तीचे पायांपासून सुरवात करून डोक्यापर्यंत चढवीत लक्ष देवविण्याची संवय करावी. तेथून तसेंच मूर्तीच्या पाठीमागून लक्ष काढून पुन्हां मूर्तीचे पायांवर आणावें. व पुन्हां

वर चढवावें. याप्रमाणें मनाला इकडे तिकडे फिरण्यास मुळींच सवड देऊं नये ह्मणजे या अभ्यासानें तें स्थिर होण्यास लागेल. प्रथम सुरवातीस कंटाळा येऊं नये व अभ्यास व्हावा ह्मणून एकच बैठक दिवसांतून एक वेळची करावी. बसण्याची संवय झाली, अभ्यास चालूं लागला, ह्मणजे दोन वेळची करावी. तीही संवय झाली ह्मणजे तीन वेळची करावी. याप्रमाणें त्रिकाळ बैठकीची संवय करावी व मनाला अगदीं कंटाळवून सोडावें. एकदां तें कंटाळलें ह्मणजे जसा एकादा त्रास-दायक भिकारी, ' ऐनाच्या बैना घेतल्याबगर जायना ' ह्मणतो व त्रास देऊन देऊन कंटाळवितो व यजमानाच्या मनांत नसतांही मनाच्या विरुद्ध त्याचा त्रास जावा ह्मणून पैसा देऊन त्यास हांकून लावितो. व त्रास चुकवितो. भिकारी मात्र त्रासीक पणानें आपलें काम करून घेतो. त्याप्रमाणें मन एक ठिकाणीं जखडल्यामुळें आपल्या स्वाधीन व्हावयास लागतें. व जे जे हुकूम करावे, ते ते ऐकण्याची त्याची तयारी होते. कारण जसा पारध्याच्या दोरीनें बांधलेला पक्षी चोंहोंदिशांकडे उडण्याचा प्रयत्न करितो, तरी आश्रय न मिळाल्यामुळें अखेरीस बंधनाकडेच येतो, त्याप्रमाणें हें मन चोहोंकडे भटकून आश्रय न मिळाल्यानें नाइलाज जाहल्यानें, अखेरीस प्राणाचाच आश्रय करितें. कारण प्राण हा मनाचें बंधन आहे. ह्या बंधनांत एकदां मन सांपडलें कीं, त्या मनाकडून वाटेल तीं कामें वरील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें करून घेतां येतात, इतकें तें शक्तिमान् सर्वसंचारी व्यापक आहे. त्याची किंमत आपणास त्याच्या भडकण्यामुळें समजत नाहींशी झाली आहे.

झाड हा मनुष्य प्राणी कल्पिला, व त्यावरील काजवे मनाच्या ठिकाणीं कल्पिले, तर त्या काजव्याची जी स्थिति तीच मनाची होय. त्या झाडावर लाखोंशें काजवे असले तरी, त्यांच्या लिकलिक व चंचल उजेडाचा कांहीं तरी फायदा आहे का ? परंतु सर्व काजव्यांचा एकत्र अचंचल उजेड जर एक होऊन स्थिर होईल तर त्या उजेडापासून उजेडाचा फायदा करून घेतां नाहीं का येणार ? तसेंच मनाचें आहे. मन हें इतकें चंचल आहे कीं, चंचलपणांत तें अद्वितीय आहे. वर्षाकाळीं जी बिजली चमकते, ती आपण पाहतों; ती किती चंचल असते ? तिच्याहूनही मन चंचल आहे. बिजली एकदां चमकण्यानें थोडासा प्रदेश प्रवास करील, परंतु मन त्याच्याहूनही लाखोशें पट प्रवास करूं शकतें. आतां जर मन हिंदुस्थानांत आहे तर डोळ्यांची पापणी लवते न लवते इतक्याच वेळांत आफ्रिका अमेरिका वगैरे पाहिलेल्या ठिकाणांतूनही

प्रवास करूं शकतें. जितका पदार्थ जास्त चंचल तितका तो आहारीं येईल तर जास्त कामीं येईल, असा सृष्टीचा नियम दिसतो. आपणांस ज्या चंचल वस्तू आज मितीस जगांत आढळतात, त्यांत विजेइतका चंचल पदार्थ दुसरा कोणताच आढळत नाहीं. चंचल आढळलेली वीज आहारीं आणिल्यानें आजमितीस भयंकर व अकल्पित कामें तिजपासून किती करून घेतां येत आहेत; मग मन जें विजेच्याहूनही चंचल आहे तें जर आहारीं आणिलें–स्वाधीन करून घेतलें तर त्याजकडून काय होणार नाहीं ?

हा जो मन आवरण्याचा प्रयत्न लिहिला, त्या प्रयत्नानें आसनजय होण्याला सहजीं साधन होणार आहे. ह्म० शरीर जय आसनानें साधेल. तो साधल्यानें प्राण जय मग प्राणायामानें; इंद्रियजय प्रत्याहारानें; मनजय अभ्यास वैराग्यानें; बुद्धिजय ध्यानानें; अहंकारजय गुरूभक्तिनें, करावयाचा आहे याबद्दल सूत्रें गेलीं आहेत. याप्रमाणें सहाही ताब्यांत आल्यानें शरीर हें मोक्षमार्गाचें साधन होईल. शरीर मोक्ष मार्गाला साधन कसें करून घ्यावें, हेंच मागील गेलीलीं पातञ्जलसूत्रें सांगत आहेत.

## १० ब्रह्मचर्य.

ब्रह्म ह्मणजे वेद. शरीरसंपत्ति कायम टिकवून, वेदाध्ययनाकरितां किंवा ब्रह्मप्राप्तीकरितां, अवश्य जें आचरण त्याला ब्रह्मचर्य असें ह्मणतात. विशेषेंकरून, उपस्थइंद्रियनिग्रह हा याचा अर्थ होय. आपल्याला सबंध आयुष्यांत १ ब्रह्मचर्य २ गार्हस्थ्य ३ वानप्रस्थ आणि ४ संन्यास असे चार आश्रमांतून जावयाचें आहे. ह्या चार आश्रमांपैकीं वानप्रस्थ व संन्यास या आश्रमांमध्यें ब्रह्मचर्य व गार्हस्थ्य ह्या आश्रमांची पूर्तता होऊन, सर्वसंग परित्याग करून, पुढील आश्रमांत वनांत रहावयाचें असल्यानें ह्मणजे ब्रह्मचर्य हा स्वाभाविक धर्म आंगवळणीं पडलेला ह्मणून ब्रह्मचर्य पाळण्याकरितां प्रयत्न करण्याचें कारणच त्या आश्रमांत पडत नाहीं. ह्या दोन आश्रमांत ब्रह्मचर्य हा अंगभूत स्वभावच बनलेला आहे, असें समजूनच पुढील आश्रमांचा स्वीकार असतो; तेव्हां आतां ब्रह्मचर्याची–ब्रह्मचर्य पाळण्याचे प्रयत्नाची अवश्यकता राहिली. दोन आश्रमांत, ब्रह्मचर्य व गार्हस्थ्य. जून्या काळांत वर दिलेले चार आश्रम स्वीकारले जात असत. हल्लींच्या काळांत ब्रह्मचर्य व गार्हस्थ्य हे दोनच आश्रम पाळले जातात व ह्या आश्रमांतच ब्रह्मचर्य

पाळण्याची अवश्यकता असते. ह्मणून या दोन आश्रमांचा व या आश्रमांतील ब्रह्मचर्याचा विचार करूं.

ब्रह्मचर्य आश्रम हा मुख्यतः विद्या संपादनार्थ आहे. विद्या संपादन करितांना अडथळा येऊं नये व विद्या निष्फळ जाऊं नये, ह्मणून ब्रह्मचार्याला अनुलक्षून कांहीं विधिनिषेध सांगितले आहेत. ब्रह्मचर्याश्रम हा लग्न होण्यापूर्वींचा आश्रम असल्यानें, ह्या आश्रमाला उचित असे स्त्रीषयक व अन्नपानादि नियमही कडकडीत सांगितलेले आहेत. व गार्हस्थ्य ह्या आश्रमांत विद्यासंपादन करून लग्न झाल्यानंतर ब्रह्मचर्य पाळण्याकरितां जे नियम आहेत, ते त्या आश्रमानुसार स्त्रीविषयक नियम जरा नरम आहेत; ह्मणजे ब्रह्मचर्यव्रताचे दोन भाग करितां येतील—एक कडकडीत ब्रह्मचर्यव्रत, व दुसरा सौम्य ब्रह्मचर्यव्रत. पहिलें अविवाहितांनीं पाळावयाचें व्रत ह्मणजे ब्रह्मचाऱ्यांकरितां; व दुसरें विवाहितांनीं पाळावयाचें व्रत ह्मणजे गृहस्थाकरितां. दोन्ही आश्रमानुसार ब्रह्मचर्य पाळतां येणें शक्य आहे. सर्व आश्रमांत गृहस्थाश्रम श्रेष्ठ आहे, असें दाखविल्यानें ह्या अशा श्रेष्ठ आश्रमांत जर ब्रह्मचर्य पाळलें गेलें तर ‘ अधिकस्य अधिकं फलं ’ होणार आहे. ह्मणून प्रथम गार्ह्यस्थ्य आश्रमाचें श्रेष्ठत्व दाखवून, नंतर ब्रह्मचर्याच्या नियमाकडे वळूं.

गार्हस्थ्य आश्रम हा सर्व आश्रमांत मुख्य असून, सर्वांचा मायबाप आश्रम होय. कारण—

**यथा वायुं समाश्रित्य वर्तंते सर्वजंतवः ॥**
**तथा गृहस्थमाश्रित्य वर्तंते सर्व आश्रमाः** ॥ मनु. ३. ७७

प्राण वायूच्या आश्रयानें जसे सर्व प्राणी, तसेच गृहस्थाश्रमाच्या आश्रयानें अन्य सर्व आश्रमी निर्वाह करितात; ह्मणून हा आश्रम श्रेष्ठ होय.

**यस्मात्त्रयोऽप्याश्रमिणो ज्ञानेनान्नेन चान्वहम् ॥**
**गृहस्थेनैव धार्यंते तस्माज्ज्येष्ठाश्रमो गृही** ॥ मनु. ३. ७८.

तिन्ही आश्रमी ( ब्रह्मचर्य, वानप्रस्थ, व संन्यासी ) यांना प्रत्यहीं ज्ञान, आणि अन्नदान, यांहींकरून गृहस्थाश्रमी पोषण करितो, यास्तव गृहस्थाश्रम श्रेष्ठ होय.

**कालो ह्ययं संक्रमितुं द्वितीयं सर्वोपकारक्षममाश्रमं ते ॥**

रघुवंश सर्ग ५ श्लोक १० गृहस्थाश्रमाचें श्रेष्ठत्व दाखवितो.

**यथा मातरमाश्रित्य सर्वे जीवन्ति जंतवः ॥**
**वर्तन्ते गृहिणस्तद्वदाश्रित्येतर आश्रमाः ॥**
**ब्रह्मचारी गृहस्थश्च वानप्रस्थो यतिस्तथा ॥**
**एते गृहस्थप्रभवाश्चत्वारः पृथगाश्रमाः** ॥ मनु. ६. ८७

ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ आणि यति, हे निरनिराळे चार आश्रम गृहस्थापासून होणारे आहेत; ह्या चारही आश्रमाच्या स्थितीला गृहस्थ कारण आहे.

**सर्वेषामपि चैतेषां वेदस्मृतिविधानतः ॥**
**गृहस्थ उच्यते श्रेष्ठः स त्रीनेतान् बिभर्ति हि** ॥ मनस्मृ. ६.८९

ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ, आणि संन्यास ह्या चार आश्रमांमध्यें, वेद व स्मृति, यांचें जें विधान ( अग्निहोत्राद्यनुष्ठान ) तें गृहास्थाश्रमांत असल्यानें गृहस्थाश्रम श्रेष्ठ मानला आहे.

**यथा नदीनदाः सर्वे सागरे यांति संस्थितिम् ॥**
**तथैवाश्रमिणः सर्वे गृहस्थे यांति संस्थितिम्** ॥ मनुस्मृ. ६. ९०

जसे नदी, आणि नद हे सर्व सागरांमध्यें जाऊन स्थिति पावतात, तद्वत् सर्व आश्रमी, गृहस्थाचे ठायीं स्थिति पावतात.

याप्रमाणें गृहस्थाश्रम श्रेष्ठ होय. या आश्रमांत ब्रह्मचर्य पाळण्याकरितां व ब्रह्मचर्याश्रमांत ब्रह्मचर्य पाळण्याकरितां, जे नियम आहेत ते तत्तदाश्रमानुसार आहेत.

ते नियम पाळण्याकरितां आपले आचारविचार उच्चार तसेच सात्विक पाहिजेत. अन्न व वस्त्र स्वच्छ शुद्ध पाहिजे. इन्द्रियदमन-उपस्थ इंद्रियदमन, गुरुसेवा, उपस्थ इंद्रियदमन ह्मटल्यानें स्त्रीशीं संबंध न ठेवणें हा विषय येतोच. भिक्षान्न, प्रणवोच्चार, धूतवस्त्राचें सेवन, सुखशय्या नसणें मित झोंप, अन्न ग्रहण करितांना मौन धारण, शौच, वगैरे आचरण पाहिजे.

**शौच**-सदोदीत हातपाय धुणें, उपस्थ इंद्रिय धुणें, वगैरे स्वच्छता पाहिजे. अशा शुद्ध आचरणानें संपादिलेली विद्या शुद्ध, स्वच्छ व सात्विकफलदायी होते.

त्या व्यतिरिक्त ब्रह्मचर्यव्रताचे नियम मोडल्यानें ब्रह्मचारी आपल्या आश्रमापासून भ्रष्ट होतो, अर्थात् त्यापासून मिळणारे फळाला तो मुकतो.

मनूनें या बाबतींत जें लक्षण सेवन करण्यास सांगितलें आहे तें-

**चतुर्भिरपि चैवैतैर्नित्यमाश्रमिभिर्द्विजैः ॥**
**दशलक्षणको धर्मः सेवितव्यः प्रयत्नतः ॥** मनु. ६. ९१.

चारहि आश्रमी यांना दशलक्षणक धर्म पुढील श्लोकांत सांगितलेला मोठ्या प्रयत्नानें सर्वदा सेवन करावा.

**धृतिः क्षमा दमोऽस्तेयं शौचमिंद्रियनिग्रहः ॥**
**धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणम् ॥** मनु. ६. ९२

चारी आश्रमी यांनीं पाळावयाचीं दहा लक्षणें.-धृति ह्मणजे धनादि नाश झाला असतां धैर्य धारण करणें. दम ह्मणजे विषयांपासून मनोनिग्रह करणें. अस्तेय ह्मणजे अन्यायानें धनग्रहण न करणें. शौच ह्मणजे यथाशास्त्र देहशुद्धि करणें. इंद्रियनिग्रह ह्मणजे विषयांपासून चक्षुरादि बाह्य इंद्रियांचा निग्रह करणें. धी ह्मणजे शास्त्रादि तत्वज्ञान. विद्या म्हणजे आत्मज्ञान; सत्य ह्मणजे यथार्थकथन. अक्रोध ह्मणजे क्रोधाचें कारण असतां ही तो उत्पन्न न होऊं देणें.

**दश लक्षणानि धर्मस्य ये विप्राः समधीयते ॥**
**अधीत्य चानुवर्तंते ते यांति परमां गतिम् ॥** मनु ६. ९३

हीं दहा लक्षणें जे सूज्ञ पठण करितात; व त्याप्रमाणें वागतात ते उत्तम गतीला प्राप्त होतात.

**इंद्रियदमन-इंद्रियाणां विचरतां विषयेष्वपहारिषु ॥**
**संयमे यत्नमातिष्ठेद्विद्वान् यंतेव वाजिनां** ॥ मनु. २. ८८

पुरुषांना आपल्या आधीन करणाऱ्या विषयांच्या ठिकाणीं संचार करणाऱ्या इंद्रियांच्या संयमनाविषयीं, विद्वान् पुरुषानें घोडा आवरून धरण्याचा यत्न करणाऱ्या सारथ्याप्रमाणें यत्न करावा. श्रवणेंद्रिय, त्वगेंद्रिय, चक्षुरिंद्रिय, रसनेंद्रिय, व घ्राणेंद्रिय हीं पांच ज्ञानेंद्रियें; पायू, उपस्थ, हस्त, पाद व वाणी हीं पांच कर्मेंद्रियें. अकरावें मन हें ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रियही आहे. ब्रह्मचाऱ्यानें ह्या इंद्रियांना जिंकल्या शिवाय ज्ञान प्राप्ति होणार नाहीं ह्मणून जिंकलीं पाहिजेत. तीं इंद्रियें जिंकल्याची खुणा.

**श्रुत्वा स्पृष्ट्वा च दृष्ट्वा च भुक्त्वा घ्रात्वा च यो नरः ॥**
**न हृष्यति ग्लायति वा स विज्ञेयो जितेंद्रियः ॥** मनु. २. ९८

स्तुति निंदा श्रवण केल्यानें, मृदु कठोर स्पर्श केल्यानें, सुरूप कुरूप पाहिल्यानें, गोडकडु भक्षण केल्यानें आणि सुगंध दुर्गंध हुंगल्यानें ज्याला हर्ष अथवा विषाद उत्पन्न होत नाहीं तो पुरुष जितेंद्रिय जाणावा.

**इंद्रियाणां तु सर्वेषां यद्येकं क्षरतींद्रियम् ॥**
**तेनास्य क्षरति प्रज्ञा दृतेः पादादिवोदक ॥** मनु. २. ९९

सर्व ज्ञानेंद्रियांपैकीं एक जरी इंद्रिय विषयाकडे वळूं लागलें तरी, पखालीला जीं चार भोंकें असतात. त्यांतील एक जरी भोंक उघडें राहिलें तर, त्यांतून जसें सर्व पाणी निघून जातें, त्याचप्रमाणें पुरुषाचें सर्व धैर्य निघून जातें. (दृति=पखाल)

## उपस्थइन्द्रिय निग्रह-व स्त्रियांशीं वर्तन.

**परपत्नी तु या स्त्री स्यादसंबंधा च योनितः ॥**
**तां ब्रूयाद्भवतीत्येवं सुभगे भगिनीति च ॥** मनु. २.१२९

जी आपल्या नात्यांतील नाहीं, अशा परपत्नीशीं बोलण्याचा प्रसंग आल्यास ( ब्रह्मचर्यव्रत पाळणाऱ्यानें, मग तो गृहस्थाश्रमी असो अथवा ब्रह्मचारी असो ) हे भवति सुभगे, हे भवति भगिनी, ह्मणजे ताई माई संबोधून भगिनी समजून भाषण करावें.

**वर्जयेन्मधु मांसं च गंधं माल्यं रसान् स्त्रियः ॥**
**शुक्तानि यानि सर्वाणि प्राणिनां चैव हिंसनम् ॥**मनु २.१७७

मद्य, मांस, सुगंधिक अङ्गलेप, उटणें वगैरे ( सुवासिक पुष्पें उदबत्ती वगैरे नव्हे ) पुष्पमाला, उत्कटरस, मिष्टान्नें, शृंगारादि रस-नाटकादि प्रेक्षणेन, काव्य श्रवणेन, रसपुष्टिर्ने कर्तव्या; तसेंच स्त्रिया, ( पूज्य स्त्रियांचें पादाभिवंदन वर्ज नव्हे तर कामवासना उत्पन्न होईल अशा रीतीनें ) स्त्री संसर्ग करूं नये. शुक्त ह्मणजे मधुर असून मग आंबलेला पदार्थ, आणि प्राण्यांची हिंसा ह्या गोष्टी वर्ज्य कराव्यात.

**आहार**-सात्विक आहार, दूध, तूप, वगैरे स्निग्धपदार्थांचें सेवन; तेल स्निग्ध पण वर्ज;

**वर्ज आहार व त्याचीं कारणें**--अन्नापासून रक्ताची उत्पत्ति व रक्तापासून

वीर्याची उत्पत्ति होत असते. अन्नामध्यें ज्या प्रकारचे गुणधर्म असतील, त्याच प्रकारचे गुणधर्म रक्तांत उत्पन्न होत असतात. रक्तापासून वीर्य उत्पन्न होत असल्यानें वीर्यांतही तसेच फरक पडतात. ज्याप्रमाणें व प्रकारें अन्न व त्यापासून रुधिरोत्पत्ती व रुधिराभिसरण, त्याचप्रमाणें व त्याच प्रकारें बुद्धि व स्फुरण, असा नियम असल्यानें उद्दीपक अन्नानें बुद्धीला वाईट स्फूर्ति होऊन स्नायूकडून व इंद्रियांकडून, वाईट क्रिया घडून येतात. ह्मणून वृत्तींत सात्विकपणा राहून ब्रह्मचर्यव्रत पाळलें जाईल, अशाप्रकारच्या अन्नाचा उपयोग, ब्रह्मचर्यपाळूं इच्छिणारांनीं केला पाहिजे.

जे प्राणी निव्वळ मांसाहारी आहेत, त्यांच्या वृत्ति सदोदीत क्रूर व अविचारी असतात. पण जे केवळ सात्विक आहाराचे प्राणी आहेत, त्यांच्या वृत्ति सात्विकच राहतात. उदाहरणार्थ—वाघ, सिंह, वगैरे प्राणी क्रूरवृत्तीचे असतात. व हत्ति गाय वगैरे वनस्पति आहार करणारे प्राणी सात्विकवृत्तिचे असतात. ज्याच्या वृत्ति सात्विक नाहींत त्याच्या स्फूर्तीही सात्विक नसतात. मग कृति सात्विक कशी होणार ? सात्विक स्फूर्ति व कृति होणें हीं ब्रह्मचर्यव्रताचीं अवश्य अंगें आहेत. ह्मणून ब्रह्मचर्यव्रत पाळूं इच्छिणारांनीं वाईट स्फूर्ती करणारे व कामेच्छा उत्पन्न करणारे आहार, उत्तेजक आहार सेवन करूं नये. मद्य, मांस, तिखट, मसाले, कांदा, लसूण, तेलांत तळलेले पदार्थ, मादक पदार्थ, चहा, तंबाकू, काफी, वगैरे पदार्थ वर्ज केले पाहिजेत.

**द्यूतं च जनवादं च परिवादं तथाऽनृतम् ॥**
**स्त्रीणां च प्रेक्षणालंभमुपघातं परस्य च ॥** [ मनु. २. १७९ ]

जुगार, लोकांशीं व्यर्थ कलह, दुसऱ्याचे दोष बोलणें, असत्य भाषण, स्त्रियांना विषयबुद्धीनें अवलोकन, स्पर्श इत्यादि विषयांपैकीं कोणत्याही विषयांची आसक्ती करूं नये. व आलिंगन करणें, हीं वर्ज्य समजावीं.

**गुरुपत्नी तु युवतिर्नाभिवाद्येह पादयोः ॥**
**पूर्णविंशतिवर्षेण गुणदोषौ विजानता ॥** मनु. २. २१२

कामजन्य गुण दोष जाणणाऱ्या, पूर्ण वीस वर्षांच्या वयाच्या ब्रह्मचाऱ्यानें, तरुण गुरुपत्नीचे चरण धरून नमस्कार करूं नये. कारण—

**स्वभाव एष नारीणां नराणामिह दूषणम् ॥**
**अतोऽर्थान्न प्रमाद्यंति प्रमदासु विपश्चितः ॥** [ मनु. २. २१३ ]

पुरुषांच्या ठिकाणीं शृंगाराचे हावभाव दाखवून, व मोहित करून कामवासनोत्पत्तिरूप दोष उत्पन्न करणें हा स्त्रियांचा स्वभाव आहे. 'प्रमादः स्पर्शादिकरणं वस्तुस्वभावोऽयं यस्तरुणीं स्पृष्ट्वा, कामकृतं चित्तं संक्षोभं जनयति.' हा वस्तु स्वभाव आहे. स्त्रियांकडे त्याचा दोष नाहीं. अग्नीजवळ तूप पातळ होणें, हा जसा अग्नीचा स्वभाव, तसाच स्त्रीसान्निध्यानें पुरुषाला च्युत करणें, हा तरुणी स्त्रियांचा स्वभाव.

**शृंगार नारी, द्वय कातरा या**
**केल्या विधीनें नर कातराया ॥**
**जो सांपडेना नर कातरा या,**
**तो योग्य होतो नरका तराया ॥**

यास्तव विद्वान् पुरुष स्त्रियांच्या बाबतींत बेसावध राहत नाहींत.

**अविद्वांसमलं लोके विद्वांसमपि वा पुनः ॥**
**प्रमदा ह्युत्पथं नेतुं कामक्रोधवशानुगम् ॥** [ मनु. २. २१४ ]

कामक्रोधाच्या तावडींत सांपडणारा पुरुष, विद्वान् असो वा अविद्वान् असो मीं जितेंद्रिय आहें, अशी कदापि त्यानें घमेंडी करूं नये. विद्वानाला व अविद्वानालाही कुमार्गाला नेण्यास स्त्रिया समर्थ आहेत. 'न कश्चित् पुरुषोऽस्ति यः स्त्रीभिर्नाकृष्यते अयस्कान्तेनेव लोहः 'न चात्र स्त्रीणां प्रभाविष्णुता वस्तुस्वाभाव्यात्तरुणीजनदर्शने पुंसामुन्मथ्यते चित्तं विशेषतो ब्रह्मचारिणामिति '। जसें लोखंडाला लोहचुंबक आकर्षितो, तसेंच स्त्रियेकडून आकर्षिला गेला नाहीं, असा एकही पुरुष सांपडणार नाहीं. पुरुषाला धैर्यापासून च्युत करणें, हा स्त्रियांचा स्वभाव. स्त्री समजून उमजून पुरुषाला आकर्षिते, अशांतला प्रकार नव्हे; तर स्त्रीच्या ठिकाणीं स्वाभाविक असलेल्या मोहकधर्मामुळें यौवनसंपन्न स्त्री दृष्टीस पडतांच पुरुषाचें विशेषें-करून ब्रह्मचाऱ्याचें चित्त क्षुब्ध होतें.

**रोगार्तिं रञ्जना तृष्णा गम्भीरमपि मानवम् ॥**
**उत्तानतां नयन्त्याशु सूर्यांशव इवाम्बुजम् ॥** } योगवाशिष्ठ.

सूर्य जसा आपल्या किरणांनीं कमलाला उताणें करितो, तसेंच रोगपीडा, तृष्णा आणि अङ्गना, ह्या ब्रह्मचाऱ्याला तेव्हांच उताणा पाडतात.

ह्मणून ब्रह्मचार्यानें

**मात्रा स्वस्रा दुहित्रा वा न विविक्तासनो भवेत् ॥**
**बलवानिंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ॥** [ मनु. २. २१५ ]

निर्जन प्रदेशामध्यें, एकान्तांत, मग जरी माता, बहीण, किंवा कन्या असली तरी, तिच्याशीं ब्रह्मचाऱ्यानें सहवास करूं नये. कारण इंद्रियग्राम मोठा बलवान् आहे. तो विद्वानालाही पराधीन करितो. विद्वानाची जर ही दशा, तर मग विद्यार्थीदशेंत ब्रह्मचाऱ्याची अविद्वानाची काय गत होईल तें पुसूंच नका, ह्मणून ब्रह्मचाऱ्यानें स्त्रियांपासून अगदीं अलग राहावें. कन्याशब्दावरून गृहस्थाश्रमी यांचें ब्रह्मचर्य घेणें, किंवा ब्रह्मचाऱ्याला समान स्त्रीजाती घेणें.

ब्रह्मचर्यव्रत पाळूं इच्छिणारांनीं, आपलें मन ताब्यांत येईपर्यंत, कामेच्छा वाढविणारे विषय असतील तेथें जाऊं नये. उदाहरणार्थ तमाशे पाहाणें, कादंबऱ्या वाचणें वगैरे; आपल्या स्त्रीशिवाय इतर स्त्रियांजवळ, भाषणप्रसंग होतांहोईल तितका टाळावा. वाचकांस सांगावयास नकोच कीं, स्त्री हा पदार्थ कामेच्छेचा विषय होय. म्हणून ज्याला ब्रह्मचर्य पाळावयाचें असेल मग तो ब्रह्मचारी असो वा गृहस्थ असो त्यानें स्त्रीसंबंध विशेष काळजीनें टाळला पाहिजे. आतां कोणी असें ह्मणेल कीं, "सर्व जगभर स्त्रीजाती पसरली आहे तर त्या स्त्रीजातीविषयीं तुम्हीं असे अनुदार उद्गार कां काढतां?" **स्त्रीजाति** म्हणजे सृष्टिकर्त्या परमेश्वरानें आपल्या कौशल्यानें तयार केलेली **चीज** होय. तिचा असा धिक्कार कां करतां? अशा आक्षेपकांविषयीं, एवढेंच सांगितलें म्हणजे पुरे आहे कीं आम्हा-सारिखा स्त्रियांविषयीं आदर कोणातही वसत नसेल. स्त्रीजाति म्हणजे खरोखरच विधात्याच्या चातुर्याची कमाल होय. म्हणूनच स्त्रीजातीशीं योग्य व सभ्य रीतीनें वर्तन ठेविलें पाहिजे. या कारणास्तव, जुन्या काळापासून स्त्रीजातीला पहिला मान, नंतर पुरुषजातीला आम्हीं देत आलों आहों; राधाकृष्ण, सीताराम, लक्ष्मी-नारायण, असें जें आम्हीं अद्यापही म्हणतों, तें ह्याचेंच द्योतक होय. परंतु स्त्रीजात ही अबला, बलहीन असल्यानें व काम ह्यांच्यामध्यें जोरावर असल्यानें,

विशेष काळजीनें, त्यांचें व त्यांच्यापासून आपलें रक्षण झालें पाहिजे. स्त्रिया शुद्ध राहिल्या तर समाज शुद्ध राहतो स्त्रिया भ्रष्ट झाल्या तर, सर्व समाज बिघडतो. असें अर्जुनाच्या मुखानें श्रीमद्भगवद्गीतेंत सांगितलें आहे. यावरून स्त्रियांची योग्यता आह्मीं किती लेखतों, हें ध्यानांत येईल. आतां ब्रह्मचर्य व स्त्रीसंबंध या एकमेकांच्या विरुद्ध गोष्टी आहेत. याची सांगड कशी घालावी, हें गूढ वाटेल. म्हणून गृहस्थाश्रम जो परिग्रह प्रधान आहे. ( परिग्रह हा शब्द, स्त्रीसूचक समजावा. ) तो पत्करावा. मात्र शास्त्रोक्त परिग्रह तेवढाच केला पाहिजे. यायोगें, नियतसंबंधामुळें स्त्रीपुरुष या दोघांचें ही कल्याण आहे.

**झोंपः—एकः शयीत सर्वत्र न रेतः स्कंदयेत्क्वचित् ॥**
**कामाद्धि स्कंदयन् रेतो हिनस्ति व्रतमात्मनः ॥** मनु. २.१८०

कोठेंही शय्येवर एकट्यानेंच निजावें; कदापि रेतस्खलन करूं नये; 'इच्छा अत्र कामः हस्तव्यापारादिना अयोनौ मैथुनेनच रेतः शुक्रं स्कंदयत् न कर्तव्या । कामतस्तु स्त्रियं दृष्ट्वापि स्कंदनेन व्रत–ब्रह्मचर्य–हानिः;' कामवशेंकरून, रेतस्खलन केलें असतां, स्वकीय व्रताचा नाश होतो.

बिन्दु ह्मणजे वीर्य हें चल झालें असतां चित्त चंचल होतें, बिन्दु स्थिर असेल तर प्राणसञ्चय सुलभ होतो, त्या योगें अलौकिक सामर्थ्य अंगांत संचित होत असतें. बिन्दु चल होईल तर चित्त चल होतें; व स्थिर राहील तर चित्त स्थिर राहतें. व चित्ताचा निरोध करितां येतो. बिन्दु चालनाने ग्लानि येते; छाती, व सांधे, कमकुवत होतात, वृद्धापकाळ लवकर येतो, व शरीर पतन होण्यासही फार वेळ लागत नाहीं. ह्मणून बिन्दु स्थिर करणें हिताचें आहे. हें समंजस मनुष्य तेव्हांच कबूल करील.

**चित्तायतं नृणां शुक्रं शुक्रायतं च जीवितम् ।**
**तस्माच्छुक्रं मनश्चैव रक्षणीयं प्रयत्नतः ॥**
**सततं रक्षयेत् बिन्दुमृत्युं जयति योगवित् ।**
**मरणं बिन्दुपातेन जीवनं बिन्दुधारणात् ॥**

आधुनिक शोधांनीं असें कळलें आहे कीं, रेताचा एक बिन्दु रक्ताच्या चाळीस बिन्दूबरोबर आहे. ह्मणजे चाळीस थेंब जेव्हां रक्ताचे पैदा होतील, तेव्हां रेताचा

एक थेंब बनेल. ह्यावरून बिन्दूंत रक्ताचा किती समावेश आहे, हें कळून येतें. बिन्दुक्षयापासून हानी केवढी होते, याचा अनुभव बहुतेकांस असेलच. ह्यास प्रत्यक्ष दाखला विंचवीण किंवा खेंकडा जातीची स्त्रीजात हा होय. हे प्राणी रतिसुखानें ललचावतात; परंतु परिणाम प्राणहानींत होतो अल्पसुखासाठीं संबंध आयुष्याला मुकावें लागतें. इतका एकाच वेळच्या बिन्दुक्षयानें घात होतो. मानवी प्राण्यांना एकदम क्षय विंचविणी प्रमाणें दिसत नाहीं, परंतु बिन्दु क्षयानंतर ग्लानि येते, यावरून बिन्दुक्षयाच्या मानानें आयुष्यनाश होतो, हें उघड आहे. हा दाखला मानवी प्राण्यांना बोध घेण्यासारखा आहे. ह्मणून बिन्दुक्षय न होऊं देण्याचा प्रयत्न करावा ह्मणजे ब्रह्मचर्य पाळावें. सारांश—बिन्दुरक्षणाकरितां, खालील उपाय अवश्य योजावेत.

१ कामोत्तेजक पदार्थांचें सेवन वर्ज्य करावें.

२ जेणेंकरून दुष्ट मनोविकार उत्पन्न होतील अशा गोष्टी पाहूं नये, ऐकूं नये, व पुस्तकांतून वाचूं नयेत.

३ निजण्यापूर्वी मनांतील विचार साधुपुरुष, पुण्यपुरुष, यांविषयीं असावेत. ह्मणजे झोंपेंत भलते सलते विचार येऊन बिन्दूवर परिणाम होणार नाहीं.

४ झोंप गाढ लागेल असा भरंवसा असेल तेव्हांच झोंपीं जावें. एरव्हीं ईश्वर चिंतनांत वेळ आंथरुणांवर घालवावा.

५ निजण्यापूर्वी मळमूत्र विसर्जन करून, हातपाय व उपस्थइंद्रिय धुवून, मग झोंपी जाण्याची तयारी करावी. कारण मलावरोध झाल्यानें अस्वस्थता होते. व मूत्राशयाचा वीर्याशयावर भार पडून बिन्दुक्षय होतो.

६ जेवणानंतर सुमारें दोनतास अन्न पचनास अवकाश देऊन, पाणी पिऊन दूध मिळाल्यास दूध पिऊन मग निजावें. पचन होण्यापूर्वी निजल्यास अपचनानें स्वप्नें पडतात. स्वप्नामध्यें स्वप्नावस्था होण्याचा संभव असतो.

७ उताणें केव्हांही निजूं नये. उताणे निजण्यानें बिन्दुक्षय होण्याचा संभव असतो. डाव्या कुशीवर निजावें ह्मणजे झोंपेंत बिन्दुक्षय होणार नाहीं.

८ स्त्रीसंबंध शक्य तितका टाळावा.

*९ वज्रोलीमुद्राविधि ह्मणून एक प्रकारचा विधी आहे, तो ज्याला साधण्यासारखा असेल, त्यानें शिकावा; तो फार कठीण नाहीं. तरीपण हा विधि निव्वळ पुस्तकावरून नवशिक्यानें, अनुभविक माणसाच्या सान्निध्याशिवाय करणें धोक्याचें आहे; हें लक्षांत असावें. ह्याची माहिती व्यावहारिक योग या पुस्तकांत दिली आहे. हा विधि ज्याला साधला त्याला गृहस्थाश्रम पत्करून ही ब्रह्मचर्य पाळतां येतें. बिन्दु त्याच्या ताब्यांत राहतो. स्वतःच्या इच्छेशिवाय बिन्दुक्षय व्हावयाचाच नाहीं. इतकें ही करून बिन्दुनाश झाल्यास उपाय—

**स्वप्ने सिक्त्वा ब्रह्मचारी द्विजः शुक्रमकामतः ॥**
**स्नात्वाऽर्कमर्चयित्वात्रिः पुनर्मामित्यृचंजपेत्** ॥ मनु. २. १८१ ॥

इच्छा नसतां शुक्राची स्वप्नांत च्युति झाल्यास ब्रह्मचाऱ्यानें स्नान करावें. सूर्याची प्रार्थना असें न होण्याबद्दल करावी व खालील मंत्राचा त्रिवार जप करावा—पुनर्मामैत्विंद्रियं पुनरायुः पुनर्भगः पुनर्ब्राह्मणमैतुमा पुनर्द्रविणमै तु मा.

इंद्रियसामर्थ्य, आयुष्य, भाग्य, ब्राह्मण्य व धन हीं मला पुन्हां प्राप्त होवोत.

**गुरुसेवा—श्रेयस्सु गुरुवद्वृत्तिं नित्यमेव समाचरेत् ॥**
**गुरुपुत्रेषु चार्येषु गुरोश्चैव स्वबंधुषु** ॥ मनु. २. २०७

आपल्यापेक्षां जे विद्यादिकांनीं श्रेष्ठ असतील त्यांच्याशीं, गुरुपुत्रांशीं, आणि गुरुबांधवांशीं, गुरुप्रमाणें वृत्ती ठेवावी.

**गुरुवत्प्रतिपूज्याः स्युः सवर्णा गुरुयोषितः ॥**
**असवर्णास्तु संपूज्याः प्रत्युत्थानाभिवादनैः** ॥ मनु. २. २१०

गुरूच्या असवर्ण स्त्रियांना गुरूप्रमाणेंच मान द्यावा. परंतु गुरूच्या सवर्ण स्त्रियांना, फक्त उत्थापन व नमस्कार ह्याहीं करून सत्कार करावा.

---

*देहसिद्धिंच लभते वज्रोल्याभासयोगतः ।
अयं पुण्यकरो योगो भोगो भुक्तेऽपि मुक्तिदः ॥
सुगंधो योगिनो देहे जायते बिंदुधारणात् ।
यावद्बिंदुः स्थिरो देहे तावत्कालभयं कुतः ॥

**अभ्यंजनं स्नापनं च गात्रोत्सादनमेव च ॥**
**गुरुपत्न्या न कार्याणि केशानां च प्रसाधनम् ॥** मनु.२. १११.

गुरुपत्नीला तेल लावणें, स्नान घालणें, अंग चोळणें, वेणीफणी, पुष्पमाला घालणें, ह्या गोष्टी वर्ज्य कराव्यात.

**भिक्षान्न--वेदयज्ञैरहीनानां प्रशस्तानां स्वकर्मसु ॥**
**ब्रह्मचार्याहरेद्भैक्षं गृहेभ्यः प्रयतोऽन्वहम् ॥** मनु. २. १८३.

वेदाध्ययनापासून व यज्ञकर्मापासून जे पराङ्मुख नसतात, व जे स्वकर्मनिष्ठ असतात, त्यांच्या घरांतून ब्रह्मचाऱ्यानें, सदा शुचि राहून, प्रत्यहीं भिक्षा आणावी.

**गुरोः कुले न भिक्षेत न ज्ञातिकुलबंधुषु ॥**
**अलाभे त्वन्यगेहानां पूर्वं पूर्वं विवर्जयेत् ॥** मनु. २. १८४

गुरुकुल ( वंश ) आपल्या ज्ञातीचें कुल ( सपिंड ) बंधु मातुलादिक यांचे घरीं, ब्रह्मचाऱ्यानें भिक्षा मागूं नये. भिक्षा घेण्याला योग्य अशा इतर गृहांचा अभाव असेल, ज्या गांवामध्यें गुरू राहतो, त्या गांवांतील सर्वच घरें गुरूचीं संबंधीं किंवा आपल्या बापाशीं किंवा मातेशीं नातें असणारीं असलीं तर, पहिलें पहिलें वर्ज्य करावें. प्रथम मातुलादि बंधुगृहीं भिक्षा मागावी; त्याचे अभावीं ज्ञाति; ज्ञातीच्या अभावीं गुरुकुल, यांचे घरीं भिक्षा मागावी.

**सर्वं वापि चरेद्ग्रामं पूर्वोक्तानामसंभवे ॥**
**नियम्य प्रयतो वाचमभिशस्तांस्तु वर्जयेत् ॥** मनु. २. १८५.

भिक्षा मागण्याचें वाक्य खेरीजकरून, दुसरें कसलेंही भाषण करूं नये, आणि उपजीविकेकरितां सबंध गांव फिरण्याचा प्रसंग आला तरी, पातकी दुष्ट ह्मणून ज्यांचा बोभाटा असेल, त्यांचीं घरें वर्ज करावींत.

**प्रणव, ओंकार**–अध्ययनाआरंभीं, व शेवटीं प्रणवाचा उच्चार करावा. जर प्रणवाचा उच्चार केला नाहीं तर, चुका होतात, अध्ययनाचा विसर पडतो. प्रणव ह्मणजे ओंकार व ओंकार ह्मणजे अकार, उकार, व मकार मिळून ॐ अक्षर होतें. अकार उकार मकार हे प्रणवाचे अंश आहेत. **अकारो विष्णुरुद्दिष्टो उकारस्तु महेश्वरः । मकारेणोच्यते ब्रह्मा प्रणवेन त्रयो मताः ।** प्रणवाचा उच्चार

केल्यानें, उत्पत्ती स्थिति, व लयकर्त्या ईशशक्तीचा आदर केल्याप्रमाणें होतो. ह्मणूनच प्रणव उच्चार पाहिजे.

**अकारं चाप्युकारं च मकारं च प्रजापतिः ॥**
**वेदत्रयान्निरदुहद्भूर्भुवः स्वरितीति च** ॥ मनु. २. ७६

अकार, उकार, मकार हे तीन ओंकाराचे अवयव व भूः, भुवः, स्वः, ह्या तीन व्याहृति दोहन करून ह्मणजे ऋग्वेदापासून अकार व भूः ही व्याहृति, यजुर्वेदापासून उकार व भुवः ही व्याहृति, आणि सामवेदापासून मकार व स्वः ही व्याहृति, याप्रमाणें उत्पत्ती.

**ओंकारपूर्विकास्तिस्रो महाव्याहृतयोऽव्ययाः ।**
**त्रिपदा चैव सावित्री विज्ञेयं ब्रह्मणो मुखम्** ॥ मनु. २. ८१

ओंकारपूर्वक तीन अविनाशी व्याहृति, आणि त्रिपदा सावित्री, हें ब्रह्म प्राप्तीचें द्वार होय.

**धूत वस्त्राचें सेवन**-ब्रह्मचार्यानें लंगोट्या किंवा धोतरें वगैरे, वस्त्रें, स्वच्छ व हलकीं वापरावीं. स्वतः आपले कपडे आपण धुवावे; [ स्वयंदासाः तपस्विनः, ] दुसऱ्याकडून धुतल्यानें, पाहिजे तितकी स्वच्छता राहात नाहीं. **सुखशय्या**-ब्रह्मचार्यानें पलंग गाद्या ह्यांजवर निजूं नये. घोंगडी, कांबळें, यांजवर धूतवस्त्र टाकून निजावें. ह्मणजे आळस व सुस्ती, शरीरांत भरणार नाहीं. मितझोप लवकर निजणें, व लवकर उठणें, हिताचें आहे early To bed an dearly To rise is heatthy wealthy and wise. झोंप प्रत्येक माणसानें, किती घ्यावी हें प्रकृति, व वयमान, यांवर अवलंबून आहे. परंतु सामान्य नियम ६ तास झोंप घ्यावी. ती मध्यरात्रीचा समय साधून घ्यावी ह्मणजे दहा वाजतां निजावें व चार वाजतां उठावें अध्ययन असल्यास उठतांच तें प्रथम करावें. कारण अध्ययनाला वेळ पाहांटेची शांतवेळ हीच उत्तम वेळ, ध्यानांत विद्या दृढ करण्याची होय. नंतर स्नानसंध्या-' अहरहः सध्यामुपासीत, यः सन्ध्यामुपास्ते ' ब्रह्मैव तदुपास्ते. अन्नग्रहण करितांना मौन धारण-जेवतांना देवाचें ह्मणजे पूज्य पुरुषांचें नाम घेण्यानें, मौन धारण केल्याप्रमाणेंच होतें. ' स्नास्यतो वरुणः कान्तिजुव्हतोपि श्रियं हरेत् । भुञ्जतो मृत्यु-

रायुष्यं तस्मान्मौनं त्रिषु स्मृतं' ॥ मौन धारण न करितां, स्नान करणाऱ्याची कान्ति वरुण हरण करितो, हवन करणाऱ्याची सपत्ति अग्नि हरण करितो, आणि भोजन करणाऱ्याचें आयुष्य मृत्यु हरण करितो. ह्मणून ह्या तीन कर्मांत मौन अवश्य पाहिजे.

**गृहस्थाश्रमीं कारणें ब्रह्मचर्यः**—साधुपुरुष सांगतात बिन्दु निरोध होत नसेल, अशा पुरुषांनीं शास्त्रविधीप्रमाणें गृहस्थाश्रम पत्करावा. व गृहस्थाश्रमास उचित असें ब्रह्मचर्य पाळावें. ब्रह्मचर्याश्रमांतील सर्व नियम गृहस्थाश्रमी यांस लागू आहेत. मात्र स्त्रीविषयक संबंधें वर्तनांत जो फरक करावयाचा आहे, त्याविषयीं शास्त्रकार सांगतात.

**ऋतुकालाभिगामी स्यात्स्वदारनिरतः सदा ॥**
**पर्ववर्जं व्रजेच्चैनां तद्व्रतो रतिकाम्यया ॥ ४५ ॥**

**ऋतुः स्वाभाविकः स्त्रीणां रात्रयः षोडश स्मृताः ॥**
**चतुर्भिरितरैस्सार्धमहोभिः सद्विगर्हितैः ॥ ४६ ॥**

**तासामाद्याश्चतस्रस्तु निन्दितैकादशी च या ॥**
**त्रयोदशी च शेषास्तु प्रशस्ता दश रात्रयः ॥ ४७ ॥**

**युग्मासु पुत्रा जायंते स्त्रियोऽयुग्मासु रात्रिषु ॥**
**तस्माद्युग्मासु पुत्रार्थी संविशेदार्तवे स्त्रियम् ॥ ४८ ॥**

**पुमान् पुंसोऽधिके शुक्रे स्त्री भवत्यधिके स्त्रियाः ॥**
**समे पुमान् पुंस्त्रियौ वा क्षीणेऽल्पे च विपर्ययः ॥ ४९ ॥**

**निन्द्यास्वष्टासु चान्यासु स्त्रियो रात्रिषु वर्जयन् ॥**
**ब्रह्मचार्येव भवति यत्र तत्राश्रमे वसन् ॥ ५० ॥** [मनु. अ. ३]

श्लोक ४५–गृहस्थाश्रमी पुरुषास देखील ब्रह्मचर्य व्रत पाळतां येतें. या बाबतींत मनुनें जो कायदा घालून दिला आहे तो—स्वस्त्रियेचेच ठायीं पर्व दिवस वर्ज करून गमन केलें असतां ब्रह्मचर्यव्रतभंग होत नाहीं. आतां पर्व दिवस ह्मणजे, पर्वन् म्ह. A knot, joint, period, fixed time, paricularly the days of the four changes of the moon i. e. the eighth and fourteenth day of each halfmonth, and the days of

the full and new moon ह्मणजे दोन अष्टम्या, दोन चतुर्दशा, अमावास्या, पौर्णिमा व दर महिन्याची सूर्यसंक्रांत मिळून सात दिवस हे पर्व दिवस मानलेले आहेत.

श्लोक ४६. स्त्रियांचा ऋतुकाळ—रजोदर्शनापासून चार दिवस व पुढील बारा दिवस मिळून १६ दिवस, हे दिवस स्वाभाविक ऋतुकाळाचे दिवस मानलेले आहेत.

श्लोक. ४७. रजोदर्शनापासून अकरा, व तेरा, ह्या रात्री निंदित मानलेल्या आहेत. ह्या दोन व प्रथम दिवसांच्या चार मिळून सहा रात्री निंदित होत.

श्लोक ४८. युग्म=pair, सम; रजोदर्शनापासून सहावी, आठवी, दहावी, बारावी ह्या रात्रींचे ठायीं स्त्रीगमन केलें असतां पुत्र होतो व अयुग्म ह्मणजे विषम ५।७।९।११।१३।१५ ह्या रात्रींचे ठिकाणीं गमन केल्यानें स्त्रिया ऽह० कन्या होतात.

श्लोक ४९. वीर्यामध्यें कमजास्तपणा झाल्यानेंही फरक पडतो, वीर्यामध्यें समता झाल्यानें जुळें, किंवा नपुंसक उत्पत्ति होते, निःसार क्षीण वीर्य असतां गर्भसंभव होत नाहीं.

श्लोक ५०. पूर्वी सांगितलेल्या ६ रात्री निंद्य व इतर आठ रात्री, अशा सोळा रात्रीं पैकीं १४ रात्री टाळण्याबद्दल शास्त्रकार सांगतात.

**धर्मलोपभयाद्राज्ञीमृतुस्नातामिमां स्मरन्** । रघुवंश सर्ग १, श्लोक ७६.

ऋतुस्नात स्त्रीचा अव्हेर करण्यानें गृहस्थाश्रमी पुरुषाला दोष आहे. **धर्मसिंधु**— "प्राग्रजोदर्शनात्पत्नीगमने ब्रह्महत्यादोषोक्तेः किंचित् प्रायश्चित्तं विधेयमिति भाति" ऋतौ तु गमनमावश्यकं अन्यथा भ्रूणहत्यादोषः । विरक्तस्य न कोऽपि दोष इति श्रीभागवते लोके व्यवायेतिपद्ये टीकायां च स्पष्टम् । ऋतुकालस्तु रजोदर्शनमारभ्य षोडशदिनपर्यंतं ज्ञेयः तत्र प्रथमदिनचतुष्टयैकादशत्रयोदशदिनेषु गमनं वर्ज्यम् अवशिष्टदशदिनेषु पुत्रार्थिना समदिने कन्यार्थिना विषमदिने गमनं कार्यम् । तत्राप्युत्तरोत्तररात्रीणां प्राशस्त्यम् । एकस्यां रात्रौ सकृदेव गमनंकार्यं सकृद्गमनं च युग्मासु सर्वासु आवश्यकमिति केचित् । अन्यकाले प्रतिबन्धादिना गमनासंभवे श्राद्धैकादश्यादिदिनेऽपि ऋतुगमनं कार्यमिति केचित् । स्त्रीणां वरमनुस्मरन् पत्नीच्छयानृतावपि गच्छन्न दोषभाक् किंतु ब्रह्मचर्यहानिमात्रं ॥ ऋतौ गच्छति यो भार्यामनृतौ नैव गच्छति । यावज्जीवं ब्रह्मचारी मुनिभिः परिकीर्तितः ॥ अष्टमीचतुर्दशीपौर्णिमाऽमा

वास्यासूर्यसंक्रान्तिवैधृतिव्यतीपातपरिघपूर्वदलविष्टिसंध्यासु मातापित्रोर्मृतदिने श्राद्ध-तत्प्राग्दिने जन्मनक्षत्रे दिवाच स्त्रीगमनं वर्ज्यम् ॥

**अर्थ**—रजोदर्शनापूर्वी स्त्रीगमन दोषास्पद आहे. जो करील, त्याला प्रायश्चित्त सांगितलें आहे. परंतु ऋतुकाळ प्राप्त झाल्यानंतर, स्त्रीगमन आवश्यकच होय. नाहीं तर बालहत्येचें पातक लागतें. मात्र विरक्त पुरुषांना, कोणताच दोष लागत नाहीं. हें श्रीमद्भागवतांमध्यें ' लोके व्यवाया–' या श्लोकामध्यें व त्यावरील टीकेंत स्पष्ट सांगीतलें आहे. स्त्रियांचा ऋतुकाळ, रजोदर्शनापासून १६ दिवसपर्यंत जाणावा. पहिले चार दिवस व ११।१३ हे दिवस वर्ज समजावे. बाकी दहा दिवसांमध्यें कन्या इच्छिणारांनीं, विषम दिवशीं, व पुत्र इच्छिणारांनीं समदिवशीं गमन करावें. रजोदर्शनापासून पुढील रात्रीं जास्त प्रशस्त होत. एका रात्रीं एकदांच गमन करणें व तें समरात्रींच प्रशस्त होय. कांहीं कारणानें गमनाला अड चणी असतील तरच मात्र श्राद्धतिथी, एकादशी, ह्या रात्रीसुद्धां गमन करणेस केवल अडचणी मनांत घेऊन योग्य होईल. असें कांहीं ग्रंथकारांचें मत आहे. स्त्रियांचे कामाचा नाश करणें, हें पाप आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन शास्त्रकार ऋतु काळा शिवाय सुद्धां गमन सांगतात कारण त्यायोगें पा नाहीं. परंतु ब्रह्मचर्याची मात्र हानि होते, हें लक्षांत असावें. जो ऋतुकाळा शिवाय स्त्रीगमन करित नाहीं, तो यावज्जीव ब्रह्मचारी मानला जातो. असें मुनिवचन आहे. अष्टमी चतुर्दशी पौर्णिमा, अमावस्या सूर्यसंक्रान्ती, वैधृति, व्यतीपात, परिघाचा पूर्वार्ध, कल्याणी, दिनरात्रीचा संधिकाळ, मातापितरांचा मृतदिवस, श्रद्धादिवस, श्राद्धदिवसाच्या पूर्वीचा दिवस जन्मनक्षत्र यावेळीं व दिवसास स्त्रीगमन वर्ज समजावें.

वरील सर्व धोरण ध्यानांत घेऊन, विरक्त पुरुषांशिवाय करून गृहस्थाश्रमी यांसही ब्रह्मचर्यव्रत कसें पाळतां येईल, याजबद्दल शास्त्रकार सांगतात; पर्वदिवस वर्ज केले, व सर्वच अशुभ दिवस वर्ज करायाचे योजिल्यास, मग कोणताच दिवस स्त्रीगमनास उक्त रहात नाहीं. ह्मणून मनुस्मृति श्लोक ५० मध्यें 'अन्यासु अष्टासु' या श्लोकांत ऋतुकालांतील १६ दिवसांपैकीं ६ दिवस वजा जातां, जे प्रशस्त दहा दिवस मानले, त्यांपैकीं ८ दिवस वर्ज करण्यास सांगतात. ह्मणजे प्रत्येक महिन्याचे ऋतुकाळांतील १६ दिवसांमध्यें दोन दिवसांची सूट ठेवितात. एका विद्वान् शास्त्र्यांचे मतें ऋतुकाळापासून ५।१६ हे दिवस उक्त असें ठोकळ मानानें समजावें.

त्या दोन दिवशीं सुद्धां जर कुयोग दूषित दिवस असेल तर तोही वर्ज समजावा. तात्पर्य–गृहस्थाश्रमी जर ब्रह्मचर्यव्रत पाळूं इच्छील तर वर्षाकांठीं एखाद दुसरा दिवसच स्त्रीगमनाला उक्त सांपडेल; इतकी तयारी असेल त्यास गृहस्थाश्रम पत्करून ब्रह्मचर्यव्रत पाळतां येईल, व त्याचें फळ मिळाल्यावांचून राहणार नाहीं.

**निंद्यास्वष्टासु चान्यासु स्त्रियो रात्रिषु वर्जयन् ।**
**ब्रह्मचार्येव भवति यत्र तत्राश्रमेवसन् ॥ ५० ॥** [ मनु. ]

निंद्य दिवस कोणते, व उक्त दिवस कोणते धरावयाचे हें कळण्यासाठीं निरनिराळ्या तज्ज्ञांच्या टीका या श्लोकावरील खालीलप्रमाणें दिल्या आहेत त्या वाचाव्या ह्मणजे खुलासा होईल.

( १ ) मेधातिथिः । निन्द्यासु षट्स्वन्यासु चानिन्द्यास्वप्यष्टासु रात्रिषु स्त्रियो वर्जयन् परिहरन्द्वे रात्री अवशिष्टे यदि गच्छति पर्ववर्जे तदा ब्रह्मचार्येव भवति ब्रह्मचर्यफलं प्राप्नोति । यत्र तत्राश्रमे वसन् अर्थवादोऽयम् । नतु वानप्रस्थाद्याश्रमेषु रात्र्यभ्यनुज्ञा जितेंद्रियत्वविधानात्सर्वाश्रमेषु गार्हस्थादन्येषु वीप्सायाश्चार्थवादतयाप्युपपत्तेः । एताश्च रात्रयो वर्ज्या न क्रमेणैव किं तर्हि यथेच्छया पर्ववर्जे गमनं यथा न भवति तथा रात्रिद्वयमभ्यनुज्ञायते । किं पुनर्ब्रह्मचर्यस्य फलं विशेषाश्रवणात्स्वर्गः । क्वचित्तु श्रूयते । न ब्रह्मचारी प्रत्यवैतीति । स्वल्पैरतिक्रमैर्न दुष्यतीति ॥ ५० ॥

( २ ) सर्वज्ञनारायणः । प्राक् निन्दितत्वेनोक्तासु षट्सु रात्रिषु तथान्यासु प्रशस्ततयोक्तानामपि दशानां मध्ये अष्टासु स्त्रियो वर्जयन्नस्मिन्नृतुषोडशकमध्ये रात्रिद्वयमेवोपगच्छन्नित्यर्थः । यत्र तत्रेति वचनात् । गार्हस्थ्य इव सपत्नीकवानप्रस्थेपि ऋतुगमनमस्तीति गम्यते । अन्यथा गार्हस्थ्येपीत्येवावक्ष्यत् ॥ ५० ॥

( ३ ) कुल्लुकः । निन्द्यासु पूर्वोक्तासु षट्सु रात्रिष्वन्यासुच निन्द्यास्वपि यासु कासुचिदष्टासु स्त्रियो वर्जयन्द्वे रात्री अवशिष्टे । पर्ववर्जिते व्रजन्नखण्डितब्रह्मचार्येव भवति । यत्रतत्राश्रमे वसन्निति वानप्रस्थापेक्षया । तस्य हि भार्यया सहगमनपक्षऋतुगमनंप्रसक्तं । नच वनस्थभार्याया ऋतुर्न भवतीति वाच्यम् । वनं पञ्चाशतो व्रजेदिति वर्षैरेकगुणां भार्यामुद्वहेत्त्रिगुणः पुमानित्यादि शास्त्रपर्यालोचनया तत्संभ-

वात्। मेधातिथिस्तु यत्र तत्राश्रमेवसन्नित्यनुवादमात्रं गृहस्थेतराश्रमत्रये जितेन्द्रियत्वविधानाद्रात्रिद्वयाभ्यनुज्ञानासंभवादित्याह गोविंदराजस्तूत्पन्नविनष्टपुत्रस्याश्रमान्तरस्थस्यापीच्छया पुत्रार्थे रात्रिद्वय गमने दोषाभावाप्रतिपादनार्थमेतत्। यत्र तत्राश्रमे वसन्निति वचनात्पुत्रार्थी संविशेदिति च प्रस्तुतत्वात्पुत्रस्य च महोपकारकत्वादित्याह हन्तगोविन्दराजेन विशेषमवितृष्णता। व्यक्तमङ्गीकृतमृतौ स्वदारसुरतं यतेः॥ ५० ॥

( ४ ) राघवानन्द,। निन्दिता एकादशी त्रयोदशी आद्याश्चतस्र इति षट्सु अष्टासुच अनिन्दितासु निशासु एवं रात्रिद्वयमवशिष्यते तयोर्गच्छन् ब्रह्मचार्येव भवतीत्यर्थवाद इति मेधातिथिः। गोविन्दराजस्तु ऋतावुपेयादेव अन्यभार्यां न व्रजेत् अनृतावपि भार्याप्रीतये व्रजेदिति। पर्ववर्जमित्युभयत्र संबध्यते। अत एव गौतमः। ऋतावुपेयादनृतौच प्रतिषिद्धवर्जं। याज्ञवल्क्योपि। यथाकामी भवेद्वापि स्त्रीणां वरमनुस्मरन्। सन्तत्यभावे आश्रमान्तरयोः कुटीचकवानप्रस्थयोरपि यत्र तत्राश्रमे वसन्निति स्वरसात् तादृशदिनद्वये गमनं युक्तम्। तद्दिनद्वयमष्टमीं वा चतुर्दशीमित्याद्यपर्वोक्ते रीति पञ्चाशदुत्तरं वनं प्रतिभार्यया सह गमननिधानेन स्त्रियाःपुत्रोत्पादनयोग्यकालत्वात् पुत्रार्थी संविशेदार्तवे स्त्रियमिति साधारण्याच्च यत्तु गृहस्थ एवैषां योनिरिरिति गौतमसूत्रं व्याख्यातं च हरदत्तेनेत्त्येषामपत्यं चण्डाल इति तदप्राप्तपत्नी विषयम्। स्वपत्न्यां न दोषोऽन्यथा यत्र तत्रेति मनुवचनविरोधः। कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्माः सनातना इति श्रीकृष्णोक्तेः। नाप्यर्थवादो द्रव्यसंस्काराङ्गकर्मस्वेव स इति। गृहस्थानां तु दिनषट्कं प्रशस्तम्. तदुक्तं याज्ञवल्क्येन। षोडशर्तुर्निशा स्त्रीणां तासु युग्मासु संविशेत्। ब्रह्मचार्येव पर्वाण्याद्याश्चतस्रश्च वर्जयेदिति ॥ ५० ॥

( ५ ) नन्दनः। निन्द्याः प्रथमाश्चतस्र एकादशी त्रयोदशी च तासु अष्टासु चान्यासु स्त्रीजनननिमित्तप्रतिनिषिद्धास्वयुग्मासु पञ्चमी सप्तमी नवमीपञ्चदशीप्रभुतिषु प्रजाफलरहितासु चतसृषुचेत्यर्थः। एकविंशीप्रभृतीनामृतोरकालत्वादष्टास्वित्युक्तम्। यत्र तत्राश्रमे गृहस्थाश्रमे वसन्नपि। एवमुद्रोढुर्नयमउक्तः॥ ५० ॥

( ६ ) रामचन्द्रः। निन्द्यास्वन्यासु अयुग्मासु रात्रिषु स्त्रियो वर्जयेदित्यर्थः। अवशिष्टासु गच्छन्ब्रह्मचारी भवति। यत्र तत्राश्रमेवसन् ब्रह्मचार्येव भवति भवेदित्यर्थः। अयमर्थवादो न तु वानप्रस्थाद्याश्रमेषु गार्हस्थ्यादन्येषु स्त्रियागमनम्॥५०॥

येणेप्रमाणें ब्रह्मचर्य व गार्ह्यस्थ्य या दोन आश्रमांत ब्रह्मचर्य यथाविधि यथाशास्त्र पाळलें गेलें तर, त्यापासून अंगाला सुगंध येतो. अल्पमळमूत्र होतें. शरीर

कान्ती, व शरीरावर तेज येतें. इंद्रियामध्यें ओज, धृति, उत्साह बल, कार्य करण्याची, व दुसऱ्यावर छाप बसविण्याची अद्भुत शक्ति, अंगीं प्राप्त होते. मन निर्विकार, शुद्ध, पवित्र, व बलवान् होतें. मोठाले विचार सुचून नवे नवे तर्क वाढतात. मन एकाग्र करणेंस सोपें जात असल्यानें, गुप्त, अदृष्ट असे नवे शोध लावण्याची लायकी येते.

## आसन

आसनांसंबंधें माहिती, पाद २ दोन सूत्रें ४६।४७।४८ यांत आहे ती पाहावी. आपल्या शरीरांत घामाच्या अनेक नळ्या सर्व शरीरभर पसरलेल्या आहेत, त्यांचें काम निरूपयोगी द्रव्यें, शरीरांतून बाहेर काढून टाकणें हें होय. जरी हें त्याचें काम आहे, तरी त्यांस आतून चलन वलन असेल तरच त्यांची कामगिरी त्यांच्या कडून पार पेडल. त्या जडच आहेत. त्या चेतन नव्हत. सबब त्या हालल्या जातील अशी कृती करून त्यांस चालन दिलें पाहिजे. घामाच्या ह्या नळ्यांवर हजारों, लाखों रक्ताच्या नळ्याचें वेष्टन आहे. ह्या रक्तनळ्या सर्व भागांना रक्त पुरवीत असतात. स्नायु व शिरा अगणीतच आहेत. त्यांच्या चलनवलनानें, शरीराला लागणारा प्राण व पोषण, ह्यांच्याच मार्फत मिळत असतें. ह्यांच्या हालचालींत अडथळा झाला तर शिथिलता ( Paralysis ) येत असते. शरीरांत जिकडे तिकडे अनेक हाडें आहेत. व हाडांचे सांधे, बिजागरांप्रमाणें आहेत. प्रत्येक सांध्यांत ईश्वरानें बिजागरें झिजूं नयेत ह्मणून, पातळ पदार्थ ठेविला आहे. सांधे हालले गेल्यानें, त्यांत गरमपणा उत्पन्न होऊन, नरमपणा येत असतो. सांध्यांतील पातलद्रव्य हालल्यानें, निरुपयोगी झालेलें द्रव्य पुढें ढकललें जाऊन, त्यांत नवेपणा उत्पन्न होत असतो; व तरतरी प्राप्त होत असते. सुस्ती जावी, तरतरी यावी, शरीराचे प्रत्येक भाग हालचालींत राहून हुशार बनावेत, जे भाग सहजगत्या हालले जात नाहींत, तेही हालविले जावेत, फुप्फुसांचा वरचा व खालचा भाग—जो शरीरयंत्रांतील सर्व यंत्रक्रिया सुरळीत चालण्याकरितां मुख्य आहे ब वरचा भाग विशेष कृतीशिवाय हलला न जाणारा असल्यानें रोगोत्पत्तीला कारण होणारा आहे, तोही हालला जावा, कुंडलिनी व ज्ञानाचीं कमलें, ह्यांचीही जागृती व्हावी; शरीराला इतर व्यायामानें श्रम वाटतात, थकवा येतो, तसा थकवा तर येऊं नये, व शरीराचे प्रत्येक भाग, मलरहित मजबूत निरोगी तर बनावेत ह्मणून शरीराच्या प्रत्येक भागाला व सर्व भागांना चलन वलन देण्याकरितां शरीराच्या निरनिराळ्या आकृत्या बनवून शरीर प्राण धारणेला लायक व्हावें, यासाठीं आसनें घालावयाचीं आहेत.

इतर व्यायामांनीं, दम लागतो, थकवा येतो, तसा थकवा आसनांनीं येत नाहीं. " समं कायशिरोग्रीवं अचलं " या प्रमाणें शरीराला वळण, लावल्यानें, बसल्या जाग्यावर तोंड बंद करून स्थिर झाल्यानें, व कांहींएक मेहनत न करितां, अति मेहनत करून, जसा घाम येतो, तसा आसनांनी घाम येतो. व शरीर साफ होत असतें. व हलकें होतें. इतकेच नव्हे तर, आसनापासून नाडीशुद्धि, शरीरारोग्य, व अंगीं चपलता येत असते ' आसनस्य फलान्वक्ष्ये प्रथमं नाडिशोधनं । द्वितीयं शरी-रारोग्यं तृतीयं चांगलाघवम् ॥

**अनलसत्वमुपस्थबलक्षयो अनिलबोधपटुत्वमनूर्मिता ।**
**पवनमंथरताप्युपजायते स्थिरमतेरिह पीठजयात्किल ।**

आसनें नित्य नियमित घातल्यानें, शरीराचे परमाणू बदलूं लागतात. जुने निरु-पयोगी झालेले परमाणू निघून जातात व त्यांची जागा नव्यांनीं व्यापली जाते. व असें होतां होतां म्हातारें शरीर असलें तरी, उमेदवाराप्रामाणें मजबूत तरतरीत होतें. माणूस निरोगी बनतो. नवीन परमाणूसंचय बराच होत गेल्यानें, व तो ब्रह्मचारी व्रतानें, टिकविला तर, मनुष्य फारच दीर्घायुषी होतो.


विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, नवशिकामनुष्य, घाई घाई करून लवकर पुढें, जाण्याच्या इच्छेनें, आसनें सुरू करून त्यांतच प्राणायामही करूं लागतो. परंतु हें करणें, हिताचें नाहीं. आसनें साध्य झाल्यानंतरच प्राणायामास सुरवात करा-वयाची असेत. आसनांना सुरूवात केल्यानें प्राणायामाला आपोआपच नकळत जरूर ती सुरवात होत असते. त्यांत आणखी प्राणायाम म्हणून, सुरू करून निराळे शरिराला हिसके बसून बिघाड होतो, तो करून घेऊं नये. कोणतेंही आसन तीन तीन तासपर्यंत सतत आनंदानें घालतां येऊं लागलें कीं मग प्राणायामाला सुलभ जातें. व प्राणायाम सहज साधतो म्हणून आसनाच्या सुरवाती बराबरच प्राणायामाला सुरवात करुं नये. आसनसिद्धि न होतां गुरुशिवाय हटानें जर प्राण कोणी रोकण्याचा म्हणजे प्राणायाम करण्याचा प्रयत्न करील तर त्याचा परिणाम शास्त्रकार सांगतात.

**प्राणायामेचयुक्तेनसर्वरोगक्षयोभवेत्**
**अयुक्ताभ्यासयोगेन सर्वरोगस्य संभवः ॥**
**हठान्निरुद्धः प्राणोऽयं रोमकूपेषु निःसरेत् ॥**
**देहोविदारयत्येष कुष्टादि जनयत्यपि ॥**
**ततः प्रत्यायितव्योऽसौक्रमेणारण्यहास्तिवत् ॥**

वरील ह्या इषारा लक्षांत घेऊन आसन जय झाल्याविना प्राणायामाला सुरवात करूं नये.

आसनें अनेक आहेत. सर्वांची माहिती पाहिजे तर व्यावहारिक योग पुस्तक वाचावें. परंतु साधारण शरीर निरोगी ठेवण्यासाठीं व सिद्धि मिळविण्यासाठीं, वसिष्ठ, मत्सेंद्रस्वामी, गोरखनाथ सारख्या मोठमोठ्यांनीं ज्या आसनांचा आश्रय केला व सिद्धि मिळविली तीं. पद्मासन, सिद्धासन, मत्स्येंद्रासन, गोरक्षासन, मुक्तपादवृक्षासन, शीर्षासन किंवा विपरीतकरणीं, मयुरासन वगैरे हीं होत.

## मुक्तपादवृक्षासन.




ह्या आसनानें छाती व बाहू मजबूत होतात. ( Constipation ) बद्धकतेची तक्रार साफ नाहिशी होते. धातूस्थानाच्या आसपासच्या नाड्या ताठ होतात.

## वज्रासन.

नं. १० आसनांत शरीर सरळ ठेवावें कसें हें हा फोटो दाखवितो. हें **वज्रासन** आहे. गीतेंत सांगितल्याप्रमाणें,


**समंकाय शिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः।**

**संप्रेक्ष्य नास्तिकाग्रंस्वंदिशश्चानवलोकयन्** ॥ गी. ६. १३.



# वज्रासन.

१६ **वज्रासन**—मुसलमान लोक नमाज पढावयास बसतात, त्याप्रमाणें बसून हात जोडणें; ह्यांत दोन प्रकार आहेत. पायांच्या टांचावर बसणें हा एक प्रकार; व पायांच्या टांचा अलग करून, कुले जमिनीवर टेंकून बसणें हा दुसरा प्रकार. सदरील फोटो हे इसम हठयोगविद्येंत निपूण असून, ज्यांनीं मजला प्रत्यक्ष हठयोगांतील सर्व क्रिया दाखवून शिकविल्या ते आमचे गुरूजी होत.




रा. **पांडुरंग गंगाधर नामजोशी,**

ठाकूरद्वार पोष्टाजवळ गंगारामखत्र्यार्ची चाळ—**मुंबई.**

## पद्मासन.

नं ११ **पद्मासन**—उजवा पाय डावे मांडीवर व डावा उजवे मांडीवर, ठेऊन, उजवे गुडघ्यावर उजवा व डावे गुडघ्यावर डावा हात तांठ ठेवावा, मान व पाठ सरळ ताठ करून बसावें.


**पद्मासने स्थितो योगी सर्व द्वाराणि रोधयेत् ।**
**मनः प्राणसहितं तु ब्रह्मरंध्रे स्थिरं भवेत् ॥**



# सिद्धासन.


नं. १९. **सिद्धासन**—उजव्या पायाची टांच जननेंद्रियावर मूत्राशयाच्या ( Bladder ) खालच्या बाजूस रेंटून लावावी. व त्याच खोटेंवर डावे पायाची टांच लावावी. ह्या आसनावर अनेक साधूनी सिद्धि मिळविली असल्यानें, ह्यास सिद्धासन ह्मणतात. हें सदोदित सर्वत्रांनीं करण्यास उचित आसन आहे.

चतुरशीति पीठेषु सिध्यासनं सदाभ्यसेत ।
द्विसप्तति सहस्राणां नाडीनां मलशोधनम् ॥
सिद्धासने स्थितो योगी माया बीजं पठेत् ध्रुवम् ।
दीर्घोच्चारणमात्रेण वशीभूता भुजंगमी ( कुंडलिनी ) ॥




# अर्धमत्स्येन्द्रासन.

**नं. २१ अर्धमत्स्येन्द्रासन**—उजवा पाय ढोंपरांत मोडून कुल्याखालीं घ्यावा. व घोंटा गुदाखालीं येईल म्हणजे घोंटा हें गुदाला बूज होईल असें बसावें. नंतर डावा पाय सोडून मांडीवरून जमिनीवर टेंकावा. व डाव्या पायाचें ढोंपर जें उचललें येतें तें हळूहळू उजव्या हातानें बगलेंत न्यावें; व बगलेंत नेल्यावर तो उजवा हात ढोंपराच्या पलिकडून नेऊन डावे पायाचा अंगठा चिमटींत धरावा. डावा हात पाठीवर ठेवावा. व तोंड पाठीकडल्या बाजूनें दिसण्याकरितां जितकें फिरवेल तितकें फिरवावें.




## गोरक्षासन.

नं. २२ **गोरक्षासन**—प्रथम उकीडवें बसावें; नंतर कुले उचलून पायाच्या दोन्ही खोंटा समोरासमोर एकालाएक लागतील अशा पुढें आणाव्या; नंतर पाय लववीत दोन्ही पायांच्या टांचा ह्म. पायांवरची टेंमकें जमिनीला टेकतील अशीं करावीं जमिनीला टेंकल्यानंतर ताठ सरळ बसून पोट ताठ करून उजवा हात उजव्या पायाच्या कमानीं खालून पुढें आणावा. पुढें आणील्यानें हाताचीं बोटें पुढल्या बाजूला चांगली स्पष्ट दिसतात अशा रीतीनें बसून पोट भकाळीं नेऊन पोटाला ताण बसेल असें तांठ व्हावें, व जालंदर बंद करावा. ह्या आसनानी स्वप्नावस्था बंद होते. गोरखनाथांचें हें प्रिय आसन होय.



# मंडूकासन.


**नं. ३४ मंडूकासन**—प्रथम मांडी घालून बसावें. दोन्हीं पायाचे तळवे उताणें करून मांड्या ढोंपरांसह रुंद कराव्या. उताणे तळव्यावर कुले टेकावे. किंवा चित्रांत दाखविल्याप्रमाणें ठेवावेत.



## शीर्षासन.


नं. ३८ **शीर्षासन**—ह्या आसनानें धातूसंबंधें सर्व विकार जातात. धातू-स्थानच्या नाड्या मजबूत बनतात. त्यामुळें, धातु पतन होत नाहीं.

नाभिदेशे स्थितो नित्यं भास्करो दहनात्मकः ।
अमृतात्मा स्थितो नित्यं तालुमूले तु चंद्रमाः ॥
वर्षत्यधो मुखश्चंद्रोग्रसत्यूर्ध्वमुखोरविः ।
करणं तच्च कर्तव्यं येन पीयूषमाप्नुते ॥
यत्किंचित्स्रवते चंद्रादमृतं दिव्यरूपिणः ।
तत्सर्वं ग्रसते सूर्यस्तेन पिंडो जरायुतः ॥




# मयूरासन.

नं. ४३ **मयूरासन**—ह्या आसनानें, उदररोगासारखे भयंकर रोग बरे होतात. दोन्हीं हात, तळवे जमिनीवर लागतील असे, बोटें मागें ह्मणजे अंगाकडे करून व दोन्हीं हाताचीं दोन्हीं कोंपरें दोन्हीं नळांनां रेंटून लावावीं. व त्या कोंपरांवर सर्व शरीराचा तोल संभाळून तांठ काठीसारखें आडवें व्हावें. प्रथम शिकतांना दोन्हीं हातांमध्यें अंतर राहिलें तरी हरकत नाहीं. परंतु संवय करितां करितां दोन्ही हात एकमेकांशीं मिळतील तर चांगलें. व दोन्हीं हातांचीं कोंपरें हीं बेंबीच्या देंटाशीं लागतील तर उत्तमच. ह्या आसनानें नळ दबले जाऊन शौचास साफ होतें. जठराग्नि वाढतो, व उदरासारखे रोग बरे होण्यास हा उत्तम उपाय आहे. बस्ति केल्यानंतर हें आसन करावें म्हणजे अवशिष्ट मळ बाहेर निघून जाईल.




# कुक्कुटासन.

**३२ कुक्कुटासन**—प्रथम पद्मासन घालावें; नंतर दोन्ही हात, मांड्या व पोटऱ्या यांचे मधून बाहेर काढावे; व दोन्ही हाताचे पंजे जमिनीवर टेंकून त्याच्यावर शरीराचा सर्व भार संभाळावा. या आसनानें योग्याचे दंड व छाती यांवर ताण बसत असल्यानें ती मजबूत होतात.



# सर्वांगासन.

**५१ सर्वांगासन**--प्रथम साफ उताणें निजावें; नंतर सबंध हात व **खांदे** जमिनीवर टेंकलेले असतात, ते तसेच जमिनीवर टेंकून त्यांवर जोर **घेऊन**, खांद्यापर्यंतचा सर्व भाग व पाय वर उचलून, ताठ करून स्थिर व्हावें, **साधकानें प्रथम दोन्ही** हातांचे टेंके पाठीच्या दोन्ही कण्यांना चित्रांत दाखविल्या**प्रमाणें होतील असें** करावें. सवईनें टेंके सोडून दोन्ही हात जमिनीवर ठेवावेत. यानें **मान पाठीचा** वरचा भाग व दंड यांस ताण बसतो, व ते भाग मजबूत होतात.



## उड्डीयानबंध.

**उड्डीयानबंध**-पोट भकाळीं बेंबिशीं आंत जितकें ओढून धरवेल तितकें धरावें बैठकीनें किंवा उभ्यानीं कोणत्याही तऱ्हेनें हा बंध साधावा. ह्या बंधानें, प्राण सुषुम्ना नाडीमार्गें उड्डान करीतो म्हणून ह्यास उड्डीयानबंध म्हणतात.

**उड्डीयनं तु सहजं गुरुणा कथितं सदा ।**
**अभ्यसेत्सततं यस्तु वृद्धोऽपि तरुणायते ॥**



---

हें पुस्तक लिहितांना ज्या पुस्तकाचा आधार घेतला त्यांची यादी.

रा. हरि नारायण आपटे यांनीं वाचस्पति यांचे टिकेसहित व्यासभाष्यासह प्रसिद्ध केलेलीं योगसूत्रें रा. साहित्याचार्य पंडित दामोदर गोस्वामी यांनीं मणि-प्रभाटीकाख्य वृत्तिसहित प्रसिद्ध केलेलीं योगसूत्रें रा. रावजी श्रीधर गोंधळेकर यांनीं प्रसिद्ध केलेलीं योगतत्वामृत सोमयाजी वे. मू. रा. लेले वाईकर शास्त्री यांनीं प्रसिद्ध केलेला संस्कारदर्श. भाग १ मनुस्मृति व श्रीमद्भगवद्गीता व उपनिषत्संग्रह.

**समाप्त.**